KÂVYASANGRAHA. 17.

# THE POEMS

OF

# ANANTAKAVI

(A POPULAR MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

*EDITED WITH*

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMANA DÂJÎ OKA,

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1896.

*Price One Rupee.*

*(Registered under Act XXV of 1867.)*

[ All rights reserved by the publisher. ]

काव्यसंग्रह. १७.

महाराष्ट्रकविअनंतकृत

# कवितासंग्रह.

हा


**वामन दाजी ओक,**

हेडमास्तर, हायस्कूल्, रायपूर;


यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन जुनाट हस्तलिखित अनेक प्रतींच्या आधारें शुद्ध करून, व चार परिशिष्टें जोडून तयार केला.

तो


मुंबईंत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१८९६.

किंमत एक रुपया.

महाराष्ट्र भाषेचें आणि कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

# अनुक्रमणिका.


| काव्यसंख्या. | काव्यनाम. | पद्यसंख्या. | पृष्ठसंख्या. |
| --- | --- | --- | --- |
| | **१. रामायणांतील आख्यानें.** | | |
| १ | सीतास्वयंवर .... .... .... .... | ११३ | १–१४ |
| २ | सुलोचनाख्यान .... .... .... .... | ७४ | १४–२५ |
| ३ | अहिमह्याख्यान .... .... .... .... | १०१ | २५–३५ |
| ४ | कुशलवाख्यान–प्रसंग पहिला .... .... | ७५ | ३५–४५ |
| | ,, ,, दुसरा .... .... | ९८ | ४५–५४ |
| | **२. कृष्णचरित्रांतील आख्यानें.** | | |
| ५ | गोपीगीत .... .... .... .... | २४ | ५५–५६ |
| | **३. महाभारतांतील आख्यानें.** | | |
| ६ | द्रौपदीस्वयंवर .... .... .... .... | ९६ | ५७–६८ |
| ७ | गजगौरीव्रताख्यान .... .... .... | ४४ | ६९–७४ |
| ८ | गरुडगर्वपरिहाराख्यान .... .... .... | ५९ | ७४–८१ |
| ९ | सुरथसुधन्वाख्यान–प्रसंग पहिला .... .... | १०० | ८२–९४ |
| | ,, ,, दुसरा .... .... | १०० | ९४–१०८ |
| | **४. स्फुट प्रकरणें.** | | |
| १० | रामदासस्तुति .... .... .... .... | ६ | १०८–१०९ |
| ११ | निर्वाणषट्क .... .... .... .... | ६ | १०९–११० |
| १२ | पदसंग्रह .... .... .... .... | ९ | ११०–११३ |
| १३ | श्रियाळचरित्र .... .... .... .... | २६ | ११४–११६ |
| १४ | पदसंग्रह (पुनः) .... .... .... .... | ५ | ११७–१२० |
| | **५. नवीन मिळालेलीं काव्यें.** | | |
| १५ | सुलोचनागहिंवर–प्रसंग पहिला .... .... | ६१ | १२१–१२९ |
| | ,, ,, दुसरा .... .... | ७५ | १२९–१३९ |
| | ,, ,, तिसरा .... .... | ६८ | १३९–१४९ |
| | ,, ,, चवथा .... .... | ६५ | १४९–१५६ |

| काव्यसंख्या. | काव्यनाम. | पद्यसंख्या. | पृष्ठसंख्या. |
|---|---|---|---|
| | सुलोचनागहिंवर–प्रसंग पांचवा .... .... | ९० | १५६–१६८ |
| | ,, उपसंहार .... .... | ४ | १६८– |
| १६ | बभ्रुवाहनाख्यान–प्रसंग पहिला .... .... | १०० | १६९–१८० |
| १७ | सिंहध्वजाख्यान (त्रुटित) .... .... .... | ८ | १८१– |
| १८ | पदसंग्रह (पुनः) .... .... .... .... | ७ | १८२–१८५ |
| १९ | पाळणे .... .... .... .... .... | २ | १८५–१८७ |
| २० | भूपाळ्या .... .... .... .... | २ | १८७–१८८ |
| | एकंदर ग्रंथसंख्या | १३९६ | |


# परिशिष्टें.


| अनुक्रमांक. | परिशिष्टनाम. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | पाठभेद .... .... .... .... .... .... | १–८ |
| २ | आणखी टीपा .... .... .... .... .... | १–२ |
| ३ | अधिक पद्यें .... .... .... .... .... | १–८ |
| ४ | शुद्धिपत्र .... .... .... .... .... .... | १–११ |
| ५ | पदांची सूची .... .... .... .... .... | १– |


---

## सूचना.

हीं परिशिष्टें तयार करण्याच्या कामीं अनेक 'काव्यसंग्रह'हितैषी मित्रांनीं साहाय्य केलें. रा० रा० वासुदेव मोरेश्वर कर्वे (भिंवडी), श्रीनिवास नीलकंठ सरमोकादम (वणी), चिंतो गोविंद वैशंपायन (पालशेत) भगवंत बाळकृष्ण पै रायकर (होडावडें) व कै० तुकारामपंत बावीसकर (बिलासपुर) यांनीं पहिलीं दोन परिशिष्टें तयार करण्याच्याकामीं हस्तलिखित प्रती मिळवून दिल्या आणि तिसरें व चौथें हीं परिशिष्टें तयार करण्याच्या कामीं रा० मोरो गणेश लोंढे यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून साहाय्य केलें यास्तव या सर्व सज्जनांचे आम्ही फारफार आभारी आहों.

**'काव्यसंग्रह'कार.**

# अनंतकवि.

कवी सभेचें मंडण । कवी भाग्याचें भूषण ।
नाना सुखांचें संरक्षण । ते हे कवी. ॥

रामदास.

प्रत्येक कवीचे उपलब्ध असलेले ग्रंथ छापून झाले ह्मणजे त्या कवीविषयीं जी माहिती मिळाली असेल ती एकत्र करून वाचकांस सादर करावी असा आमचा परिपाठ आहे. त्यास अनुसरून अनंताची कविता छापून झाली म्हणून त्याजविषयीं जी अल्प माहिती उपलब्ध आहे ती येथें देण्याचा विचार आहे.

अनंताविषयीं खरी माहिती अगदीं अभावरूप आहे. त्याचें कुलशील, गोत्र, जन्ममरणशक, जन्मभूमि, संतति, निधनस्थान इत्यादि अनेक गोष्टींतून एकही गोष्ट खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. तथापि वाचकांस सादर करण्यासारखें जें कांहीं आहे तें यथामति येथें देतों.

**जीवनवृत्त**–हा कवि श्रीसमर्थ रामदासस्वामींचा शिष्य असावा असें वाटतें. सातार प्रांतांत मेथवड ह्मणून गांव आहे तेथील रहिवासी अनंत गोसावी हे समर्थांचे शिष्य होते. त्यांस निलंगावादेस समर्थांनीं मठ बांधून दिला होता व ते तेथेंच राहात असत. पंढरपुरची वारीही नियमानें करीत असत. यांच्या संबंधानें उपलब्ध असलेली आख्यायिका पृष्ठ १०८ टीप ९ येथें दिलीच आहे. अनंत गोसावी हेच अनंत कवि असावेत असें दिसतें. या विधानास फारसा लेखाधार नाहीं हें येथें सांगावयास नकोच. तथापि 'ऐसा सद्गुरु तो अनंतकविचा जो निस्पृहांचा तुरा' असा 'रामदासस्तुति' प्रकरणातील एका श्लोकांत उल्लेख आहे. याहून जास्त माहिती उपलब्ध नाहीं हें आमचें महद्दुर्भाग्य होय. या कवीविषयीं कांहीं तरी विश्वसनीय आणि साधार माहिती मिळेल अशी आशा होती व तदर्थ प्रयत्नही करून पाहिला, परंतु सर्व खटपट निष्फळ झाली.

या कवीनें 'सुलोचनागहिंवर' व 'सुलोचनाख्यान' या काव्यांच्या शेवटीं समाप्तिशक अनुक्रमें शके १६४३ व १६४९ असा दिला आहे, यावरून प्रकृत कवि शके १६४९ पर्यंत हयात होता असें निश्चित होतें. याचा जन्म शके १५८०–८९ च्या सुमारास झाला असावा असें मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. सारांश हा कवि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत जिवंत होता असें सरासरीनें ह्मटलें तरी चालेल.

हा कवि रामभक्त असावा असें त्याच्याच कवितेंतील अनेक रामगौरव-पर पद्यांवरून दिसून येतें. (पृ० १४ श्लोक ११३; पृ० ३९ श्लोक १००; पृ० १९६ श्लोक ६९ पहा).

**कवितासंग्रह**—या कवीचीं काव्यें जीं आमच्या संग्रहीं होतीं व जीं आमच्या रसिकवर्य सन्मित्रांनीं मिळवून दिलीं त्या सर्वांचें प्रकाशन करून तीं महाराष्ट्रकाव्यरसलोलुपांस सादर अर्पण केलीं आहेत. या कवीला रामायणीयकथांची आवड फार ह्मणून बरींच काव्यें रामायणांतील कथांचा आधार घेऊन रचिलीं आहेत. शिवाय महाभारत, श्रीमद्भागवत, जैमिन्यश्वमेध इत्यादि सर्वमान्य ग्रंथांतील कथानकांवरही याची कविता आहे. याशिवाय १०।१२ पदें एवढीच काय ती कविता उपलब्ध आहे. अद्याप अनंताची न छापलेली अशी कविता पुष्कळ असावी असें वाटतें. या आमच्या विधानास सदर्हू कवीच्याच कवितेंत बराच आधार आहे. (पृ० १०८ श्लोक १००, पृ० १८० श्लोक १०० पहा). या कवीनें सर्व अश्वमेधग्रंथावर कविता केली असावी असा तर्क आहे. सुरथसुधन्वाख्यान व बभ्रुवाहनाख्यान हीं दोन प्रकरणें आम्ही छापिलीं आहेत ती मोठ्या काव्याचीं अंगें असावींत, कारण अनंताच्या नेहमीच्या परिपाठाप्रमाणें त्या प्रकरणांच्या आरंभीं ईशस्तव असावयाचा पण तो नाहीं. अनंताच्या इतर सर्व प्रकरणांच्या आरंभीं—कोठें सरस्वतीवंदन, कोठें गणपतिप्रार्थना, कोठें सद्गुरुस्तव, ईशपदवंदन आढळतें परंतु या दोन प्रकरणांच्या आरंभीं तें नाहीं म्हणून आमच्या तर्कास बळकटी येते. फार तर काय? या कवीनें केलेलीं 'ताम्रध्वजाख्यान' व 'मयूरध्वजाख्यान' हीं आख्यानें वयोवृद्ध गृहस्थांनीं आपल्या डोळ्यांनीं

पाहिलेलीं[१] आहेत. तसेंच या कवीनें 'ध्रुवाख्यान' केलें असून फक्त शेवटील एकच श्लोक सांप्रत उपलब्ध आहे[२]. यावरून अनंताची कविता अद्याप बरीच उपलब्ध व्हावयाची आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सुदैवेंकरून जर अप्रसिद्ध काव्यांच्या प्रती उपलब्ध झाल्या, तर आमच्या अनुमानाचा प्रत्यय येण्याचा संभव आहे.

**वर्णनशैली**–**अनंता**ची कविता जरी **वामनपंडित**, **मुक्तेश्वर** यांच्या बरोबरीची नाहीं तरी बरीच सरळ, मोहक, सुबोध व साधी आहे. **आनंदतनय** आणि **अनंत** ह्यांची गणना एकाच वर्गांत केली असतां चालेल. दोघांच्याही कवितेचा विषय एक दिसतो आणि त्यांनीं कथानकांची केलेली निवडही बरीच एकसारखी आहे. **आनंदतनया**च्या काव्यांत जे गुणदोष आढळतात तेच गुणदोष **अनंता**च्या कवितेंत दिसतात. तेव्हां **आनंदतनय** आणि **अनंत** यांची कविता तुल्यगुण होय असें समजलें पाहिजे. या कवीनें शब्दालंकाराच्या भरीस पडून अर्थालंकाराची उपेक्षा केली आहे असें नाहीं. कोठें कोठें शब्दालंकाराकडे चांगलेंच लक्ष पुरविलें आहे असें आढळतें. **अनंत**कृत काव्यनामावलीवरून सहज लक्षांत येईल कीं, त्याच्या कवितेंत युद्धप्रसंगाचा भरणा फार आहे. व त्यावेळीं वीररसस्फूर्तिजनक

---

१. या आमच्या विधानाच्या पुष्ट्यर्थ आमच्या **व**णीकर मित्राकडून आलेल्या एका पत्रांतील उतारा देतों:—'अनंतकवीच्या **बभ्रुवाहन, ताम्रध्वज, मयूरध्वजा**दि आख्यानाबद्दल अति शोध केला. **पत्ता लागला** परंतु मिळत नाहींत. **ता**म्रध्वजाख्यान–श्लोक ४५, **ब**भ्रुवाहनाख्यान–अध्याय २ त्रुटित वगैरे ग्रंथ हे·········हरिदास यांजवळ आहेत. ते हमेशा फिरत असतात. त्यांचें दोघे मुलगे आहेत त्यांस मागितलें असतां आज देतों, उद्यां देतों, सांपडत नाहीं, कांहीं दिवसांनीं पाहून देतों अशा चाळवणीनें आजपर्यंत मला घोटाळ्यांत ठेविलें. येणें करून मी मात्र आपणाशीं लबाड ठरलों. **हीं काव्यें मी खुद्द दृष्टीनें त्यांचेजवळ पाहिलीं.**············ते पंधरा दिवसांनीं वणीस आल्यानंतर माझेकडोन जितका प्रयत्न होईल तितका करून [पाहतों]'–[वणीकर मित्राचें पत्र–ता० २६ जून १८९४]. २. हा श्लोक असा आहे:—

**वै**कुंठाहुनि तो **गरूड ह**रिनें तात्काळ पालाणिला,
जेथें उग्र तपें धरूनि महिला त्या पर्वतीं स्थापिला, ।
**शा**क्रा दुर्लभ उंच थोर पद जें तेथें **ध्रु**व स्थापिला
**मेरू**चें शिखरीं **अनंतकवि**नें लक्षोनियां वंदिला. ॥ १ ॥

काव्यांची आवश्यकताही फार होती. कोठें कोठें तर या कवीनें फारच बहार उडवून दिली आहे. या उल्लेखाच्या समर्थनास पोषक अशीं अनेक उदाहरणें अनंताच्या कवितेंत आहेत, त्यांपैकीं कांहींचा वाचकांच्या सोईसाठीं येथें निर्देश करतों. नवयौवनप्राप्त सीतावयववर्णनांत त्या त्या देहांगास नुसती उपमा न देतां अलंकारयुक्त शब्दभूषणांनीं गौरविलें आहे (पृ० ४ श्लोक ३९–३८) तसेंच पुढें श्लोक ३९–४९ पर्यंत दागिन्यांचें वर्णन दिलें आहे. 'सीतास्वयंवरां'तील हा भाग पुष्कळांस चेतोहर वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. सीतेच्या सख्यांनीं रामास वंदन करण्यास सीतेला सांगितलें, तेव्हां नूतनपत्नीपदप्राप्ता सीता नैसर्गिक लज्जेस वश होऊन कसें निमित्त शोधून काढते व नमस्कार करण्याचें कसें टाळते याप्रसंगाचें चित्र प्रेक्षणीय उतरलें आहे. (पृ० १३ श्लोक १०६) तें पाहून या कवीच्या या खुबीदार वर्णनशैलीची कोण तारीफ करणार नाहीं? तसेंच वाल्मीकिऋषी 'नको नको' ह्मणून निषेधीत असतां लहुबाळ मोठमोठ्या वीरांशीं युद्ध करण्यास सरसावला हें वीरसूनूस जसें भूषणप्रद आहे तसें कवीसही भूषास्पद आहे. पुनः त्याच्या व शत्रुघ्नाच्या संवादांतील कोटिक्रम मनास चटका लावणारा आहे. (पृ० ३८ श्लोक २८–३१). रणांत लवाचा पाडाव झाला हें ऐकून सीतेनें केलेला शोक वाचकांच्या हृदयांस पाझर फोडल्यावांचून राहणार नाहीं. (पृ० ४१ श्लोक ४७-९०). शोकान्तीं सीता लवास आठविते इतक्यांत कुश प्राप्त होतो व युद्धाचा दुष्ट परिणाम ऐकून क्षम्य गर्वोक्तीनें स्वपराक्रमाचें वर्णन करून मातेचें सांत्वन करितो (पृ० ४२ श्लोक ९९–९७) तो प्रसंग रघुकुलसंभव वीरबालकाच्या स्वभावास अनुरूप नाहीं असें ह्मणण्याचें साहस कोण रसिक करील? जे जात्या वीर असतात त्यांसच अशी दर्पोक्ति साजते. तसेंच दुर्जनचित्तास तापलेल्या तेलाची उपमा दिली आहे ती तर फारच समर्पक आहे. (पृ० ८९ श्लोक ९२।९३).

अनताच्या काव्यांत 'सुलोचनागहिंवर' हें प्रकरण सर्वोत्कृष्ट उतरलें आहे. त्यांत कवीनें आपल्या कर्तबगारीची शिकस्त केली आहे. कित्येक स्थळीं अशी वर्णनचमत्कृति केली आहे कीं, ती पाहून कौतुकच वाटतें. इंद्रजित् व लक्ष्मण यांच्यामध्यें निकराचें लोमहर्षण युद्ध झालें व आपल्यास जय मिळणें अशक्य आहे असें लक्ष्मणास वाटलें, तेव्हां त्यानें आपणास पूज्य असलेल्या सर्वांवर हवाला ठेवून बाण सोडला. ( पृ० १३६ श्लोक ९९–

६३ ) त्या प्रसंगाचें वर्णन फारच हृदयंगम वठलें आहे. सुलोचनेचा महाल, व तिचें वैभव यांचें वर्णन वाचून त्याचें प्रतिबिंब आपल्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभें असल्याचा क्षणभर भास होतो. तसेंच सुलोचनेनें रामदर्शन घेतलें तेव्हांचें रामरूप कवीनें वर्णिलें आहे ( पृ० १९७ श्लोक ९-७ ) तें वाचून एखादा हुशार चितारी तेव्हांच अनंतानें वर्णिल्याप्रमाणें रामाचें चित्र काढील असें वाटतें. योग्यतेच्या मानानें पाहिलें असतां 'सुलोचनागहिंवर' याच्या खालोखाल 'कुशलवाख्यांना'स जागा दिली पाहिजे. अनंताच्या चांगल्या काव्यांपैकीं हें एक होय. यांतही मनमोहक अशीं अनेक स्थळें आहेत. याशिवाय इतर काव्यांतून अनेक रमणीय स्थळें मधून मधून दृग्गोचर होतात. अनंताची सर्व कविता वाचकांपुढें आहेच, तेव्हां आणखी स्थळें दर्शविण्याच्या भानगडींत विस्तारभयास्तव व स्थलसंकोचास्तव आम्ही पडत नाहीं.

अनंतास अनुप्रासांची मोठी आवड होती असें दिसतें. त्यानें त्यांची कोठें कोठें गर्दी उडवून दिली आहे. ता, ते, णे, री, नी, सा, टा, इत्यादि अक्षरांची आवृत्ति वारंवार ज्यांत झाली आहे, अशीं पद्यें त्याच्या कवितेंत पुष्कळ आहेत.

**भाषा**—अनंताची भाषा शुद्ध, साधी आणि सरस आहे. तथापि बऱ्याच ठिकाणीं अव्यवस्थित प्रयोग आढळतात. सर्वांत लेखनशुद्धीच्या नियमांचा अतिक्रम हा दोष मोठा आहे. आतां हें खरें आहे कीं, अनंताच्या वेळीं सर्व व्यवहार मोडीलिपींत चालत असे. शिवाय मराठीभाषेच्या लेखनशुद्धीकडे त्याच्या पूर्वकालीन व समकालीन कविजनांनीं फारसें लक्ष्य पुरविलें आहे असें नाहीं. यामुळें अनंताचा हा दोष क्षम्य आहे असें म्हटलें असतां त्याची बाजूवीपेक्षां ज्यास्त तरफदारी केल्याचा दोष आम्हास कोणीं लावील असें वाटत नाहीं.

अनंताच्या कवितेंत 'खेव', 'दिठी' 'वोजे' 'लाहो' 'भोजे' अशासारखे जुने शब्द फारसे आढळत नाहींत. 'नृपू', 'लंकेशू' 'वेळू' 'विस्मयो' इत्यादि अकारान्त नामांचीं उकारान्त व ओकारान्त रूपें कोठें कोठें डोकावतात. तसेंच ज्या कर्मणिरूपांचा प्रचार मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्याशिवाय अन्य कवींच्या कृतींत आढळत नाहीं तीं रूपें 'बैसिजे' 'कीजे' इत्यादि—या कवीच्या काव्यांत क्वचित् स्थलीं दृग्गोचर होतात. जेथें संधि

कर्तव्य असून केला नाहीं अशीं स्थळें, अप्रशस्त समास, ऱ्हस्वाचें दीर्घ, व दीर्घाचें ऱ्हस्व अशीं रूपांतरें इत्यादि प्रकार त्यांच्या कवितेंत आढळतात. त्यामुळें त्याच्या कवितेची मनोहरता फारशी कमी झाली असें नाहीं. पण

'सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यम्'

या कालिदासोक्तीप्रमाणें त्याच्या काव्याला उलटी जास्त शोभा देतात! आपल्या कविताकुमारीला दृष्ट लागूं नये म्हणूनच जणूं काय अनंतानें क्षुद्रदोषरूप कज्जलतिलक तिला लाविला आहे असा भास होतो!

अनंताच्या कवितेंत परकी भाषेंतील शब्द—फारशी, उर्दू इत्यादि फारसे आढळत नाहींत म्हणून अनंताची भाषा ज्यांत भेसळ नाहीं अशा सोन्यासारखी आहे, असें साधारणतः ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

**विद्वत्ता**—अनंताचा हिंदी व संस्कृत ह्या भाषांशीं बराच परिचय होता असें त्या त्या भाषांतील त्यानें जे शब्द योजिले आहेत, त्यांजवरून वाटतें. तसाच त्याचा छंदशास्त्र व व साहित्यशास्त्र यांच्याशींही परिचय असावा असें वाटतें. त्यानें संस्कृत भाषेंतील शिखरिणी, शार्दूलविक्रीडित, पंचचामर, स्वागता इत्यादि अक्षरगणवृत्तांत कविता रचिली आहे व मराठी भाषेच्या सौंदर्यास भर घातली आहे. तसेंच रूपक, कारकदीपक, पर्यायोक्त, उपमा इत्यादि अलंकारांच्या साहाय्यानें आपल्या कवितेस मधून मधून भूषविलें आहे. मराठी भाषेच्या आद्यवृत्तांस—ओव्या, अभंग, दिंडी यांस—यानें अगदीं हद्दपार केलें आहे असें नाहीं. त्यांचाही प्रसंगवशात् आदर केला आहे.

अनंताच्या कवितेविषयीं आम्हांस जें काय वाटतें तें वर लिहिलेंच आहे. तें 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' या न्यायानें कोणास अपूर्ण वाटेल, कोणास अयथार्थ वाटेल व कोणास तर अरुचिकरही वाटेल हें आम्ही जाणून आहों. यास्तव प्रस्तुत लेखांत कोणास कांहीं गैर अथवा संशोध्य आढळल्यास मेहरबानी करून आम्हांस कळवावें अथवा छापून प्रसिद्ध करावें अशी सविनय सूचना आहे. आतां रसिक विद्वज्जनांस अखेरची विनंती अनंताच्याच वाणीनें करून हा त्याजविषयींचा अल्प लेख समाप्त करतों:—

"कोठें अंतर जें असेल पडिलें, तें ते करावी क्षमा,
हे माझी विनती असे, चतुर हो! बद्धांजलीनें तुम्हां. ॥"

[अनंत–सुलोचनाख्यान–७१.]

# अनंतकविकृत काव्यें.

## रामायणांतील आख्यानें.

### सीतास्वयंवर.

(श्लोक.)

सिद्धिबुद्धिवर! मंगलमूर्ति! दे मला गणपती! अतिस्फूर्ति. ।
वंदितों तुज सरस्वति! माते! वक्त्रिं[१] राहुनि कृपा करिं मातें. ॥ १
चिंतितों सदय सद्गुरुराया! शीघ्र सदृढ भवाब्धि[२] तराया; ।
श्रोतयां विनविं जोडुनि पाणी, आयका सकळ बोबडि वाणी. ॥ २
अहल्या शिळा राघवें मुक्त केली; जडत्वासि[३] टाकूनियां दिव्य झाली; ।
रघूनायकें आणिलें गौतमाला, अहल्या करीं घातली पुष्पमाळा. ॥ ३
अहल्या म्हणे, 'राघवा! तूं दयाळा! वियोगासि संयोग केला नृपाळा! ।
पुढें तूज स्त्री प्राप्त होईल रामा! 'तथास्तू'[४] म्हणे हा आशीर्वाद[५] आम्हा.॥४
उद्धरूनि पदिं गौतमजाया सिद्ध होति मिथिले[६]प्रति जाया ।
कौशिकादि[७] म्हणती, 'रघुनाथा! चाल तूजचि वरी महिसूता[८].' ॥ ५

(दिंड्या.)

विश्वामित्रें केला यज्ञ थोर, तेणें मेळविले ऋषीश्वर, ।
स्वयंवरासी चालिले थोर थोर, त्यांचीं नामें परीसा सादर. ॥ ६
महासुक्त, माध्येम भार्गव, गृत्समद, सप्तर्षि वामदेव, ।
अत्री, भरद्वाज महानुभाव[९], असंख्यात चालिले भूदेव[१०]. ॥ ७
औधवा ही, वैशंपायन, मौदवी हा, तो आश्वलायन, ।
महापयंगी, सनक, सनंदन, सनत्कुमार आणि सनातन. ॥ ८
धर्माचार्य जाणती बाहाव्ये, पराशर साकल्यें बाभ्रव्ये ।
महाभारत, मांडुक, मांडव्ये, भाष्य भारत सुलभ लव्ये. ॥ ९

---

१. मुख. २. संसारसागर. ३. पाषाणत्वास. ४. तसें होवो. ५. शब्दाची ओढाताण केल्याचें हें उदाहरण आहे. ६. जनकनगरी. ७. विश्वामित्रादि. ८. भूकन्या.(सीता.)९. मोठा आहे प्रभाव ज्यांचा असे. १०. ब्राह्मण.

(श्लोक.)

ऋषी **राम सौ**मित्र ते शीघ्र आले; पुरा बाह्य येवोनियां स्थीर झाले; ।
**वि**देहा[१]प्रती सांगती दूत वार्ता; 'ऋषी आणिले' ऐकतां तोष चित्ता.॥ १०
प्रधाना सवें घेउनी बाह्य आला, समस्तांसि रायें नमस्कार केला. ।
उठोनी ऋषी क्षेमे[२] देती नृपाशीं; नृपें देखिला **रा**म तो तेजराशी. ॥ ११
**र**घूराजवक्रांबुजीं लुब्ध झाला, न सोडी जसा भृंग नीलोत्पलाला[३]; ।
ऋषी सावधा बोलताती **वि**देहा, 'त्वरें चाल, आम्हांसि नेईं स्वगेहा.'॥१२
**वि**देहांतरीं थोर झाली अशंका; पुसे **कौ**शिका[४], 'भीड सोडोनि देखा, ।
तुम्हीं कोठुनी आणिलीं दोन रत्नें? तुम्हां प्राप्त कैसेनि झालीं प्रयत्नें?'॥१३

'पृथ्वीअंतरिं **सू**र्यवंशजलधीमध्यें महापर्वणी,
**कौ**सल्योदरशुक्तिका **द**शरथस्वातीजळें गर्भिणी; ।
झाले सुंदर पूर्ण मास; सदनीं निर्माण हीं मौक्तिकें
होतां, निर्जर[५] येउनी वरषती, आनंदती कौतुकें. ॥ १४
ऐसें म्यां परिसोनि जाउनि नृपा अत्यादरें प्रार्थिलें,
'यज्ञा रक्षक पुत्र देइं मजला,' दोघांसि मागीतलें. ।
कंठींचे जिव काढुनी मम करीं दिल्हे अतीसंकटें;
देवोनी नरवीरसे उभयतां कीं जे बहू गोमटे[६]. ॥ १५
दोघे नंदन घेउनी क्रमिं, पथीं आली पुढें राक्षसी.
**रा**में ओढुनि चाप तीक्षण शरें ताडोनि पाडी तिसी. ।
माझा रक्षुनि यज्ञ पूर्ण करितां, आली तुझी पत्रिका,
येतां **रा**घव पाहि तों जड शिळा झाली **वि**धीपुत्रिका[७]. ॥ १६
**श्री**रामें पद लावुनी जडपणापासोनि उद्धारिली.
तेव्हां **गौ**तम आणुनी **र**घुविरें ज्याची तया अर्पिली. ।
ऐसे **दा**शरथी पराक्रमि बहू हे सैंवरा[८] आणिले.'
बोले तो नृपती, 'सुलाभ घडला' वंदी ऋषीपाउलें. ॥ १७

क्षणक्षणा **राम**मुखा भुकेला. मनीं म्हणे, 'मीं पण व्यर्थ केला; ।
कैसेनि हा लाविल चाप सीता[९]? वरील हा बाळक काय **सीता**?'॥१८
समृद्धि अन्नोदक तें बिऱ्हाडीं करोनि, नेले ऋषिचे वऱ्हाडी; ।

---

१. जनकराजा. २. आलिंगन. ३. निळ्या कमळाला. ४. विश्वामित्र. ५. देव. ६. सुंदर.
७. अहल्या. ८. स्वयंवरा. ९. धनुष्याची दोरी.

घेवोनि आज्ञा ऋषिची निघाला, अमात्य घेवोनि सभेसि आला. ॥१९
राये मंडप घालुनी मग सभा शृंगारिली कूसरी;
लोपे ते अलकापुरी[1], सुरपुरी[2] ते ही न पावे सरी[3]. ।
दूतां धाडुनियां सभेसि जनकें पाचारिले भूपती.
आले ते महिचे असंख्य नृपती, वक्रें गणावे किती? ॥ २०
अंग वंग भूपती कलिंग शुंग पावती.
गौड गुर्जरादि कामबोज भोज धांवती. ।
मागध माळवी नृपाळ चोळ भार चालले.
मलियाळ पांचियाळ नेपाळ सर्व पातले. ॥ २१
कामवीर कामरूप काश्मिरादि विक्रमें
द्रवीड रायचोर केरळादि येति संभ्रमें. ।
त्रिगूळ ते त्रिलिंगराय सैंवरा उचाटले.
अचाट ते सुराष्ट्र माहराष्ट्र सभे पातले. ॥ २२
मानदेश खानदेश राय वांइ देशिंचे,
वऱ्हाड मारवाड लाड गौड गूजराथिंचे, ।
भद्रिपाट बद्रिकेदारिंचे ते भूपती
अचाट जाट ते दहाट आट काट मीळती. ॥ २३
जे चउली प्रयाग रूम हापसाण देशिंचे
भींवडी कल्याण बागलाण कालठाणिंचे. ।
वेदनूर चंदाऊर बंकापूरिंचे किती?
मछलिबंदर रायबाग देशिंचे विलासती. ॥ २४
गोलकुंडि काबुलादि भूप हिंदुस्थानिंचे,
शीवकांचि सोरटिचे राय सोमनाथिंचे, ।
घटीपली बिजापूर भागानगरिंचीं दळें
येति झाडिंचे द्रवीड फिरंगाण ते बळें. ॥ २५
बीड ते लाहूर वीर शूर ते शृगालिंचे,
मऱ्हाट हाटकर येति राय देशदेशिंचें, ।
समस्त भूपती सभेसि वैभवासि दाविती.
'वंद्य वंद्य राय' त्यांसि बंदिलोक वानिती. ॥ २६

---

१. कुबेरनगरी. २. अमरावती. ३. तुलना.

जनक जाउनी सुनम्र प्रार्थितो ऋषीश्वरा,
'चालिजे सभेसि, राम घेउनी, कृपा करा. ।
अनाथ मी, ऋषी तुम्ही, सनाथ केलें पाहिजे,
आपुला समूह घेउनी, सभेसि बैसिजे.' ॥ २७

नम्र भूपती बहुत बोलिला. ऐकतां ऋषीस हर्ष वाटला. ।
राम लक्ष्मणासि घेउनी सभे पावतांचि; राव राहिले उभे. ॥ २८
ते क्षणीं ऋषी समस्त बैसले, नम्रतेकरूनि रायें पूजिले. ।
'तें धनुष्य आणुं कीं सभांतरीं,' विप्र बोलती, 'आणिं नोवरी.' ॥ २९
जाउनी नृपू स्वकीय मंदिरा सांगे, 'शीघ्र सिद्ध नोवरी करा.' ।
त्या वधूसि लावितां हरिद्रिका, ऊपमेसि बाळ भानु तो तुका. ॥ ३०
गौर जानकी बहुत कांतिसीं, त्यावरी हरिद्रा चर्चिली तिशीं; ।
जाणों हाटकासि ओपें दीधलें, तेंवि जानकीचें आंग ऊटिलें. ॥ ३१
रत्नयुक्त रुक्मकुंभ ठेउनी गुंफिताति तंतुनें वऱ्हाडिणी; ।
त्यांत बैसवीति ते अयोनिजा, न्हाणिती सुमंगळें नृपात्मजा. ॥ ३२
न्हाणुनी स्वमंदिरांत आणिली, विद्युतेपरी[च] चीर नेसली; ।
पल्लवीं निवीड शुद्ध मौक्तिकें साम्यतेसि शुक्र पाहतां फिकें. ॥ ३३
अंगिं रेखिली सुरत्न कंचुकी, बैसली सुखासनीं ति जानकी; ।
घालिती सुवासिनी सुकज्जला, नेत्र पाहतां विस्मिताबला. ॥ ३४

(सवाया.)

नेत्र इचे अति चंचळ देखुनि, घालिति मत्स्य जळीं शरिरासी.
वर्तुळ आणि विशाळ विलोकुनि, नित्य कुरंग फिरे वनवासी. ।
अंजनयुक्त सुसुंदर पाहुनि, लज्जित खंजन लंवि दिशांसी.
सूर्यविकासिनि पद्मिनि नेत्रदळां पाहतां करि म्लान मुखासी. ॥ ३५
देखुनियां मुखचंद्र इचा, नभिं चंद्र म्हणे, 'मज स्पर्धि उदेला,
यासि कळंक नसे, मजमाजि कळंक,' म्हणोनि सचिंत हि झाला. ।
'षोडश ह्या मजलागिं कळा, अधरामृत मिश्रित बत्तिस त्याला.'
यास्तव तो शशि होउनि क्षीण दिसेंदिस वाळवि त्या शरिराला. ॥ ३६

---

१. हळद. २. सूर्य. ३. सोनें. ४. उजळा. ५. सोनें. ६. सीता. ७. हरीण. ८. पक्षिविशेष. ह्याची नेत्रसौंदर्याविषयीं ख्याति आहे. ९. त्या मुखचंद्राला.

चंचुचि नासिक देखुनियां, शुक लाजुनि पंखिंचि चंचुसि खोंवी.
आस्य तिचें अतिहास्य पहा, अमवास्येसि लास्य चकोरिस दावी. ।
सुंदर दाडिम 'मी' म्हणे 'दंत इचे पहतां उललें निज देहीं ?
बिंब प्रवाळ सुधारस सुंदर सुस्थळ देखुनि होति च स्थायी. ॥ ३७
मुष्टिप्रमाण इची कटि पाहुनि, जाउनि सिंह द्विपांतरिं राहे.
'हे गति तों मज नाहिं' म्हणे गज, यास्तव मस्तक डोलविताहे. ।
पद्मदळाहुनि कोमळ सुंदर, राबति त्या सखियांद्वय, पायें;
आणुनि पादयुगांगुळिं भूषण लेववितो ललना लवलाहें. ॥ ३८

(श्लोक.)

अंगुष्ठद्वयिं शोभती अनवटें, तीं जोडवीं चोखटें
पोल्हारें विरुद्या दशांगुळिं वळीं गर्जोनियां पोंचटें, ।
वांकी गुर्जरिया, सुनूपुरझणत्कारें विलासे सिता;
कन्येचा पृथिवी विलास पहतां आनंदली तत्वतां. ॥ ३९
रुक्में[1] मंडित रत्न मिश्रित प्रभा फांसे[2], विलासे सती.
पाचू[3] माणिक[3] पद्मराग[3] मर्कत[3] वैडूर्य[3] रत्नद्युती, ।
गोमेदांकित[3] इंद्रनील[3] जडिले पेरोज[3] ते खेवनी[3],
ऐसें तें कटिसूत्र सुंदर कटीं ल्याली क्षितीनंदिनी[4]. ॥ ४०
मणबंधीं[5] मणिभूषणें करुनियां, तीं कंकणें शोभती.
त्यांपूढें गजरे, करांगुळिं वळीं, त्या मुद्रिका[6] राजती. ।
दोहींतें भुज वाजुवंद अवळी चोळीवरी लेइली.
कांचोळीवरि हंस मोर लिहिले मोत्यें बहू खीळिलीं. ॥ ४१
चीतांका चिंचपेटिया गळसरी, ते एकदाणे किती ?
मोत्यांचे सर आणि पंचलडि तो कंठा गळां बांधिती. ।
कंठीं ताइत गोफ दाट पुतळ्या, त्या गोंविच्या सांखळ्या,
नाना मौक्तिक रत्नहार हृदयीं, त्यामाजि चांफेकळ्या. ॥ ४२
आधीले बुगड्या फुल्या तळिं पहा बाळ्या वहूतांपरी,
खुंटा टोप असे विशाळ झुबका मासोळि कोंथिंबिरी. ।
नागोत्रे श्रवणीं, विराजति, फुल्या,. त्या दूहिरी सांखळ्या;
त्यांचे हलक खोंविती वरि, परी मत्स्या पहा मोकळ्या. ॥ ४३

---

१. सुवर्ण. २. प्रकाशे. ३. हीं रत्नांचीं नांवें आहेत. ४. सीता. ५. मणगट. ६. अंगठी.

नाकीं बेसर घातलें, मज गमे, त्रैलोक्य मोलागळें.
भाळीं सुंदर शोभतो बिजवरा, भांगीं सुमुक्ताफळें. ।
दोन्ही मस्तकिं राजती, रविशशी देखोनियां बोलती,
'आम्ही व्यर्थचि फीरणें' म्हणउनी अस्ताचला धांवती. ॥ ४४
जैसा चक्रफणीवरी मणि दिसे, वेणी तशी साजिरी;
त्याली राकडि मूद बोर कळि ते, शोभे तळीं कूहिरी. ।
त्या खालीं फुल, तोचि ताइत पहा, झीब्यावरी आंवळे,
गोंडे ते कटिं लोंबतां चि दिसती, दोन्ही जसे जावळे. ॥ ४५
यापरी करूनि सिद्ध नोवरी, बैसली अयोनिजा गजावरी. ।
देखतां तिशी गभस्ति[1] झांकला. सुप्रभे प्रकाश थोर फांकला. ॥ ४६
भोंवती असंख्य दासिचीं शतें, मध्यभागीं रूप तें विराजतें. ।
जेंवि चंद्र तो उडूगणांतरीं[2] तेंवि शोभते सिता [हि] सुंदरी. ॥ ४७
स्वर्गि मेनकादि त्या तिलोत्तमा, त्यापरीस दासि सर्व उत्तमा, ।
त्या गजावरी बसोनि चालिल्या, वेत्रधारिणी सभेसि पातल्या. ॥ ४८
चामरासि वीजती[3][च] दूतिका; पातली सभेसि भूमिबाळिका; ।
पावतां सभेसि फांकली प्रभा; त्या प्रभे करूनि झांकली सभा. ॥ ४९
दीप्ति दाटतां सभेसि, भूप नेत्र झांकिती.
थोर थोर राय अंतरीं विचार तर्किती; ।
काय ऐकतांचि सूर्य सैंवरासि पातला?
याजसाठीं ह्या सभांतरीं प्रकाश दाटला. ॥ ५०
एक बोलताति, 'व्यर्थ तर्क कां तुम्ही करा?
पातली सभेसि भास्करोपमा[4] हि सुंदरा.' ।
यापरी नृपें सभेसि आणिली ति नोवरी;
सेवकां म्हणे, 'धनुष्य आणिजे सभांतरीं.' ॥ ५१
राय बोलतां, अमात्य सेवकादि धांवती.
जाउनी धनुष्य तें असंख्य लोक ओढिती. ।
पाठिं कोटि मत्त हस्ति लोटिताति मस्तकें,
आणिलें सभेसिं ओढूनी अनंत हस्तकें. ॥ ५२

---

१. सूर्य. २. नक्षत्रसमूहामध्यें. ३. वारा घालिती. ४. सूर्यासारखी.

ते क्षणीं उठोनि भूप बोलिला सभांतरीं,
'चाप सज्य जो करील त्यासि नोवरी वरी.' ।
ऐकतांचि **अंग वंग कैकयादि** बोलिले,
'देणें नाहिं नोवरी म्हणोनि विघ्न निर्मिलें.' ॥ ९३
राव ते तटस्थ होउनी सभेसि बैसती;
तों [1]**कुबेरबंधु** पूजुं चालिला [2]**पशूपती**, ।
ते क्षणीं [3]**प्रहस्त** घेउनी विमानिं बैसला.
[4]अंबुधीमधूनि **शंभु**पूजनासि चालिला. ॥ ९४
[5]व्योममार्गिं [तें] विमान पातलें परी, वरी
वाद्य वाजताति, नाद कोंदला दिगंतरीं. ।
ऐकतां **दशाननें** सचीव यासि पूशिलें.
तेणें सर्व वृत्त ही **दशानना** निरूपिलें. ॥ ९५
'**विदेहराजयासि** कन्यका सुरत्न लाधलें,
मंदिरीं नृपें तिच्या स्वयंवरासि मांडिलें. ।
धाडुनी मुळें, समस्त आणिले चि भूपति.'
ऐकतांचि **रावणें** विमान प्रेरिलें क्षिती. ॥ ९६
दूरि देखतां **दशाननासि** राय बोलती,
'लग्न हें चि विघ्न पातलें असे सुनिश्चिती.' ।
देखतां समीप **रावणासि** राय उठले.
त्या सहीत बैसले, परंतु कंप सूटले. ॥ ९७

गर्जोनि **रावण** म्हणे, '**जनका** ! **विदेहा** ! धाडोनि आणिसि मुळें नृपती स्वगेहा,
नेणेसि रे ! अझुनि तूं मज **रावणाला**, **कैलास** हालवुनि दाविन मीपणाला. ॥९८
कन्या तुझी वहुत सुंदर आयकोनी, आलों असें त्वरित बैसुनियां विमानीं; ।
मातें वरील तरि, मीं वदुं काय वाचे ? [6]सूरांगना चुरिति पाय सदैव ईचे. ९९
भाग्यासि वानुं तरि, ते सुर वंदिशाळे राहोनि काम करिती, पुसती, सुवेळे ।
जें काम वांटुनि दिलें, तितुकें करावें. आधीक बोल करिती, तरि म्यां चिरावें.
**सुरेंद्र** आणि माळिका, अखंड **चंद्र** ऊदका, ।
[7]**समीरणू** चि झाडणी धरोनि झाडि आंगणीं; ॥ ६१

---

१. रावण. २. शंकर. ३. रावणाचा प्रधान. ४. समुद्र. ५. आकाश. ६. देवांगना. ७. वायु.

वरूण घालि [1]मार्जना, करोनि यम गर्जना ।
अखंड घर्टि घालितो [2]सुपर्ण ग्राम रक्षितो. ॥ ६२

[3]विरिंचि वाचि [4]पैंतडें मुखा करीत वांकडें, ।
मैराळ दावि दर्पणा, श्रिसूर्य वाहे सर्पणा. ॥ ६३

गणेश रासभें वळी, नव ग्रह ते आंवळी. ।
करोनि त्यांसि पायरी चढूनि जाय ऊपरी. ॥ ६४

गृहीं [5]विरिंचिकुमरी अमंगळें चिरें चुरी. ।
प्रसूतिकाळिं लेंकुरें तयांचि वाचि [6]अक्षरें. ॥ ६५

या परी च देव सर्व मंदिरींच रावती.
मज परीस भाग्यवंत कोण आहे भूपती? ।
मौन तें धरूनि व्यर्थ कां उशीर लाविसी?
न वदोनि नोवरीसि बैसवीं ये मांडिसी. ॥ ६६

कुबेर [7]भांडारगृहीं च राहे, तपें करोनी शिव आर्चिलाहे. ।
सुरत्न तो [8]हाटक कोट माझा, तयासि तो खंदक [9]सिंधु राजा! ॥ ६७
हें भाग्य माझें असतां नृपाळा! आणीस ना कां हिन तूं कपाळा? ।
मी आसतां कोण वरील ईतें?' तों भूपती वीनवि रावणातें. ॥ ६८
'आधीं च म्यां व्यर्थ पणासि केलें, तयावरी भाग्य फळासि आलें. ।
बोलोनि गेलों, पण लंकनाथा! झाला तुम्हां देखुनि खेद चित्ता.' ॥ ६९
गर्वें म्हणे राक्षस[10]वृंदराजा, 'बोलें विदेहा! पण काय तूझा?' ।
'जो चाप हें ओढुनि [11]सीतें लावि, तेणें सुखें नोवरि हे वरावी.' ॥ ७०
ऐकोनियां रावण पूर्ण हांसे. '[12]अजा गजाला बहु काय भासे? ।
तृणापरी मोडिन मी धनुष्या, दावीन मी कौतुक या मनुष्यां.' ॥ ७१

उठोनी गेला तो दशमुख धनुष्यासि कवळी.
[13]बिभत्सा देखोनी जनकतनया ते दचकली. ।
'अगे! पृथ्वी! माते! दशवदन पाडीं कलथुनी,
तया धूळी मूर्खा! फजित करुनी घालिं वदनीं. ॥ ७२
कुळस्वामीनी! गे! तुजप्रति करीतें विनवणी,
त्वरें पावें माते! दशमुख यशस्वी न करुनी, ।

---

१. सडासारवण. २. गरुड. ३. ब्रह्मा. ४. पंचांग. ५. सरस्वती. ६. ललाटाक्षरें. ७. खजीना. ८. सोनें. ९. समुद्र. १०. समूह. ११. दोरी. १२. शेळी. १३. अकराळविकराळ.

अपेशा देईजे, विसभुजि धनुष्या उचलितां,
तुझीं मीं नौरात्रें करिन नव, कोणा न कळतां. ॥ ७३
शिवाच्या कोदंडा! विनवि दशमुंडासि कलथीं,
करीं तूं घोंटाळा, जरि करि उडाणा, तरि मथीं, ।
त्रिनेत्रा! त्वां चापीं रिघुनि निज शक्ती जड करीं
त्वरें पापी चापा नुचलि; तंव पावें झडकरी. ॥ ७४
ऋषी साधू संतां मुनिजनमहंतां विनवितें,
करा तुम्ही याची गलित निज शक्ती बहुमतें.' ।
सिता तैं सर्वांची स्तुति करुनि पाहे ऋषिवळीं[1];
सगवें लंकेशू विसभुजि धनुष्यासि उचली. ॥ ७५
धनुष्या लंकेशें अमित वलकोशें उचलिलें,
न थारे भूमीसी, पदयुगुल चापें कलथिलें; ।
त्वरें त्याचे वक्षःस्थळिं बसुनि पाडी क्षितितळीं;
उताणा आक्रंदे, तंव महि मुखीं घालित धुळी. ॥ ७६
मुखें मारी हाका, म्हणत, 'जनका! काय पहसी?
बरें, मी मेल्यानें, जिउनि मिथिळे! काय रहसी? ।
जिता माझा बंधू करिल नृपती! निर्मुळ तुझें'.
कुशब्दा ऐकोनी नृपवर धनू ओढिति भुजें. ॥ ७७
मिळोनी पृथ्वीचे अमित नृपती ओढिति धनू,
न सोडी तें त्याला, घसरत तळीं राक्षसतनू[2]. ।
'नका तुम्ही चापासहित मज ओढूं फरफरां,
भुमी त्राहटी पायें बहुत गुद वाजे परपरा.' ॥ ७८
प्रयासें ते राजे उलथुनि धनू पाडिति तळीं,
उठोनी राक्षेसाधिप दश मुखें क्षाळित जळीं, ।
सभेसी जावोनी गरगर नृपां पाहि नयनीं,
मुखीं घे तांबूला बसुनि वदला काय वचनीं? ॥ ७९
'कैलासा हालवीलें स्वकिय भुजबळें, त्रीजगा कांपवीलें,
मातें होणार नकळे, विपरित घडलें, दंडिलें वंशेवाळें[3]; ।

---

१. मुनिमंडळामध्यें. २. राक्षसदेह. ३. बांबूचें लहान कांबीट.

आतां कोण्या नृपाळें धनु करकमळें ऊचलीजे उलाळे,
युद्धें हो जें कपाळें अमित वधुमुळें लोळती कंठनाळें.' ॥ ८०
ऐकोनी राव कानीं दृढतर वचनीं बोलिला तो उठोनी.
गर्जोनी ऊर्ध्वपाणी करुनि म्हणे, 'नृपा! आहे कीं नाहीं कोणी ? ।
निर्वीरा मेदिनी[1] हे मज गमत मनीं चित्रिंचे[2] मानवांनीं,
आतां तो नंदिनी हे वरविण सदनीं राहिलीसे निदानीं.' ॥ ८१
कौशीकू रायवाक्यें परिसुनि म्हणतो, 'बोलतो हा विवेकें,
कोणी ही ऊर्ध्व मूखें न करिति, सुमुखें बैसलीं जेंवि रंकें[3].' ।
तेव्हां पंकेरुहाक्षा[4] म्हणत ऋषि मुखें, 'नोवरी पैल देखें,
सौख्यें चापा विशीखें[5] उचलिं कवतुकें, खालवीं सर्व नाकें. ॥ ८२
यशस्वी श्रीरामा! परमगुणधामा[6]! तुं, नवरी
तुला ध्याते चित्तीं, तुज रहित कोणासि न वरी, ।
त्वरें चापीं सीता चढविं, तुज सीता पहतसे,
विदेहो 'देहाची करिन कुरवंडी' म्हणतसे. ॥ ८३
अनाथाच्या नाथा! उठुनि रघुनाथा! क्षणभरी,
उभा ठाकें, चापा उचलुनि, सभा विस्मित करीं, ।
प्रतिज्ञेनें सुज्ञा! वधुनि रिपु, यज्ञा जिवविसी,
अवज्ञा तूं माझी कधिं हि जनवंद्या! न करिसी. ॥ ८४
अमांगल्याची ती अनुदिनिं अहल्या रघुपती!
तिला तूं साफल्या करिसि, पद कल्याण सरती, ।
प्रतापीया आतां दशरथसुता! चाप उचलीं,
तुला देतों आशीर्वचन, नवरी तूज दिधली.' ॥ ८५
घनश्यामें रामें ऋषिसि अतिप्रेमें नमियलें.
म्हणे, 'स्वामी! आज्ञा.' उठुनि जनकासी निववीलें. ।
नमस्कारी सर्वां, स्तवित मग शर्वा निज मुखें,
'तुला ध्याती शंभो! जप तप करोनी शतमखें.' ८६
रघूनाथ सौमित्र कोदंड[7] नेत्रें सभे पाहतां, बोलती भूपवक्त्रें[8] ।
'लघू बाळकें कासया ऊठवीलीं ? मघां रावणाचीं मुखें घोळवीलीं ? ॥ ८७

---

१. पृथ्वी. २. मुलगी. ३. भिकारी. ४. कमलनेत्रा.(रामा.) ५. बाणानें. ६. उत्तमगुणनिधाना.
७. धनुष्य. ८. तोंड.

राम ऊठतां, सभे तटस्थ भूपमंडळी.
मेघनीळ बाळ काय कार्मुकासि[1] ऊचली! ।
जानकी विदेह कौशिकादि विप्र अंतरीं
पूर्ण राघवासि येश चिंतिती स्वयंवरीं. ॥ ८८
ते क्षणीं धनुष्य तें अवेक्षुनी प्रदक्षणा
करीत अंबुजाक्ष[2] तो, विलोकिते सुलक्षणा; ।
अंतरीक्ष यक्षकिन्नरादि लक्ष धांवतीं;
राम लक्ष्मणा अपेक्षुनी क्षितीस पाहती. ॥ ८९
वामपाणिनेंचि राम तें धनुष्य ऊचली.
देखतां सभा समस्त विस्मयें चि दाटली. ।
भूपती सभेसि बोलताति, 'धन्य राघवा!
विक्रमीं[3] च मान गर्व हारिला तुं आघवा.'[4] ॥ ९०
चाप पाणिनें[5] धरूनि राम राहिला उभा.
अंगभा[6] विलोकितां तटस्थ जाहली सभा. ।
अलभ्य तें लवूनि सव्य बाहुनें धरी गुणा,[7]
कोटि लावितां असंख्य कोटि दाविती खुणा. ॥ ९१
राघवें करीं धरोनियां सुचाप ओढिलें.
ओढि काढितां चि मुष्टिमाजि तें कडाडिलें. ।
रामहस्त लागला म्हणोनि गर्जना करी,
'धन्य धन्य मीच, कृतकृत्य ये महीवरी.' ॥ ९२
विक्रमें करूनियां असंख्य ओढि काढुनी,
दुखंड तें करूनि चाप टाकिलें विखंडुनी. ।
कडकडा कडाडिलें धनुष्य तें स्वयंवरीं.
अघोर घोष ऊठतांचि कोंदला दिगंबरीं.[8] ॥ ९३
'क्षेत्रि म्यां धरित्रिचे अमित्ररूप[9] मारिले.'
कठोर मुष्टिपत्र त्या पवित्र हस्त लागले. ।
धन्य रामचंद्र वक्र तें चरित्र वानिती.
पद्मपाणि पात्र चाप तें विचित्र गर्जती. ॥ ९४

---

१. धनुष्य. २. कमलनेत्र. (राम.) ३. पराक्रमानें. ४. सकल. ५. हातानें. ६. आंगाची कांति. ७. दोरी. ८. दिश व आकाश यांत. ९. शत्रु.

रामें तें स्वकरें धनुष्य निं[1]करें ओढोनियां मोडिलें.
त्या नादें करुनी क्षि[2]ती दुमदुमी, आकाश तें गर्जलें. ।
नक्षत्रें बहु व्योमिंचीं तटातटां तूटोनियां चे[3]वती;
इंदूभास्करमंडळें गरगरां भूमी पडों पाहती. ॥ ९५
देती कुं[4]जर किंकळ्या अमित, पैं दाही दिशा धांवती;
राजे ते पडिले सभे पटपटां मूर्छीत नेणों किती; ।
ऐशी सर्व सभा सुमूर्छित पहा व्याकूळ झाली असे.
त्यामध्यें बहु सावधान असती, चौघांसि मूर्छा नसे. ॥ ९६
सीता कौशिक भूप शेष नयनीं श्रीराघवा पाहती;
रामें सर्व सभा कृपामृतरसें आलोकितां भूपती ।
झाले सावध, पाहती, दशमुखा, आली असे काळिमा.
राजे बोलति, 'राघवा! अनुपमा नाहीं बळाची सिमा.' ॥ ९७
सीता ते गज प्रेरुनी मग सभे आली विजेचे परी;
श्रीरामा पहतां उताविळ पहा झाली असे घाबरी; ।
रायां देखत राघवा मग तिनें माळा गळां घातली;
ते काळीं शिरिरामचंद्रस्मरणें गर्जे सभामंडळी. ॥ ९८
सक्रोधें दं[5]शनें दशानन उठे ओष्टांसि चावोनियां,
बोले रावण, 'एक वेळ इजला जाईन घेवोनियां.' ।
ऐशीं दुर्वचनें वदोनि शिबिके बैसोनियां चालिला.
सांगातें करितो [6]प्रहस्त विनती, 'लंकेसि आतां चला.' ॥ ९९
तेव्हां रावण गेलिया, दशरथा रायें मुळा धाडिलें.
[7]साकेताहुनियां वऱ्हाड मिथिले आलें, नृपें ऐकिलें. ।
राजा बाहिर जाउनी दशरथा वंदी पदा आदरें;
क्षे[8]मा देउनि चालती तंव पुढें वाद्यें असंख्यें तुरें. ॥ १००
राजा तोचि वऱ्हाडिकांसह पुरीमाजी नृपें आणिला.
होता जानवसा, सुरम्य नृपती नेवोनियां घातला. ।
आला मंडपिं भूपती, मग त्वरें तें बाहुलें निर्मिलें.
रात्रौ विद्युतभा असंख्य गुढिया घेवोनि चाले मुलें. ॥ १०१

---

१. जोरानें. २. पृथ्वी. ३. पतन पावतात. ४. हत्ती. ५. दांतानें. ६. रावणाच्या प्रधानाचें नांव. ७. अयोध्येहून. ८. आलिंगन.

चारी दाशरथी चतुर्मदगजीं शृंगारुनी बैसवी;
  बाजारे फुलबाजिया बहु नळे ते सोडिती हावई; ।
सत्राणें बहु चक्र बाण फिरती त्या चंद्रजोती किती?
  दारूचे मृग वाघ सिंह वृक[1] पैं ते ऐंडके[2] भांडती. ॥ १०२
ऐसा तो वधुमंडपासि नवरा त्या संभ्रमें आणिती;
  द्वारासन्निध पावतां मुद वधू ओंवाळुनी टाकिती; ।
हस्तीचे तळिं नोवरा उतरुनी श्रीमंडपा आणिला;
  तेव्हां तो मधुपर्क[3] आसनिं द्विजीं बैसोनि आरंभिला. ॥ १०३
सारोनी मधुपर्क, अंत्रपट तो मध्यें धरोनी ऋषी,
  वक्त्रें मंगळ अष्टकें वदति, पैं शास्त्रज्ञ ते ज्योतिषी. ।
'ॐपुण्या'[4] म्हणतां परस्पर शिरीं त्या अक्षता टाकिती,
  विप्रीं त्यां सुतवूनियां निज करीं ते कंकणें बांधिती. ॥ १०४
लज्जाहोम[5] करोनियां वधुवरें पूजोनि गौरीहरा,
  ग्रंथी देउनियां, रघूत्तमकटीं देती वधू सुंदरा. ।
आली तैं बहुल्यावरी, तंव सिते त्या शिक्षिती[6] सुंदरा,
  'रामाला नमिं तूं सिते!' अतित्वरें तेव्हां विलोकी धरा. ॥ १०५
'रामाचें पद लागतां, जड शिळा झाली त्वरें कामिनी[7],
  यासाठीं न नमी रघूत्तमपदें, भाळीं सुरत्नें मणी, ।
रत्नाच्या युवती सुरम्य सवती होतील मातें सदा,
  रामाची बहु अप्रिती मजवरी होईल गे! सर्वदा.' ॥ १०६
ऐसें संभ्रम लग्न तें मग बरें झालें चतुर्था दिशीं.
  रायें देउनि झालिसी मग सुता घाली नृपा ओंटिशी. ।
आज्ञा घेउनियां वऱ्हाड तितुकें आलें अयोध्येप्रती.
  मार्गीं भार्गव येउनी बहुत तो सक्रोध ऊभा क्षिती. ॥ १०७
तेजःपुंज विलोकुनी दशरथें घेवोनियां पूजना,
  पूढें येउनि भार्गवासि नमितां, 'धाडीं' म्हणे 'नंदना.[8]' ।
रामा सन्मुख देखुनी मग म्हणे, 'कोदंड त्वां भंगिलें
  माझें, तें दृढवीर्यशृंग बहुतां काळें तुवां मोडिलें; ॥ १०८

१. लांडगा. २. मेंढा. ३. संस्कारविशेष. ४. विवाहमंत्राचीं आद्याक्षरें. ५. लाजाहोमविधि. ६. शिकविती. ७. सुंदर स्त्री. ८. मुलाला.

रे ! रे ! दुर्मति विकृती नरपतीवंशाधमा ! राघवा !'
'शस्त्रें विप्रपणा कधीं प्रगट म्यां केलें नसे भार्गवा !' ।
'एकी छेदुनियां निशाचरि महा तूझी तनू फूगली.'
'राक्षेसी वधिली, परंतु द्विज ! म्यां माता नसे मारिली.' ॥ १०९
'निक्षत्री वसुधा करोनि, असुनी शत्रू मि, क्षत्रीकुळा;
हें तों सत्यचि बोलतां, द्विजवरा ! मी कोण सांगा मला?' ।
ऐकोनी बहु व्यंग बोल श्रवणीं खोंचोनियां अंतरा,
आला तो बहु क्रोध; भार्गव म्हणे, 'येई मशीं संगरा.' ॥ ११०
'स्वामी ! भूदेव तुह्मीं, अनुदिन हृदयीं मस्तकीं पूज्य आम्हां;
गाई विप्रा निघाता वर शर धरितां, कांपतो हा ममात्मा; ।
आम्हीं एक्या गुणानें, तुम्हि तों नव गुणें, पूर्ण वेदें पुराणें.'
ऐकोनी भार्गवानें मग निज वदनें बोलिला साभिमानें. ॥ १११
'होतें तें जीर्ण साचें, धनु मम करिंचें हें करीं सज्य आतां.'
ऐकोनी राघवानें धरुनि धनु करिं, बाण लावूनि सीता, ।
ओढोनी राम बोले, 'म्हण द्विज ! तुमचा कोणता मार्ग रोधूं?
रोधूं या व्योमपंथा?' मग फरशधरें वंदिला शेषबंधू. ॥ ११२
ऐशीं तींच वऱ्हाडिकें कवतुकें आलीं अयोध्या सुखें;
रामाचें जितुकें चरित्र तितुकें कर्णासि लागे निकें. ।
श्रीरामा शतकें जरी म्हण मुखें निर्दग्ध तैं पातकें
सालंकार तुकें अनंत यमकें वर्णी भल्या भातुकें. ॥ ११३

---

## सुलोचनाख्यान.

(श्लोक).

एकांताप्रति नेउनी तिसि वदे मंदोदरी सुंदरी,
'रात्रीच्या समयीं कुस्वप्न सखिये ! म्यां देखिलें मंदिरीं, ।

---

१. भार्गवा. २. युद्धास. ३. ज्यासहित, दोरीनें युक्त. ४. आकाशमार्गा. ५. भार्गवानें. ६. शेषाचा (लक्ष्मणाचा) बंधु. (राम.) ७. सुलोचनेस. 'तिसि' या सर्वनामावरून हें पद्य आरंभीचें नव्हे असें होतें. यास्तव, या आख्यानाचीं पहिलीं पद्यें अद्याप उपलब्ध व्हावयाचीं आहेत.

[1]वाळीतातजित्या रणीं निवटिलें [2]रामानुजें, संगरीं
काकुत्स्थें मग रावणासिं भिडिजे, त्या दीर्घघोरांदरीं. ॥ १
रामें तीव्रशरें रणीं दश शिरें तीं पाडिलीं भूवरी,
केली हे अवघी रघूत्तमविरें निर्वीर लंकापुरी. ।
झाला हर्ष जनां, सुखें सुरवरां बंदीहुनी सोडिलें;
आणूनी शरणागता बिभिषणा, राज्यासनीं स्थापिलें. ॥ २
लंके रामगुढी जनीं उभविली, रामा सिता भेटली.
गर्जे हें नभ रामनाम अवघें, ख्याती असी देखिली. ।
नोहे स्वप्न कदां, शशांकवदने ! होणार ऐसें खरें,
आतां श्री[3]रविवंशभूषणपदा त्वां भेटतांची बरें. ॥ ३
निष्ठा देखुनियां तुझी, रघुपती देईल आधीं शिरा,
तेणें, जाण, तुझा स्वधर्म अवघा पावेल सिद्धी वरा. ।
युद्धीं राय पडेल, राघव कदां नेदी शिरा तूजसी.
त्यासाठीं उपवास नित्य करितां क्लेशासही पावसी. ॥ ४
आहे राय जिवंत, तोंवरि तरी, होईल गे ! सोहळा.
हा युद्धीं पडिल्यावरी, सकळिकां कोणी न पाजी जळा. ।
लंकेशासमवेत [5]कैर्बुर रणीं देहांतता पावती.
सर्वां एक तिळांजुळी बिभिषणू देईल वो निश्चिती. ॥ ५
आतां तूं [6]न मनीं विकल्प गमनीं, जावें प्रसन्ना मनीं.
वंदीं जाउनियां रघूत्तमपदा, सायुज्यतासाधनीं. ।
वारूनी [7]हरिसंघ, देइल तरी [8]तारापती तूजला.
आहे तो परमाप्त ते स्थळिं तरी बीभीषणू आपुला. ॥ ६
तुवां राजसे ! पूसुनी राजयासी, त्वरें जाइजे त्या सुवेळाचळासीं.।
पतीच्या शिरा घेउनी, मंदिरासी, नमी येउनी, मागुती रावणासी. ॥ ७
बोले रायासि, [9]प्राज्ञा ! सकळगुणनिधी ! सर्वशास्त्रज्ञ ! सुज्ञा !
मागाया रामराज्ञा शिर निजपतिचें, इच्छितें राजआज्ञा. ।
मातें द्यावी [10]अनुज्ञा, तुम्हि निजवदनें रामभेटी गुणज्ञा !
माझी आहे प्रतिज्ञा, 'सहपति करणें आजिया [11]देहयज्ञा.' ॥ ८

---

१. इंद्रजितास. २. लक्ष्मणें. ३. चन्द्रमुखि. ४. रामचरणा. ५. राक्षस. ६. मानूं नको. ७. वानरसमूह. ८. सुग्रीव. ९. बुद्धिमंता. १०. आज्ञा. ११. सहगमना.

[1]तो बोले वचनें, '[2]सरोजनयने ! ऐकें विचारू [3]पुरा,
रामाची निज[4]योषिता हरुनियां ते आणिली या [5]पुरा. ।
तेणें वैरमतें रघूत्तम तुतें ठेवील हें जाणिजे;
यासाठीं न वचें कदा रिपुसभे, हें वाक्य, [7]तां मानिजे.' ॥ ९
'राया ! हें नँ मनां, रघूत्तममनीं कैंची असी वासना ?
ज्याचें नाम् करी अपार दुरितें दुष्कर्म विध्वंसना. ।
गौरी होउनि ज़ानकी उभि पुढें बोले, तितें 'माय हो.'
ते तों कीर्ति; पहा, जगीं मिरवली. नेणा तुम्ही काय हो?' १०
'हा पाणी धरुनी वि[8]खारवदनीं जैं घातला दाटुनी,
तैं तूं, जाण मनीं, न झोंबल [9]फणी, कैसा तयालागुनी ? ।
तैसी तूं तरुणी सरोजनयनी कं[10]दर्पसंजीवनी
ते कैसी धरुनी स्वपुत्र[11]रमणी देऊं रिपूलागुनी ?' ॥ ११
ते बोले, '[12]परेलालसें बळ करी, तो कोण पापी असा ?
चारी हे [13]पुरुषार्थ विन्मुख तदां होती, तया माणसा. ।
तेथें पुण्य पवित्र तो विभिषणू सांगेल सीतावरा,
देवूनी शिर, पाठवील मजला, माना भरोंसा पुरा.' ॥ १२
बोले राय तिसीं, 'विचार पुरता तो तूं करीं अंतरीं.
आहे कोण असा ? पुरेल मजसीं, जो झुंजतां संगरीं. ।
नोहे जें अघटीत, एक पहिलें, तें जाहलें, सुंदरी !
त्याचें घेइन ऊसणें, विभिषणा मारीन [14]युद्धांतरीं. ॥ १३
जाता ना जरि येथुनी तरि [15]हरी, [16]रामानुजालागुनी
नेता कोण ? [17]निकुंबळेसि वधिता तो तान्हया [18]रावणी. ।
तेणें गोत्रज बंधु मित्र अवघे ते मारवीले रणीं.
इच्छी नीजमनीं, 'समस्त नि[19]मेतां, होईन राज्या धनी.' ॥ १४
यासाठीं समरीं तयासि वधुनी, श्रीराघवा मारितों.
[20]शक्रारीशिर आणुनी, तुजप्रती, तें आजि मी दावितों. ।

---

१. रावण. २. कमलनयने. ३. पुरता. ४. कांता. ५. लंकेस. ६. त्वां. ७. मानूं नकां. ८. सर्पमुखीं. ९. सर्प. १०. कामाला वांचविणारी. ११. कांता. १२. अतिउत्सुकतेनें. १३. धर्म, अर्थ, काम, मोक्ष. १४. युद्धामध्यें. १५. वानर. १६. लक्ष्मणास. १७. स्थळविशेष. १८. रावणाचा पुत्र, इंद्रजित्. १९. मरतां. २०. इंद्रजिताचें मस्तक.

त्याच्या जाशिल तूं सभे जरि तरी, चक्षुःश्रव्याचे[1] सुते!
आम्हीं आणियली हरूनि महिला[2]; ते सोडिती कां तुतें?' ॥ १५
ते बोले दशकंधराप्रति मुखें, माधुर्यशब्दें[3] बरी,
'एकस्त्रीव्रत राघवासि, परिसा, तो अन्यथा कां करी? ।
ऐसें जाणुनि निश्चयें, मज तुम्हीं आज्ञा दिजे, भूपती!'
बोले रावण, 'आवडी जशि तुझी, ते जाउ सिद्धिप्रती. ॥ १६
ऐकें आणिक, मागतां शिर तुतें, कोणी छळी उत्तरीं,
तेव्हां निर्भय होउनी, हरिसभे[4] प्रत्युत्तरें दे बरीं. ।
देतां त्रास तुतें, प्रभाकरकुळा[5] होईल गे! बोहरी[6].'
ते बोले मृगलोचना, 'बहु बरें.' आली सभेबाहिरी. ॥ १७
चालली पुढति दासिचि थाट हो. अश्विनीअरुढ क्रमित वाट हो. ।
वर्णिती विभव धांवति भाट हो. जाहली पथिं तयांप्रति थाट[7] हो. ॥ १८
लंघिला नगरिचा मग घाट हो. देखिले तंव हरीरिसथाट[8] हो. ।
वर्णिती रघुपतीसि अचाट हो. हें असें म्हणति काय कचाट[9] हो. ॥ १९
देखतांचि नयनीं नृपसुंदरा, विस्मयो[10] बहुत वाटत वानरां. ।
'होय हे' म्हणति, 'रावणपूज्यता, कीं गमे नगरमंडणदेवता.' ॥ २०
कोणी वानर बोलती निजगणा, 'हे तों सिता सुंदरी.'
दूजा त्यासि म्हणे, 'शरें वधियलें शक्राजिता[11] संगरीं, ।
ऐसें ऐकुनि, रावणें निजभयें सीतासती धाडिली.'
'झालें कार्य बरें,' म्हणोनि वदती, 'आली जगन्माउली.' ॥ २१
हर्षें जाउनि सांगती रिस पुढें, '[12]भेणें तुझ्या रावणें
दिल्ही धाडुनि जानकी, रघुविरा! हे येतसे पाहणें.' ।
त्यांतें राम म्हणे, 'वृतांत बरवा आणा मना पूरता,
नाहीं रावण मारिला तंववरी, दृष्टी पडेना सिता.' ॥ २२
ऐसें बोलत वानरां, तंव सभेसन्मूख आली सती.
देखोनी, मग तो विलोकित असे बीभीषणा, श्रीपती. ।
तों आलें जळ लोचना, म्हणतसे , 'इंद्राजिताची प्रिया,
कांहीं कार्य असेल, यास्तव गमे, आली असे, स्वामिया!' ॥ २३

---

१. नागकन्ये. २. भार्या. ३. मधुर शब्दानें. ४. वानरसभे. ५. रविवंशा. ६. नाश. ७. गर्दी. ८. वानर, आस्वल, यांची गर्दी. ९. किचाट, संकट. १०. आश्चर्य. ११. इंद्रजिता. १२. भयानें.

तों आली, परिवार घेउनि सवें, रामापुढें ते सती.
जैजैकार करूनियां, मग नमी, साष्टांग सीतापती. ।
बोले राघव तेधवां, 'उठिं उठीं, चक्षुःश्रव्याचे सुते!
हो कां पूर्ण तुझा मनोरथ सदा, शक्रारिचे[1] योपिते!' ॥ २४
स्वाशीर्वाद वदे असा रघुपती, तों ऊठिली सुंदरी,
राहे जोडुनि हस्त, सन्मुख उभी, नानास्तुती आदरी. ।
'श्रीरामा! जय राघवा! रघुविरा! विश्वंभरा! ईश्वरा!
पावें, पंकजलोचना! नरहरी! नारायणा! श्रीधरा! ॥ २५
मी प्रार्थी तुजला, 'दयाब्धि[2]! सगुणा! हे कारुणा भाकितें.
दावीं तूं मजला पती, रघुपती! साष्टांग कीं वंदितें. ।
झाला शांत पती, म्हणोनि श्रवणीं म्यां ऐकिलें जेधवां,
गेले त्यासरिसेचि प्राण, परिसें, ते पांचही तेधवां. ॥ २६
आली हे हुंसती[3] कुडी तुजसिं पां, मागों शिरा माधवा!
आहे अंतरला पती मजप्रती, तो भेटवीं येधवां. ।
सर्वात्मा! तुजला कळे सकळही, म्यां कायसें सांगिजे?
आतां गौरव हेंचि दे, पतिसवें सायुज्यता[4] लाहिजे.' ॥ २७
हे भाकी करुणा अनंततनया[5] रामापुढें सुंदरी.
तीची ऐकुनियां स्तुती रघुपती संतोपला अंतरीं. ।
सूर्याचा तनयो[6] म्हणे, 'रघुविरा! हे पन्नगाची सुता,
आलीसे सहजें, तरी चतुरता कांहीं महाविश्वता.' ॥ २८
वारी शीघ्र बिभीपणू निजमुखें, 'रे! स्तब्ध राहीं,' म्हणे.
'कीर्तीचा निधि हा रघुत्तम महा, कोणें यया वर्णणें?' ।
तेव्हां राम सुलोचनेप्रति पुसे, 'स्नेहें पहा सौरसें;
आम्हीं आणियलें शिरासि, तुजला हें ज्ञात[7] झालें कसें?' ॥ २९
ते बोले, 'पतिचा सुबाहु[8] पडिला येऊनियां अंगणीं.
संग्रामीं घडला वृतांत तितुका पत्रीं दिल्हा लेहुनी.' ।
दावी पत्र रघूत्तमासि मग, तो पाहे बरा अन्वयो;
देखोनी नयनीं सुपत्र, मग तो चित्तीं करी विस्मयो. ॥ ३०

---

१. इंद्रजिताचे स्त्रिये. २. दयासमुद्रा. ३. केवळ. ४. मुक्ति. (ब्रह्मस्वरूपीं मिळणें.) ५. शेषकन्या. ६. सुग्रीव. ७. विदित. ८. उत्तमभुज.

कपीश[1] तर्कला म्हणे, 'असेल सत्य हस्त तो;
परंतु पत्रअर्थ हा अम्हांसि मिथ्य भासतो. ।
कधीं असें न जाहलें, पुढें न होय जाणिजे.
अजीवहस्तलेखनार्थ[2] सत्य केंवि मानिजे? ॥ ३१
प्रचीत[3] एक याजला असे, रघूत्तमा! विरा!
सुपत्र हें खरें जरी, सभेंत हांसवी शिरा.' ।
म्हणे श्रिराम, 'पावला गृहासि हस्त जीस हो,
ते कसी न हांसवील मस्तकासि वीर! हो?' ॥ ३२
सुरूपभासि सुग्रिवें द्विलोचनें खुणाविलें.
सुलोचनेसि द्यावया सभेसि शीर आणिलें. ।
ग्रिवेसि[4] रक्तथेंबटे, अचाट दाट धांवती,
त्रिशूळवर्ण पिंगटा जटा महीसि रूळती. ॥ ३३
कराळ[5]दंत दंष्ट्रिका[6], विशाळ ओष्ठ शोभती.
मुखींहुनी लुळे जिव्हा, सबाह्य सिंदुराकृती. ।
वन्हिरूप वामनेत्र सव्य[7] चक्षु झांकला.
बिभत्स[8] वेष देखुनी कपीसमूह धाकला[9]. ॥ ३४
जटा धरूनि फीरवी, कपी शिरासि थापटी,
फणींद्रकन्यकेपुढें वळेंकरूनि आपटी. ।
हरीसभा समस्तही वळें पहा दणाणिली.
निनाद[10] थोर ऊठिला, क्षिती सकंप जाहली. ॥ ३५
श्रवण मंद जाहले, सुरांसि नाद पावतां.
निर्घा[11] अपार दाटला अभंग शीर ताडितां. ।
पुसोनि पल्लवें[12] तयास ती पतीस भेटली.
ठेवोनि अंचळावरी सुशब्द काय बोलिली. ॥ ३६
'ज्याचिया गृहींच नित्य देव दैत्य कष्टती,
सेवनासि इंद्र चंद्र अष्टकाळ तिष्टती, ।

---

१. सुग्रीव. २. निर्जीव हातानें लिहून देणें ही गोष्ट. ३. प्रतीति. ४. मानेस. ५. भयंकर' ६. दाढा. ७.'सव्य' म्हणजे 'उजवा' असा अर्थ प्रचारांत आहे, पण कोशांत 'सव्य' म्हणजे 'डावा. असा अर्थ आढळतो. ८. अक्राळविक्राळ. ९. त्याला. १०. ध्वनि. ११. घडघडाट. १२.पदरानें.

त्रिलोक ज्याज कारणेंचि थर्थराट कांपती,
तया शिरासि; मर्कटें[1] धरूनि आजि ताडिती. ॥ ३७
ऐकावें प्राणनाथा! तुम्हि मम वचनें, आजि ऐसें करावें,
देवीं दैत्यीं समस्तीं हरि रघुपतिनें धन्य मातें म्हणावें. ।
कैसें तें येश दिल्हें? समरंणि अरितें, सांडुनी देहआशा.
प्राणेशा! प्राणनाथा! नुमजत मजला, ठेविलें कां विदेशा? ॥ ३८
नक्षत्रीं उपमा, नभीं सुरवरां साजे, हरीपुंगवा.
यातें चंद्र तुम्ही, भले सकळिकां, हर्षामृतें नीववा. ।
एथें रामसुमंत्र वानरसभा ते पाहती सत्व हो.
तीचे हस्तिं तुम्ही झणी मजवरी आणाल मिथ्यात्व[2] हो! ॥ ३९
एकांतमंदिरीं मसीं उदंडवेळ हांसलां.
तया सुखासि वीसरोनि, काय आजि रूसलां? ।
क्रिडाविनोद खेळतां, कधीं न हास्य मी करीं,
अपार छंद ते करूनि, हांसवा तुम्ही तरी. ॥ ४०
अपूर्ण यैज्ञ[3] जाहला, तुम्हासि खेद वाटतो.
म्हणोनि कीं न हांसवे? मनांत क्रोध दाटतो. ।
कीं रणीं न जाहलें, तुम्हासि येश प्राप्त हो?
म्हणोनि तेंचि बैसलें उरांत पूर्ण शल्य हो. ॥ ४१
कीं सुमित्रहस्तकें[4] अपार सूख जोडलें?
पुढें विनोदबोलणें समस्त सत्य सोडलें.' ।
करी शिरासिं कारुणा, न हास्य येचि जेधवां.
विनोद मांडिला तिनें कसा शिरासिं तेधवां. ॥ ४२
'अर्पितां मुखाहुतीसि आक्रमूनियां नभू,
स्वदेहधर्म तो करी तुम्हावरी सुरूपभू ।
समस्त पृष्टि तूमची सचैल[5] दिग्ध[6] जाहली.
क्षाळितां सुगंधता कसी तुम्हासि मानिली? ॥ ४३

---

१. वानर. २. खोटेपणा. ३. ब्रह्मदेवाचा वर प्राप्त झाल्यावर इंद्रजितानें निकुंभिलेस जाऊन अश्वांसहित दिव्य रथ आणि अमरत्व मिळण्यासाठीं यज्ञ आरंभिला. हा यज्ञ समाप्त झाला तर इंद्रजित् अजिंक्य होईल ळश्या भयानें वानरांनीं त्या यज्ञाचा भंग केला, या गोष्टीकडे एथें लक्ष आहे. ४. लक्ष्मणाच्या हस्तानें. ५. वस्त्रांसहित. ६. लिप्त.

पितृभगिनिनें पती सुलक्ष्मणासि याचिलें.
शरें खुडूनि नासिका सुलग्न तीसिं लाविलें. ।
तसाचि राम गौरवीत पितृभ्रातृकारणें
तुम्हांसि भेटि वाहतां तयांकडे विलोकणें.' ॥ ४४
ऐसा केला विनोदू, मग सति, परिसा, राहिलीसे उगी ते.
येना तें हास्य, बोले, 'हर! हर! श्रमली व्यर्थ जिव्हा' म्हणे ते. ।
'आलें मिथ्यात्व माझें रघुपतिहि रिसां देखतां, आजि अंगीं.
मिथ्याचें थोर वोझें मजवरि पडलें, वज्र जेंवी नगांगीं. ॥ ४५
कैसें मी मुख दाखवूं दशमुखा? मिथ्याक्षरें जाहलीं.
माझ्या आजि कसी पतिव्रतपणा हे काळिमा लाविली? ।
कां नाहीं कथिलें मुळीं? मम पिता मी आणितें साद्यते;
रक्षीता तुमतें, पराभव रणीं हे शत्रुही पावते'. ॥ ४६
बोलली वचन हें सति जेव्हां; हांसलें खदखदां शिर तेव्हां. ।
वन्हिसा उघडि दक्षिण अक्ष. पाहती टकमकां कपि दक्ष. ॥ ४७
'कैसें हें शिर हांसलें?' कपि पुसे, 'अर्थावरी कोणत्या?'
बोले राम, 'फणींद्र लक्ष्मण असे, हें ठाउकें जाण त्या. ।
कीं ज्यानें वधिला स्वयें समरणीं जामात हा रावणी,
तो कैसा मज रक्षिता? म्हणउनी हें हांसलें येक्षणीं. ॥ ४८
शेषा देखियलें, म्हणोनि उघडा वामाक्ष हो! तो बरा.
आतां पाहवया मला उघडिला हा सव्य चक्षू खरा.' ।
ऐकोनि मग 'सत्य सत्य' म्हणती सर्वत्रही प्लवंगपती
स्वर्गींचे सुर सिद्ध तेहि वदती, 'हे धन्य ऐसी सती.' ॥ ४९
बोले लक्ष्मण राघवा, 'खरि असे, हे आपुली कन्यका.
दुष्टें म्यां अधमें कसा वधियला? भर्ता इचा हा निका. ।
व्याधू तो मृगिवेगळा मृग वधी, झालें तसें स्वामिया!
सिंधूच्या सम पात्र तें डळमळी पापोदकें माझिया.' ॥ ५०
बोले राम तया, 'सख्या! रणधिरा! ऐकें, विरा! शार्दुळा!
ब्रह्यानें तरि क्षात्रधर्म पहिला, जो नेमिला प्रांजळा, ।

१. शूर्पणखा. २. पर्वतदेहावर. ३. शेषाचा अवतार. ४. डावा. मागचो 'सव्य' शब्दावरील टीप पहा. ५. वानर. ६. व्याध. ७. व्याघ्र.

बंधू पुत्र पिताहि गोत्रज मरे, जैं आलिया संगरीं
तैं त्या दूषणता नसे तिळभरी, हें धर्मशास्त्रांतरीं.' ॥ ९१
हे वंधू परि तत्समान, त्रिजगीं हा मोह लोकांतरीं
याची तों प्रचिति स्वयें मज असे, मी जाणतों अंतरीं. ।
शाखी[1] प्रस्तर[2] गौतमीतटिं[3] धरी, त्यातें म्हणे मी सिता,
तेथें जो घडला वृतांत अवघा तो तों तुम्ही जाणतां.' ॥ ९२
हें बोलोनि दयानिधी कळवळे; तेव्हां म्हणे श्रीपती,
'आतां मी उठवीन अमृतकरें, ये कन्यकेचा पती.' ।
ऐसें ऐकुनि प्रार्थना करि सती, 'दीना जना तारिसी,
मोठा हा उपकार, जन्म दुसरा जेव्हां पती जीविसी.' ॥ ९३
बोलतां सकृप जानकिवल्लभा, दुर्भयें गजबजे हरिची सभा. ।
लागती कितिक तेक्षणिं कानीं, 'श्रीपते! न करिं हे जनहानी.' ॥ ९४
खुणें हरी वारिति राघवासी, 'तूं आठवीं वैर बरें मनासी.' ।
तेव्हां वदे मारुतिराय, 'देवा! औदार्य हें नेडनि, दूर ठेवा. ॥ ९५
धेनूसमान तरि वाघ कसा म्हणावा?
बाळासमान उँरगू[4] न कधीं गणावा. ।
जैं मानिलें परम सज्जन दुर्जनासी,
तैं काय तो त्यजिल हो जिविंच्या गुणासी? ॥ ९६
याचा सिद्धिस पावता मँख[5] जरी, त्रैलोक्य तैं जिंतिता.
आम्हां मर्दुनियां, तुम्हां उभयतां बाणीं रणीं त्रासिता. ।
सर्वांतें शरपंजरीं खिळियलें, यासीं तुम्ही झुंजतां
तें कैसें विसरोनियां रघुविरा! याकारणें जीवितां?' ॥ ९७
बोले लक्ष्मण, 'फारसें हित त्यजा, भक्तोत्तरा मानिजे.'
तेव्हां राघव बोलिला, 'फणिसुते! आतां तुवां जाइजे.' ।
चाले घेउनि सुंदरी पतिशिरा, नैराश्य[6] देखोनियां,
बोले उत्तर राघवाप्रति सती पादाब्ज[7] वंदोनियां. ॥ ९८
वर्जावा हरि! आजिचा दिन, रणा जातां, दयासागरें;
देती अग्नि मला, मिळोनि अवघीं, लाहान थोरें करें.' ।

---

१. वृक्ष. २. पाषाण. ३, गोदा. ४ सर्प. ५. यज्ञ. ६. निराशपणा. ७. पदकमल.

बोले राघव आननें 'बहु बरें' ठेवूनि पाणी शिरीं.
चाले सुंदरि वंदुनी रघुविरा; सौमित्र सेना हरी. ॥ ५९
दासी सर्वे भाटहि लोक आले. वंदोनि रामाप्रति ते निघाले. ।
निरोपितां सुग्रिव तो निघाला. केलें नगीं स्थीरहि वानराला. ॥ ६०
संग्रामस्थळ पातली फणिसुता, वाद्यें चमू वाजवी.
देखे, रुंड उभें सुरेशअरिच्या धैर्यद्रुमा लाजवी. ।
आलिंगी मग धांउनी पतितनू ते पुष्पकीं घातली.
लंका सव्य करूनि दीर्घगजरें सिंधूतिरा पातली. ॥ ६१
तेथें त्या त्रिकुटाचलातळवटीं अग्नीकुटी योजिली.
काष्ठें चंदन बिल्व आणुनि, बहू कुंडामुखीं घातलीं. ।
अग्नी चेतविला, शिखा उसळती, त्या पुष्करीं धांवती.
त्यामध्यें पतिची तनू निजविली, अर्पी स्वदेहा सती. ॥ ६२
आला रावण घेउनी, सकळही ऐंशींसहस्रा सती.
येती लोक समस्त, कौतुक उभे राहोनियां पाहती. ।
तों ते स्नान करी जळार्णवतिरीं विध्युक्त संपादुनी;
वाणें दे, भरुनी सुवर्णतबकीं, सूवासिनींलागुनी. ॥ ६३
द्रव्यें वांटित चालिली निजकरें, हर्षें जनां निर्भरें.
नादें अंबर कोंदलें दुमदुमी, भेरी निशाणें तुरें. ।
आनंदें जयकार लोक करिती, दासी सवें धांवती.
तीचें सद्गुणकीर्तिवैभव पुढें वैतालिकू वर्णिती. ॥ ६४
ऐसीये गजरें प्रदक्षिण तिणें कुंडाप्रती घातली.
आली धर्मशिळेवरी, तंव नभीं आश्चर्यता देखिली. ।
देवांचीं गगनोदरीं पसरलीं यानें विमानें बहू.
स्वर्गींचे सुर कौतुकार्थ मिनले गंधर्व हाहा हुहू. ॥ ६५
सद्विद्याधर यक्ष किंनर मुनी, जो आन सृष्टी रची,
आला इंद्र, विराजितें सुरगणीं, वामांगिं शोभे शची. ।

---

१. स्तुतिपाठक. २. सुलोचना. ३. सेना. ४. जीव असून युद्धांत पराक्रम करणारें असें मस्तकरहित शरीर, धड. ५. विमानांत. ६. आकाशीं. ७. भाट. ८. गंधर्वविशेष. ९. इंद्राणी.

**सा**वित्री [१]नगनंदिनी [२]अनसुया **वृंदा** **पु**लोमा बरी
 येती, कौतुक पाहती, सकळिका जे अक्षवाणें करी. ॥ ६६
देवीं अंबर दाटलें; [३]सुरसती तेथुनि वोंवाळिती.
 ज्वाळा चंड नभोदरीं उसळती, वाद्यें महा वाजती. ।
कुंडीं कांत विराजमान बरवा, तो वाट पाहे उभा.
 ऐसें देखुनि, दाकिली उडि तिनें. तों धूम्र व्यापी नभा. ॥ ६७
ज्वाळांचे भडके नभीं उसळती, काळे निळे तांबडे.
 कुंडीं **रा**वण पाहुं जात न दिसे. **मं**दोदरी ते रडे. ।
‘आम्ही वोळविलें,’ म्हणे ‘निजकरें पुत्रस्नुषेलागुनी.’
 आक्रंदे [४]**म**यजा, असी नृपतिच्या कंठीं मिठी घालुनी. ॥ ६८
त्यातें शांतविति प्रधान वचनें, ‘ऐका,’ म्हणे ‘वीनती.’
 ‘राया! शोक त्यजा, पुढें बळ धरा, शत्रू तुम्हा हांसती.’ ।
बैसोनी शिबिकेंत [५]पल्लव मुखीं त्या **रा**वणें घातला.
 घेऊनी परिवार सर्व, नगरा आला, गृहा पातला. ॥ ६९
झाली येथुनि हे कथा, जन म्हणे, ‘**रा**मा ! नये वर्णितां.
 घेता जैं उसणें स्वयें युवतिचें, तैं कोण त्या वर्जिता ?’ ।
स्पर्शेना अपकीर्ति त्यासि भजतां, मुक्तीपदीं बैसवी.
 ऐसा **रा**म उदार हा कवि म्हणे, ध्यावा [६]गिरागौरवीं. ॥ ७०
**रा**माचीं चरितें अनंत सुकथा जे **वा**ल्मिकें गायिली.
 तो आधार धरूनि, प्राकृत टिका हे तों नवी योजिली. ।
कोठें अंतर जैं असेल पडिलें, तैं ते करावी क्षमा.
 हे माझी विनती असे, चतुर हो! बद्धांजुळीनें तुम्हां. ॥ ७१
नेत्रीं पाहविता, मुखें वदविता, ज्ञानेंद्रियां चाळिता,
 देता, देवविता, जगत्र सृजिता, पाळोनि संहारिता, ।
त्रैलोकीं पुरता, **सि**[७]तापरिणिता, कोठें नसे पैं रिता,
 सत्ताधारि असा **पि**तामहपिता, मीतूंपणा छेदिता, ॥ ७२
चित्ता चेतविता, कथा सुचविता, अर्थान्वया योजिता,
 साहित्यें रचिता, तुकें स्मरविता, लोलुप्यता लाविता, ।

---

१. पार्वती. २. अत्रिमुनिपत्नी. ३. देवांगना. ४. मंदोदरी. ५. पदर. ६. वाणीच्या गौरवानें.
७. सीता वरणारा. (राम.)

छंदा बैसविता, लघु गुरु तथा हेंहि स्वयें शोधिता,
ग्रंथातें लिहिता, अनंतकविता श्रोता नि वक्ता स्वता. ॥ ७३
सोळाशें निगमावरी[1] शिवमुखें[2] ठेवूनि संख्यागणा,
ऐका, शोभन तैं सुवत्सर असे, जो सौख्यकारी जना, ।
मास चैत्र, ऋतू वसंत विलसे, शुक्ल तृतीया दिनीं,
झाला ग्रंथ समाप्त[3] राघवकृपे; आनंद वृत्तें मनीं. ॥ ७४

---

## अहिमह्याख्यान.

(श्लोक).

आदीं नमूं त्या गणनायकाला, त्रिसप्त दुर्वा [प्रिय फार ज्याला] ।
गजाननीं लेपन शेंदुराचें[4], सदैव ज्या वाहन उंदिराचें. ॥ १
वागेश्वरी[5]! वाजवि रम्य वीणा, संगीतशास्त्रें करिजे प्रवीणा. ।
पाशांकुशीं शोभति युग्मपाणी, प्रार्थीतसें, 'येवुनि बैस वाणी.' ॥ २
आर्तें[6] पुजी मी गुरुराजमूर्ती, अज्ञान जे निर्सुनि देत स्फूर्ती. ।
वंदोनियां वीनवितों सुवाचे, 'वर्णीं बहू तूं गुण राघवाचे.' ॥ ३
दशरथसुत सैन्यें राहिलासे सुवेळे[7].
निवटुनि अतिकाया[8] राहियेला सुवेळे. ।
दशमुख सुतशोक प्राप्त होतां स्वहस्तें,
महिवरि पडतांची, ऊठवीती स्वहस्तें. ॥ ४
येवोनियां विद्युतजिव्ह[9] यानें नीरोपिलेंसे निज गुह्य त्यानें. ।
'चिंतोनि आणा अहिरावणाला, हें कार्य सांगा महिरावणाला. ॥ ५
आणोनि तो देइल जीत शत्रु, बोलूं नका, भेद करील भ्रातु.' ।
तों बंधुतें रावण शीघ्र चिंती, ऐकोनि ते येत उभे रहाती. ॥ ६
अहिमहि विनवीती, 'काय आज्ञा करावी'?
दशमुख म्हणे, 'चिंता हे नदी ऊतरावी, ।

---

१. चौंवर. निगम (वेद) चार आहेत:—ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, आणि अथर्ववेद. २. पांच. शिवाला पांच मुखें म्हणून त्याला पंचास्य, पंचानन, पंचमुख, अशीं नांवें आहेत. ३. शके १६४५ शोभन नाम संवत्सरीं चैत्र शुद्ध तृतीयेस हें काव्य परिपूर्ण झालें. ४ संस्कृत 'सिंदूर' शब्दाच्या 'इ'ला 'ए'त्व येऊन आणि वर्णभेद होऊन हा शब्द झाला आहे. ५. सरस्वती. ६. आवडीनें. ७. लंकेंतील पर्वत. ८. रावणाचा पुत्र. याचें शरीर फार मोठें होतें म्हणून यास हें नांव पडलें. ९. रावणाचा प्रधान.

मम सुत अतिकाया मारिला राघवानें,
मजप्रति बहु वाटे हेंचि अश्लाघ्यवाणें.' ॥ ७
अहीमही बोलत रावणातें, 'काळों न दिल्हें पहिलें अम्हातें; ।
कशास जाता सुत मृत्युपंथें? आणोनि देतों जित राघवातें. ॥ ८
गेली ती गोष्ट आतां पुनरपि करणें, चौवटी व्यर्थ दीसे.
देहींचे जीव जैसे यम हरि, हरुं ते राम सौमित्र तैसे.' ।
वंदोनी रावणातें अहिमहि निघती; दूत वीभीषणाचे
येवोनी सांगती तैं, 'टपति रघुविरा! चोर ते रावणाचे.' ॥ ९
ऐकोनियां बिभिषणें निज दूत वार्ता, नीवेदिलें नळनिळांगदजांबुवंता. ।
जावोनि सांगत असे हनुमंत कानीं. बोले कपी, 'तुम्हि रहा दृढ रामध्यानीं.' १०
सैन्यास तो परिघ[3] सदृढ लांगुलाचा[4] बांधोनि, सावध बसे सुत अंजनीचा. ।
दुर्गास तें कपिविरें मुखदार केलें. देखोनियां सकळ सैन्य अचेत झालें. ॥ ११
रात्रौ सितापति म्हणे, 'मजला फणींद्रा[5]! सूषुप्तिनें[6] पिडियलें, करुं चाल निद्रा.'।
जावोनि मंचकिं सहोदर नीजताती. 'श्रीराम' घोष करुनी कपि गर्जताती. १२
ते काळीं दोघे बंधू अहिमहि कपटी पातले मध्यरात्रीं.
देखोनी पुच्छदुर्गा, मग तळिं त्रिशुळीं, खाणिताती धरित्री. ।
नाहीं त्या अंत पुच्छा, खणित बहु जरी शेषपर्यंत गेले.
सांडोनी शूळ तेव्हां, मग अहिमहिंनीं ऊर्ध्व उड्डाण केलें. ॥ १३
जाती ते व्योममार्गें[7] रविशशि त्यजुनी, नाहिं त्या अंत पुच्छा.
त्यांहूनी उंच दीसे, मग ध्रुवसदना आक्रमीलें स्वइच्छा. ।
होतां सुप्राप्त तेथें, वरुनि उतरुनी संभ्रांत[8] जाती.
टाकोनी मोहनास्त्रा[9] झडकरि विवरीं, त्यां रिपू शीघ्र नेती. ॥ १४
सुमंचकीं शेषरघूत्तमांतें बांधोनि, नेलें उदधीतटातें. ।
करोनि आज्ञा मकरध्वजाला[10], 'वर्जी[11],' मुखें, 'येतिल पंथ त्यांला.' ॥ १५
ते दोघे नेले महिकावतीसी[12], ज्या मंदिरीं रीघ न हो यमासी. ।
त्या स्थानकीं ठेवुनि रावणारी, सभोंवते रक्षण चापधारी. ॥ १६

---

१. बडबडेपणा. २. हेर. ३. वेढा. ४. शेंपुटाचा. ५. लक्ष्मणा. ६. निद्रेनें. ७. आकाशपंथें. ८. तंबूत. ९. मोहन या नांवाचें अस्त्र. हें ज्यावर टाकावें तो मृत न होतां, मोहित होउन मूर्च्छित पडतो. १०. मारुतीच्या कंठगत श्लेष्म्यापासून एका मगरीच्या ठायीं झालेला राक्षस. ११. बंद कर. १२. अहिमहींच्या नगरीचें नांव.

येरीकडे वानर सर्व, 'रामा पाहों चला' बोलति, 'पादपद्मा.' ।
मिळोनियां ते कपिरीस आले. न देखतां राम, तयीं गळाले. ॥ १७
'श्रीरामशेषा गति काय झाली?' चिंतेकरोनी चे मुखें विरालीं. ।
'नेला गमे तो रंजनीचरानें, उपेक्षिलें कां गुणसागरानें?' ॥ १८
कंठीं मिठी घालुनि 'वायुपुत्रा. दावीं,' कपी बोलति, 'रामवक्त्रा !' ।
धिक्कारुनी रुद्र म्हणे तयांतें, 'मला गमे बुद्धि नसे तुम्हांतें. ॥ १९
समीप ते तिष्ठति सर्व वैरी, ऐकोनि पीडा करितील भारी. ।
श्रीराम आहे म्हणवूनी वाणी, ऐसें वदा वाक्यचि चापपाणी.' ॥ २०
नळनिळांगदरिसादिक घेउनी, विवरिं संचरती श्रमि होउनी, ।
बहुत संमत धर्मिक वीवरीं पडति मूर्च्छित चौजण भूवरी. ॥ २१
फिरवुनी कपिविरें दृढ लांगुलें; कवळुनी त्वरित खांदिं च वाहिलें. ।
विवर तें त्यजुनि बाहिर पातला. तंव निशाकर दिवाकर भेटला. ॥ २२

नळनीळअंगदादि जांबुवंत बाहिरी,
नेत्र ऊघडोनि पाहताति, ऊर्ध्व अंबरीं, ।
देखताति सर्वत्रांस लांगुलीं विवेष्टिलें.
मारुतीस बोलताति, 'कां अम्हांसि बांधिलें? ॥ २३
मूर्छनादरींत हें अम्हांसि नाहिं ठाउकें,
आणिलें विवेष्टुनी बहूत वाटतें निकें.' ।
सोडुनी तयांसि बोलिला. 'स्वरूप पालटा;
विप्रवेश धरोनियां चला सिंधुच्या तटा.' ॥ २४

पांच विप्र देखोनि लोचनीं, मत्स्यसूत धांवे चि ते क्षणीं. ।
अंगशक्तिनें पांच लोटले. अंजनीसुतें मूख ताडिलें. ॥ २५
वीर पेटला, बाण लावुनी विंधितो, बळें ओढि ओढुनी. ।
रुद्र चेतला, वृक्ष ऊपटी, झोडितो करें, सिंधुच्या तटीं. ॥ २६
वृक्ष मारुनी, वक्षमंडळीं मगरिआत्मजा आणिलें तळीं. ।
वेढि कंठनाळू, वक्षि बैसला. मृत्युकाळिं बोलू साह्य आपुला. ॥ २७
कपिसि तो मकरध्वज बोलिला, 'मरणकाळिं सखा न दिसे मला. ।
मम पिता जरि मारुति आसता, निवटुनी तुजला, मज रक्षिता.' ॥ २८

---

१. आस्वल. २. 'चमु ते विराली' असाही पाठ आहे. ३. राक्षसानें. ४. चंद्र. ५. सूर्य. ६. मकरध्वजराक्षस. ७. मारुति.

**नळनिळां**गदरिसादिक हांसती. वदतसे तयिं स्वमुखें सुत **मा**रुती. ।
कपि म्हणे, 'जनक **मा**रुति तो कसा? श्रुत करीं, अनृत भासत मानसा.' २९
'कपिविरें[1] **क**नकपट्टण जाळिलें, फिरुनि अमृतउदधी मुख क्षाळिलें. ।
जिवनिं जो वदनखांकर टाकिला, जननिनें मगरिनें मग गीळिला. ॥ ३०
तो ऊर्ध्वरेता,[3] जन बोलताहे; मातेस तैं पासुनि गर्भ राहे. ।
त्या पूर्णमासीं मज जन्म झाला, मी बाप जाणें **प**वनात्मजाला.' ॥ ३१
ऐकोनियां **मा**रुति ऊठलासे. आलिंगिला बाळक; सत्य भासे. ।
वाहोनि आणी मगरीस अंतां. जावोनि बोले, 'तुज बाहि ताता.' ॥ ३२
भ्रतारनामा परिसोनि आली. देखोनि विप्रां, मग ते बुझाली. ।
'तें रूप नोहे, पुर दग्ध केलें.' तये क्षणीं वानररूप झालें. ॥ ३३
देखोनि तीनें प्रणिपात केला. घेई पुढें त्या **म**करध्वजाला; ।
**रु**द्रें तिला सांगुनि सर्व वार्ता, 'शोधीतसें मी **र**घुराज भर्ता.' ॥ ३४
ऐकोनि बोले मगरी तयासीं, 'ते दोघे[4] नेले **म**हिकावतीसी, ।
**अहीम**हीनें, बळिदान त्यांचें नियोजिलेंसे **तु**ळजेसि साचें.' ॥ ३५
तों **न**ळ **नी**ळ हि **अं**गद बोलति परस्पर, 'केंवि च सिंधु तरावा?'
प्रार्थितसे **म**करध्वज त्यांसिच, 'या वदनांतरिं वास करावा; ।
नेइन पैल थडी, कुसुमापरि, अंतरिं हेतु दुजा न धरावा.'
लागति कार्णि परस्पर, 'हा मुख मेळवितां, कवणें अंवरावा?' ॥ ३६
बोलतसे **ह**नुमंत, 'मुखीं जरी चाविल, भेदिन टाळु हि याची.
निर्भय होउनियां, बसणें अनयास, तुम्हास हि नौक फुकाची.' ।
**मा**रुतिला म्हणती कपि यावरि, 'चौकि[5] धरूं अम्हि सिंधुतटाची;
जाउनि तूं **म**हिकावति; शुद्धि[6] करीं, **र**घुनाथ स**ल**क्षमणाची; ॥ ३७
त्यांसि ठेवुनी **वा**युच्यात्मजें, **रा**मनाम घे आननांबुजें.'[7] ।
सिंधु लंघुनी, पार पावला रूप त्यागुनी, सान जाहला. ॥ ३८
रेणुच्या परी रूप घेतलें. जाउनी बरें ग्राम शोधिलें. ।
[8]**अं**बिकालयीं तो प्रवेशला. कोंपरें बहू मारितो तिला. ॥ ३९
घेउनी तितें न्हाणिं[9] टाकिलें. ते क्षणीं विशाळ् रूप घेतलें. ।
लावुनी कपाट्[10] **अं**बिकासनीं. बैसला कपी तोंड वांसुनी. ॥ ४०

---

१. लंका. २. उदकांत. ३. आमरण ब्रह्मचर्यव्रत पाळणारा. ४. देवीला. ५. रक्षण करूं. ६. शोध. ७. मुखकमलें. ८. कालीच्या मंदिरांत. ९. नाहाणींत. १०. उघडून.

अंबिकापुजे दूत पातला. देखुनी कपाट् सांगुं धांवला. ।
'कोपली असे फार अंबिका. दार दीधलें, ग्रामनायका!' ॥ ४१
कुशब्दा ऐकोनी, अहिमहि त्वरें धांवति पदीं,
'तुझी अंबे! इच्छा कवण? पुरवूं, सांग, सं[1]पदी.' ।
वदे अंबारूपी कपिविर तयांलागिं वचनें,
'प्रसन्ना मी तुम्हांवरि, बहुत संतुष्ट भजनें. ॥ ४२
सुभक्ती देखीली, म्हणुनि निज रूपा प्रगटिलें.
तुम्ही या रूपातें नयनिं पहतां दग्ध[2] बुबुळें. ।
कपाटें यासाठीं दिधलिं, परि पोटीं बहु क्षुधा,
गवाक्षाचे द्वारीं, प्रचुर दधि ओता घृत दुधा?' ॥ ४३
तदा त्यां अंबेचें वचन परिसुनी हर्ष जहला.
सुगंधी त्या माळा वरुनि कुसुमांच्या वरुषल्या. ।
गवाक्षानें पंचामृतघट भरूनी रिचविले[3].
कपीनें कंठींचे सकळ तुळजे हार दिधले. ॥ ४४
रिकामे दुग्धाचे अमित घट झाले, परि तळीं
स्रवेना तो बिंदू; 'शिव शिव' हि बोले कपि बळी. ।
उभे न्हाणीपाशीं पहति तायें ते, सर्व मिळुनी.
न येतां देखोनी, दडपिति करीं दंड धरुनी. ॥ ४५
यष्टि घालुनि पाहती, तंव कष्टि बोलत अंबिका,
'दोंकडे मज जाचणी; जिविं आठवी बहु त्र्यंबका. ।
दुग्ध तें सरतां चि देखुनि, गर्ज्जनी कपि बोलिला,
'येउं द्या मज अन्नराशि, जठराग्नि हा बहु चेतला.' ॥ ४६
शब्द ऐकुनि, अन्नदूरडि घेउनी, तळिं लोटिती.
भक्षिलें शत कोटि खंडी[4]च, तें हि देखुनि मारुती ।
बोलिला मग, 'भक्त हो! अजि तृप्ति नाहिं च आझुनी,
रामसौमितरीसि लौकरि पाठवाचि शृंगारुनी. ॥ ४७
त्यांसि भक्षिलियावरी, वरदान देइन मी तुम्हां.'
आमुचे जिविचें चि जाणुनि बोलली हि मनोरमा. ।

---

१. आतां. २. जळून जातील. ३. रिकामे केले. ४. पांटी.

शीघ्र जाउनियां, अहीमहि वंधु वाहिर काढिती.
मोहनास्त्र चि काढुनी, मग तेल लावुनि न्हाणिती. ॥ ४८
न्हाणुनी मग हेम[1]वासन लेववूनि शृंगारिती.
टीळका निढळीं[2] लवूनि, बहू पुष्पहार घालिती. ।
वीविधू करुनी तदा बहु यत्न दोघे शृंगारिले.
अंगि चंदन लावुनी मग संभ्रमें च हि चालिले. ॥ ४९
टाकली उभि ऊंपरीवरि आहिरावण[3]अंगना
जाहली अति लुब्ध, लोचनिं पाहतां रघुनंदना. ।
'धन्य ते सति, जीस हा पति, कोणतें तप साधिलें?'
रामरूपिं च वेधली; तिस ध्यान अंतरिं लागलें. ॥ ५०
यावरी पुढें चालतां नरनारि ठाकुनि पाहती.
[4]राममूख सुलोक सर्व [5]चकोर होउनि पाहती. ।
अंबिके बळिदान यांचें चि काय पाहुनि योजिलें ?
[6]रामरूप चतूरमूख ऍकाग्र होउनि निर्मिलें. ॥ ५१
रामशेप हि आणुनी बहु प्रार्थिती जगदंबिके,
'यावरी तुझि काय आज्ञ चि? ते करीं सुखदायके !' ।
शक्तिरूपि चि बोलला कपि 'देउळांतरिं लोटणें.'
कांहिं मुक्त कपाट पाहुनि लोटिलें महिरावणें. ॥ ५२
रामशेप तो प्रवेशतां चि, रुद्र तांतडी
पाद लावुनी कपाट झांकि, सर्व झांपडी. ।
बोलिला कपी तयां विशाळ रूप दावुनी,
अंतकाळिंचा सखा स्मरावयासि त्या क्षणीं. ॥ ५३
राम म्हणे, 'वरदायिनी! तिन्हि लोक हे मज चिंतिती,
तो चि मी रघुनाथ, ये क्षणिं, आठवूं कवणाप्रती ? ।
आमुचा तनुप्राणरक्षण मारुती जरि आसता,
विघ्न हें हि दुरी करोनि चि, संकटीं अजि रक्षिता.' ॥ ५४

---

१. कनकवस्त्र. २. कपाळीं. ३. चंद्रसेना. ४. 'रामरूप शशी लोक चकोर सर्व' असाही पाठ आहे. ५. हा पक्षी चंद्रदर्शनानें आनंद पावतो असा कविसंकेत आहे. 'चकोराणां चंद्रः कुसुमसमयः काननभुवाम्' हा श्लोक प्रसिद्ध आहे. ६. 'याचियाचि जिवासिं कैसें तुझें सांग मन वेधिलें' अन्य पाठ.

ऐकतां हनुमंत सद्गदकंठ फारचि दाटला.
दावुनी निजरूप ते क्षणिं रामपायिंच लोटला. ।
राम देखुनि वायुपुत्र हि नीरें लोचनिं चालिलें.
राघवें उचलोनि मारुतितें, भुजींच आलिंगिलें. ॥ ५५

राममारुति घालुनी मिठि, खंति पावुनि, स्फुंदती.
शेष वीनवि अंतरीं, 'प्रभु! वैरि बाहिरि ऐकती.' ।
राम म्हणे, 'पवनात्मजा! अहिमहिसी कसें मारणें?'
बोलिला कपि, 'दर्शनासचि बाहुनी शिर छेदणें.' ॥ ५६

ऐकोनि बोले रघुनाथ वाणी, 'दृष्टीसि मी कैं च अधर्म नाणीं. ।
विश्वास तो देउनि, जाण, त्यांतें, मारूं नये रे! शरणागतातें.'॥ ५७
तों वीनवी मारुति रामचंद्रा, मीं मागतों एक दयासमुद्रा! ।
मारावया दे महिरावणातें, भेदीं पुढें तूं अहिरावणातें.' ॥ ५८
'अवश्य' बोले रघुराज दाता. प्रार्थी कपी, 'या तुम्हि पृष्ठि आतां.' ।
तो शक्तिरूपें महिरावणासी बोले, 'सख्या! ये मम दर्शनासी. ॥ ५९
प्रसन्न झाल्यें, तुझिया सुभक्ति.' ऐकोनि धांवे तंव उग्र शक्ति. ।
देखोनि त्यानें दृढ चित्त केलें. तेथें पुढें येउनि कर्म ठेलें. ॥ ६०
जावोनि लागे हनुमंतपायीं, तैसाचि त्यानें रगडोनि ठायीं, ।
विलंब तो देखुनि चेव आला. अंबा नव्हे, मारुति सिद्ध झाला. ॥ ६१
तैं वेंगडी बोबडि प्राप्त झाली. जावोनि सांगे म्हणे , 'धाड आली. ।
पूर्वी च जेणें पुर दग्ध केलें, अंबालयीं वानररूप झालें.' ॥ ६२

अशा वाक्यांपोटीं भय बहुत सर्वांसि भरलें.
उभा युद्धालागीं अहि समरिं ठाके भुजबळें. ।
कपी बोले, 'रामा! त्वरित अहिशत्रू निवटणें.'
म्हणे, 'वायूपुत्रा! शरधनुविणें काय करणें? ॥ ६३

कपी! माझें आहे शरधनु अहीरावणगृहीं,
त्वरें दे आणोनी, वधिन शरजाळें मग अही.' ।
कपीनें ते काळीं क्षण न लगतां आणुनि दिलें.
म्हणे, 'रामा! आतां त्वरित निवटीं राक्षसकुळें.' ॥ ६४

---

१. उदक. २. 'कपिसिं दोहिं भूजिं' अन्य पाठ. ३. 'सुखें' अन्य पाठ. ४. 'दळें' अन्य पाठ.

कपी दोघे बंधू नमुनि बसवी स्कंधिं स्वकरें.
निघे तो बाहेरी, तंव रघुपती विंधित शरें. ।
शरा सोडी ओढी, पडति रिपुकोटी पटपटां.
रवीला तो वाहे, खुडुनि शिरकंजें[१] तटतटां. ॥ ६५
विमर्दोनी सेना तंव पुढें अहीरावण उभा.
शरें विंधी त्यातें, अनुपम दिसे राघवप्रभा. ।
शराचे संधानें महिवरि बहू शोणित[२] पडे.
[३]अशुद्धाचे थेंबू तितुके अरि होती चहुंकडे. ॥ ६६
रणामाजी झाले अगणित अहीरावण पहा
[३]जनाचा तो आत्मा म्हणत हनुमंता, 'अजित हा. ।
मरेना हा शत्रू, त्रिपुरवरदी भासत मला.
वधूं जातां एका, बहुत रिपु होती कपिकुळा.' ॥ ६७
रघुपती त्यजुनि मारुति चालिला, झडकरी मगरिसंनिध पातला; ।
'प्रिये[४]! न ये मरण कां अहिरावणा? समरिं कष्ट बहु त्या रघुनंदना.' ॥६८
'सदनिं ते अहिरावणकामिनी, मरण तीस पुसा, तुम्हि जाउनी. ।
कथिल सर्व तुम्हां गुज जीविचें, वचन तीस वदा बहु युक्तिचें.' ॥ ६९
वचन ऐकुनि मारुति ये पुरा, सदनिं बैसलिसे नृपसुंदरा. ।
दशरथात्मजसेवक देखुनी, परम आवडिनें नमि कामिनी. ॥ ७०
धरुनि मारुति आसनिं बैसवी. 'कवण हेत असे तुझिये जिवीं?' ।
'रघुपती युवती! तुज चिंतितो, समरिं आज पती न चि जिंकितो. ॥ ७१
बहुत दाशरथी करी संगरा. समरिं मृत्यु नये तुझिया वरा. ।
पडति रक्तसडे जितुके मही, त्वरित उद्भवती तितुके अही. ॥ ७२
मरण सांग खरें पतिचें मला.' म्हणत सुंदरि ते, 'कपि! तूं भला. ।
पतिस मारुनि, देशिल काय रे! जरि सितापति दाखवि पाय रे. ॥ ७३
जरी मला वरिल तो महिजापती, कथिन मी मरण तें तुज मारुती!' ।
कपि म्हणे; 'पति रघूत्तम दीधला.' सति म्हणे, 'वचन हें कपि! दे मला.'७४
घेवोनी भाष तेव्हां, मग सति पतिचा सांगते मृत्यु आतां.
'पाताळीं अमृताची डेळमळ[५] भरलीं स्थंडिलें वायुसूता! ।

---

१. शिरकमळें. २. रक्त. ३. 'जगद्धर्ता आत्मा म्हणुनी' अन्य पाठ. ४. चंद्रसेना. ५. कांठोकांठ.

आज्ञाधारी पतीचे भ्रमर मुखपुटें आणुनी अमृतातें,
रक्ताचा बिंदु जेथें, स्रवति वरि सुधा, ऊठवीती मृतातें. ॥ ७५
रोधीं पाताळदारा, त्वरित कपिविरा! येउं नेदीं सुधा ते.'
ऐकोनी शीघ्र गेला कपि. बहुत करी आपदा षट्पदांतें. ।
तेणें ते चूर्ण केले, अमित रगडिले. पातला स्वामि त्यांचा.
त्याशीं युद्धासि येतां, मग धरित करीं मारुती कंठ त्याचा. ॥ ७६
मारावा वायुपुत्रें, तंव भ्रमर मुखें कारुणा थोर भाके
'देई तूं जीवदाना.' म्हणत कपि तया, 'नाणिं तूं सूध मूखें.' ।
'नाणीं नाणीं' त्रिवाणी वदत कपि. तयें वाहिल्या शीघ्र आणा.
'आज्ञा स्वामी ! करावी' परिसुनि कपिनें सोडिलें शीघ्र त्यांना. ॥ ७७
तेव्हां ते स्तब्ध झाले. अमृत अलिकुळें टाकिलें शीघ्र आणूं.
येवोनी राघवातें वदत कपि, 'सितीं बाण लावीं कृशानू. ।
रामा ! एक्या शरानें, दिसति बहु अही, राघवा ! मारिं आतां.'
रामें त्या तीव्र बाणें अहिशिरकमळें लाविलीं व्योमपंथा. ॥ ७८

(सवाई.)

मर्दुनियां अहिरावण तो, महिजावर बोलत, 'चाल, कपींद्रा !'
'संकट एक असे. रघुनायक! काय करूं? भुवनत्रयचंद्रा! ।
जैं रिपु हा न मरे, अहिरावणस्त्रीसि तुला विकिलें, भुवनेत्रा !
घेउनि भाष तिनें, मज दुस्तर गोंवियलें असे, बुद्धिसमुद्रा!' ॥ ७९
राम म्हणे, 'मम नेम तुला कपि! ठाउक पत्निविना व्रतधारी.
जाणसि तूं कपि! द्यावि च संकट भाष कशी? दिधली सखियारी. ।
ही जशि युक्ति नियोजिलि, त्वां पवनात्मज! हें तसें विघ्न निवारीं.'
ऐकुनि जाय कपी, तंव मंदिरिं तिष्ठत बैसलिसे अहिनारी. ॥ ८०
'ऐक सखे ! रघुराज तुझा पति, हाचि रणांगणिं निश्चय केला.
राम तुझा तरि संग करील, अभंग सुमंचक नाश न झाला.' ।
येरि म्हणे, 'मम मंदिरिं मंचक, वज्र पडे, परि भंग न त्याला.'
बोलतसे कपि, 'भंगत मंचक, तैं न चले मम मुक्त ग ! बोला.' ॥ ८१

---

१. 'तेणें माझा पती तो उठत महिवरी घातल्या अमृतातें' अन्य पाठ. २. भ्रमरांतें. ३. भ्रमरांचे समुदाय. ४. अग्निसारखा तेजस्वी. ५. आकाशमार्ग. ६. 'भुवनेंद्रा' अन्य पाठ.

(श्लोक.)

नारिपासुनी रुद्र चालिला. ते क्षणीं त्वरें भृंग बाहिला. ।
शब्द ऐकतां, शीघ्र येउनी ठाकला पुढें, हस्त जोडुनी. ॥ ८२
'काय काज तें सांगिजे मला. ते क्षणीं तया रुद्र बोलिला. ।
'जाउनी अहीरावणागृहीं, चाव मंचकापासुनी मही; ॥ ८३
पर्णतुल्य तो भृंगनायका ! ठेवुनी त्वचा, बांधिं मंचका; ।
काढिं आवघा गर्भ कोरुनी.' भृंग चालिला वाक्य ऐकुनी. ॥ ८४
भक्षुनी त्यजी कौंठ तों करी, भृंग तेंवि तो मंच कातरी. ।
प्रार्थि येउनी रामकिंकरा, 'कोरिलें प्रभू! मंचकांतरा.' ॥ ८५
कपी येउनीयां म्हणे राघवातें, 'चलावें प्रभू! कामिनीमंदिरातें.' ।
धरोनी कपी चालवी शीघ्र रामा, घरा आणितां, पातली शीघ्र वामा. ॥ ८६
रघूराजपादांबुजीं मग्न झाली. 'उठी नायका! भृंग होउनि ठेली.' ।
रघूराज स्नेहें वदे, 'पाहिं मातें.' कपी चीमटी, 'तूमची हे रमा ते.'॥ ८७
उठोनी वधू ते धरी रामपाणी, 'चला राघवा!' तों म्हणे रुद्र कानीं, ।
'तुम्ही मंचकीं जाउनी स्वस्थ वैसा. तुम्हां सूटका, ते अयोध्यानिवासा!'॥ ८८
स्त्रैजी जो हरी ब्रह्मयानायकातें, जडत्वासि त्या काय ऊणीव तेथें? ।
तिनें मंचकीं आणुनीयां विहारें, प्रभू वैसतां भंगला अंगभारें. ॥ ८९
सुपर्यंक तो भंगतां, भंग चित्ता. वदे तो कपी, 'भाप ते मुक्त आतां. ।
रघूनाथजी! शीघ्र तुम्हीं चलावें, दया त्यागुनी, पूर्ण निष्ठूर व्हावें.'॥ ९०
रघुपती धरुनि मारुति ऊठवी, मग रडे सति पती जिविं आठवी. ।
'न च कळे, कपि! तुझे जिविंचें कुडें, रघुपती! मज वहूतचि सांकडें.॥ ९१
कपि! खुणावुनिच नेशिल राघवा, त्यजिन मी त्वरित ये क्षणिं या जिवा.' ।
सति म्हणे, 'तुज मि शापिन मारुती!' रडतसे, पडत मूर्च्छित, ते क्षिती.९२
बोले रघूत्तम अनूत्तम, 'खेद त्यागीं, द्वापार तें प्रगटतां, मम रूप भोगीं. ।
होशील तूं बहुत सुंदर सत्यभामा. सोळासहस्र ललनांतरिं पट्टरामा.' ॥ ९३
ऐसें वदोनि तिजला वरदान दिल्हें. श्रीराम तैंच मग तेथुनि शीघ्र गेले. ।
घेवोनियां कपिसवें मग शेषबंधु, चाले पथीं विजयि होउनि दीनबंधु. ॥ ९४

---

१. हत्ती. २. 'मंदिरातें' पाठांतर. ३. सुंदर स्त्री. 'तेथें' पाठांतर. ४. 'अनंतोदरीं ब्रह्म अंडें अनंतें' अन्य पाठ. ५. मंचक. ६. पट्टराणी. ७. लक्ष्मण. (हा शेषाचा अवतार होय.)

आले त्वरें तिघहि ते उदधीतटातें. देखोनियां मगरि वंदित राघवातें. ।
पादांबुजा नमियलें मकरध्वजानें, शेषाग्रजा कथियलें पवनात्मजानें. ॥ ९५
तो सिंधु लंघुनि प्लवंगमदीनबंधु, देखोनि, ते नमिति त्या कपि बुद्धिसिंधु. ।
धांवोनियां नळनिळांगदजांबुवंतें, आलिंगुनी धरिति रामपदांबुजातें. ॥ ९६
श्रीरामशेष कपि घेउनियां निघाले. ते संभ्रमें करुनियां चमुमाजि आले. ।
श्रीराघवा नयनिं पाहुनि सर्व सेना, आनंदली. सुख मुखें मज बोलवेना. ॥ ९७
श्रीसूर्यवंशकुळभूषण राम आला. त्या दर्शनें बिभिषणा बहु लाभ झाला. ।
वीराजली निजसुखें रघुराजमूर्ती. वाखाणिती सकळ वानर थोर कीर्ती. ॥ ९८

'अनामा! निःकामा! अमितसुखधामा! रघुपती!
तुतें वर्णी वाणी, श्रमित बहु झाला अहिपती. ।
अनंता! वेदांता! करिशिल अनाथावरि दया,
तरी सीताकांता! मम भवभयें नेइं विलया.' ॥ ९९

रामाचीं चरितें, सुखाब्धिभरितें, कोट्यांतरीं ये रिते.
शत्रूतें अहितें, पवित्र महितें, संतांसि तें साहिते. ।
वंदी तीं चरितें, सुमुक्त उचितें, देया जना संचितें.
भूमीतें रवितें अनंतकवितें संभाविता गायितें. ॥ १००

श्रोते! हो! बहुभाषणें त्यजुनियां काव्यासीं या भूषणें
तुम्ही तो निजभूषणें निजकृपे दृष्टी मला पोषणें. ।
कृष्णार्थासिं न कर्षणें वदविलें हें काव्य संकर्षणें,
ह्या काव्या अतितोषणें बहुत मी संतृप्त संभाषणें. ॥ १०१

---

# कुशलवाख्यान.

## प्रसंग पहिला.

(श्लोक.)

सदा धरी आनन जो गजाचें, मदोदकीं स्रावति गंड ज्याचे, ।
मोरेश्वरा शोभति चार भूजा, स्थापूं मुळीं ग्रंथ करूनि पूजा. ॥ १
श्रीशारदे! सादर तूज भावें चिंतीतसें, किंकर मी स्वभावें. ।
अज्ञान विध्वंसुनि ज्ञान देईं. प्रज्ञा करीं सोज्वळ, येश घेईं. ॥ २

---

१. राक्षसानें. (मारुतिपुत्रानें.) २. वानर. ३. विराजमान झाली. ४. अगणित सुखाचें गृह. ५. 'मुमुक्षुचरितें' अन्य पाठ. ६. तोंड. ७. मदोन्मत्त गजाच्या गंडस्थलापासून जें पाणी स्रवतें त्या पाण्यांत.

भो! सद्गुरू! मी तुजलागिं वानूं, तुझी सरी कैं न करीच भानू. ।
तो अस्त झाल्या, प्रगटे सु रात्री. नित्योदयी तूं दिन नेत्र नेत्री. ॥ ३

तें यज्ञकंकण करांबुजिं राघवातें
शत्रुघ्न ते भरत बांधिति नीजहातें. ।
सोडूनि भूमिवरि त्या मग श्यामकर्णा;
झांकी रवी नयन, देखुनि कांतिवर्णा. ॥ ४

श्रीराम वंदुनि सहोदर ते निघाले. वाजीं गजारुढ रथीं दळभार चाले. ।
पादाति चालति; नव्हे गणना तयांची; कीं काढिली वरुनि कांति हिमालयाची.
तो श्यामकर्ण मग चालतसे पुढारां, मागून सैन्यरज पाडित अंधकारा. ।
सोडूनियां चमु तुरंगम तेजराशी आला त्वरें करुनि वाल्मिकिआश्रमासी. ॥ ६
तेथें क्रिडा करितसे लहु बाळवेशें. गेला असे वनफळां कुश तो अवेशें. ।
त्या बाळकाजवळ अग्रज तो नसोनी, पाहे हयासि, मन निर्भय तें करूनी. ॥ ७

अश्व देखतांचि बाळकाशि चोजं वाटलें.
'रुक्मरत्नभूषणें' म्हणे 'कसें सुशोभलें?' ।
ते क्षणींच देखिली शिरीं सुवर्णपत्रिका,
पाहि बाळ वाचुनी बहूत अर्थ नेटका. ॥ ८
'सूर्यवंशिराघवें तुरंग हाचि सोडिला.
याशि जो धरी बळें, नृपांत वीर आगळा. ।
सैन्य हें करील युद्ध, सोडिना तयावरी,
मीच राम येउनी करीन शत्रुमोहरी.' ॥ ९
पत्रिकार्थ पाहुनी लहू कुमार हांसला.
सोडुनी करांबुजें चुरा करूनि टाकिला. ।
अश्वकंठिंची करें सुरत्नमाळ काढिली,
जानकीसुनंदनें गळ्यांत शीघ्र घातली. ॥ १०
तुरंगकंठ वेष्टुनी सुरम्यवस्त्रपल्लवें,
कर्दळीवनांत आणुनी तयासि गौरवें, ।

१. बरोबरी. २. 'न पवेच भानू' असें पाठांतर आहे. ३. 'आत्महातें' असाही पाठ आहे. ४. ज्याचे कान काळे असा अश्व. ५. तेजाचा रंग. ६. सखे बंधु. ७. पायदळ. ८. धुरोळा. ९. लगबगीनें. १०. कौतुक. ११. चांगला. १२. उत्कृष्ट, समर्थ. १३. जो राजा अश्व सोडणार नाहीं त्याच्याशीं. १४. अरिपराभव. १५. लवानें. १६. पदरानें.

बांधुनी रणांगणांत संगरासि[1] ठाकला.
अश्व तो न देखतांचि सैन्यभार लोटला. ॥ ११
अश्वरक्षपाळ[2] येउनी कुमार पाहती;
चाप सज्जुनी उभा लहान फार आकृती; ।
दीसतो कुमार हा जसा सकाळचा रवी,
धाकुटा परंतु हावभाव[3] फार दाखवी. ॥ १२
एक जाउनी सांगती सिते, 'अनर्थ मांडिला तूझिया सुतें. ।
कर्दळीवनीं अश्व बांधिला. त्या निमित्त सैन्यभार लोटला. ॥ १३
प्रार्थिलें अम्हीं बाळकोत्तमा, 'देइं सोडुनी या तुरंगमा[4].' ।
नायकेच[5] तो हट्ट मांडिला. चाप सज्जुनी बाण लाविला. ॥ १४
येणें कां उगें हयासि बांधिलें? रावणारिशीं[6] वैर लाविलें. ।
सैन्य येउनी लुटिल आश्रमा. नारिबाळकें पावती श्रमा. ॥ १५
तुम्हिच बांधिला अश्व तो जरी, सैन्य[7] येउनी करिल बोहरी[8]. ।
कासयास तूं येथ आलिशी? सर्व तापसां काय भोंवशी[9]?' ॥ १६
आश्रमीं महाकांत वर्तला. एक बोलती, 'येथुनी चला.' ।
त्यावरी सुबुद्धिवंत बोलती, 'सर्व आयका आमुची मती. ॥ १७
देउं त्यां करीं हीं तिघंजणें. निर्भयें मठीं तुम्हिच राहणें.' ।
बोलिली सिता बहुत हें निकें[10], 'द्या तुम्ही अम्हां धरुनि हस्तकें.' ॥ १८
रुदन ते करितसे जनकात्मजा. 'कुमति हे उपजली कशि आत्मजा?' ।
तुरग बांधुनि जिवावरी ऊठला. पडतसे[11] जननि होउनि व्याकुला. ॥ १९
दीर्घ रोदन वनीं लहु आइके, 'कोण गांजित असे मम [12]अंबिके? ।
तीक्ष्ण[13] सायक [14]शितीं धनु तें करीं, येउनी नमुन प्रार्थित सुंदरी[15]. ॥ २०
'कासया[16] धरियला हय तो तुवां? काय होय न कळे तुझिया जिवा.' ।
येरु[17] वीनवि, 'तुझा सुत मी जरी, सैन्य[18] कां करि न संगरीं बोहरी[19]?' ॥ २१

१. युद्ध. २. भरतशत्रुघ्न. 'अश्वपाळ तेथ' अन्यपाठ. ३. शौर्याचा डौल. ४. अश्वास. ५. 'नायकेच तो हावें वेधला.' असाही पाठ आहे. ६. रामांशीं. ७. 'सैन्य नेउनी करिल मोहरी' असाही पाठ आहे. ८. नाश, नासधूळ. ९. प्रतिकूळ होशी. १०. चांगलें. ११. 'भुमिवरी' असाही पाठ आहे' १२. आईला. १३. "बाणतीक्ष्णशितीं" असाही पाठ आहे. १४. धनुष्याची दोरी. १५. सीता. १६. कशाला १७. लव. १८. 'आज कां करुनि घेइन मोहरी' असाही पाठ आहे. १९. राखरांगोळी, नाश.

आत्मजें जननिशी समजावुनी, सैन्य बाहिर असे मठ वेष्टुनी, ।
अश्व हिंसति बळें घनगर्जना. किंकळ्या द्विरद[1] फोडिति आनना. ॥ २२

(सवाई.)

ऐक[2] गजावरि, एक हयावरि, एक रथावरि बैसुनि आले.
 घालुनियां कवचें, धरुनी बरच्या करिं, सेवैक[3] पेलिति भाले. ।
गर्जति वीर धुंधाटसमीरण[4], ते रणधीर उताविळ झाले,
 वस्त्र सँवारुनि[5] शस्त्रं विकल्पुनी[6] अस्त्रहि मंत्रुनि युद्धिं निघाले. ॥ २३
तुंबँळ[7] सैन्य विलोकुनियां, लहुशीं मग तो मुनि वाल्मिकि बोले,
 'हे चमु फार, लहू! सुकुमार तुं राहिं उगा, तुजलागिं न तोले.' ।
येरु वदे, 'चमु मारिन आज, ऋषी! तुमचे निववीन मि डोळे.'
 ऐकुनि शब्द ऋषी मग स्तब्धचि होउनियां हृदयांतरिं डोले. ॥ २४
वंदुनियां ऋषीमायपदांबुज, वोढुनि कार्मुक[8]. बाहिर नीघे.
 सैन्यसमुद्र विलोकुनि दृष्टिस भूतनु[9]पासुनि धांवत वेगें; ।
छेदितसे परवीरशिरें उडवी नभिं सोडुनि बाण अमोघे[10].
 येरिकडे चमुमाजि उताविळ दाशरथी[11] निधडे[12] रणिं दोघे. ॥ २५
देखुनियां अति मार दयाकुल वाल्मिकि सांगतसे लहुवातें,
 'संनिध साह्य नसे कुश तो तुज, यास्तव सोडुनि दे तुरगातें.' ।
येरु[13] म्हणे, 'मज साह्य कृपा तुमची, मग काय असे भय मोतें[14].'
 'धन्य' म्हणे ऋषि, 'जानकिच्या कुशिं जिंकुनि ये रिपुंशीं निजहातें.' २६
बोलतसे शुभ वाक्य ऋषीश्वर, 'हो विजयी रणिं तूं लहुबाळा!'
 त्यावरि युद्ध करी समरांगणिं. पाहतसे भरतानुज[15] डोळां. ।
प्रेरुनियां रथ, गर्जतसे म्हणे, 'हे मज दाविशि कौतुक काळा,
 खेळशि अग्निसवें लहु! केंवि तुं वोढिसि पुच्छ धरूनि सुंग्याळा[16] ?' २७

(श्लोक.)

बोले[17] लहू त्या भरतानुजासीं, 'मी धाकुटा अद्भुत रे! तुम्हांसीं. ।

---

१. दोन रद (दांत) ज्याला आहेत तो. (गज.) २. कित्येक. ३. 'सव्य कराप्रति' अन्य पाठ. ४. सोसाट्याचा वारा. ५. आटोपून. ६. 'विकंपितें' असाही पाठ आहे. ७. अतिशयित, फार. ८. चाप. ९. 'भूतनया बहु हांवेंशि वेगें' असाही पाठ आहे. १०. अव्यर्थ, फलदायक. ११. भरतशत्रुघ्न. १२. धैर्यवान्. १३. लव. १४. मला. १५. शत्रुघ्न. १६. उत्तम सर्पास. १७. 'तो बोल बोले भरतानुजाशीं मी धाकुटा अंतक रे तुम्हांसीं' असाही पाठ आहे.

भक्षी जसा तो वडवाग्नि[१] सिंधू, कीं तो करी हस्ति अगस्ति[२] बिंदू. ॥ २८
द्रोणाद्रि कैसा हनुमंत[३] आणी? पायें जगा वामन[४] तो उमाणी[५]. ।
न मानणें अंबरिं सूक्ष्म भानू, अन्यत्र गाईसम कामधेनू. ॥ २९
चिंतामणि[६] प्रस्तर[७] कां म्हणावा? चतुष्पदीं[८] नंदि[९] कसा गणावा? ।
अन्यत्र पक्ष्यासम पन्नगारी[१०] म्हणों नये मानव दानवारी[११]. ॥ ३०
न लेखणें कल्पतरू[१२] तरू तो, कीं या जनाचा परि सद्गुरू तो. ।
जो शूर क्षत्री[१३] परचक्रभेदी[१४] लहान कैसा? रणिं पाठ नेदी[१५].' ॥ ३१
ऐकोनी शब्द त्याचे मग निजवदनीं काय शत्रुघ्न बोले,
　'पृथ्वीमाजी दिसेना लहुसम, परि हा मीपणें फार डोले. ।
शिक्षा मी याशि लावूं, परि लघुमुल हें; काय होईल कीर्ति?'
　यालागीं स्तब्ध झाला. मग लहु उठला संगरा शूरमूर्ति. ॥ ३२
'सांभाळीं बाण माझा' मग रघुपतिचें नाम गर्जोनि कर्णीं,
　वोढूनी सोडि तेव्हां, गगन गडगडी, जेंवि वीजा सुवर्णी. ।
जाती झांकूनि डोळे, पडति हय तळीं, वीर मूर्छीत यानें.
　शत्रुघ्ना थोर चिंता, '[१६]मृतिसमयिं' म्हणे 'रक्षिजे राघवानें.' ॥ ३३
झाले कोट्यान कोटी; नभिं महिवरुनी, बाण एक्या शराचे.
　जैशा त्या मेघधारा वरुषति अवनी, प्राण घेती परांचे. ।

---

१. समुद्रांत राहून त्याचें जल शोषण करणारा अग्नि. याची कथा अशी:—और्व नामक एक मोठा भार्गववंशोत्पन्न मुनि होता. त्यास असें कळलें कीं कार्तवीर्यकुलोत्पन्न राजांनीं भार्गवसंततीचा उच्छेद करून आपल्या कुलांतील स्त्रियांस द्रव्यनिमित्त बहुत पीडा दिली. तेव्हां यानें त्यांच्या नाशासाठीं तपःप्रभावानें भयंकर अग्नि उत्पन्न केला. त्यामुळें क्षत्रियांस फार त्रास झाला, तेव्हां ते और्वपितरांस शरण गेले. नंतर पितरांच्या आज्ञवरून और्वानें आपला कोपानल समुद्रांत टाकिला. यासच 'वडवाग्नि,' 'वडवानल' असें म्हणतात, कारण याचें मुख वडवे(घोडी)सारखें आहे. २. अगस्त्यमुनि. यानें कालकेय नामक असुर देवांस पीडा देऊन समुद्रांत लपत, म्हणून संपूर्ण समुद्राचें शोषण केलें. (महाभारत, वनपर्व,अ० १०२–१०५). ३. लक्ष्मणास रावणाची शक्ति लागली, तेव्हां मारुतीनें द्रोणाद्रि (पर्वत) आणून औषधीच्या योगें त्याला सजीव केलें. (रामायण, युद्धकांड, अ० १०१–१०२). ४. विष्णूचा अवतार. यानें बलीजवळ तीन पावलें भूमि मागून त्यानें उदक सोडल्यावर विराटरूप धारण केलें आणि एका पावलांत पृथ्वी आणि दुसऱ्यांत आकाश आटोपून, तिसरें पाऊल बलीच्या शिरावर देऊन त्यास पाताळांत लोटिलें. ५. मापून पाही. ६. चिंतिलेलें देणारा मणिविशेष. ७. पाषाण. ८. चारपायांच्या पशूंत. ९. शिवाचा मुख्य गण, नंदिकेश्वर. हा शिवाचा द्वारपाल होय. १०. गरुड. ११. देव. १२. इष्टवस्तु देणारा वृक्ष. १३. क्षत्रिय. १४. शत्रुसैन्याचा नाश करणारा. १५. न देई; पळून जात नाहीं. १६. मरणकाळीं.

**शत्रुघ्नें** धैर्य चित्तीं धरुनि म्हणितलें, 'थोर हा वीर राणा.
मोठी[1] या साध्यविद्या; अति गुणपुरता, हे गती नाहिं कोणा. ॥ ३४
आतां या पाठि देऊं, निजमुख फिरवूं, अग्रजा[2] काय दावूं?
मारूं हा तीव्र बाणें, जरि मज न मरे, संगराशीं समाऊं.[3]' ।
तेव्हां तो बाण सोडी, गगन पैरवडी[4] जाहले लक्ष कोडी.[5]
देखोनी **जान**कीचा तनय भुजबळें बाण बाणेंचि तोडी. ॥ ३५
असंख्या बाणांचे करुनि तुकडे पाडित शरें,
तळीं[6] भेदी वीरां गगनिं उडवी तो किति शिरें? ।
कृतघ्नें **शत्रुघ्नें** प्रबल रिपु पाहोनि नयनीं,
निमंत्री मार्तंडास्त्रहि[7] मग धनुष्या चढवुनी. ॥ ३६
त्यजी त्या अस्त्रातें, मग रवि नभीं कोटि दिसती.
**लहु** तैं मेघास्त्रा त्यजि दिनमणी[8] सर्व लपती. ।
बुझाले ते भानू, न दिसति कदां अभ्रपडळीं,[9]
प्रसंगें **शत्रुघ्ना** कुतुहल दिसे नेत्रकमळीं. ॥ ३७
आवेशें[10] **शत्रुघ्नें** समरिं मग मोहास्त्र[11] त्यजिलें.
**लहू**नें तें दृष्टीसमुख निरखोनी न गणिलें. ।
मुखीं श्री**रा**माचें स्मरण करितां मौन्यचि पडे.
न चाले अस्त्राचें सकळ बळ भूसापरि उडे. ॥ ३८
सुचिंता **शत्रुघ्ना** हृदयिं पडिली, त्याशि बघतां.
विलोकोनी बंधू **भर**त मग बोले नृपसुता.[12] ।
त्यजी निर्वाणास्त्रा[13] अजुनि नयनीं काय बघसी;
रिपू हा नाटोपे, यश मज गमे तूं [14]नें पवसी.' ॥ ३९
निमंत्री शैलास्त्रा त्यजित मग **श**त्रुघ्न समरीं,
म्हणे, 'वीरा! आतां समरिं न पळें, संगर करीं.' ।
निघे तों गर्जोनी धरणिनभ व्यापूनि भरलें,
कुमारें देखोनि त्यजुनी शर मध्येंच खुडिलें. ॥ ४०

---

१. 'मोठी या साध्य विद्यागुरु तरि पुरता हे मती नाहीं कोणा' असाही पाठ आहे. २. भरताला. ३. समाविष्ट करूं. ४. रीति, प्रकार, आकाशभर पसरलेले. ५. कोटी. ६. भूमीवर. ७. सूर्यास्त्र, ८. सूर्य. ९. मेघमंडळांत. १०. लगबगीनें. ११. या अस्त्रानें प्राण न जातां मूर्च्छा येते. १२. शत्रुघ्ना. १३. निर्वाणींचें, अखेरीचें, शेवटचें अस्त्र. १४. न पावशी.

साध्य[1] ज्या असति छत्तिस विद्या, केंवि बांधिल तयासि अविद्या[2]? ।
शस्त्र[3] अस्त्र न चले मग बुद्धया[4] तो करीं करुं म्हणे मल्लयुद्धया[5]. ॥ ४१
ते करें धरिति हस्तक वोढुनी, पाडिती मग परस्पर मेदिनी[6], ।
लाविती रंग[7] बहू करपंकजीं[8] हाणिती दुरुनि धांउनियां भुजीं. ॥ ४२
लहु लघू दशरथात्मज मोठा, फिरुनि जाउनि धरी करि पोटीं[9]. ।
उचलुनी मग रथावरि घाली, सकळही चमु सुशीघ्र निघाली. ॥ ४३
हर्ष मानिति नृपात्मज दोघे[10], 'जाहलों' म्हणति 'आजि अमोघे[11].' ।
घेउनी निघति राघवपुत्रा, चालिली निजपुरा चमुयात्रा[12]. ॥ ४४
लहु रथीं सुदृढ बांधुनि नेला. जनकजे श्रुत उदंत[13] जहाला. ।
येउनी मठिं ऋषीसुतमेळे[14] कथिति सर्व मुखीं क्षितिबाळे. ॥ ४५

भूमिजे[15] ऋषीकुमार सांगती, 'तूझिया सुतें मारिले किती? ।
शस्त्रि अस्त्रि तो अजिंक जाहला, मल्लसंगरीं[16] बंध पावला. ॥ ४६
बांधुनी तया रथिंच घालुनी, वीर गच्छले[17] सैन्य घेउनी.' ।
ऐकतां वृतांत जानकी पडे, वक्ष भाळ तें पिटुनियां रडे. ॥ ४७
शोक ते करी रामअंगना. 'दाखवा' म्हणे 'शीघ्र नंदना, ।
यावरी कुठें पाहुं लेंकरूं? एकली वनीं काय मी करूं?' ॥ ४८

अळउनि[18] महिजा म्हणे मुखें, 'ये त्वरें मम बाळका!
तुजविण हा जिव शीणतो, त्वरें धांवरे रविपाळका[19]! ।
म्यां तरी तुजलागिं रे! मुळिं म्लान आननिं[20] शिक्षिलें;
नम्रतें मज त्वां बुझावुनि[21] कंटकीं धड घातलें. ॥ ४९
शत्रु रथिं तुज बांधितां, हंबारशी मम वासुरा[22]!
काय एकटि या वनीं करूं, लागला जिविं झोंझरा[23]. ।
आजुनी कुश कां न ये तुजलागिं सोडवुं येक्षणीं?'
अश्रु ते स्रवती महीवरि, दुःखें[24] दाटत मेदिनी. ॥ ५०

---

१. प्राप्त. २. माया. ३. 'यत्न कांहिं न चले मग बुद्ध्या' असाही पाठ आहे. ४. जाणूनबुजून. ५. बाहुयुद्ध. ६. भूमीवर. ७. कळ. ८. हस्तकमळें. ९. कमरेस विळखा घाली. १०. भरतशत्रुघ्न. ११. सफळ. १२. सैन्यभार. १३. वार्ता. १४. थवे. १५. जानकीस. १६. बाहुयुद्धांत. १७. गेले. १८. विनवणी करून. १९. रविवंशाचें पाळण करणाऱ्या. २०. मुखानें. २१. समजावुनी. २२. वत्सा. २३. घोर. २४. 'दुःख दाटतसे मनीं' असाही पाठ आहे.

'ठाव दे महि माय !' म्हणउनि धाय वदनीं मोकली.
'जीव कां नवजाय' धरि ऋषिपाय रडतां शोकली. ।
'भेटवा वाल्मीकि ! ताता ! कूश तो मज आणुनी.'
येरु सांगतसे बुझावुनि[1], 'ऐक वो क्षितिनंदिनी ! ॥ ९१
सोडऊनि लहूस, कूश धरूनि आणिल चूलते,
शब्द मी अनुवादतों तुज, अंतरीं धरिं पूरतें. ।
भाष्य[2] म्यां पहिलें कथीलें, घडुन आलें हें तीतुकें.
मानिं हा विश्वास अंतरिं, दुःख ना करिं ईतुकें.' ॥ ९२
असें ऋषी वदे मुखें, 'अचिंत[3] राहिं तूं सुखें.
कुमार पैल पातला दुरूनि कूश कौतुकें. ।
कुशासि देखुनि सिता रडोनि आळवी[4] शुरा;
कुमार होय घाबरा, पुसे नमूनि सुंदरा. ॥ ९३
वृतांत सर्व सांगती; लहूचें युद्ध वानिती[5],
निदान बंध पावला म्हणोनि त्या अमानिती[6]. ।
सुसैन्य तेंचि वोसरे[7], परंतु जानकी झुरे[8]
बहूत आम्हि सांगतों, 'रडूं नको कृपाकरे !' ॥ ९४
'नेला असेल जरि बाळ महीतळीं[9] तो, वोढूनि काढिन बळें स्वकरे गडी तो. ।
मारीन पन्नग[10] मि, फोडिन शेषटाळू[11], भूगोल हा उलथितां मज नाहिं वेळू. ॥ ९५
सच्छिन्न हें करिन अंबरें[12] नीजबाणीं, अर्धक्षणें करुनि आटिन सिंधुपाणी. ।
पाडीन मेदिनिवरी नगें[13] सर्व मेरू, तारांगणें रवि शशी यम तो कुबेरू. ॥ ९६
वैकुंठ नाक उलथूं शिवशैल हातें, दिक्पाळ[14] अष्ट बुडवूं उदधींत माते ! ।
तीं किंकरें मजपुढें, लहु काय नेती? मारूनि त्यांसि रणिं आणिन पाहिं ख्याती.' ९७
माता म्हणे, 'न वधिं कैकइ[15]आत्मजांशी, बांधोनियां रथिंच घालुनि आणि त्यांशी. ।
जा, शीघ्र सोडविं सहोदर[16], येश घेयीं.' ऐकोनि ठेवि कुश मस्तक मायपायीं. ॥ ९८

---

१. समजावुनी. २. 'भाक म्या पहिले दिनीं तुज दीधली जरि तीतुके' असाही पाठ आहे. ३. चिंताविरहित. ४. आर्जव करी. ५. स्तविती. ६. निंदा करिती. ७. नाहीसें होई. ८. शोक करी. ९. पाताळीं. १०. सर्प. (पन्न म्ह० पडत पडत जो जातो तो.) ११. मस्तक. १२. आकाश. १३. पर्वत. १४. अष्ट दिशांचें प्रतिपालन करणारे आठ अधिकारी. (पूर्वेचा इंद्र, अग्नेयीचा अग्नि, दक्षिणेचा यम, नैर्ऋतीदिशेचा निर्ऋति, पश्चिमेचा वरुण, वायवीदिशेचा वायु, उत्तरेचा कुबेर, आणि ऐशानीचा ईशान.) १५. भरतशत्रुघ्न यांस. १६. सखा भाऊ.

माता ऋषी नमुनि घालुनि सव्य दोघां, तो चालिला परम शूर सदां अमोघा. ।
जाऊनियां, करित हाक रणांगणीं तो शत्रूगजांतरिं पडे रणकेसरी तो. ॥ ५९

(घनाक्षरी.)

देखतांचि कूश वीर, लहू रथीं धरी धीर, ।
जेंवि सूटतां समीर नीरदास घालवी. ॥
युद्ध द्यावया उदार, रणीं करी शरमार, ।
रवी कुळीं अवतार धरी, रिपू खालवी. ॥ ६०
सैन्यामाजि हाहाकार झाला वीरघोष फार ।
आतां कैचें घर दार? नाहीं थार जावया. ॥
हाय बोलती वदनीं, 'विघ्न आलें हें कोठूनी? ।
कोणी जावें रणांगणीं? याशि सम व्हावया.' ॥ ६१
कूश म्हणे, 'रे शत्रुघ्न! थोर होशि रे! कृतघ्न. ।
करूनियां थोर विघ्न लहू बाळ आणिला. ॥
आतां करूं दंतभग्न, वाणिं लाउं तुझें लग्न; ।
दु:खसिंधुमाजि मग्न होशी प्राणावेगळा. ॥ ६२
बहू झालाशि तूं शेर, आतां करीन मी जेर, ।
सैन्य झाडुं जैसा केर, टाकूं मेरु पांठारीं. ॥
टांग धरूनि, गगनिं तूज झोंकुं फीरवूनि. ।
स्वर्ग दाखवूं नयनिं याचि क्षणामाझारीं. ॥ ६३
संगराचि आठवण कैचें तुम्हांशि गमन? ।
तुम्हीं सेवावें तें वन रामावीण तापसी. ॥
तुमचें युद्ध तें नूतन दांतीं धरवीन तृण, ।
घेऊं अयोध्यावतन होऊं तुम्हां वारशी. ॥ ६४
धोंड्याहूनि मऊ वीट तैसे तुम्हीं योगि धीट, ।
नका करूं पाय नीट टीटविच्या सारिखे. ॥
आतां मांडलें निदान, तुम्ही व्हावें सावधान, ।
रणीं घ्यावें जीवदान, जाणा वाण पारखे. ॥ ६५

१. अजिंक्य. २. सिंह. ३. वारा. ४. मेघास. ५. 'शूर मार' असाही पाठ आहे. ६. नाश करी. ७. वीरांचा गलबला. ८. विजयी. ९. निर्बळ. १०. पृष्ठभागीं. ११. कारण.

(श्लोक.)

[1]युद्ध तें तुम्हीं कधिं न देखिलें, म्हणुनि राघवें तुम्हांसि धाडिलें. ।
भ्याड ते तुम्ही ठावुके मला. मान्य तो नव्हे याग मांडिला. ॥ ६६
कोणि नाम शत्रुघ्न हें तुला ठेविलें, परंतु शब्द लाविला. ।
मारिले कधीं शत्रु संगरीं? जाशि भूषणें दूषणा परी. ॥ ६७
यावरी करीं नाम सार्थका, साहिं, सोडितों तीव्र सायका.' ।
शीतें[2] कर्षुनी चाप वोढिलें, [3]जपोनि बीजमंत्र अस्त्र सोडिलें. ॥ ६८

तेव्हां तो कुश वीर संगर करी [4]नारायणास्त्रा त्यजी.
दीसे अंबरिं भूवरी दशदिशा सैन्यांत पक्षिध्वजी. ।
झाला विस्मित अंतरीं मग रथीं शत्रुघ्न वेडावला.
धांवोनी [5]महिजासुतें रथिहुनी पृथ्वीवरी पाडिला. ॥ ६९
टाकूनी दृढ पाश हस्तपद ते बांधोनि घाली गळां.
मोडूनी रथ, सोडवी निजकरें, बंधू करी वेगळा. ।
पाचारी भरताशि, तो कुश म्हणे, 'राहें उभा संगरीं;
तुम्हां योग्यचि बोलिलों, उपजली कां बुद्धि हे अंतरीं?' ॥ ७०
ऐकोनी मग कैकयीसुत म्हणे, 'कां धीट होशी मुला!
ओंठाचा तरि जार आझुनि तुझ्या तो नाहिं रे! वाळला. ।
हे तूझे बहु शब्द, तोंचि समरीं, जों गांठि नाहीं मशीं.'
गर्जोनि मग [6]काळदंड त्यजिला घालोनियां [7]आंकशीं. ॥ ७१
देखोनी [8]लहुअग्रजें निजकरें अस्त्राशि त्या तोडिलें.
[9]टाकोनी दृढ पाश कैकयिसुता पृथ्वीवरी पाडिलें. ।
बांधोनी समरांगणीं [10]उभयतां घेउनियां चालिले.
तेजस्वी लहुकूश ते यशभरें त्या आश्रमा पातले. ॥ ७२
शत्रुघ्ना भरताशि देखुनि दुरीं, प्रार्थी सिता वाल्मिका,
'लज्जेनें जिव सांडितील, नयना सन्मूख आणूं नका. ।
सांगोनी कुशनंदनासि तुरगापाशींच त्यां बांधणें.'
[11]'बोले वाल्मिकि, 'रे कुशा! वनिं हया सन्मूख त्यां ठेवणें.'॥ ७३

---

१. 'युद्ध तें कधीं तुम्हीं दुणाविलें' असाही पाठ आहे. २. धनुष्याची दोरी. ३. 'मंत्र बोलुनी अस्त्र सोडिलें' अन्य पाठ. ४. विष्णूची शक्ति असणारें असें अस्त्र. ५. कुशानें. ६. यमाच्या दंडासारखा भयंकर दंड. ७. इरेस, ईर्षेस. ८. कुशानें. ९. 'टाकोनी दृढपाशजाळ भरता पृथ्वीवरी पाडिलें' असाही पाठ आहे. १०. भरतशत्रुघ्न यांस. ११. 'बोले वाल्मिकि तैं कुशास वनिं ह्यां संनीध त्या ठेवणें' असाही पाठ आहे.

ऐकोनीं वर्नि ते सहोदर कुशें नेवोनियां बांधिले.
येऊनी कुश तो निवेदुनि नमी सीताऋषीपावुलें. ।
आलिंगूनि करें कुशास बसवी मांडीवरी भूमिजा;
बोले, 'त्वां श्रम हारिले' म्हणउनी चुंबीत वक्त्रांबुजा. ॥ ७४
आतां हें परिसोनि येइल रणीं सौमित्र तो संगरा.
श्रोतीं सादर होइजे अनलसें द्या चित्त काव्यांतरा. ।
ज्याचें नाम मुखीं सदैव असतां स्वप्नीं नसे आपदा,
यासाठीं धरितो अनंत हृदयीं त्या राघवाच्या पदा. ॥ ७५

---

## प्रसंग दुसरा.

(श्लोक.)

पवित्र रामायण वाल्मिकानें जें वर्णिलें, तें परिसा द्विकानें. ।
झाला यशस्वी सुत जानकीचा; न सोडणें अर्थ पुढें कथेचा. ॥ १
कैकयीसुत रणींहुनि नेले. वीर जर्जर पुरीप्रति आले. ।
धाय वाहति विभेदितगात्रें. शंखही न करवे करवक्त्रें. ॥ २
भद्रासनीं दाशरथी विलासे. समीप तो लक्ष्मण बैसलासे. ।
वसिष्ठही कौशिक आन राजे, तारांगणीं राघवचंद्र साजे. ॥ ३
तों शब्द केला क्षतयुक्त वीरीं. ऐकोनि पूसे मग रावणारी. ।
'कोणे स्थळीं रे! तुम्हि युद्ध केलें? म्हणोनि घायीं वपु छिन्न झालें? ॥ ४
ते सांगती, 'काननिं सूत दोघे युद्धांतरीं शूरपणीं अमोघे, ।
त्या नंदनीं कैकयिसूत नेले.' हें ऐकतां विस्मित सर्व झाले. ॥ ५
वीर सांगती वृतांत सर्वही. 'शूर तों तसे न देखिले महीं. ।
तूमचे कृपें आम्हि वांचलों. जीव घेउनी येथ पावलों.' ॥ ६
ऐकतांचि राम शेष हांसले, 'सांगतां मुखें बाळ धाकुले. ।
सैन्य ईतुकें असोनि तेक्षणीं, ख्याति हे तिहीं लाविली रणीं!' ॥ ७
राघवाप्रती श्रीगुरू म्हणे, 'शूर धाकुटे बोलशी झणें, ।
मीहि ऐकतों वाल्मिकाश्रमीं दोन क्षत्रसूत ते पराक्रमी.' ॥ ८

---

१. मुखकमलास. २. निरालसानें. ३. अयोध्या. ४. रत्नजडित राजादिकांचें सिंहासन. ५. प्रसिद्ध सप्तऋषींपैकीं एक ऋषि हा इक्ष्वाकुवंशीय राजांचा कुलोपाध्याय होय. ६. विश्वामित्र. ७. आणखी. ८. 'ऐकोनि बोले मघवाजितारी' असाही पाठ आहे. ९. रावणशत्रु. (राम.) १०. घावानें. ११. भरत शत्रुघ्न. १२. लक्ष्मण. १३. वसिष्ठ.

शेष[1] वीनवी, 'स्वामि ! राघवा ! देइजे मला निरोप येथवां. ।
कोण ते कुमार पाहुं धाकुटे, बंधुवांचुनी जीव हा फुटे. ॥ ९
क्षत्रसूनु ते धरुनि आणितों, बंधु सोडुनी शक्ति दावितों.' ।
दुंदुभी[3]वरी घाव घातला सैन्य घेउनी वीर चालिला. ॥ १०

नळ नीळ जांबुवंत सुग्रिवादि चालिले.
सुषेणगंधमादनादि संगरा उठावले. ।
सुबुद्धि वायुसूनु वृद्ध जांबुवंत ते क्षणीं,
चालती समागमें सुसैन्यभार घेउनी. ॥ ११

धरुनियां बहुत विस्मय अंतरीं, सकळ घेउनि चमू निघे बाहिरी. ।
अशुभ ते शकुन सन्मुख देखती, अमित वायस[4]हि वामचि धांवती. ॥ १२
हरिण भार्गव[5] सुसव्य[6]चि चालिले. रहितनासिक पुढें नर देखिले. ।
म्हणति, 'हे अशुभ टाळुनि चालणें.' वदतसे बहु हेंचि सुभावणें. ॥ १३
शेष तो मग म्हणे, 'फिरणें वृथा. भाळ[8]पट्टविधिलेखन नान्यथा. ।
काय हें फिरुनि आनन दावणें? भार घालुनि हरीवरि चालणें.' ॥ १४
हें वदोनि मग लक्ष्मण चालिला. सैन्य घेउनि ऋषीवनिं पावला. ।
भार[9] तों करुनि सर्व उठावले. सैन्यकीं दुरुनि नंदन देखिले. ॥ १५
देव कौतुक नभांतरिं पाहती. नाचतो मुनि विलोकुनियां स्थिती. ।
सैन्य देखुनि सहोदर तोषले[10]. युद्ध तें करुं उताविळ जाहले. ॥ १६
मागती जननिसी सुत आज्ञा. संगरीं बहु सुतीक्षण प्राज्ञा. ।
प्रार्थिती, 'न करिं अंतरिं चिंता, सैन्य हें तृण करूं हुत आतां.' ॥ १७
'जैंहुनी[11]' सति म्हणे 'वन पावलें, तैंहुनी जिविं सुदुःखचि लाधलें. ।
लेंकरें उभयतां मज सोयरीं, त्यांसि विघ्नहि कसें वरिच्यावरी.' ॥ १८
पुत्र बोलति, 'अचिंतचि राहणें, माय! तूं दुरुनि कौतुक पाहणें. ।
नाचवूं रणमहीवरुनी धडें पाडितों निजशरें रणिं माकडें.' ॥ १९
वाक्य ऐकुनि सरोरुहनेत्रा[12] हर्षली उरिं धरी निजपुत्रां. ।
चुंबुनी सुत मुखीं निज वोठें 'क्षेम[13] रे! तुम्हि तरी सुख मोठें.' ॥ २०

---

१. लक्ष्मण. २. 'ख्याति' अन्य पाठ. ३. नगारा. ४. कावळे. ५. कुक्कुटकुंभा. ६. 'सव्य' म्ह० 'डावे' असा अर्थ आहे, पण येथें कवीचा मनोदय 'उजवें' असा आहे. ७. 'अयुष हें यश सुप्राक्तनिं घालणें' अन्य पाठ. ८. 'लेखिलें निढळिं जें नुहे अन्यथा' अन्य पाठ. ९. सेनाभार. १०. 'कोपले' असाही पाठ आहे. ११. जेथून. १२. कमलनयना. (सीता.) १३. सुखरूप.

वंदुनी जननि, **वाल्मिक** वंदिती. सव्य घालुनि सहोदर नीघती. ।
युद्ध[1]तत्पर रणांगणिं ठाकले. वोढुनी [2]धनुष सन्मुख राहिले. ॥ २१
त्या **कुशें** समिप **अंगद** देखिला. संगरा हटकुनी मग बाहिला. ।
ऐकतां कपि त्यजी [3]नग तेथुनी टाकि तो निजशरें **कुश** फोडुनी. ॥ २२
'डूलशी' कुश म्हणे 'बहु मी[4]पणें,' मर्कटा! तरि तुवां वनिं फीरणें. ।
तो नव्हे धरिशि मंडप वानरा! जाशि घेउनि शिरावरि अंबरा. ॥ २३
सोशिं यावरि सुसायक माजे, सिद्ध हो रणमहीवरि झूजें.' ।
वोढि काढुनि करें शर सोडी, मारितां मग त्या कपि मोडी. ॥ २४

(सवाई.)

मूर्छित भूमिवरी पडे **अंगद**, धांवुनियां **कुश** तो धरि त्यासी;
　वांधुनि सुदृढ हस्तकिं कानिं आणुनि दावितसे **भरतासी**. ।
खीळुनि त्यासि, पुन्हा **कुश** येउनि, युद्ध करी रणिं तेज[5]सुरासी;
　[6]देखुनि [7]**इंद्रजितारि** म्हणे, 'लघु बाळ दिसे, बळ कोठुनि यासी?'॥२५
सैन्यपतीस उदास विलोकुनि ते क्षणिं तो सबळें [8]कपिस्वामी,
　होउनि सन्मुख बोलतसे, '**कुशा**! जा जिव घेउनि **वाल्मिकधामीं**. ।
तूं लघुबाळक, काय वधूं? म्हणऊनि जिवांत विचारितसें मी.'
　हांसुनियां **कुश** शब्द वदे, 'तुं नपुंसक रे! करिशी किती मी मी?॥२६
ज्येष्ठ [9]सहोदर देखुनि सुंदर [10]स्त्री तुझि घालि घरांत अनाथा.
　तूं तिजवीण वनीं फिरशी मग जाउनि भेटसि त्या **रघुनाथा**. ।
दुःख निवेदिशि, ते क्षणीं दोघे मिळा हृदयांत [11]समानचि व्यथा,
　**वाळिसि** मर्दुनियां कपटें, तुज राज्य दिलें उपकारहि माथां. ॥ २७
तो तुं रणांगणिं युद्ध करूं म्हणसी, मज हें बहु कौतुक वाटे.
　युद्ध करूनि वधूं परि 'मर्कट मारिलें' बोलति कीर्ति न थाटे. ।
यावरि सोडुं तरी तुज अंतरिं गर्व अपार भरूनचि साटे.'
　सोडि सुसायक तो जिवग्राहक देखुनियां कपिचें गुद फाटे. ॥ २८

---

१. 'ते करुं' अन्य पाठ. २. 'निजधनूशर लाविले' अन्य पाठ. ३. वृक्ष. ४. गर्वानें. ५. तेजाचा उत्तम निधि. ६. 'देखुनि इंद्रजितारि सुचित्त म्हणे न पडे पुरिनिश्चय यासी' असाही पाठ आहे. ७. लक्ष्मण. ८. सुग्रीव. ९. वडील बंधु वालि यानें भ्रातृभार्यापहरण केलें या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. (रामायण, किष्किंधाकांड, स० ८). १०. सुग्रीवाची स्त्री रुमा. ११. दोघेही भार्याविरहपीडित म्हणून समदुःखी.

बाण पुराव करी कुश तेक्षणिं दिश्महि व्यापुनि अंबरिं झाले.
वायु धुधाट पडे, घन दाट सुयुद्ध अचाटचि देखुनि भ्याले. ।
'वानर सैन्य' विवादति किंनर 'टाकुनि अंबर सत्वर गेले.'
ते वदती कपि, 'धांव रघूपति!' काकुलती मुखिं घालिति पाले.॥ २९

(श्लोक.)

बाणीं सच्छिन्न गात्रें, कपिगण पडती, हुंबती घायघातें,
बांधी धांवोनि जेव्हां कुश मग अठरा जुत्पती नीजहातें. ।
नांवें अष्टादशांचीं कथिन मि परिसा वानरीं मुख्य राजे
ज्यांचेनी सर्व सेना बळकट कपिंची जाय तेथें विराजे. ॥ ३०

(घनाक्षरी.)

नळ, नीळ, जांबुवंत, सुग्रीव तो बुद्धिमंत, ।
कीं सुषेण पुण्यवंत, दधीमुख साहवा. ॥
वीर्यवंत तो द्विदंत, हेमकुंद ज्ञानवंत, ।
वरुणसूत बळीवंत, गंधमादन दाहवा. ॥ ३१
तार, तराळ कराळ, मोठा हेमकूट, काळ, ।
पूर्णकेशरी विक्राळ, झाले कपि पंधरा. ॥
भट, गवाक्ष सुभट, बहु गवय तो धीट, ।
युद्धालागिं होति नीट जुत्पती हे अठरा. ॥ ३२

(श्लोक.)

कैकयीतनय अंगद ज्या वनीं बांधिले सकळ जुत्पति नेउनी, ।
देखतां हृदयिं लक्ष्मण खोंचला. वायुजा म्हणे, 'अबाधित रे! कळा.॥ ३३
रुद्र! येक्षणिं कि सर्व सुखावले काळरूप विधिनें कसे निर्मिले? ।
काय राक्षस प्रवेशुनि अंतरीं? वैर निस्तरिं हे वानर संगरीं. ॥ ३४
कीं सिताहृदयिंचा अति कोप, जन्मला बहुत सोडित कंप?' ।
यावरी गुज कथी पवनात्मजा, 'काय हें वदन दाखवुं अग्रजा.' ॥ ३५
शब्द ऐकतांचि रुद्र ऊठला. जाउनी कुशालागिं बोलिला. ।
'वागवूं नको गर्व रे! मनीं वधिन लेंकरा! तूज येक्षणीं.' ॥ ३६
कूश तो म्हणे, 'ऐक मर्कटा! मारिशी गपा काय कर्कटा? ।
पाहिं दर्पणीं मूख आपलें ग्राम जाळितां श्याम जाहलें. ॥ ३७

---

१. कुंथती. २. युद्धपति, युद्धाविषयीं शूर असे वानर. ३. दैवाचा खेळ. ४. हे मारुति.
५. रामचंद्रास. ६. मारुति.

वाक्य ऐक रे **अं**जनीसुता ! सांगतों तुझ्या स्वामिची कथा. ।
जेणें आपुली स्त्रीच त्यागिली, [1]काय रे ! जनांत कीर्ति चांगली ? ॥ ३८
एकलीच ते वनांत सोडिली. नाहिं रे! कशी लाज वाटली?' ।
ऐकतां भरे क्रोध वानरा. 'स्वामि निंदिशी केंवि ? [2]पामरा !' ॥ ३९
स्कंधिं हस्तकीं शैलशीखरीं घेउनी उडे तो नभांतरीं. ।
त्या **कु**शावरी येउं लागला. येरें तेक्षणीं बाण सोडिला. ॥ ४०
पीठ ते करूनि शैल टाकिले. दे[3]खतां समीप **मा**रुती पळे. ।
बाण जाउनी हृदयिं भेदला. सिंधुचे थडीं [4]पैल [5]टाकिला. ॥ ४१
तया मूर्च्छा आली, पडत धरणीं रक्त वमनें.
त्वरें **वा**यू आला निजसुत [6]बुझावीत वचनें. ।
'अरे ! ते **रा**माचे तनय पुरुषार्थी बळपणें.
तयां तूझी शक्ती बहुतहि न दीसे तगपणें. ॥ ४२
पुढें तूं हे गोष्टी प्रकट न करीं, अंतरिं धरीं,
प्रभूकार्यालागीं झडकरि सुता ! जाय समरीं.' ।
उलंघूनी सिंधू क्रमि पथ **र**घूनाथस्मरणें.
[7]रणामाजी आला **प**वनसुत लंघीत चरणें. ॥ ४३
महालज्जेनें तो **प**वनज अधो वक्रचि करी.
तयाशी **सौ**मित्रें नयनिं निरखूनी धनु धरी. ।
म्हणे, '**वा**यूपुत्रा ! मज तवचि होता भरंवसा,
बरें, आतां पाहें, समर करितों, सावध असा.' ॥ ४४
वदोनीयां ऐसें मग रणिं **कु**शालागिं [8]हटकी;
म्हणे, 'बाळा ! आतां शरण मज ये, सांडि हट कीं, ।
[9]ईषू माझे आतां [10]धनुशितिहुनी नाहिं सुटले,
त्वरें दे सोडूनी समरिं धरिले वीर पहिले.' ॥ ४५
गर्वशब्द ऐकतांचि **कू**श काय बोलिला.
'मारितां गपा परंतु सर्व ठावुकें मला. ।

---

१. 'वागवा जनांत कीर्ति चांगली' असाही पाठ आहे. २. नीचा. ३. 'देखतां समीरसूत तो पळे' असाही पाठ आहे. ४. परतीरास. ५. 'पाडिला' अन्य पाठ. ६. समजावीत. ७. 'चमू' अन्य पाठ. ८. विचारी, बोले. ९. बाण. १०. धनुष्याच्या दोरीपासून.

युद्धिं जैं दशाननें तुम्हांसि शक्ति घातली,
　　तूमची तनू तधींच प्रेतरूप जाहली. ॥ ४६
दैवें रुद्र[1] येत द्रोणपर्वतासि घेउनी,
　　वेल्हि[2] घालितां मुखांत वांचलेत तेक्षणीं. ।
नासिकीं निशाचरी[3] तुम्हीं करीं विटंबिली.
　　कीर्ति नाहिं वाढली, अकीर्ति फार जोडिली. ॥ ४७
नारिसी विटंबिलें म्हणोनि फार मीरवा,
आजि या रणांगणांत शौर्य फार दाखवा. ।
बंधु धांवण्यासि पावलेति थोर संकटें.
　　आणिलीं[4] रणांगणांत संगरासि मर्कटें. ॥ ४८
काय बंधुची तुम्हांस फार खंति वाटते?
　　त्याचि तूमची करें करीन एक माळ ते.' ।
ऐकतां कठोर शब्द शेष[5] तो उठावला.
　　चाप वोढुनी करें सुतेज बाण सोडिला. ॥ ४९
बाण सोडितांचि तो कडाडिला दिगंतरीं.
　　एक सायकें असंख्य जाहले महीवरी. ।
दृष्टि देखतां कुशें धनुष्यगूण[6] वोढिला.
　　मंत्र अंतरीं जपोनि क्रूर[7]बाण सोडिला. ॥ ५०
तीव्रसायकें करूनि बाणजाळ[8] तोडिलें[9].
　　देखतांचि राघवानुजासि चोज[10] वाटलें. ।
'बाळ हा म्हणों नये, धनुर्धरांत सद्गुरू.
　　काळरूप दीसतो बहूत कांपती उरू.' ॥ ५१
तयावरी लवाग्रजें जपोनियां करांबुजें[11]
　　त्यजीत भैरवास्त्र[12] जें दुजें महेशअस्त्र जें. ।
त्रिशूळ[13]डौर[14] तें करीं, विशाळ त्या जटा शिरीं.
　　असंख्य नाचती चिरें विभेदिलीं महीवरी. ॥ ५२

---

१. मारुति. २. संजीवनी लता. ३. राक्षसी. (रावणाची भगिनी शूर्पणखा हिच्या कर्णनासिकेचा लक्ष्मणानें छेद केला.) ४. 'काय आणिलीं रणांत' अन्य पाठ. ५. लक्ष्मण. ६. धनुष्याची दोरी. ७. तीव्र. ८. बाणांचें जाळें. ९. भेदिलें. १०. आश्चर्य. ११. हस्तकमळें. १२. शिवाच्या भयंकरस्वरूपी आठ अवतारांपैकीं एका अवतारास भैरव म्हणतात, त्या वेळचें त्याचें अस्त्र. १३. शिवाचें आयुध. १४. डमरुवाद्य.

विनाश तो तये क्षणीं द्विलोचनीं विलोकुनी,
अवेश **वायुनंदना** मुखें करीत गर्जना. ।
विशाळ रूप ठाकलें **कुशें** दुरूनि लक्षिलें.
मौन्य अस्त्र त्यावरी बहूविशाळ प्रेरिलें. ॥ ५३

**लक्ष्मणाशि** मूर्छना तशीच **वायुनंदना**,
चमू सु[1]षुप्तिनें तदा बहूत व्याप्त त्या रणा. ।
तेणें कष्टलें बहूत फार त्यांसि आपदा,
करूनियां वदे तदा तयांसि **कूश** तो मदा. ॥ ५४

धांवोनियां मग **कुशें** दृढ **लक्ष्मणाशी**, बांधोनि चालवि पदें [2]केदळीवनाशी. ।
पुच्छें धरूनि **लहु** वोढित **वायुपुत्रा**, ते आणुनी तरुसि बांधिति हस्तगात्रा. ५५
बांधोनियां मग स[3]होदर ते निघाले. हर्षेंकरूनि ऋषिआश्रमिं शीघ्र आले. ।
वंदोनियां ऋषिसि लागति मायपायीं; आलिंगुनी ध[4]रित **जानकि** दोहिं बा[5]हीं. ५६
येरीकडे निघति वांचुनि वीर प्राणें, जाऊनि **राघवसभे** वदती मुखानें. ।
'**शेषादि** वानर तिहीं धरुनीच नेले आम्हांसि त्यां लघुमुलीं बहु हाल केले.' ५७
ऐकोनि हांसत **रघूत्तम** तोष चित्तीं, ज्याचें वि[6]लोकन सदां फिरतें दिगंतीं. ।
जाणोनि बाह्य परि लौकिक रक्षिताहे. उद्विग्न होउनि मुखें म्हणे, 'त्राहे त्राहे.' ॥
'रे! सिद्ध व्हा सकळ सैनिक येच काळीं, दुष्टाचलीं मम सुशोभित बंधुजालीं. ।
जाऊनि सोडवुं सहोदर संगरानें, ना सूटती, तरि मि सेविन जंबरानें.' ॥ ५९
ऐसें वदोनि मग **राघव** तो निघाला. वीरां म्हणे, 'ऋषिमठावरि आजि घाला.'।
ऐकोनि वाजविति ते करणे नगारे, सैन्यांतरीं म्हणति, '**राघवकीर्ति** गा रे!' ॥
बैसूनि **राघव** रथीं क्रमि पंथ वेगें. काळासि भक्षिति असे बहु वीर संगें. ।
सन्नीध सद्गुरु **वसिष्ठ बिभीषणादी**, जातांचि भेटति व[9]धू जलकुंभ खांदीं. ॥ ६१

फार काक तंव जाति ऊजवे, वाम [10]तांस मयुरादि आडवे. ।
देखतांचि शकुनासि तोषला. 'दीसतो' म्हणे 'शकून चांगला.' ॥ ६२
सव्यनेत्र अणि बाहु तो स्फुरे, **राघवांतरिं** सुसौख्य तें भरे. ।
यापरी पथिं सुसैन्य चालिलें, **वाल्मिकाश्रमिं** सुशीघ्र पातलें. ॥ ६३
यावरी **सितेसि** पुत्र सांगती, '**राम** पातला ससैन्य संप्रती. ।

---

१. निद्रेनें. २. केळीच्या वनाला. ३. एका उदरांतून जन्मलेले. ४. 'जनकजा धरि' अन्य पाठ. ५. बाहु. ६. दृष्टी. ७. घोर वनें. ८. हा आरबी शब्द आहे. ९. स्त्रिया. (जलकुंभ घेऊन सन्मुख येणाऱ्या सुवासिनीचें दर्शन शुभसूचक होय असा समज आहे.) १०. चाष.

सूड घेउं, सोडवूं सहोदरां. धांवला परंतु देउं संगरां. ॥ ६४
सैन्य मारुनी धरुं रघूत्तमा. आजि माय गे! हरुं तुझ्या श्रमा.' ।
यापरी वदोनि पाय वंदिती, वाल्मिका नमोनि शीघ्र नीघती. ॥ ६५
जाउनी रणांगणांत ठाकले. राघवें दुरूनि बाळ देखिले. ।
शोभती लहान कार्मुकें करीं. अंगकांतिची प्रभा रवीपरी. ॥ ६६
'हे बहू लघू कुमार दीसती, यां करें ईषू[1] कितेक रूतती. ।
सैन्य तें कसें मारिलें इहीं? बंधु पाडिले वेष्टुनी मही. ॥ ६७
युद्ध तें करूनि शक्ति दावणें, कीर्ति हे तिहीं लोकिं पावणें. ।
हे हटें न सोडिती सहोदरां. क्रोध यानिमित्त येत अंतरा.' ॥ ६८
प्रेरि तेक्षणीं रथ सितापती. चाप वोढितांचि कांपली क्षिती. ।
बाण लावुनी तयांशि बोलिला, 'रे! तुम्हीं प्रताप थोर दाविला. ॥ ६९
वाल्मिकें तुम्हांशि वस्ति दीधली, केलि रे! तुम्ही बहुत आगळी[2]. ।
बंधु वानरांसि दुःख दाविलें. फेडुं ऊसणें रणांगणीं भलें. ॥ ७०
यावरी लुटूनि वाल्मिकाश्रमा, बांधुनी तुम्हांसि दाखवूं श्रमा.' ।
वाक्य ऐकतांचि कूश बोलिला, 'पूर्वीं तूमचा प्रताप ऐकिला. ॥ ७१
नारि त्यागुनी जनांत आपुली. वागवा सुकीर्ति फार चांगली. ।
मारिली वनांत एक ताटिका. मोडिलें तुम्हीं जुनाट कार्मुका[3]. ॥ ७२
कृत्रिमें करोनि वाळि मारिला. यांत कोणता प्रताप आगळा[4]? ।
मान्य तों पित्यासमान दीसतां. हेंचि बोलिलों तुम्हांशि हांसतां. ॥ ७३
वाल्मिका शरण या तुम्हि राघवा! मीच सोडिन तयावरि बांधवां.' ।
शब्द ऐकुनि रघूत्तम कोपला. 'साहिं रे!' म्हणुनि सायक सोडिला. ॥७४
एक तो प्रसवला शर ते किती? तें नव्हे गणित, कुंठित हे मती. ।
तोडिले मग कुशें वरिचेवरी. देखतां रविज[5] विस्मित अंतरीं. ॥ ७५
वैष्णवास्त्र त्यजिलें मग राघवें. तेक्षणीं अवनि[6] व्यापिलि माधवें. ।
शंख चक्रहि गदायुध चौंकरीं श्रीहरी महिदिशांतरिं अंबरीं. ॥ ७६
वैष्णवास्त्रहि[7] विलोकुनि तेक्षणीं, कूश तो त्यजि रमास्त्रहि[8] ते क्षणीं. ।
व्योमिं भूवरि दिशांतरिं त्या रमा आरत्या करिति, शोभति निःसिमा. ॥ ७७

---

१. बाण. २. अपराध. ३. शिवचाप. ४. श्रेष्ठ, मोठा. ५. राम. ६. पृथ्वी. ७. विष्णु आहे वत ज्याचें असें अस्त्र. ८. रमा आहे अधिदेवता ज्याची असें,

ओंवाळिती पंकजसौख्यधामा. जाती स्वयें शीघ्रहि त्या स्व[1]धामा. ।
विलोकुनी राम वदे कुशासी, 'शौर्यें बहू बाळक धन्य होशी. ॥ ७८
सांग रे! कुळ तुझें, जननी पिता. तोषलों बहु तुझें बळ देखतां.' ।
ऐकुनी कुश म्हणे; 'रघुनायका! युद्ध द्या, समरिं कांहिं पुसों नका.॥ ७९
तूमचा भरंवसा बहु बांधवां, युद्ध त्यां करुनि सत्वर सोडवा.' ।
जानकीपति म्हणे, 'लघु दीसतो, शब्द सायक कसे उरिं रोंवितो?॥ ८०
व्याघ्रअस्त्र त्यजि [तैं] [2]महिजापती, कूश टाकित[3][चि] सिंह भयाकृती. ।
तेक्षणीं सकळ व्याघ्र पळाले. राघवें मग इषू बहु सोडिले. ॥ ८१
ओंवाळिती राघवबाण सूता, प्रवेशती जाउनि रामभाता. ।
प्रणामिती राम इषू कुशाचे हें पाहुनी बाण त्यजीत साचे. ॥ ८२
बहू बाण सोडी रघूराज जेव्हां, अलंकार होती कुशालागिं तेव्हां. ।
कुशाचे इषू लागती रामपायीं. विलोकूनि कौतूक रामासि ठायीं. ॥ ८३
[4]पुसतसे रघुनायक गूरुसी, 'बहुत वाटत विस्मय मानसीं.'।
मग वसिष्ठ वदे रघुनंदना, 'बहुत तूं न करीं अजि [5]कंदना.' ॥ ८४
परिसोनि सितापति बोलतसे, धरिले, 'सुटती कपि बंधु कसे?' ।
मग ऐकुनि वाक्य गुरू वदला, 'त्वरें आणविं वाल्मिक [6]भानुकुळा! ॥ ८५
श्रुत तोचि करील तुला वदनें.' जिविं मानुनियां गुरुचीं वचनें, ।
मग आणुनि वाल्मिक बैसुनियां, रघुराज पुसे कर जोडुनियां. ॥ ८६
पुसतांच वृतांत फणीशयनें, मग वाल्मिक बाहे कुशा नयनें. ।
खुण दावुनि आणवि तेच क्षणीं, कपि अश्व सहोदर सोडवुनी. ॥ ८७
मग सांगतसे ऋषि, 'चापधरा! सुत जाण तुझे, [7]भवतापहरा!' ।
रघुराज म्हणे, 'ललनाचि नसे, सुत हे म्हणतां अघटीत दिसे.' ॥ ८८
मुखें राम पुसे अनुजासि, 'वना जधिं नेउनि त्वां त्यजिली ललना, ।
तधिं काय तुतें वदली वचनें?' म्हणे, 'गर्भिणि मी' कथिलें वदनें. ॥ ८९
तंव सांगतसे ऋषि सद्वचनीं, 'मम शिष्य विहारति येचि वनीं. ।
बहु खंति करी [8]अवनीदुहिता, मग आणिति आश्रमिं ते [9]वनिता. ॥ ९०

१. माधवा. २. गृहा. ३. राम. ४. "घटकर्णरिपू गुरुलागिं पुसे, 'मजशीं बहु विस्मय होत असे.'। गुरु आदि करूनि ऋषी म्हणति, 'शम युद्ध करीं रघुराज पति!" ॥ असाही पाठ आहे. ५. मर्दना. ६. रामा. ७. संसारदु:खनाशका. ८. सीता. ९. स्त्री.

गुज सांगत गर्भिणि ते मजशीं, पदिं वंदुनि मी समजावि तिशीं. ।
नवमास भरोन सती प्रसवे, तधिं उद्भवले सुत हे बरवे. ॥ ९१

गुण हे मजपासिं बहू शिकले.' ऋषिनें उचलोनि पुढें दिधले. ।
मग आणुनि जानकितें संपदी, ऋषि घालितसे रघुराजपदीं. ॥ ९२

शत्रुघ्न ते भरत लक्ष्मण धांवताती, अत्यादरें जनकजापद वंदिताती. ।
पितृव्य जाणुनि लहू कुश नम्र पायीं होतांचि ते कवळिती, सुख फार देहीं.९३

धांवोनियां लहुकुशा कपि खेंवें देती, व्योमींहुनी विबुध वर्षति पुष्पजाती. ।
त्या काननीं रुचिर उत्सव थोर झाला, स्त्रीपुत्रबंधुसह राघव तो निघाला. ॥९४

स्त्रीपुत्रबंधुसह तो रथिं राम बैसे, संतोषरूप नगराप्रति पावलासे. ।
वाद्यें तुरें करुनि संचरती स्वधामीं, सिंहासनीं मग वसे कपिरीसस्वामी. ॥ ९५

कौसल्या शेषमाता नमि महिदुहिता वंदुनी केकयीतें.
सत्पुत्रांलागिं घाली तंव पदकमळीं मूर्तिमंता क्षमा ते. ।
कौसल्याही सुमित्रा लहु कुश धरुनी संभ्रमें घेत मांडीं,
आलिंगूनी सितेतें म्हणति निजमुखें पूर्विचें दुःख सांडीं.' ॥ ९६

आला तो रामराजा म्हणउनि, गुढिया ऊभवीती पताका.
आज्ञा ते राघवानें मग निजवदनें दीधली सर्वलोकां. ।
वंदोनी राघवातें बिभिषण त्वरितां चालिला तो स्वधामा.
वेगें भारी रिसादी कपिगण निघती पूसुनी पूर्णकामा. ॥ ९७

राजा सौख्यकरी सबांधव हरी नांदे अयोध्यापुरीं.
ज्याची कीर्ति करी विमुक्त शबरी, विस्तार विश्वांतरीं. ।
शंभू तापहरी भवाब्धिलहरी अर्धक्षणीं संहरी.
नांदे नित्य बरी अनंत उदरीं पापीजना उद्धरी. ॥ ९८

---

१. त्याच वेळीं. २. आलिंगन. ३. देव. ४. तूर्यें. (मृदंगादिक, वंशादिक, तालादिक, वीणादिक अशीं चार प्रकारचीं वाद्यें तीं.) ५. सुवर्णनिर्मित सिंहाकार राजासन. ६. वानर आणि आस्वल यांचा प्रभु. (राम.) ७. ज्याचे मनोरथ पूर्ण झाले आहेत अशा (रामाला.)

# कृष्णचरित्रांतील आख्यानें.

## गो[१]पीगीत.

(श्लोक.)

वंदूनियां सद्गुरुपादुकांसी, प्रणम्य भावें मग सज्जनांसी, ।
श्रीकृष्णनामें चि कै[२]वल्यमुक्ती; गोविंद दामोदर माधवेति. ॥ १
प्रभातकाळीं जननी यशोदा 'उठीं' म्हणे, 'सत्वर बा! मुकुंदा! ।
गोपाळ येती, तुजला [३]बहाती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ २
प्रकाश केला गगनीं रवीनें, गोपी दधी त्या घुसळी र[४]वीनें, ।
त्या कंकणांचे बहु नाद येती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ३
प्रक्षाळुनीयां मुख खाय रोटी, लोणी असे सुंदर तूजसाठीं. ।
अशी कशी रे! तुज झोंप येती? गोविंद दामोदर माधवेति. ॥ ४
वृं[५]दावनालागुनि जाय बाळा! उशीर माझ्या दळणासि झाला. ।
जेवूनियां गोप घरासि येती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ५
जाई त्वरेनें सखया! वनातें, मागून मी धाडिन भोजनातें. ।
गोपाळ हे सर्व तुला बहाती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ६
क[६]रांबुजीं घेउनियां शु[७]काला, अभ्यास गोपी करिती तयाला, ।
रागस्वरें सुंदर बोलवीती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ७
गोदोहना बैसति गो[८]पदारा, पात्रांतरीं वाजति क्षीरधारा. ।
तेणें स्वरें मंजुळ गीत गाती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ८
गाई वनावांचुनि दीन झाल्या, घरीं नसे रे! तृण त्या भुकेल्या. ।
दावीं नवीं तोडुनि धांव घेती. गोविंद दामोदर माधवेति. ॥ ९
वेशीपुढें रे! कुळें" गोधनाचीं, केलीं उभीं सर्व हि यादवांचीं. ।
गोपाळ हे सर्व तुला बहाती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ १०

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवत-दशमस्कंध—अध्याय ३१ यांत आहे. आमचें सौंदर्य पाहून श्रीकृष्ण आम्हांस भुलला असा गोपींना गर्व झाला. हें जाणून कृष्ण अदृश्य झाला. तेव्हां त्या गोपी खिन्न होऊन मधुवनांत कृष्णाचा शोध करीत त्याचे गुण गाऊं लागल्या; असा कथाभाग या काव्यांत वर्णिला आहे म्हणून यास 'गोपीगीत' हें नांव दिलें आहे. २. मोक्ष. ३. हांक मारिती. ४. मंथनदंडानें. ५. यमुनेच्या तीरींचें वन. ६. हस्तकमलीं. ७. पोपट. ८. गवळ्यांच्या बायका.

घेवोनि जातें दळुं गोधुमातें, घर्मार्थबिंदू मुखपंकजातें; ।
सुवक्रकेशा हरिगूण गाती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ ११
कूपांतरीं घालुनि भांडदोरा, शोभेतसे सुंदर गोपदारा. ।
ओढोनि हस्तें श्रम फार होती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ १२
उंलूखलीं घालुनि तंदुलातें, गोपांगना कांडिति रम्य हस्तें. ।
आलापुनी सुंदर गीत गाती. **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ १३
पाकक्रिया सारिति गोपबाळी, लाटीतसे सुंदर पूर्ण पोळी. ।
घोषार्णवें कंकण ढाळ देती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ १४
या नंतरें घेउनियां शिदोरी, नेऊनि देती, सखया! **मु**रारी! ।
'घे स्वामिया! **श्री**पति! ताट हातीं,' **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति.॥ १५
'गाईस चारा **य**मुनेसि पाणी, वळ्ती करावी अजि तुम्हि कोणी,' ।
**कृ**ष्णासि माझ्या बहु श्रम होती? **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति.॥ १६
करी अती सुंदर मोहरीया, पांवा बहू वाजत थाकथय्या, ।
ते घोंगडीया कसे ऊडवीती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ १७
लिहूनि पत्र द्विज पाठवीला, 'हरी नये कां? बहु वेळ झाला.' ।
ऐकोनि गोपी करिती अकांती. **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ १८
**या**दव् **ह**रीलागुनि लुब्ध कैसे, जळांत हे मत्स्य सदैव तैसे. ।
समर्थ कैसे हरिगूण गाती? **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ १९
**गो**विंद गोपाळ हे दोघे बंधू, जेवीत होते दहिं भात लिंबूं, ।
त्या भोजनाची रुचि फार येती. **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ २०
**गो**विंद! **गो**विंद! **ह**रे! **मु**रारे! **गो**विंद! **गो**विंद! रथांगपाणे! ।
**गो**विंद! **गो**विंद! **मु**कुंदमूर्ती! **गो**विंद! **दा**मोदर! **मा**धवेति. ॥ २१
वृंदावनीं सुंदर वृक्ष आहे, श्रीकृष्णनामें ध्वनि गर्जताहे, ।
पक्षीकुळें यादव गीत गाती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ २२
'श्रीकृष्ण श्रीकृष्ण' सुखारविंदें घेवोनियां, नाचति नामछंदें. ।
ऐकोनि गाई बहु कान देती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ २३
'श्रीकृष्ण श्रीकृष्ण' विचित्र वाणी, हें बोलती वेद महापुराणीं. ।
हे **कृ**ष्ण **आ**नंत करी विनंती, **गो**विंद **दा**मोदर **मा**धवेति. ॥ २४

---

१. गहुं. २. कुरळ केश ज्यांचे अशा गोपांगना. ३. उखळांत. ४. रथांग (चक्र) आहे पाणीच्या ठायीं (हातीं) ज्याच्या अशा. ५. मुखकमलें.

# महाभारतांतील आख्यानें.

## [१]द्रौपदीस्वयंवर.

(श्लोक.)

गणपति! मति देईं ग्रंथ मातें कराया,
कथिन तव कृपेनें द्रौपदीसैंवरा या. ।
वदावें [२]विधिकुमारी! बैस येऊनि वाणी,
तुजप्रति विनवीतों जोडुनी दोनि [३]पाणी. ॥ १

[४]आर्तें पुजूनी गुरुराज याला, कदापि तें द्वैत नसे जयाला; ।
अद्वैतमाळा धरुनी जपे तो, अधोमुखीं लक्षित आजपे तो. ॥ २

श्रोते हो! तुम्हि आदरें परिसिजे या द्रौपदीसैंवरा,
पांडूनंदन कौरवें कुमतिनें घातीयले [५]जोहरा. ।
कृष्णें द्वादश योजनें विवर त्यांसाठीं असे निर्मिलें,
लाखाजोहरिं पांडवांसि कपटें त्या कौरवीं जाळिलें. ॥ ३

पार्थाचा रथसारथी यदुपती रक्षीतसे पांडवां,
[६]साही [७]वांचुनि बाहिरी च निघतां, आला हरी आडवा, ।
[८]क्षेमा देउनि पांडवां करतळें प्रेमामृतें स्पर्शिलें,
बोले श्रीहरि, 'जोहरीं श्रम तुम्हां झाले असें ऐकिलें.' ॥ ४

ऐकतांचि तो धर्म बोलिला, 'तूंचि आसतां काय भें मला? ।
जेंवि बाळका सर्व माउली, तेंवि तूं अम्हां कृष्ण! माउली. ॥ ५

इच्छिती पिलीं खोपिं बैसुनी चंचुवापुटीं धांव पक्षिणी ।
येउनी करी पांखसाउली, तेंवि तूं अम्हां कृष्ण! माउली.' ॥ ६

[९]सत्वसिंधु बोलतां, [१०]दयाब्धि काय बोलिला,
भावइंदु पाहतां चि प्रेमसिंधु फूगला. ।
'यावरी उठोनि, तूम्हि दक्षिणेसि जाइजे,
व्यास जें तुम्हां कथील तेंचि तुम्हि ऐकिजे.' ॥ ७

---

१. हें प्रकरण आदिपर्वांतील आहे. २. सरस्वती, वाग्देवी. ३. हात. ४. आस्थेनें, आवडीनें. ५. जतुगृहास. ६. पांच पांडव आणि कुंती मिळून सहाजणें. ७. जीव घेऊन. ८. आलिंगन. ९. धैर्यसागर. (धर्म.) १०. कृपासागर. (कृष्ण.)

**धर्म भीम पार्थ माद्रिसूत कृष्ण** वंदिती;
कुंति [1]आत ते म्हणोनि तीस वंदि **श्री**पती; ।
श्रीहरी नमोनि शीघ्र साहि पंथ चालती;
ठायिं ठायिं [2]थोकेती, फिरोनि **कृष्ण** पाहती. ॥ ८
तो **हरी** तयांसि मोह पालवी पितांबरें
'जा' म्हणे .'सुखें तुम्हांसवें सदैव मी फिरें.' ।
ऐकतांचि **धर्म**राज तेथ काय बोलिले,
'आमचें दयाळुवें असंख्य ऋण घेतलें.' ॥ ९

अनंत विघ्नें पतितांसि झालीं, श्री**कृष्ण**नामें तिं हि दूर केलीं. ।
**विश्वश्रवा** नाम द्विजोत्तमाचें, त्याचे घरीं आश्रम सश्रमांचें. ॥ १०
घरोघरीं आगमवेदघोषें, वाखाणिती ते श्रुतिवेद तोषें. ।
सुग्राम देखूनि तिंहिं वास केला. साही जणांचा श्रम सर्व गेला. ॥ ११
**जन्मेजयें** प्रश्न मुनीसि केला. ऐकावया भूप मनीं भुकेला. ।
मुनी म्हणे, '**द्रौ**पदिसैंवरासी ऐकें, नृपा! बैसुनि सावकासी. ॥ १२

पूर्वी **द्रोणें** बळानें **द्रुपद** रथध्वजीं बांधुनी आणिलासे.
[3]रायें वैरा स्मरोनी, तयिं निजसदनीं [4]यज्ञ तो मांडिलासे. ।
यज्ञांतीं दिव्यकांती रमणिय नृपती कन्यका प्राप्त झाली.
ते काळीं नाम साचें **द्रु**पद म्हणतसे, '**द्रौ**पदी रम्य बाळी.' ॥ १३
तेव्हां राजा विचारी, 'उपवर नवरी सुंदरी देउं कोणा?
होता मोठा प्रतापी अनुपम जगतीं **पार्थ** तो वीरराणा. ।
**गांधारें** कापटें तो [5]सहुदरसह त्या जोहरीं जाळिलेंसे.
राया कांहीं न सूचे, म्हणउनि मग, तो **द्वार**के चालिलासे. ॥ १४

**द्वार**का असंख्यपापहारका, तारका [6]भवार्तिविघ्नहारका ।
देखिली नृपें सुरम्य लोचनीं, धन्य ते त्रिवीध[7]तापमोचनी. ॥ १५

---

१. वसुदेवाची बहीण म्हणून आते. २. थांबती. ३. द्रुपदराजानें. ४. हा पुत्रकामेष्टिनामक यज्ञ याजमुनीनें द्रुपदाकडून करविला. ५. भावांसह. ६. संसारदु:खें आणि विघ्नें यांचें हरण करणारी. ७. आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक हे तीन ताप; याचीं उदाहरणें:—विद्युत्पतन, अतिवात, अतिवृष्टि हीं आधिदैविक; ज्वर, शूल, शिरोवेदना हीं आध्यात्मिक; व पाण्यांत बुडणें, चौर्यभय, व्याघ्रभय हीं आधिभौतिक. या तीन तापांपासून मुक्त करणारी.

भूपतीसि पूसिलें अधोक्षजें, 'कोण कारणें करूनि येइजे?' ।
तो म्हणे, 'सहस्र आननांबुजा! यज्ञ मी करीतसें चतुर्भुजा! ॥ १६
यज्ञिं म्यां करूनि तृप्त पावका, तेन दीधली प्रसादकन्यका. ।
तीसि नोवरा त्रिलोकिं पाहतों, कोठ हो न ये प्रशस्तचित्त तो. ॥ १७
एक आस होति माझे अंतरीं, अर्जुनासि व्हावि हे चि नोवरी ।
दुष्टि जोहरीं तयासि जाळिलें.' वाक्य ऐकतांचि कृष्ण बोलिले. ॥ १८

(सवाई.)

'ऐक नृपा! मम बुद्धि, सुबुद्धि भुमंडळ हें चि वरागळ आहे.
अर्जुन एक नसे, तरि काय? तुं जाउनि सैंवर मांडुनि पाहें. ।
सैंवर ऐकुनि या महिचे नृप येतिल धांवत ते लवलाहें.
यावरि पांडव वांचल आसति, ते तरि येति, अचिंत तुं राहें.'॥ १९
भूप म्हणे, 'जननाथ! अनाथ मि, पूर्ण सनाथ करीं मजलागीं.
चाल तुं राजसभे, यदुराज विराजितसे, तुज वर्णिति योगी. ।
तूंचि अभेद अखेद[चि बा!] तुज शोधित.........योगी.
सेविति नीर समीर, शरीर हि दंडिति, तूस्तव होति विरागी.' ॥ २०
ऐकुनियां नृपवाक्य, चतुर्भुज सत्वर [सिद्ध] नृपा सवें चाले.
भूपति रेवतिचा पति श्रीपति शीघ्र तिवे नगराप्रति आले. ।
येउनियां द्रुपदें मुळ पाठविलें, तंव दूत दिगंतरिं गेले.
सैंवर ऐकुनि पत्र विलोकुनि ते नृप सिद्ध ततक्षणिं झाले. ॥ २१

(श्लोक.)

पृथ्वीचे नृपती असंख्य मिळती या द्रौपदीसैंवरा.
तेव्हां तो हरि लाघवी स्वमतिनें योजी कुवाडें विरां.।
गर्ता खाणुनियां कढाइ चढवी स्नेहासि त्या घातलें,
त्याखालें दृढ मूर्तिमंत हरिनें त्या पावका स्थापिलें. ॥ २२

---

१. विष्णु. (कृष्ण.) 'अधःकृत केलें आहे अक्षज (इंद्रियज्ञान) ज्यानें' हा शब्दार्थ. याशिवाय या शब्दाचा अर्थ आढळतो तो:—'अधःकृतानि जितानि अक्षाणि इंद्रियाणि यैस्ते वसुदेवादयः तेभ्यो जायते कृष्णरूपेणेति.' (हेमाद्रिकृत दर्पण.) २. अग्नि. ३. जातुषालयीं. ४. निरिच्छ, विरक्त. ५. सूर्यवंशीय रेवत राजाची कन्या. ६. बलराम. ७. खंदक, खळगा. ८. तेलास.

वंशीं[1] तो मिनें[2] साधुनी, मग करें रोंवीतसे श्रीहरी.
 स्नेहाचा धुम लागतां गरगरां फेरे फिरे अंबरीं. ।
योग्याची जरि दृष्टि निश्चळ बहू, तें पाहतां चाचरे[3].
 मेषोन्मेषें[4] न लागतां मग त्वरें त्रीलक्ष फेरे फिरे. ॥ २३
तेव्हां तोचि हरी वदे स्वयंवरीं गर्जोनियां वैखरी[5],
 'खालीं लक्ष धरी, अलक्ष न करी, मीनासि भेदी शरीं. ।
त्याला ही नवरी सुनिश्चित वरी, ने घेच भूपांतरीं,
 तीं बाणीं न करी विभेदन जरी, टाकीन तैलांतरीं.' ॥ २४
ही वार्ता [पसरे जनीं] लवकरि द्वीपांतरीं फांकली.
 पत्रातें[6] नयनीं विलोकुनि त्वरें आली कुरूमंडळी. ।
तेव्हां त्या श्रुतिपाठकां सकळिकां हें गम्य झालें असे.
 ते काळीं द्विजवृंद येउनि स्वयें विश्वश्रव्याला पुसे. ॥ २५
विश्वश्रवा बोलत पांडवांसीं, 'साही चला सत्वर सैंवरासी, ।
भिक्षा तुम्हां सत्य मिळेल कांहीं, स्वयंवरीं तृप्तचि व्हाल साही.' ॥ २६
धर्में तया नम्र सुप्रश्न केला, 'स्वामी ! तुम्हां देखुनि जीव धाला, ।
सांगा तुम्ही सैंवरिंची प्रतिज्ञा' ऐकोनियां बोलति विप्र सुज्ञा. ॥ २७
 'द्वारकाविहारकें कठीण यंत्रें[7] मांडिलें.
  त्यातळीं कटाहिं[8] आगणीत तैल तापलें. ।
 तैलधूम्र लागतां चि व्योमिं यंत्र फीरतें,
  देवदानवां अभेद, मानवां अलक्ष, तें. ॥ २८
 रांव[9] खेदरूप चिंतितो सदैव अर्जुना,
  तो हरी दशा हि प्राप्त जालि ते चि ब्राह्मणा.' ।
 वाक्य ऐकतांचि सत्वसागरासि[10] तर्क बोणला[11],
  'सैंवरासि आम्हि येउं ये क्षणीं, तुम्ही चला.' ॥ २९
 तीं सवेग ब्राह्मणासवें चि जाति साजणें.
  पंथिं व्यास येउनी सुतृप्त केलिं दर्शनें. ।
 व्यास देखतांचि धांवुनी पदांसि वंदिती.
  तो म्हणे, 'स्वयंवरासि जा, तुम्हीं सुनिश्चिती. ॥ ३०

१. कळक बांबू, वांसा. २. मासा. ३. भ्रम पावे, चलित होई. ४. नेत्र उघडणें आणि मिटणें यांस लागणारा अल्पकाळ. ५. वाणी. ६. स्वयंवरपत्रातें. ७. मकरयंत्र. ८. कढईत. ९. द्रुपद. १०. धर्म. ११. ठसला.

पार्थ यंत्र भेदुनी वरील रम्य द्रौपदी.'
'आम्हीं जाउं' बोलती, म्हणोनि लागति पदीं, ।
व्यास वाक्य बोलतां लयासि शीघ्र पावला.
साहि चालतां चि देखताति जान्हवीजळा. ॥ ३१

(सवाई.)

देखुनि जान्हविचें तट, ते करसंपुट जोडुनि, लंपट होती.
'अंब! तुझ्या धृतकंबुपदांबुजउद्भवअंबुसि जे नर न्हाती, ।
पाहि तुं पावनि! किल्मिषनाशनि! त्राहि' म्हणोनि जळांतरिं गेले,
सारुनि स्नानविधी तिळतर्पणदान हि पांचजणीं तइं केलें. ॥ ३२
भक्तिपुरःसर पूजुनि ईश्वर, पंक्तिसि निश्चळ भोजन झालें
भीम म्हणे, 'शृणु धर्म! कृपानिधि! येथुनि पाहिजे सत्वर गेलें.'।
हें चि निकें वद, त्याक्षणिं काढि सुमार्गचि, भीम तयीं पुढें चाले.
.................................................. ॥ ३३
होय ततक्षणिं अस्त गभस्ति, दिशांतरिं [घोर बहू] तम दाटे.
जाति बरोबरि साहि जणें, तंव घोर वनीं पदिं मोडति कांटे. ।
आणुनि कार्ष्वि हुतांशन लावुनि, तेज पडे मग, चालति वाटे.
मार्गि महाबळि खेळतसे रळि सेवक वर्जिति जा तुम्हि वाटे.॥ ३४

(श्लोक.)

चित्रांगदें रम्य विलास केला. क्षुधीत तो भक्षित जीव गेला. ।
काम स्त्रियांचा अति घेतला, हो! भोगी जसा पर्वत हीमनाहो. ॥ ३५
सांगोनियां धाडित सर्व दूतां, 'वर्जा तुम्ही निर्भय पंथ येतां.' ।
साही चुड्या घेउनि येति पंथें, ते दूत धिःकारिति पांडवांतें. ॥ ३६
मारावया धांवति पांडवांतें, भीमें तयां टाकुनि व्योमपंथें, ।
मुष्टिप्रहारें किति चूर्ण केले, सांगावया एक पळोनि गेले. ॥ ३७
तो 'काय झालें' म्हणे सेवकांसी. 'येती बळी मारित सावकासी ।
असे गणंना किति रे! तयांची.' विख्यात ते सांगति साजणांची. ॥ ३८
.................................................. ।
कशासि ते वागविताति दाढी, बलाढ्य ते आणिक दूत धाडी. ॥ ३९

---

१. अदृश्य झाला. २. रक्षण कर. ३. पापहारिणि. ४. तिलांजलिदान आणि तर्पणविधि. ५. ऐक. ६. रवि. ७. अग्नि. ८. याचें मूळनांव अंगारपर्ण गंधर्व. ९. हिमस्नान. उष्णतेनें थिजलेलें बर्फ पातळ होऊन सर्वभर पसरणें हें पर्वतास एक स्नानच आहे.

मारावया धांवाति **पां**डवांतें, **भी**में तयां टाकुनि व्योमपंथें, ।
जे वांचले जीव घेऊनि गेले. **चि**त्रांगदा सन्मुख शंख केले. ॥ ४०

ऐकोनि **चि**त्रांगद कोपलासे, येऊनि बाणीं बहु वर्षलासे. ।
देखोनियां **अर्जुन** बाण सोडी, **चि**त्रांगदाचे शर सर्व तोडी. ॥ ४१

**गं**धर्वें मनिं विस्मयासि करुनी जाऊनियां अंबरीं.
कानाशीं धनु ओढुनी [त्वरित तो] **पा**र्थासि विंधी शरीं. ।
**पा**र्थें तैं अभिमंत्रुनी स्वकरिंची चूडी नभीं टाकिली,
ते काळीं नभ व्यापुनी दश दिशा पृथ्वींत विस्तारली. ॥ ४२

मंत्राचे निजशक्तिनें प्रजळल्या जाल्या असंख्या चुड्या.
तो पाहे तंव दीसती चहुंकडे अग्नीचिया वावड्या. ।
तेंव्हां तो बहु पोळला, रिचवला तेथूनियां मेदिनी.
मारावें जंव **अर्जुनें** तंव स्त्रिया आल्या पुढें धांवुनी. ॥ ४३

'ताता ! जामात रक्षीं' म्हणवुनि वदती त्या स्त्रिया **अर्जु**नातें.
तेंव्हां **ध**र्में स्वधर्में सहुदर धरिला, वांचवीलें तयातें. ।
**गं**धर्वें त्या अगर्वें उठुनि मग पुसे, 'स्वामि कोठील राजे ?
या पंथें कोठें जातां ? द्विजकुळ म्हणतां वेश तुम्हां न साजे.' ॥ ४४

'ऐकें **गं**धर्ववीरा ! पुससि बहु जरी **पां**डुचे पुत्र आम्ही.'
तेंव्हां त्यां ओळखीलें, 'मज हि न कळलें, चोरिलें नाम तुम्ही.' ।
तेंव्हां त्यां आदरानें करुनि प्रिति तदा नेतसे तो गृहासी.
पूजा तैं आदरानें करुनि षड रसें घातलें भोजनासी. ॥ ४५

भक्तिनेंचि ते भुक्ति सारुनी, बैसले सुखें बंधु आसनीं. ।
ठेवि त्यांपुढें वस्त्रभूषणें, त्यासि वर्जिलें पांच ही जणें. ॥ ४६

'आम्हि जातसों गुप्त सैंवरा' वीर बोलिला, 'मंत्र हा खरा, ।
तूज अर्पितों मंत्र चाक्षुसी, तो जपूनि तूं यंत्रें भेदिसी. ॥ ४७

अग्निअस्त्र तें देइं तूं मला' ते क्षणीं तया योग साधला. ।
आधिं चाक्षुसी देत **अर्जु**ना. **पा**र्थ तो करी अस्त्रअर्पणा. ॥ ४८

१. आर्य, श्रेष्ठ. २. मधुर (गोड), कटु (तिखट), कषाय (तुरट), आम्लक (आंबट), क्षार (खारट), तिक्त (कडू) हे सहा रस. ३. भोजन. ४. मकरयंत्र. ५. चाक्षुषी विद्या. या विद्येच्या योगानें कोणताही पदार्थ जसा पहावयाचा मानस असतो तसा पाहतो. ६. अग्न्यस्त्र. (भारतांत अंगारपर्ण गंधर्वानें चाक्षुषी विद्या अर्जुनास देऊन त्याजपासून अग्न्यस्त्र घेतलें अशी कथा आहे.)

यावरी बहूत पाडवांत ऐक्य जाहलें.
तोषुनी तया सुवाक्य काय तैंच बोलिलें. ।
'शीघ्र मी तुम्हां पंचाळपूर आजि लोचनीं
दावितों चला..........स्कंधिं वाहुनी.' ॥ ४९
बोल बोलतां चि ते पंचाळपूर पावले.
साजणासि ग्राम नेउनी.......दाविलें. ।
त्यासि तो पुसोनि [जाय] वीर गुप्त होउनी,
साहि बैसले [तया स्थळासि] स्नान सारुनी. ॥ ५०
ग्रामांत साहीजण शीघ्र जाती. बिंदोबिंदीं[1] देखति सर्व जाती. ।
घरोघरीं दाटणि भूपमेळा. कुंलालशाळे[2] तिहिं वास केला. ॥ ५१
कुंती मनीं आठवि चक्रपाणी, 'ग्रामांत आतां मज नाहिं कोणी.' ।
जाणोनियां दीनदयाळ आला. साहीजणें वंदिति मेघनीळा.[3] ॥ ५२

(सवाई.)

धर्म म्हणे, 'मज.....................आजि सुदीन उदेला.'
देउनि त्यांस करांगुळि भूषण.......श्रीहरि शीघ्र निघाला. ।
धर्म म्हणे, 'हरि येउनि ये स्थळिं.......रूप सुवल्लभ जाला.'
हे चि मनांतरिं खंति करी, तंव तेचि क्षणीं मग भीम भुकेला. ॥ ५३
'बंधुवरा!.......अतितीव्रचि तो उदरीं जठरानळ जाला.'
धर्म म्हणे, 'मुदि घेउनि..........वद पोटभरी मज घाला. ।
..................................................
.......................................... ॥ ५४

भीम मुद्रिका..........घेऊनि चालिला.
दाखवूनियां जनासि 'घ्या' म्हणोनि बोलिला. ।
'काय मोल? बोल काय [झट्करी तुं] बा! इचें.'
'घालिं बा! सुभोजना जोंवरीं मला रुचे. ॥ ५५
तृप्त मी जरी, तुम्हासि मुद्रिका हि दीधली.
मी अतृप्त राहिलों, फिरोनि घेइंजे भली.' ।
एक बोलती किं, हा सुवर्णपंथ भासतो,
भोजनानिमित्त हा अनर्घ्य[4] रत्न वीकितो.' ॥ ५६

---

१. गल्लोगल्लीं. २. कुंभाराच्या घरीं. ३. घनश्याम कृष्णाला. ४. अमोल्य.

बैसला प्रधान त्यासि ते निरोपि तांतडी
पैल रत्न वीकितो अमोल्य मोल कापडी[1].' ।
दूत धाडुनी [सभेसि] आणिला चि सत्वरी.
'काय मोल? बोल काय बा! इचें तुं झट्करी.' ॥ ५७
'तृप्त मी तरी, तुम्हासि मुद्रिका हि दीधली,
अतृप्त राहिलों, फिरोनि घेइजे [मि] ही भली.' ।
बोलिला प्रधान, 'कापड्या! तुं जेविसी किती?
सैंवरीं असंख्य खंडि तें हि अन्न रांधिती.' ॥ ५८
भीम जाउनी स्वस्थ बैसला, कोपरें करें भूमि ठाकला. ।
अन्न आणुनी त्यांत घालिती, कोटि नायिका त्यासि वाढिती. ॥ ५९
जेंवि कुंभसूनु[2] सिंधुच्या जळा, तेंवि अन्न भीम भक्षुं लागला. ।
दोंहि बाहुनींच ग्रास घे मुखीं, पात्रि ना उरे चि एक शीत कीं. ॥ ६०
ओंठ चावुनी, नेत्र भोंवडी, राहिलेति कां बोट मूरडी. ।
अन्न तूट देखोनि, बायका जाति त्या पळोनीच नायिका. ॥ ६१
बैसला प्रधान त्या निरोपिती, सर्व भक्षिलीच पाकनिष्पती[3]. ।
अन्न भक्षुनी हि नाहिं तृप्त तो, तेक्षणींच धांव घेत भीम तो. ॥ ६२
'बोलिलासि तूं काय रे! मसी, तृप्ति नाहिं बा! येक कूसिसी. ।
देइं माझि तूं शीघ्र मुद्रिका.' तो म्हणे, 'तुं का दीधली फुका.' ॥ ६३
ऐकतां चि तो दुष्ट पातला. मुद्रिकेमुळें लोभ सूटला. ।
................................................... ॥ ६४
.........................................
................................ ।
लोभ तो धरूनियां भिमासि गर्व दाखवी.
चेर्तला[4]चि भीम तैं मुखांतरींच चाखवी. ॥ ६५
सैंव्य[5] बाहुनें कितीक आपटी महीवरी,
वाम बाहुनें कितीक टाकिती चि अंबरीं. ।

१. गोंसावी, प्रवासी. हे तीर्थाटन करतात, भगवें वस्त्र परिधान करतात आणि भगवी पताका घेऊन फिरतात. येथें कापडी म्ह० प्रवासी इतकेंच समजावयाचें. २. अगस्तिमुनि. ३. शिजवून तयार केलेलें अन्न. ४. रागावला. ५. सव्य म्ह० 'डावा,' पण येथें 'उजवा' असा अर्थ.

मुद्रिके निमित्त तें पुरांत युद्ध मांडिलें,
केशवें तयासि येवुनी स्वयेंच वर्जिलें. ॥ ६६
अतीताशीं झुंजा त्वरित समजा या वरि तरी,
हिरोनी घे मुद्रा, मग बळसमुद्रा दिलि करीं. ।
म्हणे, 'स्वामी ! जावें, फिरुनि तुम्हि यावें स्वयंवरा.'
नमूनी तो गेला. हरि गुज निरोपी सहुदरा. ॥ ६७
बसोनीयां मातेजवळि मग भीमें विनविलें,
'स्विकारीलीं[1] अन्नें, परि जठर कांहीं न भरलें. ।
उपाहारा कांहीं जननि ! मज देईं निजकरें.
तुझ्या हातें तृप्ती जशि मज, चकोरे[2] हिमकरें[3].' ॥ ६८
म्हणे चक्री[4], 'बाळा ! रुदन न करीं, राहिं उगला.
चणाका[5] घे मुष्टीभरि च, सदनीं भक्षि तुं मुला!' ।
त्वरें त्याची आज्ञा नमुनि भिम गेलाच सदनीं.
चणाकांचे पाळे रिचवुनि[6] फके घेत वदनीं. ॥ ६९
रिकामे ते पाळे करुनि मुल आलें झडकरी.
म्हणे, 'आई ! जेऊं उठुनि मज घालीं लवकरी.' ।
म्हणे, 'बापा ! आतां तुजप्रति चणाकांसि दिधलें.'
'मला माते ! तेणें[7] वदुनि लटकें ची झकविलें[8].' ॥ ७०
वाक्यें ऐकोनि कानीं, झडकरि सदनीं चक्रि गेला उठोनी,
धान्यें पाहे पुराणीं, न दिसति नयनीं, बोलिला, 'जालि हानी !' ।
पाळे पाहे निदानीं[9] गडबड धरणी लोळत एक कोनीं.
तेव्हां तो म्लानवाणी म्हणे, 'कण जननि ! भक्षिले सत्य मानीं. ॥ ७१
एका संवत्सराचे कण मम गृहिंचे भक्षिले या कुमारें,
गाईनें रत्नमोले जरि मुखिं गिळिलें, काय कीजे विचारें ?' ।
चक्री मातीस जातां, स्थिर करुनि सुता बोलली, 'आणिं मृन्मा.'
तेणें ते मृत्तिकेचे युगकरिं धरिले पिंड, लोपीत व्योमां[10]. ॥ ७२

---

१. खावयास. २. पक्षिविशेष. (याला ज्योत्स्नापान फार प्रिय आहे अशी कविप्रसिद्धि आहे.) ३. चंद्र. ४. कुंभार. ५. चणे, हरभरे. ६. रिकामीं करून. ७. कुंभारानें. ८. फसविलें. ९. अखेरीस. १०. आकाश.

एक्या पिंडासि तेणें स्थळ करुनि म्हणे, 'दूसरा बाह्य टाकीं.'
तेव्हां तो कौरवांचे चमुवरि[1] स्वकरीं भीम तेथोनि [2]झोंकी. ।
तेणें कित्येक मेले, तुरग रगडिले, वीर विस्मीत झाले.
रायें धाडूनि दूतां, सकळ नृप सभे ते क्षणीं मेळवीले. ॥ ७३
येती ते सर्व राजे स्वयंवरीं वसती कीर्ति ज्यांची विराजे.
भीष्मादी कर्ण दुर्योधन सह शकुनी पातले नीज फौजे. ।
येती शास्त्रज्ञ वेदी निपुंग ऋषिमुनी, ज्योतिषी धांवताती.
ते काळीं पांच बंधू नमुनि जननिसी मंडपा शीघ्र जाती. ॥ ७४
दाटली सभा देखुनी, उभा ठाकुनी, म्हणे, 'दाखवा प्रभा, ।
शक्ति जांतरी त्या सभांतरीं, यंत्र भेदुनी वरा हि नोवरी. ॥ ७५
रूप तें कढेंत पाहुनी बरें, लक्षुनी मिनाक्ष[4] भेदिजे शरें. ।
भेदि त्यासि तीन बाण दीधले, भोंवते असंख्य मल्ल ठेविले. ॥ ७६
भेदितांचि तीन बाण चूकती, त्यांसि मल्ल हे कढेंत टाकिती.' ।
ऐकतां सभा स्तब्ध जाहली, भूपशक्ति ते अस्त पावली. ॥ ७७
ऐकतां चि शंखवर्ण बोलिला, 'कोण जीव देईल आपुला ? ।
पूर्वि सैंवरें बहुत ऐकिलीं, ऐशि जीवसांड[5] नाहिं देखिली. ॥ ७८
कन्यका विधीस आवडे मनीं, तो म्हणे, 'फिरेल याममेदिनी ।
त्यासि अर्पिली ते मनोरमा.' ज्ञानि जाणुनी अर्पि गौतमा. ॥ ७९
विदेहराजया प्राप्त ते सिता, तो म्हणे, 'सुचाप लावि जो सिता[7], ।
त्यासि कन्यका तीच अर्पिली.' चाप मोडितां राघवा दिली. ॥ ८०
त्रेते नाहिं द्वापारिं भीमकें, रुक्मिणी दिली हरिस कौतुकें. ।
अन्य सैंवरें वर्णु मी किती? कोण घातले तैलिं भूपती? ॥ ८१
कन्यका तुम्हां बहुत आवडे, नित्य पाहिजे लोचनांपुढें. ।
त्याजसाठिं हें विघ्न योजिलें.' ऐकतां, नृपें काय बोलिलें.'॥ ८२
'अहा! रे! श्रीपार्था! तुज कशि अवस्थाच घडली?
शशीवंशीं कोणी मज तो न दिसे भूपति बळी.' ।
स्वगर्वें तों दुर्योधन उठुनि बोले, 'नृपवरा!
तुला कैसें वाटे, मजहुनि बळी कोण दुसरा? ॥ ८३

१. सैन्य. २. फेंकी. ३. हा आरबी शब्द आहे. ४. मत्स्याचा डोळा. ५. जिवाची हयगय. ६. अहल्या. ७. धनुष्याची दोरी.

धनुष्या दे वेगीं' वदत द्रुपदा कौरवपती,
'तुझी ते तों संख्या त्रिशर, चवथा दे मजप्रती.' ।
म्हणे तो विश्वात्मा, 'तुज निजमुखें पांच दिधले.
सुखें भेदीं यंत्रा, वरिं निजकलत्रा भुजबळें.' ॥ ८४
धरी चापा हातीं, वर शर सितीं लावुनि करें,
तळीं पाहे वक्त्रा, वरि मिनसुनेत्रा त्रिधि शरें; ।
रिकामा तो गेला, मग कुरुज लावीत दुसरा;
नभीं सोडी बाणा, तरि बहुत कांपे थरथरां. ॥ ८५
तो हि व्यर्थचि जावुनी, मग तीसरा शर लाविला.
मल्ल ते सरसाविती, तंव भीष्म मोहा पावला. ।
पाहि तो दुर्योधना, 'धनु सांडि, जिव कां त्यागिशी?
होमिती कढि येक्षणी तुज सर्व वैरी नेणसी. ॥ ८६
जीव देशिल, नोवरी मग कोण भोगिल निश्चयें?
कासया अभिमान धरिसी? हातिंचें धनु सांडिये. ।
हांसविसि नृप व्यर्थ हे.' मग आंसडुनि सभे आणिला.
बैसतांचि सुयोधनें नृप बोलती, 'पण जिंकिला?' ॥ ८७
भूप तीक्षण बोलिला, 'बहु हासतां नृपमंडलीं
मंदिरीं मम नंदिनी रमणी वरेंविण राहिली.' ।
श्रीहरी म्हणे राजया, 'ऋषि राहिले मुनितापसी,
त्यांसि जावुनि शीघ्र प्रार्थुनि ये त्वरें, किति बोलसी?' ॥ ८८
कृष्णवाक्य चि ऐकुनी नृप जावुनी करि प्रार्थना,
शक्ति जांतरि या सभांतरिं धर्म बोलत अर्जुना. ।
'ऊठ पार्था! धनुसि घे, मिन भेदुनी वरिं नोवरी.'
बंधु वंदुनि ऊठिला, नमिला पदांबुजिं श्रीहरी. ॥ ८९
घेवुनी धनुबाण अर्जुन येवुनी सभे ठाकला.
देखतां नृप बोलती, 'संवसारिं हा जिव त्रासला, ।
अंगनेस्तव आंग सुंदर तप्त तैलीं घालितो;
सव्य घेवुनि सव्यसाचि कढाह दृष्टिसि पाहतो. ॥ ९०

१. वायको. २. मूर्च्छा. ३. न जाणसी. ४. वायकोस्तव. ५. अर्जुन. डाव्या हातानें शरसंधान करण्याचा स्वभाव आहे ज्याचा—हा शब्दार्थ. (अर्जुन डाव्या हातानेंही बाण सोडीत असे म्हणून त्यास हें नांव आहे.)

दर्भ घेवुनियां करीं जिविं आठवीतसे चाक्षुकी.
टाकितां कढयांतरीं तंव स्वच्छ दीसत मच्छकी. ।
धूम्र तो शमतांचि, अंतरिं यंत्र निश्चळ राहिलें.
अर्जुनें ताळिं पाहुनी, शर लावुनी वरि भेदिलें. ॥ ९१
मीनलोचन भेदुनी त्वरें पाडिला अवनीवरी.
देखतां नृप 'धन्य' म्हणवुनि गर्जिताति स्वयंवरीं. ।
प्रेरुनी मदमत्त हस्तिनि द्रौपदी सभे पातली.
माळ ते निजहस्तकें मग पार्थकंठिं च घातली. ॥ ९२
भीम तेक्षणिं द्रौपदी गजस्कंधिं वाहुनि चालिला.
धर्मअर्जुननकुलसहदेवांसि बोलत, 'तुम्हि चला.' ।
दुष्टमतिनें एक भूपती द्वार जावुनि रोधिती.
भीम होवुनियां पुढें नृप लोटितां, पडती क्षिती. ॥ ९३
मार्गि त्या भिम चालतां नृप बाहुनें किति मारिले.
पांच जण कुंल्लालशाळे घेवुनी वधु पातले. ।
बंधु बोलति, 'माय! भिक्षा आणिली तुजकारणें.'
स्नेहें जननी बोलली, 'तुम्हि पांच वांटुनि घ्या' म्हणे. ॥ ९४
मातृवचनें द्रुपदतनया बंधु वांटुनि भोगिती.
तीस वदनीं नित्य स्मरतां पातकें बहु नासती. ।
भूप ते क्षणिं पंडुसूता आणुनी करि सोहळा
सद्गुरुकृपे काव्यरस हा अल्पमतिनें बोलिला. ॥ ९५
श्रोते हो! तुम्हि तों विचक्षण बहू, मी बोलतां भीतसें,
मी तों बालक तूमचें, मजकडे पाहा कृपासौरसें. ।
नाहीं ते मज बुद्धि, मंदमतिनें जें काव्य म्यां वर्णिलें
निर्दोषें करुनी अनंत विनवी तें पाहिजे भूषिलें. ॥ ९६

---

१. चाक्षुषी विद्या ही अंगारपर्ण गंधर्वानें अर्जुनास दिली. स्वर्ग मृत्यु पाताळ यांत जें कांहीं होतें तें कोठेंही असलें तरी हिच्या योगें दिसावें हें हिचें सामर्थ्य. २. कुंभाराच्या घरास. ३. 'अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा । पंच कन्या: स्मरेन्नित्यं महापातकनाशिनी: ॥' या सुप्रसिद्ध पद्याकडे येथें लक्ष्य आहे. ४. पंडित.

## [1]गजगौरीव्रताख्यान.

(श्लोक.)

नृपति पुसत वैशंपायना नम्र वाचा,
'प्रकट कलह झाला कौरवांपांडवांचा ।
कथवुनि मुनि! सांगा तृप्ति सूर्यात्मजाची,
कथुनि हि करिजे विश्रांति हृत्पंकजाची.' ॥ १
परिसुनि मुनि बोले, 'ऐक एकाग्र राया!
जधिं [2]रतमृत पांडू धर्म कर्मा जिराया।
लघु शिशु धृतराष्ट्रें पाळिले पुत्रमानें
निरखुनि बहु कीजे द्वेष दुर्योधनानें. ॥ २
बहू विद्या पार्था, तदुपरि हरीभक्तिरचना
विलोकूनी ख्याती शकुनि[4]सुतदुर्योधनमना ।
सदा ते पार्थाचा त्रिजन करिति द्वेष हृदयीं
तदा आलें हस्तीव्रत करित गांधारि समयीं. ॥ ३
निरोपी गांधारी वचन मग [5]ऐकोत्तरशता,
'अरे! योजा हस्ती सकळिक तुम्ही मृन्मय व्रता.' ।
अशीं तीचीं वाक्यें नमुनि सुत [6]मृद्गोल स्वकरीं
धरूनीयां आले, करिति गृहिं [7]सावेव हि [8]करी. ॥ ४
करी शृंगारीला कनकमय तो भूषणचिरें
द्विभागीं घंटांचे ध्वनि उमटती, वाजति धरे, ।
विलेपीला शुंडे [9]तगतगित सिंदूर विलसे ।
तळीं चक्रें त्यासी चतुर फिरवीतां फिरतसे. ॥ ५
वसोनी गांधारी सकळ सुत ते ओढिति करें,
पुढें नानावाद्यें घनस्वर [10]नफेऱ्यादिक [11]तुरें; ।
उभारोनी [12]पाणी अगणित मुखीं भाट स्तविती
अशी कुंतीगेहाप्रति मिरवुनी ये सुतवती. ॥ ६

---

१. 'व्रतराज' नामक ग्रंथांत हें आख्यान आहे, पण त्यांत आणि यांत भेद दिसतो. २. रतिसमयीं मुनिशापानें मेलेला. ३. अधिरथपुत्र (कर्ण.) ४. तिघेजण. (शकुनि, कर्ण, दुर्योधन.) ५. एकशें एक (पुत्रांना. यांत दासीपुत्र युयुत्सु याचीही गणना केली आहे.) ६. मातीचे गोळे. ७. सावयव. ८. हत्ती. ९. चकचकित, लकलकित. १०. वाद्यविशेष. ११. वाद्यें. १२. हात.

गजाखालीं नारी उतरुनि दिलें वायन तिला
फिरे जों तो **दुर्योधन** कुमतिनें वाक्य वदला, ।
'अहो! या दानाचें त्वरित उसणें सिद्ध करणें
न देतां तैं आहे नरक पितरांला, धिग जिणें.' ॥　　७

ऐकोनी कटु वाक्य त्या कुमतिचें **कुंती** मनीं दचकली
झालेंसे मुख म्लान, मान हरला, दुष्टोत्तरें पोळली. ।
जैशी त्या पियुषांतरीं वमुनियां व्यालें गैरा टाकिली,
तैसें वाक्य **सुयोधनें** चि वदतां **कुंती** जिवें खोंचली, ॥　　८

ऐशी दुःखित अंतरीं निज गृहीं, तों **भीम** आला पुढें,
'माते! कां वँदनेंदु हा उतरला ? सांगें मला एवढें.' ।
ते सांगे, 'गजव्रोवेसा मम गृहा **गांधारिनें** आणिला,
जातां ज्येष्ठ हि दुष्टबुद्धि वचनें स्पष्टोत्तरें बोलिला. ॥　　९

'घ्यावें वायन हें जिनें निजकरें द्यावें तिणें ऊसणें,
या दानासि विलंब हो न करणें, केल्या कुळाला उणें.' ।
ऐशीं तो कठिणोत्तरें वदुनियां मातेसवें गच्छला.'
ऐकोनी मग **भीम** तो निजमुखें **कुंती**प्रती बोलला. ॥　　१०

'तूं **गौरी**गजव्रोवसा निजसुखें आतांचि माते! करीं.
योजूं मी निज पायरी **गज**पुरीं त्या मृत्तिकेचा करी.' ।
ऐकोनि जननी म्हणे सुवचनीं, 'हे सांडि रे! योजना
आणीं तूं मृदु मृत्तिका निज करें जाऊनियां हो! वना.' ॥　　११

आणोनी मग टाकिला पवनजें मृद्गोल द्वारापुढें,
येवोनी जन सांगती जननिसीं, 'त्वद्भाग्य हें केवढें ? ।
आतां आणिल पिंड तो हि दुसरा या ग्राममाथां धरी,
देतो जीर्तसमाधि **भीम** सकलां नारीसपुत्रीं घरीं.' ॥　　१२

ऐकोनि तीणें जनपीडनार्था, **भी**मासि वर्जी तंव गम्य **पार्था**. ।
प्रार्थीतसे **अर्जुन**, 'काय आहे?' माता स्वपुत्राप्रति सांगताहे.॥　　१३

'**गौरी**करीं हें व्रत आचरावें, त्या मृत्तिकेच्या द्विरदा पुजावें, ।
जन्मांतरीं स्वर्गज पाविजेतो,' त्यानंतरें उत्तर **पार्थ** देतो. ॥　　१४

---

१. अमृत. २. साप. ३. विष. 'सर्पें विषा' असाही पाठ आहे. ४. मुखचंद्र. ५. व्रत, नवस. ६. गेला. ७. वायुपुत्रें.(भीमें.) ८. जीवंतसमाधि. ९. हत्ती. १०. स्वर्गातील हत्ती.

'जन्मांतरें तीं तुटलीं स्वभावें,[1] तेव्हांश्रिले श्रीहरिपाय भावें,[2] ।
मृद्गोलहस्ती तरि भव्य बाणा पूजोनि पूढें फलप्राप्ति कोणा? ॥ १५
आतां चि इच्छा करिं पूर्ण माते! आणीन ज्याची[3] भगिनी रमा ते, ।
त्या चारदंता[4] उतरोनि सृष्टी आणूनि मी दाविन तूज दृष्टी.' ॥ १६
बोलोनि ऐसें मग बाण चापीं[5] लावूनियां पत्र खिळि प्रतापीं, ।
मंत्रोनि मंत्रें निजबाण[6] सोडी, इंद्रालयालागिं सुशीघ्र धाडी. ॥ १७

कडकडाट तो थोर जाहला. भडभडां घहू वायु सूटला. ।
गडबडी तदां निर्जरीसभा,[7] झडझडोनि इंद्र राहिला उभा. ॥ १८
बाण लोटला इंद्रआसनीं, लक्षिती पुढें देव लोचनीं. ।
त्या शचीवरें उठुनि पाहिलें, सायकामुखीं पत्र देखिलें. ॥ १९
सोडुनी तिहीं तेच पत्रिका पाहिली वरी कृष्णमुद्रिका[8] ।
तो बृहस्पती सभेंत वाचितो, देवनाथ[9] एकचित्त ऐकतो. ॥ २०

'सकल हि उपमा जे ते तुम्हांसी विराजे,[10]
शतमखफलप्राप्ति[11] स्वामि तेथील राजे, ।
नमन हि तुम्हि घ्यावें श्रीहरीसेवकाचें
तदुपरि परिसीजे कार्य पंडुसुताचें. ॥ २१
सुरकुळमणि ! तुम्हां एक विज्ञप्ति आहे
सुरगजवर कुंती त्या वरा इच्छिताहे. ।
म्हणउनि प्रभुवर्यें धाडिजे गौरवानें
नाहिं तरि न म्हणीजे पोर हें टौरवाणें.' ॥ २२

(सवाई.)

वाचुनि पत्र बृहस्पति त्यावरि पार्थपराक्रम सांगत इंद्रा,
'तो हरिचा बहु आप्त धनंजय, हे नयनीं निरखीं हरिमुद्रा. ।
यास्तव अन्य मनीं न धरीं, करिं सिद्ध सुशोभित धाडिं गजेंद्रा'
ऐकुनियां गुरुवाक्य परी गज धाडुं जिवीं न वटे अमरेंद्रा. ॥ २३
'हा गजराज[12] विराजित ये स्थलिं, तो अवनीवरि[13] जाइल कैसा?
हे गुरुराज! मनीं उमजा तुम्हि, यासि विचार सुचे मज ऐसा ।

---

१. स्वभावतः भिन्नभिन्न झालीं. २. भक्तीनें. ३. ज्या गजाची (ऐरावताची) वहीण लक्ष्मी आहे. ऐरावत आणि लक्ष्मी हीं क्षीरसागरापासून मंथनसमयीं झालीं. ४. ऐरावतास. ५. धनुष्य. ६. आपुले बाण. ७. देवांची सभा. ८. शिक्का. ९. इंद्र. १०. शोभे. ११. शंभर यज्ञ केल्याचे फळाची प्राप्ति ज्याला तो. (इंद्रपद लाभ ज्याला झाला तो.) १२. ऐरावत. १३. पृथ्वी.

सांगुनि धाडुं तया नृवराप्रति, न्या करि सिद्ध कळेल हि तैसा'
बाहुनि[1] दूत म्हणे अमराधिप, 'हस्तिस न्या कथिं जा हरिदासा.'॥२४
जावुनि दूत नराप्रति[2] बोलति सिद्ध असें, तुम्हि हस्तिसि आणा'
ऐकुनि सेवकवाक्य धनंजय तेक्षणिं चिंतितसे गुरु द्रोणा ।
शीत[3] करें कसुनी करितो शरवृष्टि नसे परमीत हि बाणा,
ते नभिं वाट करी शरदाट[4] सुपार्थ अचाटपराक्रम जाणा. ॥ २५

(श्लोक.)

बांधोनि बाणीं मग स्वर्गमार्ग तो, जाया जनाला पदवाट दावितो. ।
त्या एवढा विक्रम वैष्णवी असे, तेव्हां गुरू तो भयभीत होतसे. ॥ २६
शक्रासि तो सद्गुरु वाक्य बोलिला, 'या नंतरें पाहिं विचार आपुला. ।
मनुष्य ते येतिल सर्व निर्भयें, वोढोनि घेतील बळें सुरालयें[5].' ॥ २७
तेव्हां म्हणे अर्जुन भीमसेना, 'जाऊनि तुम्हीं सुरहस्ति[6] आणा.' ।
त्या बाणपंथें अमरावतीसी[7] जाऊनि बोले सुरनायकासी. ॥ २८
'कोठें तुझा रे ! तनुशुभ्र हस्ती ?' आश्चर्य केलें विबुधीं[8] समस्तीं. ।
सांगे गुरू, 'सेवक अर्जुनाचा, दावा त्वरें त्यासि तरी च वांचा.' ॥ २९
'दावूनि ऐरावति देवरायें, निर्विघ्न व्हावें भलत्या उपायें.' ।
बोले मुखें भीम महावतासी[9] 'रे! चालवीं हा गज हस्तिनासी[10].' ॥ ३०
महावतें तो चिकळोनि हस्ती, 'आला' म्हणे 'हा गजराज मस्ती.' ।
घालोनि शुंडा मग भीमसेना ओढीतसे तो, परि हा ढळेना. ॥ ३१

धरोनि[11] चार दंत चार पाय दोन हस्तकें
महीस पाडिला करींद्र तो उताण[12] कौतुकें, ।
करोनि सिंहगर्जना चतुष्पदीं च बांधिला
गदेसि घालुनी करें धरोनि स्कंधिं चालिला. ॥ ३२
सभेसि भीम जावुनी म्हणे, 'सुरेंद्र! वैसणें'
नगारि[13] बोलिला, 'तुम्हीं कदापि हो ! न रूसणें. ।

---

१. बोलावूनी. २. अर्जुनाप्रति. ३. धनुष्याची दोरी. ४. बाणांनीं भरलेली ( हा संस्कृत प्राकृत शब्दांचा समास निषिद्ध होय.) ५. देवांचीं घरें. ६. देवांचा हत्ती ( ऐरावत ) ७. इंद्राची प्रधाननगरी. ८. देव. ९. हत्तीला हाकणारा महात. १०. हस्तिनापुरास. ११. 'करद्वयें धरूनि चारी पाय तेंवि हस्तकें दंत चारि पाय पुच्छ शुंड वाहिला तुकें' असाही पाठ आहे. १२. उताणा. १३. इंद्र.

करींद्र कैंवि टाकिला ?' नरेंद्र 'तो' म्हणे, 'असे'
विडंबना विलोकुनी म्हशासि कोण या पुसे. ॥ ३३

विडंबना विलोकुनी सुरेंद्र लाजला मनीं,
'गजासि सोडवीतसे' म्हणे 'अकीर्ति मेदिनी. ।

विभूषणासि घालितों, तुम्हीं क्षणेक वैसिजे,[1]
सुशोभितासि नेलिया तुम्हासि श्लाघ्य जाणिजे. ॥ ३४

चतुरदंत पैदीं[2] करिं भूषिला, चतुर स्कंधिं मंहावत[4] वैसला ।
चतुरपाणिसखाग्रज[3] त्यावरी, बसुनि आण्तिसे अवनीवरी. ॥ ३५

शरपथें ईभपती उतरे क्षिती, घंणघणा[5] अमित किंकिणि[6] वाजती. ।
सकळिकां बहुत कौतुक वाटलें, निरखितां गज गजाव्हय[7] लोटलें. ॥ ३६

'जरि[8] पराक्रम असे तरि मानिती, न करि विक्रमहि कोणि न मानिती, ।
शचिवरें[9] बहु पराक्रम देखिला, म्हणुनियां गजपुरा गज धाडिला.' ॥ ३७

सुरगज मग भीमें आणिला मंदिरासी,
निरखुनि जननी[10] ते तुष्टली सौख्यराशी. ।
करि सति निजभावें हस्तकें हस्तिपूजा,
विविधकुसुममाळा घातल्या शीर्षि वोजा. ॥ ३८

करुनि रुचिर पूजा शीघ्र आरूढ झाली,
मिरवत मग चाले, देवुं वाणा निघाली. ।
स्थिर करि सुरहस्ती नारि गांधारिगेहीं
उतरुनि मगे[11] देते वायनालागिं पाहीं. ॥ ३९

निरखुनि सुरहस्ती नारि विस्मीत झाली,
'अघटितकरणी हे त्वत्सुतीं[12] दाखवीली. ।
बहु सुत हरिणीसी[13] जाहले काय[14] कामा ?
उपजत करिगंडा[15] दारितो[16] सिंहनामा.' ॥ ४०

म्हणउनि अतिप्रेमें क्षेम[17] कुंतीस दीलें,
'तव व्रत इह जन्मीं सांग सिद्धीस गेलें.' ।

---

१. 'राहिजे' असाही पाठ आहे. २. 'करी परि भूषिला' असाही पाठ आहे. ३. भीमसेन. ४. ऐरावत. ५. 'खणखणा' असाही पाठ आहे. ६. घंटा. ७. हस्तिनापुरांतील जन. ८. हे दान चरण बोधपर सुभाषितरूप आहेत. ९ इंद्रें. (शचीच्या भ्रताराने) १०. कुंती. ११. 'मग तीतें वायनालागिं वाही' असाही पाठ आढळतो. १२. 'प्रस्तुतीं असाही पाठ आहे. १३. मृगीला. १४. काय उपयोगाचें आहेत ? नाहींत असा भाव. १५. हत्तीचें गंडस्थळ. १६. फोडितो. १७. आलिंगन.

सुरगज मग भीमें धाडिला इंद्रलोका,
परिसुनि घडिलासे तक्षकालागिं धोका. ॥ ४१
देखोनियां विक्रम अर्जुनाचा, संतापला जीव सुयोधनाचा. ।
तैंपासुनी मत्सर वाढलासे, रायासि पूर्वार्थ निरोपिलासे. ॥ ४२
हा गौरीगजवो[1]वसा, परियसा पुण्यांश घ्या फारसा,
सेवा ना अळसा, कथामृतरसा एकाग्रचित्तीं वसा, ।
काळाचा वळसा, बहू भरंवसा मानूं नका मानसा,
नोहे जन्म असा पुढें तरि बसा श्रीकृष्णपायीं बसा. ॥ ४३
सत्काव्यश्रवणें करूनि श्रवणे, [2]सायोज्यता पावणें,
संतासी लवणें, [3]अहं लपवणें, तोषा तसा पावणें, ।
चिंता मालवणें, स्तुती निवळणें, तत्वें मना लावणें,
धर्मा चालवणें, अनंतस्तवनें चित्तीं हरी ठेवणें. ॥ ४४

---

## [4]गरुडगर्वपरिहाराख्यान.

(श्लोक.)

वंदीन मूळिं गणनायक ! दे मतीला, त्यानंतरें स्तविन सिद्धसरस्वतीला; ।
स्वानंदसद्गुरुपदें नमिं मस्तकानें, सेवा कथामृत उदार समस्त कानें. ॥ १
फि[5]रत फिरत आला द्वा[6]रके वा[7]युपुत्र,
हृदयिं जपत आहे तारकें राममंत्र. ।
सचकित कपि पाहे द्वारका पुण्यभूमी,
[8]कनककळस जीचे लागले रम्य [9]व्योमीं. ॥ २
पां[10]च पु[11]ष्कराज वज्र[11] गोमेदादि माणिकें
नीळ[12]पीतरंगरत्नें जोडिलीं अमोलिकें, ।

---

१. व्रत. २. मुक्ति. ३. अहंता, अभिमान. ४. या प्रकरणास 'रामहनुमंतभेट' असेंही नांव आहे. ५. 'भ्रमत भ्रमत आला' असाही पाठ आहे. ६. हिलाच द्वारवती, द्वारावती, असीं अन्य नांवें ग्रंथांतरीं आढळतात. ७. मारुति. ८. सोन्याचे. ९. आकाशीं. १०. 'पाच पुष्पपद्मराग गोमेदादि माणिकें, ठाइं ठाइं विश्वकर्मे जोडिले ते कौतुकें । देखताचि अंतरीं तया संदेह वाटला, पर्वतीं चढोनि लांगुलें करोनि थाटला ॥' असाही पाठ आहे. ११. रत्नविशेष. १२. 'नील पीत रक्त श्वेत जोडिलींत आणिकें' असाही पाठ आहे.

अप्रतीम[1] सुप्रभा प्रसिद्ध[2] भिंत पोवळी[3]
इंद्रनीळ[4] पद्मराग व्हावया प्रभावली. ॥ ३

मरूकतादि कुंडलें विडूर्य भव्यमौक्तिकें
ठाइं ठाइं जोडिलीं हिरे सुपाच माणिकें. ।

दीप्ति देखतांचि तो गभस्ति[5] अस्त पावला,
तेचि **द्वा**रका विलोकितांच मोक्ष लाधला. ॥ ४

'नगर हें रचिलें कवणें बरें? मदन काढियलें कनकांबरें ।
मज गमे दशमुखानुजलंका[6] खणुनि आणियली अकलंका. ॥ ५

**द्रो**णागिरीपरि पुरी उपडीन आतां **रा**में दिली[7], तिस उपद्रव कोण देता? ।
त्या शत्रुला वधिन मी करितों प्रतिज्ञा.' तों येवुनी **मु**नि[8] म्हणे कपिराजसुज्ञा. ॥ ६

मुनि म्हणे, 'कपि! अंजनिनंदना[9]! दिससि आजि प्रवर्तसि कंदना, ।
बहुत कोप दिसे तुझिया मना, वद कपी! मनिंची मनकामना[10].' ॥ ७

मुनीतें वदे तो कपी नम्रवाचे, 'स्मरोनी फिरें पाय त्या **रा**घवाचे, ।
तयें **रा**घवें दीधली दान **लं**का वळें[11] शत्रुनें आणिली हेच शंका[12]?' ॥ ८

मुनि म्हणे, 'परिसें पवनात्मजा[13]! प्रभुविना तुजला न दिसे दुजा, ।
नृपति या पुरिंचा बरवा असे, कनक देइल तो तुज घे तसें. ॥ ९

**क**पिवरा! नगरि हे न्हे **लं**का, सुदृढ हे भवनदींतिल[14] नौका. ।
पुससि नाम इचें तरि **द्वा**रका रसिकभाविकलोकसुतारका. ॥ १०

ये पुरींत **ब**ळरामहि साजे, नाम हेंचि भुवनत्रयिं गाजे.' ।
ऐकतांच **क**पि अंतरिं कोपे, रोम[15] ते उभवितां वपु[16] लोपे. ॥ ११

भ्रुकुटि वक्र अग्निरूप बूबुळें, भूमि ताडिली आत्मलांगुलें[17], ।
क्रोधरूप[18] **ना**रदासि बोलिला; 'जाइं रे! पुरीमाजि तूं भला. ॥ १२

---

१. अनुपम. २. 'प्रशस्त भिंति पोंवळी' असाही पाठ आहे. ३. देवालयादिकांच्या सभोंवती जी भिंत असते ती. ४. 'पद्मराज सुप्रवाळ इंद्रनीळ आवळी' असाही पाठ आहे. ५. सूर्य. ६. बिभीषणाची लंकापुरी. ७. दशाननवधोत्तर रामानें बिभीषणाला दिली. ८. नारद हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र, मोठा भगवद्भक्त असून कामचारी, कलहप्रिय आणि गंधर्ववेदवेत्ता अशी याची ख्याति पुराणांत वर्णिली आहे. ९. मारुति. १०. इच्छा. ११. 'वळें आणिली हेचि झाली अशंका' असाही पाठ आहे. १२. संशय. १३. वायुनंदना. १४. संसार. १५. केंस. १६. शरीर. १७. आपल्या शेंपटानें. १८. 'अग्निरूप' असाही पाठ आहे.

जावुनी तया निरोप सांगिजे, **ब**ळीराम हें नाम सोडिजे. ।
सोडिना तरी सांग त्या [1]खरा सिद्ध होवुनी येइं [2]संगरा.' ॥ १३
हर्ष **ना**रदा न माय अंतरीं, चालिला त्वरें **द्वा**रकापुरीं. ।
जावुनी [3]सभेमाजि बैसला, तों सभेस **रा**म **कृ**ष्ण देखिला. ॥ १४
**या**दवांसहीत तो विराजला **र**मापती,
[4]शुभ्र [5]चामरें धरोनि [6]चार तेथ वीजती[7]. ।
[8]ध्यान तेंचि रम्य फार **ना**रदासि लागलें,
वाणिला-न वर्णवे बहूत रूप चांगलें. ॥ १५
वज्र अंकुशादि कुंकुमें बहू पदातळीं
अनंत [9]भानु लोपले सुदीप्ति ते दशांगुळीं, ।
वांकि [10]तोडरें [11]त्रिदें विराजिताति [12]नूपुरें
गर्जताति अंबरीं सहंसहंहि सुस्वरें. ॥ १६
[13]जानुचक्रि लोपताति भानुचंद्रमंडळें
केळिगर्भ मांडिया द्विभाग त्यास कोमळें, ।
कटिप्रदेशिं पींवळा पितांबर प्रकाशिला,
क्षुद्र [14]किंकिणीध्वनीस नाद थोर ऊठिला, ॥ १७
सुरंग रंग वेगळा [15]कुरंगनाभिचा टिला,
विशाळभाळमस्तकीं किरीट तो विराजला. ।
अमौल्य रत्न मूकुटासि जोडिलीं [16]खणोखणीं
चतुर्भुजांत आयुधेंशि बैसला सुखासनीं. ॥ १८
[17]मुनि श्रीहरीतें म्हणे, 'वासुदेवा! कपीनें मला धाडिलें गा! सुदेवा! ।
**ब**ळीराम हें नाम सोडूनि द्यावें, न सोडां तरी शीघ्र युद्धासि यावें.' ॥ १९
[18]रेवतीरमण हांसुनि बोले, 'काय मी त्यजिन वानरबोलें? ।
मर्कटा धरुनि आणिन येथें सैन्य घेवुनि निघे गिरिपंथें.' ॥ २०

---

१. दुष्ट. २. युद्ध. ३. 'सभास्थानिं पावला तों सभेस राम कृष्ण बैसला' असाही पाठ आहे. ४. 'चाप शुभ्र चामरें धरोनि दूत ढाळिती' असाही पाठ आहे. ५. चमर नामक महिषाकृति मृगाच्या पुच्छाचें केलेलें जें तें—चामर. (व्यजन.) ६.दास. ७. वारतात. ८.'तेंचि ध्यान व्यास शूक नारदासि लागलें' असाही पाठ आहे. ९. सूर्य. १०. तोरडी, पादभूषण. ११. कंकणें. १२. पैंजण. १३. गुडघेरूप चक्रांचे ठाई. १४. घागरी, घुंघुर. १५. कस्तूरीचा. १६. ठिकठिकाणीं. १७. 'मुनी तो वदे श्रीहरी देवदेवा' असाही पाठ आहे. १८. बळिराम.

जावुनी मुनि म्हणे, 'हनुमंता! व्यर्थ तूं दुखविला अहिमाथा,[1] ।
तो रिपू चमुस घेवुनि आला.' ऐकतां कपि सुतप्तहि[2] झाला. ॥ २१
लघुगिरी उपडितां पदिंच्या नखीं, उडवितां पडति ते चमुच्या[3] मुखीं. ।
हलधरी[4] परम विस्मित जाहला, मुनि तया त्वरित संनिध पातला. ॥ २२
बळ म्हणे, 'पडला स्थुळ धोंडा!' मुनि म्हणे 'कपिचा पदगुंडा;[5] ।
त्यापुढें बळ तुझें विकसेना,[6] वांचवीं सकळ भाविकसेना.'[7] ॥ २३
बोलतां समिप[8] पर्वत ये नभीं, देखतां खेळवळे[9] चमु ते उभी. ।
ते क्षणीं सकळिकां पळ सूटला, प्रळयकाळ तयां जिविं वाटला. ॥ २४
सैन्यासहीत बळराम पळोनि आला. श्रीकृष्ण त्यां पुसत, 'काय वृतांत झाला?'।
ऐकोनियां हलि म्हणे, 'शृणु[10] चक्रपाणी! मूर्खासि[11] बोध करितां श्रम होय वाणी.॥२५

(सवाई.)

दुर्धर[12] डोंगर टाकित वानर त्यापुढें संगरें[13] काय तो आम्हां?
जाणसि तें करीं लाघव तूं हरि, तो तों वनांतरिं केसरि श्यामा!' ।
ऐकुनि श्रीहरि विस्मित अंतरिं, 'वानर भासतसे बळिरामा!
पूर्ण सखा श्रमहारक तो मम अंतरिं होय कपीचा प्रेमा. ॥ २६
द्वययुगिं[14] भापण देइन दर्शन द्वापरिं यापरिपूर्ण ति संज्ञा'[15]
हेंच मनांतरिं आठवलें हरि! जाइं' म्हणे 'गरुडा करिं आज्ञा. ।
सांग तया बळराम वाहे तुज, चाल त्वरें, असें वद तूं सुज्ञा,
हांमुनियां गरुड म्हणे, 'हे मज लाज चतुर्भुज! ऐक प्रतिज्ञा. ॥ २७
सप्तसमुद्रहि[16] घोंटुनियां महि, काढिन मी अहि[17] चंचुबळानें
ऊर्ध्व उडून ते भानु शशी नभिं, बांधुनि आणिन पक्षबळानें, ।

---

१. सापाचें मस्तक. २. क्रोधाविष्ट. ३. सेनेच्या. ४. बळिराम. ५. पायानें टाकलेला दगड धोंडा. ६. पसरेना. ७. भोळीं गरीब यांची सेना. ८. 'समुळ' असाही पाठ आहे. ९. क्षोभ पावे. 'हळवळी' असाही पाठ आहे. १०. ऐक. ११. हा चतुर्थचरण बोधपर सुभाषितासारखा आहे. १२. 'दुर्धर डोंगर टाकितो वानर त्यासिही संगर कायसा आम्हां, जाणसि तें करि अंतरीं श्रीहरी त्यासि असे बहु राघवप्रेमा । पूर्वसखा मम आत्मज वानर भासतसे जणो तो बळीरामा पूर्ण मनोरथ होइल दर्शन त्याचि असे बहुलालस आम्हां ॥' असाही पाठ आहे. १३. युद्ध. १४. दोनयुगीं (त्रेतायुगीं आणि द्वापारयुगीं). १५. 'त्रेतायुगीं तुज देइन दर्शन भाष्य असे मम हेचि ति संज्ञा' असाही पाठ आहे. १६. लवण, इक्षु, सुरा, घृत, दधि, दुग्ध आणि जल यांचे सात सागर. १७. सर्प.

तो मि खगेश्वर जावुनि वानर, प्ार्थुं कीं थिल्लर[1]; सिंधुजळानें,
काय करूं? हरिशब्द नुलंघवे वारुळ तें नमिजे अचळानें.[2]' ॥ २८

(श्लोक.)

जावुनी[3] खगेंद्र शब्द बोलिला, 'चाल रे! बली बाहतो तुला. ।
ऊठ मर्कटा! चाल लौकरी.' गरुड ताडिला श्रीमुखावरी. ॥ २९
चडकणा मुखीं लागतां उडे, येवुनी सभेमाजि तो पडे, ।
भडभडां अशुद्ध[4] वाहतें मुखीं दुडदुडां हरी धांवे कौतुकीं. ॥ ३०
कांहिं त्या खगा धुगधुगी जिवीं, श्रीहरी कृपाहस्त फीरवी. ।
श्रीहरीकृपें उठुनि बैसला, 'धिग्' म्हणे हरी, 'नित्य निर्बला! ॥ ३१
जावुनी तुवां काय बोलिलें? कासया निमित्त तूज ताडिलें?' ।
गरुड श्रीहरीलागिं तो वदे, 'तो कपी बहू मातला मदें. ॥ ३२
काज जें तुम्ही मज निरोपिलें तसेंच जावुनी त्या निवेदिलें. ।
चाल रे ! बलीराम बाहतो,' ते क्षणीं मला होय काळ तो. ॥ ३३
इंद्रवज्र तें लागतां बरें, त्यापरीस पाणिपद्म[6] नीबरें[7]. ।
मीच होइं तों सोसिता बरा लागतांच चूर्ण होय कंधरा.[8]' ॥ ३४
म्हणे श्रीहरी वीनतेच्या[9] सुपुत्रा, 'तुवां जावुनी त्या कपीला पवित्रा ।
वदें सूर्यवंशी रघूराज आहे तुला दर्शनालागिं तो शीघ्र बाहे.॥ ३५
तनय दशरथाचा, बंधु सौमित्र[10] ज्याचा,
पति क्षितितनयेचा[11], मारिता ताटिकेचा, ।
रिपु दशवदनाचा, मित्र बीभीषणाचा,
सुखकर भरताचा, स्वामि जो वानरांचा.' ॥ ३६
ही खूण सांगितलि त्या गरुडास देवें.
बोले खगेंद्र, 'तुमच्या मनिं म्यां नसावें. ।
त्याच्या करें मरण येइल सत्य आतां
तूं कां उपेक्षिसि मला वदें[12] रे! अनंता[13]!' ॥ ३७
हरि म्हणे, 'गरुडा! हृदयांत अभय होवुनि जाइं वनांत. ।

---

१. अल्पजळ. २. पर्वतानें. ३. 'वाक्य ऐकरे अंजनीसुता ! सांगतां तुझ्या स्वामिची कथा । जेणें आपुली स्त्रीच त्यागिली, काय ही जनांत कीर्ति चांगली ॥' असें एक पद्य एका पोथींत आहे. ४. रक्त. ५. 'हस्त पाहतां वज्र तें बरें' असाही पाठ आहे. ६. हस्तकमल. ७. कठीण. ८. मान. ९. गरुड हा विनतेचा कनिष्ठ पुत्र. १०. लक्ष्मण. ११. सीतेचा. १२. बोल. १३. परमेश्वरा.

वद तुं दाशरथी तुज बाहे; [१]वचन बोलुनियां मग पाहें.' ॥ ३८
हरिपदें नमुनि सत्वर गेला. जावुनी खग दुरी दृढ ठेला. ।
'[२]दशरथात्मज तुला कपि ! बाहे.' वचन बोलुनियां पळताहे. ॥ ३९

(सवाई.)

ऐकुनि दाशरथी, कपि धांवुनि तो गरुडाचरणीं मिठि घाली,
देवुनि क्षेमें[३], तयास भुजावरि घेवुनि; त्या गरुडा कुरवाळी. ।
घेवुनियां खग खांदिसिं निर्भर नाचतसे तई हर्ष समेळीं,
'दावि मला रघुनाथ, अनाथ सनाथचि तूं मज ये करिं काळीं.' ॥४०

(श्लोक.)

'खांदियावरि परी भय अंतरीं घातलें यदुवरें मजला भरीं. ।
कपिस राम मि कोठुनि दाखवूं? अनृत देखुनि ताडिल हा बहू.' ॥ ४१
असो. यावरी ते [४]घनांबूदशामें सभे आदरें बाहिली सत्यभामे. ।
'[५]अहो! सुंदरी तूं त्वरें होइं सीता कळेना तया अंतरीं रामदूता.'॥ ४२
बहूतांपरी सर्व शृंगार केला. म्हणे, 'जानकी जाहलें मी दयाला !' ।
'[६]अहो सुंदरी ! हें नव्हे रूप तीचें. त्वरें रुक्मिणी ! रूप दावीं सितेचें.' ॥ ४३
हरीवाक्य ऐकोनि दावी स्वलीला त्वरें रुक्मिणी जाहली भूमिबाला. ।
रमाकांत तोची सिताकांत भासे [७]बंधू वामभागीं सिता ते विलासे. ॥ ४४
बहूतांपरी वीनवीलें खगेंद्रा, 'त्वरें दाखवीं माझिया रामचंद्रा.' ।
असो. यावरी तो कपीराज योगी सभे राम तो जानकी वामभागीं. ॥ ४५
कपीनें सिताकांत देखोनि दृष्टी पदीं लोळणी घातली प्रेममीठी. ।
असंभावि तें नावरे वानराला; प्रभू ऊचली आपुल्या किंकराला. ॥ ४६

(घनाक्षरी.)

आलिंगितां हनुमंत, सुख जाहलें अनंत, ।
व्यास वाल्मिकादि संत तेंचि प्रेम जाणती. ॥
सूर्य येवुनी गगनीं पुष्पें देति वि[८]खरुनी. ।
जयजयकार दीर्घध्वनि नारदादि करिती. ॥

---

१. 'सुचवुनी इतुकें मग पाहे' असाही पाठ आहे. २. 'वदत दाशरथी तुज बाहे' असाही पाठ आहे. ३. आलिंगन. ४. मेघश्यामें. (कृष्णें.) ५. 'म्हणे येइं तूं शीघ्र होवोनि सीता नये अंतरीं कल्पना रामदूता' असाही पाठ आहे. ६. 'अगे सत्यभामे नव्हे रूप तीचें' असाही पाठ आहे. ७. 'तया वामभागीं सिता ते विकासे' असाही पाठ आहे. ८. पसरूनी.

रामपायिं तोचि लीन[1] झाला हनुमंत दीन, ।
श्रम योगाचा तो शीण[2] तोंचि सर्व[3] नासला. ॥
बोले कपी गोड गोड, 'राम पुरवील कोड, ।
माझे कल्पनेचा[4] मोड[5] ऊपडोनी[6] टाकिला. ॥ ४७

(छंद.)

रामरूप भेटलें, मनासि सूख वाटलें.
अभेद[7] दुःख तूटलें, अपार पुण्य दाटलें ।
प्रपंचवित्त[8] वीटलें, प्राणरुक्म[9] गोठलें,
सुबुद्ध बुद्ध ऊठलें, अकर्म कर्म कांटलें[10]. ॥ ४८

(श्लोक.)

असें जाहलें आजि रे ! राघवेशा ! त्वरें पंगुनें लंघिलें त्या गिरीशा[11] ।
अभाग्यासि चिंतामणी[12] लाधलासे.' कपी बोलतां राम संतोषलासे. ॥ ४९
बहुत आदरें राम बोलिला, अकाळ मेघ काय आजि वर्षला ? ।
आलासि कोठुनी अंजनीसुता ! कोठें राहसी ? सांग तत्वतां.' ॥ ५०
'नित्य राहतों सिंधुच्या तटीं, ध्यातसें तुला हृदयसंपुटीं, ।
चकोर[13] इच्छिती इंदुच्या कला, तेंवि आठवीं राघवा ! तुला. ॥ ५१
चक्रवाकचक्रवाकिनी[14] तुटी[15] उदय झालिया त्यां पडे मिठी ।
उदयलक्षणीं रात्र नासली तेंवि राघवा ! भेटि दीधली.' ॥ ५२
ऐकतांच राम तो उदार शब्द बोलिला,
'धन्य भक्तराज ! भक्तिभाव थोर दाविला. ।

---

१. नम्र. २. थकवा. ३. इच्छित सर्व. ४. संकल्पाचा. ५. अंकुर. ६. उपटून. ७. 'जनासि प्रेम सूटलें' असाही पाठ आहे. ८. संसाररूप धन. ९. प्राणरूप सुवर्ण. १०. छिन्न झालें. ११. मेरुपर्वतास. १२. चिंतित (इच्छिलेली) वस्तु देणारा मणि. १३. हा पक्षी चंद्राच्या किरणांतून स्रवणारें अमृत सेवून उपजीवन करतो, अशी कविप्रसिद्धि आहे. १४. चक्रवाक नामक एक पक्षी आहे. त्यांत पुरुष (नर) आणि स्त्री (मांदी) यांचा रात्रीं ऋषिशापामुळें नित्य वियोग होतो. त्यांचा परस्परांवर अनुराग फार असल्यामुळें त्यांना वियोगाचें दुःख अत्यंत असह्य होतें. पण रात्र सरून सूर्योदय झाला म्हणजे त्यांची परस्पर भेट होते व तीं सारा दिवस एकठिकाणीं राहून घालवितात, अशी कविप्रसिद्धि आहे. 'त्यज चक्रवाकि शोकं बधान धैर्यं सहस्व समयममुम्। अयमेव वासरमणिर्हरिष्यते शापमूर्च्छां ते ॥' इत्यादि सुभाषितांवरून चक्रवाकपक्ष्याची स्थिति सुव्यक्त होते. १५. तूट.

जेंवि सिंधु नित्य चिंति पूर्णरात्रिचा[1] शशी
तेंवि आठवीं कपीवरा ! रे ! तुज मानसीं. ॥ ५३
सत्य कुंभ तो शिरीं धरूनियां ति गुर्जरी[2]
नित्य गान तें करी, समूळ चित्त त्यावरी[3]; ।
सोडी वावडी परंतु लक्ष ठेवुनी तिसीं,
तेंवि आठवीं कपीवरा ! रे ! तूज मानसीं. ॥ ५४
द्वैत तूज माजियाचसाठिं बा ! रे ! दाविलें,
राम कृष्ण ऐक्यरूप नाम तेंचि वेगळें.' ।
ऐकतां कपी म्हणे, 'विशाळपद्मलोचना[4] !
दाविं रूप तेंचि तीन तीस कोटि मोचना.' ॥ ५५
रघुपति हरि झाला तो चतुर्भूज देखा.
दृढ कपिहृदयींची छेदिली ते अशंका[5]. ।
कपिवर हरिपायीं धांवुनी ठेवि माथा,
उचलुनि हरि त्यातें क्षेम[6] दे चारि हातां. ॥ ५६
बोले कपी, 'हरि ! मला तुझि भक्ति द्यावी,
सेवा सदैव मजला शरिरीं घडावी. ।
हें मागतों तुजप्रती रघुराज[7] ! सुज्ञा !'
गेला कपी त्वरित घेवुनि कृष्णआज्ञा[8]. ॥ ५७
हें वाक्य सुंदर सुधारसपान ज्याला,
जो निश्चयें करिल हो वश तो अजाला[9]. ।
श्रोत्यां अनंत विनवी बहु नम्र वाचे
हे गूण वर्णित यथामति माधवाचे. ॥ ५८
अनंता[10] नामाचा गुणगण अनंतासि[11] नकळे,
अनंता भूजांतें हृदयिं स्मरतां तो यम पळे; ।
अनंता भक्तांचा अमितसुखदाता नरहरी[12]
अनंताचा[11] स्वामी अनुदिनिं उभा पांडवघरीं. ॥ ५९

१. पौर्णिमातिथीचा चंद्र. या दिवसीं पाण्याला भरती मोठी येते, ही गोष्ट आनंदसूचक आहे. २. गुर्जरदेशांतील स्त्री. ३. घागरीवर. ४. विशालकमलनयना. ५. आशंका, संशय. ६. आलिंगन. ७. 'यदुराज' असाही पाठ आहे. ८. कृष्णाची आज्ञा. येथें संधि कर्तव्य असून केला नाहीं. ९. परेशाला. १०. परमेश्वराच्या. ११. अनंतकवीला. १२. नरसिंहरूपधारी ईश.

## सुरथसुधन्वाख्यान.[1]

### प्रसंग पहिला.

(श्लोक.)

‘आयका सकळ भारति[2] हे कथा; देह दुर्लभ, कदा न करा वृथा. ।
धन्य जे श्रवणिं भारत ऐकती निश्चयें हरिपदाप्रति पावती.’ ॥ १
चंपकापुरि[3] प्रती हय[4] ते क्षणीं पातला तुरग मंडित भूषणीं ।
पाठिशीं मग धनंजय[5] चालिला, सैनिकांसह सुशोभित पातला. ॥ २
दूत जावुनि नृपाप्रति[6] सांग्तती, ‘पातला नृप धनंजय निश्चितीं ।
श्यामकर्णहि[7] महीवरि सोडिला; पृथ्विचे नृपति जिंकित चालिला.’ ॥ ३
हंसध्वजें ऐकुनि दूतवाणी बोले प्रधानांप्रति सत्वखाणी.[8] ।
‘होईल वाटे मज लाभ आतां, पार्थासवें श्रीहरि मुक्तिदाता. ॥ ४
ना देखिला म्यां यदुराज[9] दृष्टीं त्या चातकें जेंवि अकाल वृष्टी; ।
तैसा मला थोर सुलाभ झाला येथें अकस्मातहि पार्थ[10] आला. ॥ ५
मत्सैन्यकीं सत्वर सिद्ध व्हावें धनंजयाशीं रणिं युद्ध द्यावें.’ ।
वदोनि ऐसें नृपती[11] निघाला, सेना स्वयें तो रचिताचि झाला. ॥ ६
सेनेची गणना कथीन वदनें, अत्यादरें आयका,
राये घेवुनियां सवें अतिरथी[12] त्या सत्तरी[13] नायका ।
सेना नायकनायका प्रति किती तें ही तुम्हीं ऐकिजे,
हस्ती सत्तरि ते सहस्र गुढरी सैन्यांतरीं जाणिजे. ॥ ७
सोसें[14] सत्तरि ते सहस्र रथही उच्च ध्वजा शोभती
अश्वाधिष्ठित[15] एक लक्ष गणना युद्धा करूं तिष्ठती ।
पादाती नव लक्ष ते परचमू लक्षूनियां राहिले
ऐसे सर्वहि वीर वैष्णव[16] रणीं रायासवें चालिले. ॥ ८

---

१. हें प्रकरण जैमिनिकृत अश्वमेधांतील आहे (अध्याय १७-२१). या आख्यानांत ऱ्हस्व दीर्घ अक्षरांच्या यथायोग्यप्रयोगाकडे आणि वृत्तांतील मात्रासंख्येकडे कवीचें कांहींसें दुर्लक्ष्य दिसतें. २. महाभारतांतील कथा. ३. हंसध्वजाची राजधानी. ४. यज्ञिय अश्व. ‘बहु अलंकृत’ असाही पाठ आहे. ५. अर्जुन. राजसूययज्ञांत अर्जुनानें दिग्विजय करून संपूर्ण राजे जिंकून त्यांचें ‘धन जिंकून’ आणिलें यावरून ‘धनंजय’ असें नांव त्यास पडलें. ६. हंसध्वज नृपाला. ७. अश्व. (ज्याचे कान काळे व जो अश्वमेधास योग्य असा घोडा.) ८. धैर्यनिधि. ९. कृष्ण. १०. पृथेचा पुत्र. (अर्जुन.) ११. हंसध्वज. १२. ‘अनिवळी’ असाही पाठ आहे. १३. सत्तर सैन्यनायक. १४. सहाशें. १५. ‘अश्वारूढ सहस्रलक्ष’ असाही पाठ आहे. १६. विष्णुभक्त.

रायाचे चमुपाळ ते सचिव कीं प्रख्यात नामें पहा
श्रद्धाढ्य सुमती तिजा सुगति तो घेती चमूभार हा. ।
बंधू भूपतिचे बलाढ्य असती ते सप्तसिंधू जसे
त्यामध्यें पहिला विदूरथ बळी ग्रासील काळा दिसे. ॥ ९

चंद्रसेन, चंद्रकेतु, चंद्रदेव तो बळी,
न्यायवित्त, धर्मपाळ, धर्मबाहु त्या दळीं. ।
पुत्र ते नराधिपासि रम्य पांच आसती[1]
सुबळ, सुरथ, सम, सुधन्वादि शोभती. ॥ १०
सर्व सैन्य घेवुनी मराळकेतु[2] चालिला,
पार्थ सैन्य संनिधानें जावुनी स्थिरावला. ।
तैलपूर्ण ते कटाह ठेवुनी चुलीवरी
अग्नि लावुनी तळीं, वदे नरेश त्यावरी. ॥ ११
'प्रसिद्ध वाक्य बोलतों, तुम्हीं यथार्थ जाणिजे[3]
पुरींतुनी न येल जो तया कढेंत घालिजे ।
बहूत आप्त पुत्र पौत्र बंधु हो! जिवांगला[4]
विसंग संगरासि जो न ठेविं जीत[5] त्याजला.' ॥ १२
शंख[6] त्या पुरोहितें बहूत राव शिक्षिला
म्हणोनि भूपती जनासि शासनोक्ति बोलिला. ।
यापरी कटाहतैल तापवूनि पावकें
दूत दुंदुभीसि वाजवीति युग्म हस्तकें. ॥ १३
सुधन्वा रायाचा प्रथम सुत तो ऐकुनि निघे
पुसे मातेलागीं सज्जुनि सदनीं सत्वर रिघे. ।

---

१. पांचव्या पुत्राचें नांव सुदर्शन. २. हंसध्वज. (ज्याच्या ध्वजावर हंसाचें म्ह० मराळाचें चित्र काढिलें आहे तो.) ३. 'ऐकिजे' असाही पाठ आहे. ४. प्राणाहून प्रिय. ५. जीवंत. ६. लिखित-ऋषीचा ज्येष्ठ भ्राता. हे दोघे भ्राते भिन्न आश्रमांत रहात असत. एकदां लिखितानें शंखाच्या बागेंतील फळें तोडिलीं, तेव्हां त्यानें सुद्युम्न नामक राजाकरवीं लिखिताचे दोनही हात तोडविले. नंतर त्यास ते हात बाहुदा नामक नदींत स्नान केल्यावर तर्पणसमयीं प्राप्त झाले. असा शंख हा उग्र स्वभावाचा होता. (महाभारत, शांतिपर्व, अध्याय २३)

म्हणे, 'माते! जातों कपिवरध्वजाशीं[1] रण करूं
तुझ्याज्ञेनें[2] आतां तुरगसह तो अर्जुन धरूं.' ॥ १४
म्हणे माता, 'पुत्रा! तुरगहि त्यजीं, पार्थ न धरीं,
परी यत्नें आणीं धरुनि कमळानायक[3] हरी. ।
अरे! त्याची कीर्ती बहुत कथिली ब्रह्मतनयें[4]
पहावा तो दृष्टी धनिवर वरा याचि समयें.' ॥ १५
सुधन्वा तों वक्रें म्हणत, 'जननि! तूं वदलिसी?
तुझी इच्छा आतां पुरविन पहा कंसअरिसी[5].' ।
वदोनीयां ऐसें त्वरित सदनाबाहिर निघे
स्वसा[6] आली बोले मग तरि पुढें पाय न रिघे. ॥ १६
सुनामें ते शोभे कुवलयदलाक्षी[7] हि कुवळा
म्हणे, 'ऐसें बंधो! न करिं, हंसती देवर[8] मेला[9]. ।
यशस्वी होवोनी त्वरित फिरुनी ये निजघरा
म्हणोनी ओंवाळी, बहुत न वदें वाक्य चतुरा!' ॥ १७
म्हणे बंधू, 'बाळे! पुरविन तुझा हेतु मनिंचा.'
स्वभावेंची गेला युवतिसदना[10] थोर कुळिंचा. ।

---

१. अर्जुनास 'कपिवरध्वज' अथवा 'कपिध्वज' असें नांव पडण्याचें कारण:—मारुति आणि अर्जुन यांचें एका प्रसंगीं परस्परांच्या सामर्थ्याविषयीं बोलणें चाललें असतां निकरावर गोष्ट येऊन युद्ध झालें; त्यांत अर्जुनास कृष्णाचें साहाय्य असल्यामुळें यश आलें आणि मारुति हरला. तेव्हां युद्धप्रसंगीं अर्जुनाच्या ध्वजावर बसून आपल्या प्रचंड गर्जनेनें शत्रूंस भयाकुळ करण्याचें काम त्यानें पतकरिलें, म्हणून अर्जुनास 'कपिध्वज' 'कपिवरध्वज' असें नांव पडलें. 'कपिध्वज', 'वृषध्वज', 'मीनकेतन' इत्यादि शब्दांचा बहुव्रीहिसमास करून अर्थ करण्याची रूढि आहे; परंतु विचारदृष्टीनें पाहिलें असतां 'ध्वजावर मासा, बैल' वगैरे बसविणें या शब्दांचा जसा अर्थबोध व्हावा तसा होत नाहीं; रथावर जो ध्वज (पताका) उभारायाचा त्याचेवर 'मासा,' 'घोडा,' 'बैल' इत्यादि जें ज्याचें चिन्ह असे, त्याचें चित्र काढीत असावें, असा अर्थ संभवनीय दिसतो. या चित्राच्या खुणेवरून हा अमक्याचा रथ असावा असें तो ध्वज पाहिल्याबरोबर इतरांस कळावें, असा या चित्रें काढण्याचा उद्देश असावा. प्रस्तुत युरोपीय राष्ट्रांत देखील ध्वजावर निरनिराळीं चित्रें काढण्याचा प्रघात दृष्टीस पडतो, तसाच कांहीं तरी पूर्वी संप्रदाय असावा. २. येथें संधि नको; 'तवाज्ञेनें' असा पाठभेद कल्पिल्यास बरें. ३. लक्ष्मीपति. ४. नारदानें. ५. हा सामासिक शब्द आहे यास्तव येथें संधि कर्तव्य आहे, तथापि कवीनें तो केला नाहीं. ६. बहीण; हिचें नांव कुवला. ७. कमलपत्राक्षी. ८. दीर. ९. 'दीर मजला' असाही पाठ आहे. १०. प्रभावती नामक स्वभार्येच्या घरीं.

विलोकूनी भर्ता त्वरित उठली रम्य [1]ललना
तिच्या सौंदर्याशीं त्रिजगिं पहतां नाहिं तुलना. ॥ १८
कृशांगी गौरांगी [2]कनकरुचिरांगी कटिकृशा
[3]चलाक्षी [4]कंजाक्षी विमल कमलाक्षी मृगदृशा, ।
मुखीं इंदू बिंदू निढळ हि दिसे [5]सिंधुतनया
गमे वक्षी लक्षीं कलशकुच कीं ते नववया. ॥ १९
शुभारंभा [6]रंभा मृदु सरळ स्तंभापरि उरू
लता कीं [7]रुक्माची चढुनि बहु वेष्टी स्मरतरू, ।
सदा भद्रा मुद्रा अतिललित क्षुद्रावळि कटी
शुकाची ते शोभा विलसित जिला नासिकपुटीं. ॥ २०
यापरी बहू नारि सुंदरा रत्नदीप तो उजळिला बरा ।
त्यावरी पदीं शीघ्र लागली वाक्य सुचवुनी व्यंग बोलली. ॥ २१
‘एकपत्नि राहिलासी ज्या व्रतें आजि वल्लभा ! नष्ट भासतें. ।
सांडुनी मला जासि जीप्रती मत्समान ते नाहिं निश्चितीं. ॥ २२
[8]वर्तते सदा [9]सर्वगामिनी काय ते भल्यास होय [10]मानिनी? ।
तात जीजला [11]लग्नितो असे तीप्रती पहा पुत्र जातसे ! ॥ २३
वरुनि तीजला मुक्ति वांछिसी जारिणी चमू केंवि नेणसी ? ।
लोलही असे [12]पुंसचित्त तें [13]स्वर्गकामिनी भोगुं धांवतें. ॥ २४
आदरें बहू जासि तीप्रती ती तुला प्रिया नव्हेचि निश्चितीं ।
विवेक पुत्र तो तीजपासुनी प्राप्त तो नव्हे [14]जाणिजे मनीं.’ ॥ २५
येरु बोलिला, ‘ऐक सुंदरी ! जावुनी रणीं **पार्थ** श्रीहरी ।
पाहुनी पुनः फिरुनि पावतों अंगने ! घरीं जिवांत धीर तो.’ ॥ २६
वाक्य ऐकुनी बोलली सती, ‘लोचनींच जे हरिस पाहती ।
[15]न येति मागुती भूवरी कधीं यापरी मुखें बोलिजे बुधीं.’ ॥ २७

(सवाई.)

बोलतसे नृपनंदन दुंदुभि ऐकुनियां, ‘भयभीत मि आहें,
यास्तव युद्ध करूं रणिं जात असें ललने ! क्षण एक न राहें.’ ।

---

१. प्रमदा. २. सुवर्णासारखें सुंदर अंग जिचें अशी. ३. चंचलनेत्रा. ४. कमळासारखे डोळे जिचे अशी. ५. लक्ष्मी. ६. केळ. ७. सोन्याची, कनकलता. ८. ‘तीव्र ते सदां’ असाही पाठ आहे. ९. सर्वांपाशीं जाणारी (चमू.) १०. अभिमानवती स्त्री. ११. सेवितो. १२. पुरुषाचें मन. १३. अप्सरा, देवांगना. १४. संस्कृत ‘ज्ञा’धातूस ‘जाण’आदेश होतो. १५. ‘न येति ते कदा भवासि हो कधीं’ असाही पाठ आढळतो.

येरि म्हणे, 'मि ऋतुस्नॉत तों मज ना जिंकवेचि तुझेनिहि पाहे,
तो तुं रणांगणिं [1]षड्गुणयुक्त हरीशिं कसा जिंकसी निजदेहें? ॥ २८
अंग जयासिं नसोनि परी मज वेष्टियलें दृढ त्याहि [2]अनंगें
ते मजलागिं तुझेनिहि ना [3]जिंणवे उमजे अतिसत्वर अंगें. ।
तेच तुरंगमवेष्टित सांग चमू कस जीणसि तूं निजअंगें ?
रात्र नसे दिवसाचि.तुं गच्छसि धीर कसा धरिसी मज सांगें?' ॥ २९
वीर म्हणे, '[4]शृणु सुंदरि! येइल हा ऋतुकाळ तरी प्रतिमासा
[5]पार्थ पुन्हा नयनीं न पडे मज घालिसि व्यर्थचि कां [6]रतिफांसा ? ।
अर्जुन जाइल श्रीहरि कोठुनि दृष्टि पडेल न सोडित दासां
त्यावरि या दिवसा [6]रमणें लघुमक्षि जसी वमवी रसग्रासा.' ॥ ३०
प्राणपतिप्रति प्रार्थित यूवति, 'पार नसे पहतां [7]अगमाचा,
बोधवुनी मज [8]गच्छसि तूं तरि मेरुसमानहि दोष [9]फुकाचा ? ।
अश्रुजलें श्रवती नयनीं मग दोहिं करीं धरि कंठ [9]वराचा
[10]निग्रह देखुनि कुंठित ते क्षणिं यत्न पुढें न चलेचि तयाचा. ॥ ३१

(श्लोक.)

[11]कवच फेडुनि किरीट हि काढिला शयनमंदिरिं वधूसह पातला. ।
खचित मंचकिं दिला ऋतु तीप्रती [11]धरितसे मग सुगर्भ प्रभावती. ॥ ३२
करुनि [12]मंजन नृपात्मज चालला बसुनि स्यंदनिं नृपाप्रति पातला. ।
तंव नराधिप विलोकित ईकडे, वडिल तो तनय दृष्टिस ना पडे. ॥ ३३
बहुत ते क्षणिं नृपोत्तम कोपला; म्हणतसे, 'सुत मदें गृहिं राहिला, ।
चढविली तरि वृथा अनळीं कढे.' म्हणुनि [13]भूपतिविषादहि तो चढे. ॥ ३४
वदतसे, 'यवन हो! तुम्हि जाइजे, धरुनियां [14]कुरळिं आत्मज आणिजे.' ।
वचन तें नमुनि म्लेंच्छहि चालिले, [15]अतिजवें नृपसुताप्रति पातले. ॥ ३५
निरखिती यवन ते सुत स्यंदनीं, म्हणति, 'रे ! उतर सत्वर मेदिनी. ।

---

१. समग्र ऐश्वर्य, समग्र धर्म, समग्र यश, समग्र श्री, समग्र ज्ञान आणि समग्र वैराग्य या सहा गुणांनीं संपन्न. २. कामें. ३. जिंकवे. ४. ऐक. ५. हा संस्कृत प्राकृत शब्दांचा समास अ-ग्राह्य समजतात. ६. रतिक्रिया. ७. आगमाचा, शास्त्राचा. ८. जासी. 'गच्छसि' हें द्वितीय पुरु-षाचें वर्तमानकालवाचक एकवचन आहे. ९. नवऱ्याचा. १०. अटकाव, प्रतिबंध. ११. चिलखत. ११. 'धरित गर्भहि प्रभावती सन्मती' असाही पाठ आढळतो. १२. स्नान. १३. हंसध्वज राजाचा निरुत्साह. १४. केशीं. १५. गोट्या वेगानें.

तुजवरी बहु नराधिप कोपला, उशिर कां सदनिं राहुनि लाविला ?'॥ ३६
उतरतां नृपसुता, मनिं शंकले, सरथ घेवुनि तयासहि पातले. ।
तनय तो नृपतिसन्मुख आणिला, नृपसुतें जनक तप्तहि देखिला. ॥ ३७
मदन देखुनि [1]त्रिलोचनही जसा, सुत विलोकुनि नराधिप तो तसा. ।
वदतसे, 'तुजकडे [2]पृतना कशी? ध्वनि करी, बहुत दुंदुभि नेणसी.' ॥३८

पुनरपि नृप बोले, '[3]लंघिली कां ममाज्ञा ?'
मृदु तरि सुत प्रार्थी, 'भूपती ! ऐकं प्राज्ञा ! ।
[4]ऋतुयुत तव होती ते स्नुषा स्वस्थ [5]धर्मीं
तुज मज [6]जल द्याया [7]निर्मिला पुत्र स्वामी ! ॥ ३९
म्हणुनि नृप ! विलंबें पातलों संगरासीं.'
[8]परिसुनि नृप बोले 'नष्ट तूं दुष्टराशी, ।
हरिस विमुख तूं जो काय उद्धार वंशा?
करिसि हरिसि केंवि [9]वज्रसंसारपाशा? ॥ ४०
[10]नर [11]हरि रणिं आले आपणा दाखवाया,
त्यजुनि समरिं त्यांशी भोगिली गेहिं जाया, ।
म्हणुनि कुमति! तूंतें टाकितों त्या कढाहीं,
सदय हृदय [12]नोहे पाहतां दोष [13]कांहीं. ॥ ४१
त्वरित लिखित [14]शंखोलागिं जावूनि पूसा,
सकळहि तुम्हि सांगा पूर्व वृत्तांत ऐसा. ।
उशिर करुनि पुत्रें लंघिलीसे [15]नृपाज्ञा
म्हणुनि सुत [16]कटाहीं घालितो, काय आज्ञा ?' ॥ ४२
[17]परिचर मग गेले वीनवीती द्विजाला,
'नृपसुत रजस्त्रीच्या संगमीं स्थीर झाला, ।

१. त्रिनेत्र शिव. २. सेना. या संबधानें पुढील कोष्टक लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे:—१ रथ, १ गज, ३ घोडे, ५ पायदळ= १ पत्ति; ३ पत्ति= १ सेनामुख; ३ सेनामुखें= १ गुल्म; ३ गुल्म= १ गण; ३ गण= १ वाहिनी; ३ वाहिन्या= १ पृतना; ३ पृतना= १ चमू; ३ चमू= १ अनीकिनी; १० अनीकिनी= १अक्षौहिणी. ३. उल्लंघिली. ४. ऋतुस्नात. ५. घरीं. ६. तर्पणसमयीं पुत्रानें पितरांस उदक देणें हा एक विधि आहे, त्यास अनुसरून जलांजलि देणें. ७. 'सजिला' असाही पाठ आहे. ८. 'नृपवर मग बोले' असाही पाठ आहे. ९. वज्रासारखें संसाराचें दृढ बंधन. १०. अर्जुन. ११. कृष्ण. १२. हृदय सदय होत नाहीं. १३. हा चरण बोधपर सुभाषित आहे. १४. पुरोहिताला. १५. 'ममाज्ञा' असाही पाठ आहे. १६. कढईत. १७. सेवक.

म्हणुनि नृपति त्यासीं टाकितो त्या कटाहीं
नुमजत नृप, पाहा क्षिप्र शास्त्रार्थ कांहीं.' ॥ ४३

परिसुनी मग पुरोहित बोलती, सुत[1] विलोकुनि झळंबत भूपती ।
वदुनि सत्यहि तरी नृप ना करी नरकिं कंठिल रवीशशि जोंवरी. ॥ ४४

हरिश्चंद्रें स्वप्नीं कुशिक[2]तनया राज्य दिधलें
परी तेणें रायें अनृत वचनीं ना म्हणितलें. ।
विकूनी स्त्रीपुत्रां उपरि अपणा जान्हवि[3]तटीं
वधी, स्त्रीसी टाळी, अनृत न निघे त्या मुखपुटीं. ॥ ४५

पुरा शब्दीं गोंवी दशरथनृपालागीं ललना[4],
म्हणोनीयां राजा रघुपति[5]प्रती धाडित वना. ।
असे गेले मागें वचन वदुनी नाहिं फिरले
तुम्ही[6] ऐसें पृथ्वीपतिप्रति कथा रे ! जरि भले. ॥ ४६

कदाचित् पुत्रातें कढइंत सुलोभें न त्यजसी
त्यजूं या राष्ट्रातें फिरुनि न करूं संग तुजशीं.' ।
अशीं त्यांचीं वाक्यें परिसुनि तदा दूत फिरले,
नृपापासीं आले म्हणति 'नृपती ! विप्र रुसले.' ॥ ४७

अमात्यासीं आज्ञा करित नृपती तो निजमुखें,
'सुतालागीं घाला दृढतर कढेमाजि स्वसुखें. ।
त्वरें आणूं जातो नमुनि समजूं शंखलिखिता.
करीतां राज्यासी यश मज असे त्यांजकरितां.' ॥ ४८

---

१. 'सुत म्हणोनि बुझावित भूपती' असाही पाठ आढळतो. २. विश्वामित्रा. ३. गंगातीरीं. गंगेस 'जान्हवी' म्हणण्याचें कारण असें कीं, जन्हुराजानें गंगेला आपल्या जंघेंत प्रथमतः गुप्त करून मग मुक्त केलें, म्हणून जान्हवी हें नांव पडलें. ४. स्त्री कैकेयी. असुरांसह तिमिध्वज राजा इंद्राशीं युद्ध करीत असतां, इंद्रानें दशरथास आपल्या साहाय्यास बोलाविलें. तेव्हां दशरथानें जाऊन असुरांसह तिमिध्वजाचा पराभव केला. पण इतक्यांत एक बाण लागून तो मरणप्राय मूर्च्छित पडला. या समयीं कैकेयीनें मोठ्या चातुर्यानें त्याचा रथ एकीकडे नेवून त्यास सावध केलें. तेव्हां त्यानें प्रसन्न होऊन तिला दोन वर मागण्यास सांगितलें. ते तिनें 'अवश्य तेव्हां मागून घेईन' असें सांगून तसेच ठेविले. पुढें भरतास राज्याभिषेक आणि रामास चौदा वर्षें वनवास असे दोन वर मागितले. ५. 'प्रिय रघुपती पाठवि वना' असाही पाठ आहे. ६. 'म्हणोनीया ऐसें नृपतिस बरें सांग कथिलें' असाही पाठ आढळतो.

तदा राजा गेला नमुनि समजावी द्विजवरा
कढेपाशीं आणी, वसवुनि पुजी [1]मेदिनिसुरा. ।
अमात्यें जावोनी निजगुज सुधन्व्यासि कथिलें
‘कढेमाजी घाला तुजप्रति नरेंद्रें म्हणितलें.’ ॥ ४९
सुधन्वा म्हणे, ‘चाल, येतों प्रधाना! मला मृत्युभे ना करूं [2]तप्तस्नाना.’ ।
[3]जळीं स्नान सारोनियां शुद्ध झाला, कटीं नेसला [4]दिव्य पीतांबराला. ॥५०
गळां माळिका घातल्या [5]मंजरीच्या पढे वक्रिं नामावळी श्रीहरीच्या. ।
म्हणे, ‘केशवा! यादवा! माधवा! रे! तुझा वेध हा लागलासे जिवा रे!’॥
स्मरोनी हरीनाम वेगें निघाला, अमात्यादि संगें कढेलागिं आला. ।
कढेमाजि तें तापलें तैल कैसें? दिसे दुर्जनाचें सदा चित्त तैसें. ॥ ५२
जयामाजि [6]आवर्त ते बुद्बुदादी भडाडी कसा [7]दुष्ट जैसा [8]विषादी. ।
विलोकूनिया त्या कटाहासि नेत्रें सुधन्वा स्मरे श्रीहरी नाम वक्रें. ॥ ५३
म्हणसि तूं हरि! सुखांतरिं नाठवी मज कसा दृढ विपत्तित आठवी. ।
तरि हरी बहुत चिंतिति संकटीं [9]ध्रुव [10]गजेंद्रहि [11]गोवळ [12]हृत्पुटीं. ॥ ५४

१. भूदेव, विप्र. २. तप्त तेलाच्या कढईत स्नान. ३. ‘जळीं सारुनी स्नान तो’ असाही पाठ आढळतो. ४. ‘रम्य दिव्यांबराला’ असा अन्यपाठ आढळतो. ५. तुळसीमंजरींच्या. ६. भोंवरे. ७. ‘दुष्ट जैसा द्विपादी’ असाही पाठ आहे. ८. चांडाळ. ९. उत्तानपाद राजाला सुनीति आणि सुरुचि अशा दोन स्त्रिया होत्या. नावडती थोरली स्त्री सुनीति ही ध्रुवाची माता. हा एकदां बापाच्या मांडीवर बसला हें सुरुचीला सहन न होऊन तिनें यास खालीं लोटून दिलें. या धिक्काराचा ध्रुवास फार विषाद वाटला. तेव्हां त्यानें ईश्वराची आराधना करून त्यास संतुष्ट केलें. नंतर प्रसन्न होऊन त्यानें ध्रुवास पित्यानंतर राज्य देऊन अढळ पद दिलें. (भागवत, स्कं० ४ अ० ८–९). १०. इंद्रद्युम्न नांवाचा द्रविड देशाचा राजा होता; तो मलयाचलावर आश्रम करून तपश्चर्येसाठीं राहिला असतां एकवेळ अगस्तिऋषि त्याचे आश्रमांत शिष्यमंडळीसह आला. त्यावेळेस इंद्रद्युम्न ध्यानस्थ होता म्हणून त्याकडून ऋषीचा अभ्युत्थानादि आदरसत्कार झाला नाहीं. तेव्हां आळसानें ह्यानें आपला अनादर केला, असें वाटून ऋषीस फार राग आला आणि ‘तूं हत्ती हो’ म्हणून त्यानें त्यास शाप दिला. परंतु त्यानें प्रार्थना केल्यावर ‘विष्णु तुझा उद्धार करील’ असें आश्वासनही दिलें. पुढें तो राजा हत्ती होऊन वनांत फिरत असतां [त्रिकूट पर्वतावरील वरुणाच्या ऋतुमत् नामक उद्यानांत] पाणी प्यावयास एका सरोवरांत उतरला तों त्यांतील नक्रानें त्याचा पाय धरिला. तो नक्रही देवलऋषीच्या शापानें गंधर्वाचा नक्र झाला होता. तेव्हां पुष्कळ वेळपर्यंत गजेंद्रानें आपण सुटण्याकरितां यत्न केला, परंतु नक्रापुढें त्याचें कांहीं चालेना. शेवटीं निरुपाय होऊन त्यानें ईश्वराचा धांवा केला आणि सोंडेनें एक कमळ उपटून भक्तीनें त्यास उद्देशून आकाशांत फेकिलें, तेव्हां विष्णूनें संतुष्ट होऊन चक्रानें नक्राला मारून गजेंद्रास सोडविलें, अशी कथा आहे. (नवनीत, पृष्ठ १३१.) ११. गोप. १२. हृदयसंपुटांत.

अजामीळ[1] प्रल्हादही[2] द्रौपदीनें[3] तुला संकटीं ध्याइलें सन्मतीनें ।
तयाला त्वरें पावसी लागिंवेगें कसें विघ्न निर्दाळिसी तूं निजांगें?' ॥ ९५
वदे जों असें, टाकिलें त्या कटाहीं असे तप्त तों जाहलें शीतें[4] पाहीं. ।
कढेअंतरीं तैल आकंठ[5] दीसे, तयामाजि पद्मापरी[6] तो[7] विलासे. ॥ ९६
जना अंतरीं जाहली एक टाळी,[8] 'हरी संकटीं हो! असें विघ्न टाळी.'[9] ।
ध्वनी ऐकतां शीघ्र शंखादि आले, कुंमारा[10] विलोकूनि विस्मीत झाले. ॥९७
म्हणे शंख तो, 'तैल नी तप्त झालें, सुतें वल्लि[11] टाकोनियां शीत केलें. ।
परीक्षेस पाहों, त्यजा नारिकेला.' कढेभोंवता ठाकला लोकमेळा. ॥ ९८
त्वरें आणुनी श्रीफळा[12] टाकितातीं, कडाडोनिया भाग ते दोन होती. ।
उडोनी नरोट्या द्विजां[13] दों कपाळीं, त्वरें लागतां, खोंचती तेचि काळीं. ॥ ९९
पुसे शंख अमात्य[14] आणीक भट्टां, 'अरे! काय मी बोलिलों त्यासि होता.' ।
ऋषीलागीं ते सांगती नम्रवाणी,[15] 'द्विजां तेक्षणीं हा स्मरे चक्रपाणी.' ॥६०
असें ऐकतां विप्र तो स्तब्ध झाला, म्हणे, 'कष्टवीलें वृथा बाळकाला. ।
करूं आजि देहांत प्रायश्चितासी.' म्हणोनी कढे टाकिलें आपणाशीं. ॥६१

---

१. हा एका विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा होता. तो एकदां वनांतून समिधा दर्भ घेऊन परत येत असतां त्यानें वाटेंत एक शूद्रस्त्री पाहिली, ती फार सुरूप असल्यामुळें तिला पाहून अजामिळास मोह उत्पन्न झाला व त्या प्रमाणेंच तिलाही त्याच्या संगतीनें काल घालवावा असें वाटलें. मग त्यानें घरच्या सर्व कुटुंबाचा त्याग करून तिचा स्वीकार केला, आणि अशा रीतीनें भ्रष्ट होऊन तिच्या समागमानें आयुष्य घालविलें. त्या शूद्रस्त्रीपासून त्यास दहा मुलें झालीं. त्यांत सर्वांहून धाकटा नारायण नांवाचा मुलगा फार आवडता होता. अजामिळाचा अंतकाळ समीप आला, तेव्हां त्यानें पुत्रस्नेहानें 'नारायणा, इकडे ये' अशी आपल्या मुलास हाक मारिली. अंतकाळीं ईश्वराचें नांव, पुत्राच्या मिषानें कां होईना, परंतु त्याचे तोंडीं आलें म्हणून विष्णूचे दूत त्यास वैकुंठीं नेण्यासाठीं आले, तों यमदूत हा महापातकी असें समजून अगोदरच त्यास बांधून घेऊन चालले होते; त्यांजपासून विष्णुदूतांनीं त्याला सोडविलें आणि त्याचा उद्धार केला, अशी कथा आहे. (नवनीत, पृष्ठ १३५.) २. प्रल्हाद हा हिरण्यकशिपूस कयाधूपासून झालेला ज्येष्ठपुत्र. हा भगवन्निष्ट आणि विष्णूचा उपासक म्हणून बापानें ह्याचा बहुत छळ केला. शेवटीं या परमभागवताच्या सेवेनें प्रसन्न होऊन नृसिंहानें याच्या पित्याचा वध केला आणि याचें संरक्षण केलें. (भागवत, स्कंध ७ अ० १–१०). ३. पांडवांची स्त्री. हिनें भगवंताचे अनेकवार स्तव करून स्वसंकटांचा परिहार केला. ४. थंड. ५. कंठापर्यंत. ६. कमळासारखा. ७. सुधन्वा. ८. हातांची. ९. निवारी. १०. 'सुधन्व्या' असें पाठांतर. ११. तप्ततें शीत करणारी लता, औषधी. १२. नारळा. १३. शंख आणि लिखित या ब्राह्मणांस. १४. 'वक्रें तया सर्व दूतां' असाही पाठ आहे. १५. 'दूत' असें अन्य पाठांतर.

जावुनी धरि कंठ तो द्विज बोलिला नृपबाळका,
'धन्य धन्य तुं, मीच आधम, शिक्षिलें महिपाळका. ।
तूं हरीभजनासिं तत्पर नाहिं हें मज ठाउकें
वै[2]ष्णवाधिप जाणुनी कसें जाळिजे तुज पा[3]वकें ? ॥ ६२
जाहली तव संगमें नृपनंदना! शुचि हे तनू,
यावरी निघ बाहरी करिं युद्ध अंगणिं घे धनू.' ।
यापरी वदुनी द्विजें, धरि हस्त बाहिर काढिला,
वंदुनी लिखितादि आत्मज तातपांदिंच लाविला. ॥ ६३
क्षे[4]म देवुनियां नराधिप बोलिला निजनंदना,
'अग्नि यास्तव दग्ध ना करि चिंतिलें यदुनंदना, ।
टाकुनी तुज शंखलीखित विष्णु मो[5]हिम दाविला,
यावरी प्रगटी पराक्रम अर्जुनाप्रति आपुला.' ॥ ६४
शब्द ऐकुनि रत्नमिश्रित हे[6]मस्यंदन आणिला,
दीर्घ तो ध्वजचक्रमंडित साश्व त्यावरि बैसला. ।
प्रेरुनी रथ सैनिकांसह त्या चमूमुखिं आदळे,
पार्थसैन्य देखोनि तांबुल आननांतुनि तो गळे. ॥ ६५
तांबूलरंगें करि रक्त भूमी, निशांतकाळीं रविकांत व्यो[7]मीं, ।
परस्परें दाटणि थोर झाली, कस्तूरिका केशरिं ऊठ गेली. ॥ ६६
त्या मुक्तमाला तुटुनी गळाल्या, कीं व्योम तारा तळिं काय आल्या ? ।
किरीट रत्नें रणिं दीप्त झालीं, सूर्यप्रभा सर्वहि ते बुझाली. ॥ ६७
प्रफुल्ल छत्रें मुकुलीत होती, दीर्घस्वरें गर्जति ते पदाती; ।
त्या पार्थसैन्यांतरिं हे अवस्था, देखोनि युद्धीं नृपसू[8]नु आस्था. ॥ ६८
हंसध्वजें प्रेरुनि सेवकातें, आकर्षिलें यज्ञतु[9]रंगमातें. ।
त्या सैन्यव्यूहांतरिं आणिलासे शृंगाररत्नें करुनी विलं[10]से. ॥ ६९
त्या दुंदुभी वाजति शंख [11]भेरी शृंगें तुतारे करणे नफेरी ।
[12]कौहाळ ते गोमु[13]ख डिंडिमादी ऐकोनियां स्फूरति अ[14]श्वसादी. ॥ ७०

---

१. या छंदास 'विबुधप्रिया' अशी संज्ञा आहे. २. विष्णुभक्तांत श्रेष्ठ. ३. अग्नीनें. ४. आलिंगन. ५. महिमा. ६. सुवर्णाचा रथ. ७. आकाशीं. ८. पुत्र. ९. घोड्यातें. १०. शोभे. ११. नगारे, नौबदी. १२. वाद्यविशेष. १३. गाईच्या तोंडासारखें कातड्याचें वाद्य. १४. घोडेस्वार. (सादी म्ह० घोड्यावर बसणारा, निषादी म्ह० हत्तीवर बसणारा, आणि रथी म्ह० रथावर बसणारा).

त्या भूपतीनें रणिं संगरासीं नियोजिले वीर प्रतापरासी, ।
तो **वीर**केतू **सु**रथी **सु**धन्वा बलाढ्य मोठा शत एकधन्वा. ॥ ७१
या वाद्यशब्दें नभिं नाद दाटे भंगेल कीं वज्र मनांत वाटे. ।
येरीकडे **अर्जुन कृ**ष्णपुत्रा बोले मुखें सुंदर सर्वगात्रा. ॥ ७२
'**हं**सध्वजें तो ऋतु[1]अश्व नेला, निघे हरूं सर्वहि वीरमेळा. ।
ससैन्य कीं सात्मज **यौ**वनाश्वें रे! भीडिजे जावुनियां खिलास्वें. ॥ ७३
त्या नंतरें तो **अनु**शाल्व नीघो हावे वरी **सा**त्यकि आजि वेंघो, ।
जावूनि रंगीं[2] **कृ**तवर्म यानें, रे! सोडवीजे हय निर्भयानें. ॥ ७४
**नी**लध्वजें त्या **वृ**षभध्वजानें, रे! विंधिजे **भी**मज आत्मजानें, ।
त्या शेवटीं **पार्थ** मि एक आहें सर्वांमधें तूं अतिश्रेष्ठ पाहें.' ॥ ७५

(छंद.)

शब्द ऐकतां कुमार बोलिला, 'न्यून पूर्ण रे! किं सांगिजे मला. ।
आजि पाह मत्प्रताप **अर्जुना**! युद्धिं तोषवीन **हं**सकेतना.' ॥ ७६
यापरी **अनंग** जों मुखें वदे, तों **दि**[5]नेशपौत्र उत्तरासि दे, ।
'सैन्य कोणतें बहु असे वदा, **रु**[6]द्रसाम्य तें असे तुम्हां सदा ॥ ७७
जो किडा मरेल नेत्र[7]पक्ष्मणें त्यासिं मारुं कां **ख**गेंद्र प्रार्थणें? ।
धूळि जे शमेल घालितां सडा[8] त्यासि **वा**रुणास्त्र केंवि धावडा? ॥ ७८
वक्र श्वास टाकितांचि जे उडे, त्यासि यत्न **वा**[9]डवाग्नि येवढे; ।
तेंवि सैन्य हें तृणपरी असे त्याग निश्चयें युक्त तो नसे. ॥ ७९
तेंवि मी तुम्हा समीप आसतां कासयासि विक्रमासिं वेंचिता? ।
काय नाणिं मी ऋतुतुरंगमा? सैन्यासिंधुसीं करिन संगमा.' ॥ ८०
यापरी वदोनि **कर्ण**नंदनें, सारथ्यासि बोलिला निजाननें[10], ।
'पद्म[11]व्यूहमाजि प्रेरि स्यंदना,' ऐकतांचि सूत प्रेरि तत्क्षणा. ॥ ८१

---

१. यज्ञाचा घोडा. (येथें सामासिक शब्द असल्यामुळें संधि करणें अवश्य होतें, परंतु छंदोभंगभयास्तव केला नाहीं.) २. रणांगणीं. ३. कृष्णात्मज. (मदन.) ४. हंसध्वजाला. ५. सूर्याचा नातू. (कर्णाचा पुत्र वृषकेतु.) ६. शिवाचें साम्य. ७. डोळ्यांची पापणी हालविल्यानें. ८. अल्प जलसेक. ९. समुद्राचें जळ शोषण करून असणारा भयंकर अग्नि. १०. आपल्या मुखानें. ११. शत्रूचा आंत प्रवेश न होतां आपला मात्र मार शत्रुसैन्यावर चालावा, म्हणून सैन्याची रणांगणीं जी कुशलतेनें रचना करितात तिला 'व्यूह' म्हणतात. या रचनाविशेषाचे शकटव्यूह, चक्रव्यूह, दंडव्यूह इत्यादि अनेक प्रकार आहेत, त्यांपैकीं पद्मव्यूह हा एक होय; सेनारचनाविशेष.

(श्लोक.)

पाहोनि **वृ**षकेतुतें निजमनीं बोले **सु**धन्वा मुखें,
'लक्षूनी तरि पद्मव्यूह अभयें येतो पहा रे! सुखें ।
याच्या स्यंदनकेतनीं[1] वृष[2] दिसे, हा **पार्थ** नोहे कदा
शूरत्वें विलसे विशाळनयनीं भासे यशस्वी सदा.' ॥ ८२
तेव्हां त्या निज सारथ्यासि वदला, 'माझा रथ प्रेरिजे,
त्याचा स्यंदन जे स्थळींच विलसे, संनिध त्या नेइजे.' ।
ऐकोनी रथ सारथी अतिजवें प्रेरूनियां पातला
ते काळीं वदनें नृपात्मज म्हणे, 'तूं कोण ? सांगें मला.' ॥ ८३
ऐकोनी **वृ**षकेतु तो कथितसे, 'जो भ्रांति[3] दूरी करी,
तो माझा शृणु रे! पितामह[4] असे, तत्पुत्र[5] दैन्या[6] हरी, ।
त्या जाणे मम तात **कर्ण** त्रिजगीं विख्यात नामें असे,
तो मोठा धिर दानशूर, पहतां विश्वांत ऐसा नसे. ॥ ८४
त्याचा नंदन[7] मी, ध्वजीं वृष असे हें नाम त्वां जाणिजे.'
ऐकोनी वदनीं नृपात्मज म्हणे, 'रे ! विक्रमा दाविजे, ।
जे प्राणी अपराक्रमी निजमुखें ते पूर्वजां वानिती,
तेजस्वी **र**वि तो पितामह असे, दावी तसी रे ! गती.' ॥ ८५
ऐकोनी **वृ**षकेतु त्यावरि रणीं अत्यंत कोपा चढे,
वोढोनी दृढ कार्मुका[8] निजकरें हर्षें वरी आरुढे. ।
सोडोनी शरवृष्टि[9] ते घनपरी[10] भूपात्मजा झांकिलें
त्यीं[11] बाणीं सरथाश्व छेदुनि सवें तैसेंचि हो! व्यापिलें. ॥ ८६
रथध्वजा छेदित सायकानें तैशींच छत्रें विविधें निशाणें, ।
पंचास्य[12] सर्पोपम बाहु तोडी पाडीतसे मस्तक लक्ष कोडी. ॥ ८७
तेव्हां **सु**धन्वा रणि बोलिलासे, 'धनुर्धरीं हा अतिश्रेष्ठ भासे.' ।
वोढोनियां कार्मुक बाण टाकी **वृ**षध्वजाच्या खुडिल्या पताकीं. ॥ ८८
रथींहुनी ते हय मुक्त केले चूर्णीत[13] ठायीं रथपाद झाले. ।
यमालया[14] सारथि शीघ्र नेला, श्रमिष्ट तेव्हां **वृ**षकेतु झाला. ॥ ८९

---

१. रथाच्या ध्वजावर. २. बैल. मागली १४ व्या श्लोकावरील टीप पहा. ३. भ्रम, दृष्टिभ्रम. ४. आजा. (सूर्य.) ५. त्याचा (सूर्याचा) पुत्र. ६. आपल्या औदार्यानें लोकांचें दारिद्य नाहींसें करी. ७. पुत्र. (जो आनंद देतो तो.) ८. चाप. ९. बाणांचा पाऊस. १०. मेघाप्रमाणें. ११. 'त्यांनीं त्या नर अश्व भेदुनि गजा तें सैन्य हो व्यापिलें' असाही पाठ आढळतो. १२. सिंह. १३. चुरडलेले. १४. मृत्यूच्या घराला.

वेष्टूनि[1] त्यातें चमु सर्व राहे, सांडोनि मूर्च्छा रणिं हाचि पाहे. ।
तों वेढिलेंसे परसैनिकांनीं संनीध नाहीं निज आप्त कोणी. ॥ ९०
घे चाप भूपात्मज हस्तकींचें, भेदीतसे काळिज त्या नराचें. ।
त्या सैनिकीं देखुनि वीर दृष्टी नानायुधें प्रेरिति मेघवृष्टी. ॥ ९१
त्या शक्तिपाशांकुशभिं[2]डिमाळा, भृशुंडि पट्टीश गदा विशाळा ।
त्रिशूळ कीं खड्गहि मुद्गरांचे ते मार होती अतितोमराचें. ॥ ९२
लोहाननीं टाकिति लांब भाले, तो धीर शस्त्रें परिघे, न हाले ।
चित्तीं हरी ते निरखोनि दृष्टी ते आयुधें त्यावरि पुष्पवृष्टी. ॥ ९३
तों घेवुनीयां रथ सूत आला, आरूढ त्या स्यंदनिं शीघ्र झाला. ।
भेदीत **हं**सध्वज नंदनातें, टाकी **सु**धन्वा शर पांच हातें, ॥ ९४
ते भेदिती हो **वृ**षभध्वजाशीं मूर्च्छें करी, टेंकत स्यंदनासी. ।
तों फीरवी सारथि स्यंदनातें नेवोनियां दाखवि **अर्जु**नातें. ॥ ९५
देखूनियां विस्मित **पार्थ** झाला; युद्धा करूं आपण ही निघाला. ।
निवारिलेंसे **ह**रिनंदनातें, '[3]रे ! युद्ध पाहें मम आजि बा ! तें.' ॥ ९६
तो **मी**न[4]केतू रणिं पातलासे, अत्यंत रूपें करुनी विलासे. ।
समीरसाम्यें रथिं चार चक्रें मनोगती चालति नीट वक्रें. ॥ ९७
ज्याच्या भयें रे ! पळती कपाटी, न जाणवे या पडतांचि गांठी; ।
**ब्र**ह्मादिकांचें बळ हीन केलें, **इं**द्रासि जेणें बहु हाल केले. ॥ ९८
तेव्हां **सु**धन्वा रणिं त्यास पाहे, हा 'दिव्य तेजोमय फार आहे.' ।
देखोनियां अंतरिं तोषलासे, युद्धास **मे**रूसम सज्जलासे, ॥ ९९
युद्ध होइल पुढें अति दों[5]जणां, ऐकिजे तुम्ही कथा हितकारणा. ।
वी[6]नवी कवि **अ**नंत तुम्हांप्रती, हे कथा परिसिजे तुम्हि **भा**रती. ॥ १००

## प्रसंग दुसरा.

(श्लोक.)

आतां कथा सादर सर्व ऐका, युद्धीं **सु**धन्वा **र**तिनाथ देखा, ।
संलग्न झाले स्वबळाभिमानें; त्या नंतरें श्री**ह**रिनंदनानें, ॥ १

---

१. वेष्टिलें. (वृषकेतूला.) २. गोफण. ३. 'तूं आजि पाहे समरांत मातें' असाही पाठ आहे; तसाच 'निवारिलेंसें हरिनंदनानें, रे युद्ध पाहे मम आजि मानें' असाही पाठ आहे. ४. मदन. ५. सुधन्वा आणि प्रद्युम्न यांचें. ६. 'विनवितो हि अनंत यथामति अंतरीं धरुनियां कमलापति' असाही पाठ आहे.

टाकूनियां सायक पंच हस्तें, निर्मूळ केलें हयसारथ्यातें, ।
एक्या शरें तोडुनि त्या धनुष्या, आली बहू [1]राजसुतासि ईर्षा. ॥ २
तैं हा सुधन्वा शर पांच सोडी, छेदूनियां सारथि अश्व पाडी; ।
[2]त्रिखंड चापा करि एक बाणें मूर्छीत केला स्मर तीं शरानें. ॥ ३
देखोनि ईर्षा [3]कृतवर्मयासी, आली असे लोटत संगरासी, ।
ओढोनियां चाप सबाण दोरी झोडी चमूतें, फळयुक्त [4]बोरी, ॥ ४
क्रोधें सुधन्वा नवबाण [5]टाकी [6]वृषध्वजाचा खुडि[7]ला पताकी ।
त्या भूपपुत्रा कृतवर्म यानें विभेदिले सदृढ पंचबाणें. ॥ ५
निवारूनी बाणा, मग नव सुधन्वा त्यजि करें,
वधोनी चौं अश्वां, खुँडि ध्वज, वधी सारथी शरें ।
विभेदीले [illegible]ीं फिरुनि कृतवर्मा पळतसे,
विलोकू [illegible] [8]शाल्वानुज समरिं युद्धा उठतसे. ॥ ६
सुधन्व्यासीं वक्रें वदत असुराधीश वचनें,
'शरांचे त्वां केले [9]नग म्हणुनि मानी मुख मनें, ।
अरे ! साहें पाहें मम शर' वदोनी त्यजि करें,
निघे तो गर्जोनी ज्वलित [10]वडवाग्नीसम भरें ॥ ७
सुधन्वा त्या बाणा निरखुनि निवारूं हि न शके,
बहूवेगें आला कठिण [11]हृदयाब्जींच थडके. ।
रथाहूनी बाणें क्षितिवरिहि मूर्च्छीत पडिला,
क्षणीं एका मूर्च्छा त्यजुनि समरीं शीघ्र उठिला. ॥ ८
बहू क्रोधें झाला झडकरि रथारूढ स्वबळें,
स्वसेनातें पाहे तंव निवटि तो बाण विपुलें. ।
तदा एक्या बाणें करुनि असुराधीश [12]विंधिलें,
तया आली मूर्च्छा, क्षितिवरि क्षणार्धेंच पडिला. ॥ ९

---

१. सुधन्व्याला. २. तीन तुकडे. ३. हा हृदिक राजाचा तिसरा पुत्र. यास 'हार्दिक' असें अन्य नांव आढळतें. हा भारतीयुद्धांत अक्षौहिणी सैन्यासह दुर्योधनाकडे होता. पुढें यज्ञिय अश्वसंरक्षणार्थ अर्जुनाबरोबर गेला होता. ४. बोरीचें झाड. ५. 'सोडी' असाही पाठ आहे. ६. 'देखोनि छेदीतच मध्य तोडी' असाही पाठ आहे. ७. मोडी. ८. सौभपति शाल्वराजाचा भ्राता. (जैमिनिकृत अश्वमेध, अध्याय १२-१४.) ९. पर्वत. १०. समुद्रांत राहून त्याचें जळ शोषण करणारा भयंकर अग्नि. ११. हृदयकमळावर. १२. 'पिडिला' असाही पाठ आहे.

करी बाणें वृष्टी नृपसुत, बुजी **अर्जुन** चमू,
विलोकूनी दृष्टी मग रणिं निघे **सा**[1]**त्य**किचमू ।
शराचे त्या केले अमित तुकडे सत्तरिं शरें,
विभेदूनी सूता मग ध्वज खुडी अश्व निकरें. ॥ १०
देखोनी अतिवीर तो मग रणीं श[2]क्ती **सु**धन्वा त्यजी,
शक्ती ते उरिं ज़ावुनीच जडली, श[3]क्ती नसे दोंभुजीं. ।
झाला व्याकुळ, स्यंदनीहुनि पडे तो **सा**त्यकी मेदिनी,
तेव्हां **पा**र्थचमूमधें प्रगटलें आश्चर्य सर्वांमनीं. ॥ ११
पाहूनी समरीं नृपात्मज बळी, तो **पा**र्थ युद्धा निघे,
चावोनी र[4]द ते स्वबाण स्वकरें वोढोनि **गां**[5]डीव घे. ।
प्रेरूनी रथ बोलिला, 'बहु रथां त्वां जिंकिलें या रणीं
ते हांवा करुनी सुसौख्य हृदयीं मानूं नको रे! मनीं. ॥ १२
**भी**ष्मादी विर **कर्ण द्रोण** वधिले, हें नाहिं ठावें तुला.'
ऐकूनी वचना नृपात्मज मुखें व्यं[6]ग्योक्तिनें बोलिला, ।

---

१. हा सत्यकाचा पुत्र असून कृष्णाचा सारथी असे. हा मोठा पराक्रमी होता. २. आयुध. ३. सामर्थ्य. ४. दांत. ५. गांडीव नामक धनुष्य. हें अग्नीनें वरुणापासून मागून घेऊन, (महाभारत आदिपर्व, अ० २२५ श्लो० १-९) अर्जुनास दिलें. वीरांच्या धनुष्यांस भिन्नभिन्न नांवें होतीं असें दिसतें:—कर्णाचें 'कालपृष्ट', अभिमन्यूचें 'रौद्र.' या गांडीव धनुष्याचें वर्णन (विराटपर्व, अ० ४३ श्लो० १-७ यांत) केलें आहे तें असें:—विराटपुत्र उत्तर आणि बृहन्नला यांचें संभाषण चाललें असता बृहन्नला उत्तरास म्हणते:—'हे उत्तरा! तूं मला विचारिलेंस, तें हें अर्जुनाचें गांडीवनामक धनुष्य आहे. हें शत्रूचा संहार करण्यास समर्थ आहे; हें लोकामध्यें प्रख्यात आहे; हें सर्व आयुधांच्याहून उत्कृष्ट आहे; हें सुवर्णालंकृत आहे; हें अर्जुनाचें गांडीव धनुष्य मोठें प्रबल आयुध आहे; याला हजार धनुष्यांचें बल आहे; हें राष्ट्राचा उत्कर्ष करणारें आहे; या धनुष्यानें पार्थ देवांना आणि मनुष्यांना रणामध्यें जिंकतो; हें अनेक प्रकारच्या रंगांनीं चित्रविचित्र केलेलें आहे, हें सडसडीत बारीक आहे; हें लांब व अविद्ध आहे; देवांनीं आणि दानवांनीं याची पूजा अनेक वर्षें सतत केली आहे; पूर्वीं हें धनुष्य ब्रह्मदेवानें एक हजार वर्षें धारण केलें; प्रजापतीनें पांचशें तीन वर्षें, इंद्रानें पंचायशीं वर्षें, सोमदेवानें पांचशें वर्षें, व वरुणानें शंभर वर्षें धारण केलें; साडेबत्तीस वर्षें हें धनुष्य श्वेतवाहन (ज्याच्या रथाला शुभ्रवर्ण घोडे असतात अशा) अर्जुनापाशीं आहे; ह्या धनुष्याचा पराक्रम मोठा आहे; हें फार सुंदर आहे; हें उत्कृष्ट व मनोहराकृति धनुष्य अर्जुनाला (अग्निद्वारा) वरुणापासून प्राप्त झालें. ६. वाच्यार्थाहून इतर अर्थांतरांश (गर्भितार्थ) जींत आहे अशी उक्ति, वर्मी भाषण, छद्मिभाषण.

'तेथें **श्रीहरि** साह्य तोचि तुजला, यासाठिं ते मारिले,<br>
येथें तूं **हरि**वीण शब्द वदुनी कां वेंचिसी आपुले? ॥ १३

आतां तो तव श्यामकर्ण खिळुनी स्तंभीं बरा हस्तकें,<br>
संतोषें हयमेधही करिल पां माझा पिता कौतुकें. ।<br>
ऐकोनी **हरि** तो सहाय तुजला आला जरी धावुनी,<br>
त्यासीं जिंकुनियां वधीन तुज रे! ऐसें कळों दे मनीं.' ॥ १४

ऐशीं दुर्वचनें **धनंजय** मनीं ऐकोनि कोपा भरे,<br>
वोढोनी मग **गांडिवा**सि उसणें बाणें[1]चि हो! निस्तरे. ।<br>
हें[2] देखोनि नृपात्मजें निजशरें ते बाण तैं तोडिले,<br>
काढोनी दश बाण मंत्रुनि करें **पार्था**वरी सोडिले. ॥ १५

दाहाचे शत जाहले, दश शतें, ते लक्ष, कोटी पुढें;<br>
बाणीं तैं नभ व्याप्त, वायु न सरे संधान हो! केवढें? ।<br>
देखोनी मग **पार्थ** तो तिळपरी ते बाण तोडीतसे,<br>
होवोनी बहु क्रुद्ध त्यावरि रणीं अग्न्यस्त्र सोडीतसे. ॥ १६

अग्निअस्त्र[3] तें **पार्थ** टाकितां पाठिं ना सरे सैन्य जाळितां, ।<br>
देखतां **सुधन्वा** रणांगणीं **वारुणास्त्र**[4] तें प्रेरि तेक्षणीं. ॥ १७

**वारुणास्त्र** तें भूपनंदनें टाकितां करी वृष्टि जीवनें[5]. ।<br>
त्या जळें निवारूनि पावका पीडिलें बहू **पार्थ**सैनिकां. ॥ १८

थोर वृष्टिनें कंप सूटले, वीर आननीं दंत बैसले. ।<br>
चिब्ब अंगिचीं रम्य अंबरें, वीर पाहुनी होति घाबरे. ॥ १९

दूतहस्तकीं छत्रचामरें कांपती बहू अंत[6] जे तुरें; ।<br>
यापरी जळें फार पीडिले, **पार्थ**वीर ते दीन जाहले. ॥ २०

त्या निवारणा **पार्थ** ते क्षणीं, टाकितो समीरास्त्र[7] चिंतुनी. ।<br>
सूटतांचि ते मेघ मालवी, अंबरीं नराश्वहस्ति[8] ऊडवी. ॥ २१

---

१. 'तो बाण सोडी त्वरें' असाही पाठ आहे. २. 'देखोनी नृवरात्मजें निजशरें ते बाण हो तोडिले' असाही पाठ आहे. ३. हा सामासिक शब्द असून येथें संधि केला नाहीं. अनंताच्या काव्यांत अशीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. ४. ज्याची अधिदेवता वरुण आहे असें अस्त्र. ५. उदकें. ६. 'अंत ते नुरे' असाही पाठ आहे. ७. समीर (वायु) आहे देवता ज्याची असें अस्त्र. (पवनास्त्र.) ८. मनुष्यें, घोडे आणि हस्ती यांतें.

अर्धचंद्र[1] भूपनंदनें सुशीघ्र सोडिला,
पार्थसारथी विभेदुनी महीशिं पाडिला. ।
त्यावरी धनंजयें सबाण चाप वोढिलें
देखतां नृपात्मजें मधेंच शीत[2] तोडिलें. ॥ २२
सारथी नसोनियां हयांस पार्थ आंवरी,
संकटांत आठवी अनाथबंधु श्रीहरी. ।
ऐकतांचि द्वारकेहुनी रमेश पातला,
अश्वरश्मि[3] घेवुनी रथापुढेंचि[4] बैसला. ॥ २३
रथासि प्रेरुनी जवें म्हणे दयाब्धि तो मुखें,
'सुधन्वयासि याक्षणी वधीं धनंजया! सुखें.' ।
विलोकितांचि केशवा नृपेंद्रसूनु तो म्हणे,
'सुशीघ्र पावसी बरा धनुर्धराचिये[5] खुणें.' ॥ २४
वदोनि केशवा पुन्हा धनंजयासि बोलिला,
'करूनि भक्ति थोर त्वां बरा रमेश अर्चिला. ।
तुलाहि प्राप्त जाहला रथासि सारथी हरी,
पणासि[6] बोलुनी करीं[7] त्वरें सुयुद्ध यावरी.' ॥ २५
कुचिद्य वाक्य ऐकुनी वदे सुपार्थ तो मुखें,
'तुझ्या शिरोत्पलासि[8] मी वधीन तीन सायकें; ।
न भेदिं तैं त्रिसप्त हो! अधोगती[9] ही पूर्वजां,
स्वरक्षणा करोनियां वदें पणा नृपात्मजा!' ॥ २६
वदतसे नृपतीसुत ते क्षणीं, 'करिन खंडित सायक लक्षुनी. ।
न करितां नरकीं मज वास हो. सकल सैन्य असा तुम्हि साक्ष हो!' ॥ २७
वदुनि यापरि त्यजी शत सायका, हृदय[10] भेदित यदूत्तमनायका; ।
सहहरी सहतुरंगम स्यंदना फिरवि चक्रहि परी सहअर्जुना. ॥ २८
फिरवुनी समरीं रथ ते क्षणीं, सरविला कर चतुःशत[11] मेदिनी; ।
रगडुनी जरि हरी उठुनी धरी, [12]तरि नये रथ तो अवनीवरी. ॥ २९

---

१. अर्धचंद्राकार बाण. २. धनुष्याची दोरी. ३. लगाम. ४. 'रथावरीच बैसला' असाही पाठ आहे. ५. धनंजयाच्या. ६. प्रतिज्ञेला. ७. 'मुखें करीं सुयुद्ध यावरी' असाही पाठ आहे. ८. शिरकमळास. ९. दुर्गति, रौरवप्राप्ति. १०. 'हृदयिं भेदित असे यदुनायका' असाही पाठ आहे. ११. चारशें हात भूमींत. १२. 'तरि न थारत असे अवनीवरी' असाही पाठ आहे.

म्हणतसे यदुपती, 'शृणु अर्जुना! अजि न हाच जिणवे तरि आपणा. ।
वदुनियां प्रगटिला पण त्वां कसा? 'वधिन या तिन शरें' अतितामसा!॥ ३०
तुमजशी स्वकृति तूं यशलंपटा! हृदयिं तूं स्मर जयद्रथ[1]संकटा. ।
समरिं निश्चित हिताहित नेणसी, मरण कीं तरण हो पण बोलिसी.'॥ ३१
परिसुनी त्वरित अर्जुन बोलिला, 'न करिं मी तरि वृथा पण आपुला; ।
वधिन भूपजशिरोत्पल तीं शरें, न वधिं तैं पेंचति[2] पूर्वज हे खरें. ॥ ३२
हरि! तुझागम[3] रणीं नव्हता जरी, वदुनियां पण वृथा घडता तरी; ।
मजवरी बहु तुझी असतां कृपा, सकळ ही तरि मना न शिवे त्रपा[4].'॥ ३३
त्यानंतरें कोपुनि तो सुधन्वा टाकीतसे सायक सज्यधन्वा[5]. ।
वेष्टोनि पार्थासि म्हणे हरीला, 'तूं वांचवीशी रणिं काय याला?'॥ ३४
गोवर्धनातें[6] उचलूनि गाई संरक्षिल्या[7] त्या[8] जग सर्व गाई, ।
तैशापरी रक्षिन अर्जुनातें, या निश्चयातें न धरीं मनातें.' ॥ ३५
ऐकूनि पार्थें मग बाण चापा लावोनि सोडी वडवाग्निरूपा[10]; ।
त्या युद्धकाळीं हरि पुण्य वेंची संयोजिता सायक सव्यसाची[11]. ॥ ३६
'शैल्यातळीं[12] वांचविल्या सुधेनू त्या पूर्वपुण्यें शर हा कृशानू[13], ।
संलग्न होतां रणिं भग्न[14] नाहो, या अर्जुनाचें यश आजि राहो.' ॥ ३७
कौतूक पाहों रणिं देव आले; तेव्हां सुधन्वा रणिं काय बोले? ।
'हा अर्जुनाचा शर मी न तोडीं, तैं व्यर्थ हो रे! मम पुण्यजोडी. ॥ ३८
नेलें जसें तें धन तस्करानें, कीं संचिलें व्यर्थचि या नरानें, ।
तैशा उपायीं बहु पुण्य केलें, बाणा न छेदीं तरि व्यर्थ गेलें.' ॥ ३९

---

१. जयद्रथास मारण्याच्या वेळीं 'उदयीक सूर्यास्तापूर्वी जयद्रथास मारीन, न मारीन तर अग्निप्रवेश करीन' अशी प्रतिज्ञा केली तेव्हांचें संकट. २. अधोगतीला जाती. ३. तुझा आगम, तुझें येणें. ४. लज्जा. ५. ज्याचे धनुष्यास दोरी लाविली आहे असा. ६. यमुनातीरीं वृंदावननिकटवर्ती पर्वत. प्रतिवर्षी इंद्रानें चांगली वृष्टि करावी, आणि तद्द्वारा धान्यतृणाची विपुलता व्हावी, म्हणून नंद इंद्रयाग करीत असे, तो न करतां ब्राह्मण, गाई, आणि गोवर्धनपर्वत यांस उद्देशून यज्ञ केला. त्यावरून इंद्रास मोठा राग आला व त्यानें गोकुळ बुडविण्यासाठीं सात दिवस सात रात्री भयंकर जलवृष्टि करविली. यामुळें गाई आणि गवळी यांना खाणें मिळेना तेव्हां गोवर्धनपर्वताला बोटावर उचलून धरून त्याच्या खालीं कृष्णानें सर्व गोकुळाचें अतिवृष्टीपासून संरक्षण केलें, अशी कथा आहे. ७. 'म्यां रक्षिले गोपहि गोपिकाही' असाही पाठ आढळतो. ८. त्या कृत्यास. ९. स्तवी. १०. वाडवानलासारखा तीव्र. ११. अर्जुन. (डाव्या हातानें बाण मारण्यांत कुशल). १२. गोवर्धन पर्वताच्या तळीं. १३. अग्नीसारखा तीव्र. १४. खंडित न होवो.

(सवाई.)

हें नृपनंदन बोलतसे तंव [1]अर्धशशीशर **पां**डव टाकी,
देखुनि नेत्रिं नृपात्मज त्या इषुनें शर छेदुनि पाडित तो कीं. ।
त्यावरि **पं**डुसुतासि म्हणे **ह**रि, 'काढिं दुजा शर नूतन जो कीं,
हा तव सायक छेदुनियां, तुज मारिल, सैन्य न ठेविल बाकी.' ॥ ४०
ऐकुनि श्री**ह**रिवाक्य, **ध**नंजय लावि दुजा शर काढुनि चापीं,
ते समयीं **ह**रि जें [2]क्षितिदान दिल्हें पहिलें शरिं तेहि समर्पी. ।
त्यावरि तो नृवरात्मज बोल्तसे, 'सु**ध**नंजय! थोर प्रतापी,
तूस्तव हा **ह**रि पुण्य रणांगणिं वेंचितसेचि असूनि अकोपी. ॥ ४१
हा तव बाण न छेदिन मी जरि ते दृढ पाप तरी मज लाहो,
या स्वकरें जणुं म्या वधिला [3]संतिसंयुत तोचि **व**सिष्ठ पहा हो.' ।
ऐकुनी तो पणशब्द रणीं मग कोपुनि [4]**कृ**ष्णसहोदरिनाहो,
मुक्त करी शर, देखुनि [5]निर्जर चिंतिति, 'विश्व चिरंजिव राहो.' ॥ ४२
देखुनि **अ**र्जुन सायक तो दुसरा, मग भूपति छेदित बाणें,
पाहुनियां सुर ते पिटिती [6]कर, 'थोर धनुर्धर हा [7]बळमानें.' ।
तेक्षणिं **पं**डुसुतासि म्हणे **ह**रि, 'बाण न योजुनि जाशिल प्राणें,
कोण पराक्रमि हा निरखी, पण जाण तुझा जनिं लाजिरवाणें. ॥ ४३
धैर्य धरीं **न**र!, शंख स्फुरीं, शर काढिं तिजा चढवीं [8]गुणिं आतां.'
ऐकुनि **अ**र्जुन [9]कंबुसि वाजवुनी मग काढित तो शर भाता, ।
तेक्षणिं श्री**ह**रि तर्कित अंतरिं यासि नृपात्मज छेदिल आतां,
यास्तव [10]पिच्छस्थळीं [11]**वि**धि स्थापित, [12]**का**ळ मधें, **ह**रि आपण [13]माथां. ४४

सुकृत बहुत केलें पूर्वीं **रा**मावतारीं
[14]वंदुनि त्वरित बाणा अर्पितो श्री**मु**रारी. ।
परिसुनि मग बोले तो **सु**धन्वा सुवक्रें
'**ह**रि! मज श्रुत झालीं जीं तुझीं हीं चरित्रें. ॥ ४५

---

१. अर्धचंद्राकार. २. परशुरामावतारीं ब्राह्मणास धरादान केल्याचें पुण्य. ३. अरुधंतीसहित वसिष्टवधाचा दोष. ४. कृष्णाच्या बहिणीचा (सुभद्रेचा) पति अर्जुन. ५. देव. ६. टाळी वाजविती. ७. बळाच्या संबंधें. ८. धनुष्याच्या दोरीवर. ९. शंख. (अर्जुनाच्या शंखाचें नांव देवदत्त.) १०. पश्चिम भागीं (बाणाच्या). ११. चतुरानन. १२. मध्यभागीं शिव. १३. अग्रभागीं. १४. 'वदुनि त्वरित तें ही अर्पिजे बाण शीरीं' असाही पाठ आढळतो.

सकळहि जग तूझें, वाहसी पार्थचिंता,
मम जिवहरणाचा यत्न कां हा अनंता ! ।
अमित सुकृतयत्नें पांडुपुत्रासि रक्षीं,
दुरुनिच मजलागीं [1]नेत्रकंजें निरीक्षीं. ॥ ४६
यदुपति तुजलागीं रक्षितो आजि पार्था !
स्मरुनिहि शर सोडीं, चित्त दे पूर्वअर्था.' ।
परिसुनि मग बोले पार्थ भूपात्मजासीं,
'पुनरपि पण ऐकें, साक्ष घे सैनिकांसीं. ॥ ४७
जरि रणिं इषुनें या छेदिना [2]त्वच्छिरातें
तरि [3]हरिहरशीर्षें छेदिलीं म्यां स्वहस्तें.' ।
नियमित मग बोले पुत्र हंसध्वजाचा
'[4]कपिध्वज ! मम ऐकें हे प्रतिज्ञा त्रिवाचा. ॥ ४८
जरि रणिं तव बाणा छेदिना सायकानें
तरि निशि शिवपूजा ताडिली म्यां पदानें. ।
तदुपरि पुरकाशीमाजि हो ! कर्म केलें,
जरि मम रणरंगीं व्यर्थ [5]संधान गेलें.' ॥ ४९
परिसुनि, शर चापापासुनी पार्थ सोडी
मुखिंहुनि वमि वन्ही दीर्घ व्योमीं कडाडी. ।
[6]घनरव ताळि वाद्यें सर्वही मंदें[7] झालीं,
सकळहि विबुधांची बैसली कर्णटाळी. ॥ ५०
गगनिं सुरविमानें [8]फांकलीं, बाण जातां,
दुरुनिच नृपपुत्रें देखिला तीव्र येतां. ।
मग शर त्यजुनीयां तोडिला मध्यभागीं
तुटुनिच पडलेंसे [9]अर्ध तें भूमिरंगीं. ॥ ५१
निरखुनि नभिं झालें थोर आश्चर्य देवां,
नृपसुत [10]हरिनादें त्या भुजां पीटि तेव्हां; ।

---

१. नेत्रकमळें. २. तुझ्या मस्तकातें. ३. विष्णु आणि शंकर यांचीं मस्तकें. ४. 'श्रवणच करि पार्था ! हे प्रतिज्ञा त्रिवाचा' असाही पाठ आहे. ५. बाणसंधान. ६. मेघगर्जना. ७. मंदावलीं. ८. देवांनीं विमानें पळविलीं. ९. बाणाचें एक शकल. १०. सिंहनाद करून.

तंव रणिं उरलेंसे अर्ध जें कां शराचें,
खुडुनि त्वरित टाकी शीर्ष [१]भूपात्मजाचें. ॥ ९२
ज्वलितकुंडल शिरो[२]त्पल तें उडे, त्वरित जावुनि हरीचरणीं पडे; ।
जपतसे मुखिं [३]त्रिविक्रमवामना, हरि जनार्दन रमाधव पावना. ॥ ९३
मग [४]कबंधहि रणीं फिरतां करीं हयगजां धरुनि टाकित अंबरीं; ।
नरनराधिप पदें किति मारिले? निरखुनी अमित विस्मित जाहले. ॥ ९४
यदुवरें निरखिलें शिर तें पदीं, उचलुनी मग मुखें स्तविलें तदीं, ।
शिरमुखींहुनी सुतेजहि तें निघे, निरखितां जन हरीवदनीं रिघे. ॥ ९५
धरुनियां मग करीं शिर तें हरी नृपतिसन्मुख त्यजी [५]सुरथावरी; ।
उचलिलें नृपवरें सुतमस्तका, सुटति पाझर जळें बहु [६]अंबका. ॥ ९६
पुत्रमस्तक घेवुनी करिं आळवी निजनंदना,
'तात मी तव, कां न बोलसि? क्रोध रे! धरिला मना; ।
पुत्रस्नेह त्यजोनियां तुज तप्त तैलिं मि घातिलें,
सर्व लाभ मिळे, तधीं यश मेरुतुल्यचि जोडिलें.' ॥ ९७
चुंबुनी वदनांबुजा मग भाळ भाळिंहि मेळवी,
'ऊठ रे! करिं युद्ध संगरिं' शोकशब्दिंचि आळवी; ।
ऐकुनी सुत सूरथ क्षणिं बोलिला जनकाप्रती,
'शोक हा बहु [७]करसि कां? नृप! हे तरी सकळां गती.' ॥ ९८
'शोक कां मि करीतसें सुत! तें तुं कारण ऐक रे!
श्रीहरीपद[कंजलब्धिस] लागि पुण्यचि नीकरें; ।
लाधुनी चरणांसि हे शिर केंवि मत्प्रति पातलें?
काय याचे दुरित कीं मम आड येवुनि ठाकलें? ॥ ९९
कृष्णपादसुपंकजीं शिर भ्रामरापरि शोभतें
तें पदांबुज यासि रे! त्यजि सूख दुःखहि वाटतें, ।

---

१. सुधन्व्याचें. २. शिरःकमळ. ३. बळि नामक दैत्यानें विश्वजित् नांवाचा यज्ञ करून इंद्रपद घेतलें. (भागवत, स्कंध ८, अ० १५.) तें पुनः त्यास द्यावें या हेतूनें विष्णूनें वामनाचा अवतार घेऊन त्यापाशीं तीन पावलें (त्रिविक्रम) जमीन मागितली. त्यानें देतों असें म्हणून उदक सोडल्यावर वामनानें विराटस्वरूप धारण करून, दोन पावलांतच मृत्युलोक आणि स्वर्गलोक व्यापून तिसरें पाउल बळीच्या मस्तकावर ठेवून त्यास पातळीं घातलें, या कथेकडे या वर्णनाचें धोरण आहे. ४. धड, मस्तकरहित देह. ५. हंसध्वजाच्या उत्तम रथावर. ६. नेत्राला. ७. करतोस.

रोदना मि करीतसें स्मरुनीच अंतरिं हें सुता!'

घेवुनी करिं टाकिलें शिर तें पुन्हा हरिच्या रथा. ॥ ६०

यदुविरें शिर तें धरुनी करीं, फिरवुनी त्यजिलें वरि अंबरीं, ।

कवळुनी गगनिं गुप्तचि जाहलें, हरिकृपेकरुनि मुक्तिस लाधलें. ॥ ६१

सुरथ त्यावरि म्हणे जनकाप्रती, 'निरखुनी धरिन अर्जुन श्रीपती.' ।

वदुनि यापरि रथावरि बैसला, जॉवुनियां मग रणांगणिं ठाकला. ॥ ६२

(घनाक्षरी.)

वाजवी सुरथ शंख । रणीं बोलत निःशंक, ।
म्हणे, 'रक्षीं तूं निःशंक । आजि पार्थ यावरी. ॥
म्हणविशी गुणसिंधु, । परि करीन मी बिंदु, ।
जैसा राहु गिळी इंदु । ग्रासीन मी मुरारी! ॥
खेळे जैसें लघुपोर, । मोतीं देवुनी घे बोर, ।
तैसे सुधन्वासी थोर । पुण्य तुवां वेंचिलें. ॥
तूं रे! गोंवेळा यथार्थ, । येवढा यत्न सुधन्वार्थ, ।
न विचारिला स्वार्थ । आपणासीं वंचिलें. ॥ ६३
सुधन्वा तो माझा प्राण । पार्था! करीन निर्वाण; ।
आतां साहें माझे बाण । करीं त्राण केशवा! ॥
वाटे नेत्रीं क्रोध थोर । उंचावली चापकोर, ।
करूं पाहे युद्ध घोर । म्हणे, 'बंधु दाखवा.' ॥
आजि गेले माझे बाहू । म्हणुनियां बाण वाहूं ।
तेणें क्षिति उलों पाहूं । स्थीर राहे रवि तो. ॥
कृष्ण म्हणे, 'धनंजया! । जीवें जाशील तूं वायां, ।
नको ठाकों याचा घाया । बाण सिंतीं लावितां. ॥ ६४
बंधुदुःखें तप्त फार, । याचें पुण्य तों अपार, ।
कोण धरी यासी धीर । महावीर होवुनी? ॥
याचा दिसतो उद्धार, । फेडील हा भूमिभार, ।
कोण याचा परपार । पावे यासीं भिडुनी? ॥

---

१. जाउन. २. गोपाळ, धनगर. ३. शेवट, अंत. ४. धनुष्याच्या दोरीवर. ५. युद्ध करुन.

ब्रह्मा करितो विचार, । आतां सृष्टीचा संहार, ।
पुनः उत्पत्ति आकार । लागे आम्हांकारणें. ॥
आतां पार्था! हेंचि सार, । जाय, न ठेवीं उधार; ।
याचा क्रोध अनिवार । हेचि वेळ टाळणें. ॥ ६५
मदनादि रणीं वीर । युद्धालागीं करी स्थीर.'।
मज जेथें नव्हे धीर । काढीं रथ श्रीहरी. ॥
रथ नेला तीन गावें । म्हणे, 'आतां स्थीर व्हावें; ।
परि गुज नाहीं ठावें । सुरथासीं समरीं. ॥
कृष्णपार्थां निरखोनी । बोले सुरथ गर्जोनी, ।
'दोघे शत्रु ते लपोनी । कोण्या स्थलीं राहिले? ॥
हे तव अवघे लेंकरें, । केंवि मारूं यां निकरें? ।
मनीं पाहतां विचारें । पाहुणे हे आणिले. ॥ ६६

(श्लोक.)

चमूंत वीर तामसी हितोऽपि तात जल्पसी; ।
पुढें प्रवीर ठाकले तुवां कितेक जिंकिले.' ॥ ६७
कुशब्द कर्णिं ऐकतां रथींच भूपतीसुता ।
बहुत क्रोध पातला, जपोनि बाण सोडिला. ॥ ६८
शरांचि वृष्टि जाहली असंख्य दीसती कळी. ।
हयांगजांसि भेदिलें, खुडूं शिरांसि लागले. ॥ ६९
धडें कितीक नाचती, अघोर शब्द ऊठती. ।
शरीं चमू विलक्षणी करी कुमार ते क्षणीं. ॥ ७०
असे कितीक मारिले चमूकडेस देखिलें ।
हरी सुपार्थ स्यंदनीं, विभेदि तो रणांगणीं. ॥ ७१
विलोकितां धनंजयें रणांगणांत निर्भयें, ।
इषू सहस्र सोडिले, नृपात्मजासि भेदिलें. ॥ ७२
वरूनि केतु तोडिला महीपपुत्र पाडिला. ।
सजूं तुरंग खूडिले, रथ द्विपाद मोडिले. ॥ ७३
मधें धनुष्य छेदिलें नृपात्मजें विलोकिलें. ।
दुजा रथींच बैसला तथा नभांत पातला. ॥ ७४

---

१. या वृत्ताला 'प्रमाणिका' संज्ञा आहे.

[1]नभिंहुनी शर विभेदित अर्जुना तिन शरें फिरवितो मग स्यंदना, ।
[2]हरिकपीसहित स्यंदन तो फिरे, दडपुनी हरि धरी परि नावरे. ॥ ७५
हरि म्हणे, 'निरखि वि[3]क्रम अर्जुना! [4]अजित हा न जिणवे तरि आपणा; ।
भ्रमित होवुनि विलोकिसि ईक्षणीं सुरथ हा विरथ तूं करिं ये क्षणीं. ॥ ७६
परिसुनी नृपवरें शर सोडिला, तिळपरी रथ नभांतरिं तोडिला. ।
तदुपरी कपिवरें दृढ लांगुलें, रगडुनी धरियला रथ तो बळें. ॥ ७७
महिवरी सुरथ येवुनियां म्हणे, 'रथ तुझा दडपितां हरि हा शिणे. ।
रथहि तो यदुवरास्तव राहिला, अर्जुनि त्वां मम न विक्रम पाहिला.' ॥ ७८
धरुनियां रथ नृपात्मज बोलिला, 'कथि मुखें तरि दिशांतरिं संचला, ।
वद त्यजूं गगनिं वा जळसागरीं चढवुं कीं [5]नगपतीदरिशीखरीं.' ॥ ७९
परिसुनी नरवरें कर तोडिला क्षितिवरी सुरथ मूर्च्छित पाडिला. ।
समरिं सांवरि नृपात्मज मूर्छना रणिं उभा म्हणत गर्जुनि अर्जुना. ॥ ८०
[6]वामहस्तकिं गदा धरुनी फिरे. मारितां जिव [7]कलेवर नावरे. ।
हस्तितें दश शतें क्षिति पाडिलें, अश्व कीं अयुत भूषित छेदिले. ॥ ८१
देखतां बहुत अर्जुन कोपला, हस्त तो मग गदेसह तोडिला. ।
हस्त तो नसुनि गर्जुनि घे उडी, देखतां चरण अर्जुन तो [8]खुडी. ॥ ८२
सर्व निर्जर मुळींसह तोडिला त्या शरें सुरथ मस्तक तोडिला. ।
मुंड तें नसुनियां समरीं पडे, मर्दिले किति, [9]सुचोजहि येवढें. ॥ ८३
[10]सीतिं अर्जुन धरी धड नीढळीं, ते पडे मग हरीचरणातळीं ।
हस्तकीं उचलि मस्तक तो हरी आठवी हृदयिं जो [11]अहि संहरी. ॥ ८४
शब्द ऐकुनि [12]खगाधिप पातला, त्याप्रती निज मुखें हरि बोलिला, ।

---

१. या वृत्ताला 'विभावरी' अशी संज्ञा आहे. २. कृष्ण व मारुति यांसह. ३. पराक्रम. ४. 'तुज तरी न जिणवे नृपनंदना' असाही पाठ आढळतो. ५. पर्वताच्या दरींत अथवा शिखरावर. ६. या वृत्ताला 'यूथिका' असें नांव आहे. ७. देह. ८. तोडी. ९. मोठें आश्चर्य. १०. धनुष्याच्या दोरीनें. ११. सर्प. याचें नांव कालिय. हा यमुनेंत होता, म्हणून याच्या विषानें दूषित झालेलें डोहांतील पाणी पिऊन गोकुळांतील गुरेंवासरें मरूं लागलीं. हें जाणून कृष्णानें कदंबवृक्षावरून मोठ्या वेगानें डोहांत उडी टाकून याला इतकें चेंचलें कीं याचे प्राण कासावीस झाले. असें शासन झाल्यावर तो शरण आला, आणि तेथून निघून समुद्रांत राहावयास गेला. (भागवत, स्कंध १०, अध्याय १६.) १२. गरुड.

‘शीर्ष नेवुनि प्रयागिंच[1] रे! त्यजीं.’ तो म्हणे, ‘तत्र वसे चरणांबुजीं.’[2]॥ ८५
ऐकुनी हरि म्हणे, ‘गरुडा! खरें पूत होइल प्रयागहि या शिरें.’ ।
घेवुनी शिर खगाधिप चालला; तो हरें[3] दुरुनियां खग देखिला. ॥ ८६
त्या हरा उपजली जिवें वासना[4] माळिके[5] शिर करूं वर भूषणा. ।
पाठवी मग सदाशिव भृंगितें[6] ‘माग रे! शिर अहीरिपुलागिं[7] तें.’ ॥ ८७
वाक्य[8] वंदुनि खगाप्रति गेला, ‘दे’ म्हणे ‘शिर’ मुखें, पथिं ठेला. ।
‘मी नव्हे उरग, रे विरुळा[9]! नव्हे, ते तुला भिवुनियां पळती थवे. ॥ ८८
मी तरी पशुपतीगण रे! असें, भेडसावुंहि नको मज फारसें.’ ।
मन्युसीं[10] बहु खगाधिप तो चढे, पक्ष ते फडकतां गण[11] तो उडे. ॥ ८९
जावुनी मग उमापतिही पुढें भृंगि तो चि पडिला बळ येवढें. ।
निरखुनी गण त्रिलोचन[12] बोलिला, भृंगि पाहुनिच विस्मित जाहला. ॥ ९०

तदुपरि मग वक्रीं बोललीसे भवानी[13],
‘बहु बळ गरुडाचें त्यावरी चक्रपाणी ।
तुजप्रति प्रभुनें या पाठवीलें मराया
नुमजुनि शिबिकेसीं धांवसी कें वि राया! ॥ ९१
वहन वृषभ[14] याचें तें सदा वृद्ध पाहे,
प्रिय बहु ललना[15] जे सिंधुसीं जात आहे. ।
वसन धरि गजाचें[16] चर्म तें अंगकांती,
विपरित वसवीतो नित्य खट्वांग[17] हातीं.’ ॥ ९२
परिसुनि सतिवाक्यें शंभु विस्मीत झाला,
मग कथि वृषभासीं, ‘आणि रे! त्या खगाला.’ ।
वचन नमुनि नंदी धांवला त्या धराया,
कुतुहल तंव झालें, सांगतों ऐक राया! ॥ ९३

---

१. गंगा आणि यमुना यांच्या संगमावर वसलेल्या नगराला ‘प्रयाग’ असें नांव पुराणग्रंथांत प्रसिद्ध आहे. यालाच ‘प्रतिष्ठान’ असेंही नांव कोठें कोठें आढळतें. येथें संगमाजवळ ‘अक्षयवट’ म्हणून पुराणांत वर्णिलेलें जें प्रख्यात वडाचें झाड तें अद्याप आहे असें लोक मानतात. प्रयागाला तीर्थांचा राजा समजतात. २. चरणकमळीं. ३. शिवें. ४. इच्छा, कामना. ५. रुंडमाळेंत. ६. एक शिवगण. ७. गरुडापाशीं. ८. या वृत्ताचें नांव ‘स्वागता.’ ९. गरुडा. १०. कोप. ११. भृंगी. १२. शिव, त्र्यंबक. १३. भवाची (शिवाची) स्त्री पार्वती. इंद्र वरुण भव रुद्र मृड इत्यादि शब्दांस ‘आनी’ प्रत्यय लागून स्त्रीलिंगी रूप होतें. (अष्टाध्यायी ४।१।४९.) १४. बैल. (नंदी.) १५. गंगा. (समुद्रास जाणारी.) १६. शिव गजचर्म म्हणजे हत्तीचें कातडें पांघरतो आणि तें कातडें ओलें असतें यामुळें त्याचा देह हिडिस दिसतो, हें पुराणप्रसिद्ध आहे. १७. शिवाचें आयुध.

अनिल बहुत नंदीनासिकांतून नीघे,
भ्रमित गरुड तेणें विश्वब्रह्मांडिं रीघे. ।
मग खग वृषभासीं नाकळे त्या सुसाटे
फिरत अरुणबंधू[1] सत्यलोकादिपीठें[2]. ॥ ९४

मदयुत गजशुंडेपासुनी तूस ऊडे,
मग कारें धरूं गेला काय तो त्यासि जोडे. ।
तृणपरि वृष नासावायुवेगें उडाला
त्रिभुवन फिरतां तो तत्क्षणीं क्षीण झाला. ॥ ९५

फिरुनि बहुत दैवें त्या प्रयागासि[3] आला,
शिर जळिं सुरथाचें टाकिता शीघ्र झाला. ।
निरखुनि वृषभानें घेवुनी वीरशीर्षा,
मुरडुनि मग गेला नेवुनी दे महेशा. ॥ ९६

शिवें त्या वीराचें त्वरित शिर माळेसि जडिलें.
खगेंद्रें जावोनी सकळ गुज कृष्णासि कथिलें. ।
कुमाराची[4] वार्ता परिसुनि रणीं भूप उठिला,
विलोकी कृष्णातें, मग रथतळीं ही उतरला. ॥ ९७

उभारूनी बाहू यदुपति म्हणे, 'भेट मजशीं,
त्यजीं तूं शोकातें, तुज निरखिलें लावुनि कसीं.' ।
असें तें कृष्णाचें मृदुवचन ऐकोनि नृपती
पुढें पायीं आला, नमुनि करितो माधवस्तुती. ॥ ९८

हरी बोले, 'राया! वचन वदतों ऐक तुजला,
रणीं पार्था रक्षीं, म्हणुनि नृपती तो कवळिला.' ।
वदोनीयां ऐसें त्वरित हरि गेला गजपुरा[6];
तदा रायें[7] नेली सकळिक चमू स्वीय नगरा. ॥ ९९.

---

१. गरुड. २. ब्रह्मलोकादिस्थानें. ३. अलाहाबाद. ४. सुरथाची. ५. कसोटीला. ६. यालाच 'हस्तिनापुर' 'नागपुर' अशीं अन्य नांवें आहेत. हें शहर पुरुकुलोत्पन्न हस्तिराजा यानें वसविलें, म्हणून यास 'हस्तिनापुर' असें नांव पडलें. दुसरें असेंही आढळतें कीं अत्रिपुत्र सोम हा अरण्यांत फिरत असतां, एका हत्तीला एका विहंगमानें उचलून नेलें असें त्यानें पाहिलें; तेव्हां त्या जाग्यावर त्यानें एक शहर वसवून त्याला या चमत्कारस्मरणार्थ 'हस्तिनापुर' असें नांव दिलें. हें शहर विद्यमान मिरत शहराच्या पूर्वेस गंगाकांठीं असावें असें विद्वानांचें अनुमान आहे. ७. हंसध्वजें.

नृपेंद्रें संतोषें करुनि स्थिर त्या पांच रजनी
दिलीं वस्त्रें नाना तदुपरि हया मुक्त करुनी ।
असो; आतां ऐका, रमणिय [1]कथा भारति पुढें
अनंताचे भूषा सकळहि तुम्हां काव्य यवढें. ॥ १००

---

## रामदासस्तुति.

(श्लोक.)

निर्माणस्थळ [2]गौतमी परि महा कृष्णातिरीं जो वसे,
[3]कांतासंग नसे, प्रपंचहि नसे, आशा दुराशा नसे, ।
ज्याला उत्तम [4]रामदास म्हणती, त्रैलोक्य वंदीतसे,
ऐसा सद्गुरु हा [5]अनंतकविचा [6]बद्धांस तारीतसे. ॥ १
वस्त्रें [7]हुर्मुजि भर्‌जरी पटकुळें, माथां [8]चिराही असे,
[9]काया सुंदर गौरवर्ण विलसे, भाळीं [10]अवाळूं असे. ।
स्वामींची [11]कविता समुद्र अवघा [12]कल्याण लीहीतसे,
ऐसा सद्गुरु हा अनंतकविचा बद्धांस तारीतसे. ॥ २

---

१. या चरणावरून आणि आरंभींच्या श्लोकद्वयावरून अनंतकवीनें अश्वमेधप्रकरणीं आणखी कविता केली असावी असें दिसतें. २. गोदावरी. ३. विवाहांत 'सावधान'शब्दाचा उच्चार होतांच रामदास लग्नमंडपांतून पळून गेला, म्हणून कांतासंग नाहीं. ४. याचें मूळनांव नारायण. यानें रामभजनांत काळ घालविण्याचा निश्चय करुन त्याप्रमाणें वर्तन ठेविलें म्हणून यास 'रामदास' असें नांव पडलें. ५. निलंगाबादेस अनंत गोसांवी या नांवानें प्रसिद्ध असा रामदासस्वामींचा शिष्य स्वामींचे आज्ञेवरून मठ बांधून राहत असे. याविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, त्या गांवीं कोणी गोविंदभट नांवाचा गृहस्थ आपल्या कनिष्ठबंधूचे विधवेबरोबर रत झाला, तेणेंकरून तीस गर्भ राहिला. ही वार्ता गांवांत कळतांच ग्रामाधिकाऱ्यानें गोविंदभटास बोलावून विचारिलें. परंतु गोविंदभटानें त्या अधिकाऱ्यास कांहीं लांच देऊन हें कृत्य अनंत गोसांव्यावर घातलें व त्यास धरून सुळावर देण्यास नेऊं लागले. तेव्हां त्यानें स्वामींचें चिंतन करतांच तेथें एक वानर उत्पन्न होऊन त्यानें शिपायांस व अधिकाऱ्यांस मार दिला. नंतर स्वामी प्रकट होऊन स्वामींनीं सर्व वृत्तांत ऐकून घेतला व त्या बाईस विचारिलें कीं, 'तुला गर्भ कोणाचा राहिला?' तेव्हां ती उगी राहिली व खालीं पाहूं लागली. तेव्हां स्वामी बोलले कीं, 'जर तूं बोलत नाहींस तर आम्हीं गर्भास विचारूं.' नंतर गर्भास प्रश्न केला, तेव्हां त्या गर्भानें खरा वृत्तांत कळविला. त्यावरून अनंत गोसांव्याची सुटका झाली. कदाचित् तोच हा अनंतकवि असला तर असेल. ६. संसारांत बद्ध झालेल्यांस. ७. हुरमुजी, गेरुच्या रंगाचीं. ८. मंदिल. ९. शरीर. १०. वाळूक. ११. दासबोध, रामायण, इत्यादि अनेक ग्रंथ. १२. रामदासाचा प्रख्यात शिष्य.

ज्याची पूर्ण समाधि सज्जनगडीं[1] गुप्तप्रकारें असे,
पादूकांवरि शेष शोभत असे, दोन्हींकडे आरसे. ।
ज्याची पुण्यतिथी[2] सुदीन नवमी उत्साह होतो असे,
ऐसा सद्गुरु हा अनंतकविचा बद्धांस तारीतसे. ॥ ३
जेणें सात्विकराजसादि हि तिन्ही[3] आत्मस्थिती आटले,
ओंकारादि[4] करूनि अष्टदेह वीदेहें निराकर्णिले, ।
विज्ञानी भवसिंधुपार[5] तरले जिंकोनि साही धरा,
ऐसा सद्गुरु हा अनंतकविचा बद्धांस तारीतसे. ॥ ४
ज्याची गाढ[6] उपासना[7] जरि असे जाणे अयोध्यापती[8],
नेणे त्याहुनि अन्य दैवत असे ऐशी जयाची स्थिती, ।
ज्याचा गुप्त विचारही परि असे नारीनरां लेंकुरां
ऐसा सद्गुरु हा अनंतकविचा बद्धांस तारीतसे. ॥ ५
सह्याद्रीगिरिचा विभाग विलसे मंदारशृंगापरी
नामें सज्जन जो नृपें[9] वसविला उर्वशियेचे[10] तिरीं, ।
आयोध्याधिपती कपी[11] भगवती[12] हे देव ज्याचे शिरीं,
तेथें जागृत रामदास विलसे जो या जना उद्धरी. ॥ ६

---

## निर्वाणषट्क[13].

(श्लोक.)

नाहीं मी मन बुद्ध्यहंकृति, नव्हें चित्तादिकें इंद्रियें,
नोहे घ्राण कदापि नेत्र रसना, नव्हेचि श्रोत्रेंद्रियें, ।
नव्हे व्योमहि तें, न भूमि, अनला, वायू न तोही कदां,
आहें जें स्वत सिद्धरूप शिव तो पहा सदा सर्वदा. ॥ १
भाजे प्राण सुजाण पांच शरिरीं वारी कदां मी नव्हें,
धातू सप्तही मी न होय सहसा पंचात्मकोशे नव्हें, ।

---

१. शिवाजी महाराजांचे विनंतीवरून स्वामी परळीचे किल्ल्यावर राहूं लागले, तेव्हां त्यास ‘सज्जनगड’ असें नांव त्यांनीं ठेविलें. २. शा० श० १६०३ या वर्षी माघ वद्य ९ स मंदवारीं समर्थ परलोकवासी झाले. ३. सात्त्विक, राजस आणि तामस. ४. प्रणव, वेद अथवा मंत्र यांच्या आरंभीं उच्चारणीय ईश्वरनाम. ५. संसाररूप सागर. ६. दृढ. ७. सेवा. ८. राम. ९. शिवाजी-महाराजांनीं. १०. हिला उरमोडी नदी म्हणतात. ११. मारुति. १२. भवानी. १३. शंकराचार्यकृत निर्वाणषट्काची ही समश्लोकी टीका आहे.

वाचा आणिक पादपाणि न कदां गुह्येंद्रियें गुह्यही,
आहे जें स्वत सिद्धरूप **शिव** तो पाहा सदा सर्वही. ॥ २
नाहीं द्वेष कदापि क्रोधहि मला, लोभादि मोहो नसे,
नाहीं उन्मद चाल····कधिंच ही आश्चर्यभावो नसे, ।
पाही धर्म कदां न अर्थ सहसा कामीं न मोक्षस्पृहा
आहे जें स्वत सिद्धरूप **शिव** तो पाहा सदा सर्व हा. ॥ ३
नाहीं पुण्य न पाप सौख्य मजला नाहींच दुःखा पहा,
नाहीं मंत्र न तीर्थ तेंहि सहसा, दानें मखादी कदा, ।
नोहे भोजन मी, न भोज्यहि तसें, भोक्ता कदा मी नव्हें,
आहे जें स्वत सिद्धरूप **शिव** तो पाहा सदा सर्व हें. ॥ ४
नाहीं मृत्युभय कदापि मजला, जाती सभे दीनसे,
माता आणिक तात तोहिं न कदा, जन्मास आलों नसे, ।
नाहीं बंधु मला, न मंत्रि, गुरु तो, नाहीं मला शिष्यही,
आहे जें स्वत सिद्धरूप **शिव** तो पाहा सदा सर्वही. ॥ ५
मी तो जाण निराकृती रुप सदां वीकल्प मातें नसे
सर्वीं सर्व वसोनि इंद्रियदिकीं सर्वांत कर्मी असे, ।
नाहीं आणिक साम्यतेसि मजसीं मूर्तीषडुर्मी नसे,
आहे जें स्वत सिद्धरूप **शिव** मी पाहा बरें मागुतें. ॥[1] ६

---

## पदसंग्रह.

### पद १ लें.

सदा श्रीहरिचें नाम मुखीं गात जा रे! ॥ ध्रुवपद. ॥
वर्णाश्रमविहित[2] कर्म करणें हा परम धर्म, ।
निरहंकृति[3] कंजनयन[4] ध्यात जा रे! ॥ सदा० ॥ १ ॥
सत्संगें शास्त्रश्रवण, श्रवणाचें करुनि मनन, ।
निजध्यास पूर्ण जगीं रहात जा रे! ॥ सदा० ॥ २ ॥
निरतिशयानंत निजानंदीं निःसंग ।
अंतरंगिं रंग तोचि जगीं पाहत जा रे! ॥ सदा० ॥ ३ ॥

---

१. या षट्काच्या अखेरीस 'इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकराचार्यविरचितं देशभाषापूर्णानंतेन विरचितं निर्वाणषट्कं संपूर्णम्' असा समाप्तिलेख आहे त्यावरून हें भाषांतर अनंतकृत होय असें होतें, म्हणून येथें दिलें आहे. २. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य व शूद्र या चार वर्णांस आणि ब्रह्मचर्य गार्हस्थ्य वानप्रस्थ आणि संन्यास या चार आश्रमांस योग्य असें नेमलेलें (कर्म). ३. अहंकाररहित. ४. कमलनयन.

पद २ रें.

भक्तांचा विश्राम रे! अंकीला श्रीराम रे! ।
कैवल्याचें धाम भक्तां करी पूर्णकाम रे! ॥ ध्रुवपद. ॥
घेतां आलीं बाळकें त्यासी विश्वपालकें ।
क्षीरसिंधु दिधला मुनिमानसमराळकें. ॥ भक्तांचा० ॥ १ ॥
होतां ऋषीशाप रे! झाली शिळारूप रे! ।
पादस्पर्शे जाहली ते अहल्या निष्पाप रे! ॥ भक्तांचा० ॥ २ ॥
हाणोनीयां चक्र रे! वीदारीला नक्र रे! ।
गजा गौरवीलें तैसें नपवेची शक्र रे! ॥ भक्तांचा० ॥ ३ ॥
द्रौपदीची लाज रे! राखी महाराज रे! ।
पांडवांचे घरीं करी सर्वस्वेंची काज रे! ॥ भक्तांचा० ॥ ४ ॥
रामीं रतचित्त रे! तेचि भक्त युक्त रे! ।
निजानंदीं पूर्णरंगीं रंगला अनंत रे! ॥ भक्तांचा० ॥ ५ ॥

पद ३ रें.

कळों आली माव रे! भक्तीपासीं देव रे! ।
न पाहेची याती कूळ कर्मभूळ भाव रे! ॥ ध्रुवपद. ॥
कोण पुण्यश्लोक रे! गोकुळींचे लोक रे! ।
गोपवेशें जयां घरीं ब्रह्मांडनायक रे! ॥ कळों० ॥ १ ॥
दुर्लभ ब्रह्मादीका त्यासी गोपबाळीका ।
हर्षे नाचविती वाजवूनि करताळीका. ॥ कळों० ॥ २ ॥
प्राणाच्या नीरोधनें नव्हे साध्य साधनें, ।
लीलारूपी विग्रही तो चारिताहे गोधनें. ॥ कळों० ॥ ३ ॥
भावीकांचे बंध रे! तोडी जगद्वंद्य रे! ।
यशोदेनें उखळीं तो बांधिला गोविंद रे! ॥ कळों० ॥ ४ ॥
जया जैसा हेत रे! तया तैसा होत रे! ।
निजानंदीं पूर्णरंगीं रंगला अनंत रे! ॥ कळों० ॥ ५ ॥

पद ४ थें.

सये! कैं मनोरथ जगन्नाथ पुरवी । देवुनी अभय भवसिंधु तरवी. ॥ ध्रुवपद. ॥
लेश विश्रांतिचा प्राप्त नाहीं, भवभ्रांतिदिग्मंडळीं व्यर्थ फिरवी, ।
शीण बहु वाटतो आठवीतां पुनर्जन्ममरणावळी कोण सरवी? ॥ सये० ॥ १ ॥

१. मोक्ष, मुक्ति. २. हंसें ३. गौतमशाप. ४. जाति. ५. देहधारी.

साधुसंगें अभिप्राय षट्शास्त्रिंचा शोधितां साधली युक्ति बरवी, ।
भक्ति वीरक्ति भगवत्प्रबोधामृतें मातली बुद्धिसंकल्प नुरवी, ॥ सये० ॥ २ ॥
ब्रह्मसाम्राज्य स्वानंदयोगें असंभावना शांत निर्द्वंद्व करवी, ।
रंगलानंतपूर्णानिजानंदजनिसायुज्यप्राप्तिचें छत्र धरवी. ॥ सये० ॥ ३ ॥

**पद ५ वें.**

रमारंगहृदयसंग घडविं आजि गडे! ॥ ध्रुवपद. ॥
चंद्रचंद्रिकाप्रकाश, मलयमरुत्सावकाश, ।
सीत मंद कुसुमगंध वृंद वृक्ष चहुंहि कडे. ॥ रमा० ॥ १ ॥
मित्रकन्यकासुनीर[1], मृदुल सैकतेयतीर, ।
कोकंकोकिलासुकूंजितैक[2][3] कलकलाट पडे. ॥ रमा० ॥ २ ॥
रम्यसमय हा वसंत, येती तीर्थार्थ संत, ।
त्यांत पावतां अनंत विठ्ठलासि लाभ घडे ॥ रमा० ॥ ३ ॥

**पद ६ वें.**

वृंदावनवासी कोठें गुंतला प्राणविसांवा? ॥ ध्रुवपद. ॥
दुःशासन धरुनी वेणी जनलोकां संनिध राहे, ।
पांचाळी उघडी करितां सुरसरिता नदी पाहे, ।
गंगात्मज द्रोणाचार्या पांडवांसी दुःख न साहे, ॥
चाल ॥ मोकली दीर्घ धाय । आठवी कृष्णपाय. ॥ वृंदावन० ॥ १ ॥
शंखासुर घेवुनि गेला वेदांसी कोण तमाशा, ।
ब्रह्म्यानें करुणा करितां उदधींत जाला मासा, ।
माझी कां करुणा नयेरे! पाव तूं संकटनाशा, ॥
चाल ॥ लागली थोर आशा । नको पाहूं हा कीं तमाशा. ॥ वृंदावन० ॥ २ ॥
बैसुनी मसणीं वेडा जालासी वृंदेसाठीं, ।
लुसलुसीत हिरवा पाला तुळसीची आवड मोठी, ।
रुक्मिणी येवों नेदी घातला हार कंठीं, ॥
चाल ॥ कोणतें संकट पोटीं । लागलासि धेनुपाठीं. ॥ वृंदावन० ॥ ३ ॥
गोविंदा! गोपवेषा! गोवर्धनगिरिधर! येरे! ।
मुकुंदा! मानसरमणा! माधवा! श्रम हारीरे! ।
उचलोनी कडिये घेरे! चुकविले जन्मफेरे ॥
चाल ॥ अनंता भेट देरे! । सर्वही हेंचि म्हणारे! ॥ वृंदावन० ॥ ४ ॥

---

१. यमुना. २. चक्रवाक. ३. पक्षिशब्द.

### पद ७ वें.

उद्धवा ! या मथुरेसिं कोणि तरि हो ! पाठवा. ॥ ध्रुवपद. ॥
एक म्हणती जाउनि सांगा श्रीहरिला विनंती ।
एक विचार करिती बरवा राधिका श्रीपती ।
याच्या मुरलीच्या नादानें मोहिल्या चित्तवृत्ती ।
इतराजी आम्हांवरते सांगुनियां पाठवा. ॥ उद्धवा० ॥ १ ॥
गोकुळांत अनर्थ झाला गोपाळ आणि गाई ।
त्यागुनी वत्स फिरताती म्हणतात कृष्ण नाहीं ।
अशी सकळ जनाची वृत्ती लागली प्रभुपायीं ।
एक म्हणती शेषशायी हृदयीं तो आठवा. ॥ उद्धवा० ॥ २ ॥
गोपीचा ऐकुनी धांवा हरि आले गोकुळा ।
हा आनंद न समावे अवघ्यांच्या हृत्कमला ।
.................................................. ।
ह्या दशमुखाच्या माळा प्रेमानें गांठवा. ॥ उद्धवा० ॥ ३ ॥
हा वृत्तांत मधुसूदनातें उद्धवें जाणविला ।
करुणाकर कृष्ण मुरारी मनिं आपुले तोषला ।
व्यासानें वर्णन केलें श्रीभागवती लीला ।
अनंत प्रभु हा गातो सर्वांच्या आठवा. ॥ उद्धवा० ॥ ४ ॥

### पद ८ वें.

रसने ! नील नीरद सुंदर निरुपमशील सादर गाई. ॥ ध्रुवपद. ॥
पळभरि तरि गुरुपाया । स्मरपर मन होशिल ज्याया. ॥ रसने० ॥ १ ॥
विसर सकळ भवगाथा । मनिं समजुनि चिन्मयता. ॥ रसने० ॥ २ ॥
वदसि सुखाभय बरवी । तरि वरदकृपे जग भरवी. ॥ रसने० ॥ ३ ॥
स्मरण भयोत्कर चुकवी । मति अनंतकवि सुत शिकवी. ॥ रसने० ॥ ४ ॥

### पद ९ वें.

कोठुनि रे ! अधमा निशिमा. ॥ ध्रुवपद. ॥
थोर अहंकृति कामिनी संतति । संपतिचा गरिमा. ॥ कोठुनि० ॥ १ ॥
अल्प वयासी कल्पसि मानसी । कल्पसमा उपमा. ॥ कोठुनि० ॥ २ ॥
अनंतप्रभुसी भजसी जरि तरि । पावसि पदपद्मा. ॥ कोठुनि० ॥ ३ ॥

---

## श्रियाळचरित्र.

(दिंड्या.)

घोर संसारवारिधि तराया । मोहमायीक सर्व विसराया ।
कामरागादी क्लेशही नाशाया । नमो भावें अनंतदेवपाया. ॥ १
कथा पावन मान्य सर्वलोकीं । गावया ते मज आठविती नीकी ।
पुण्यवंत श्रीयाळराज तो कीं । मुक्त वर्त श्रीघनानंद लोकीं. ॥ २
थोर पृथ्वीवरि मोक्षपुरी कांती । तेथें नांदे श्रीयाळ धर्ममूर्ती ।
करी अन्नदान नित्य महाप्रीती । अतीतासी देऊनि करी तृप्ती. ॥ ३
जया इच्छा भोजनीं जसी आहे । तसे देऊनी तृप्त करीताहे ।
चांगुणा स्त्री मानवी कदा नोहे । इंदिरेचा अवतार वाटताहे. ॥ ४
पुत्र जीचा चिल्हाळ सत्यवंत । आला ज्यासाठीं घरा भगवंत ।
शिवप्रीत्यर्थ दान द्विजा देत । सत्व शोधाया आले भगवंत. ॥ ५

(पद.)

भोळा शंभू भक्ताच्या शोधितसे सत्वालागीं. ॥ ध्रुवपद. ॥
अतिथी होवोनि आपण । कुष्टें गळति करचरण ।
सुटली मांसाचि गोंगान । घाण घ्राणे न घेवे. ॥ भोळा० ॥ १ ॥
कुबड निघालें पाठीसी । झाली बोळवण दांतांसी ।
हातीं धरूनि काठीसी । टेंकित आला तो पहा. ॥ भोळा० ॥ २ ॥
भिक्षा म्हणोनि हाक मारी । आला राजा अतिसत्वरी ।
काय इच्छा ते अंतरीं । मागा लौकरि मी देतों. ॥ भोळा० ॥ ३ ॥
श्रियाळ सूर्यवंशी त्यातें । गोऊनि अतीत वचनातें ।
म्हणे नरमांसाचें मातें । भोजन देई हातें तुझ्या. ॥ भोळा० ॥ ४ ॥
बोले अनंतदेवस्वामी । कृत्रिम पापी पर नेघे मी ।
तुज मागो तरि पालण भूमी । कर्ता आमुचा तूं दाता. ॥भोळा०॥ ५ ॥ ६

(दिंड्या.)

सत्वशीळ पुत्रासी जरि रांधून । घालीसी तूं तरि करीन भोजन ।
बोलताहे चिल्हाळ निधान । तृप्ति चरणातें नमस्कारून. ॥ ७
धन्य माझा हा जन्म सूर्यवंशीं । धन्य संसार धन्य मायकूशी ।
देवोनिया अतीत भोजनासी । करूं संतुष्ट चंद्रशेखरासी. ॥ ८

थोर दैवें अतीत घरा आला । तेणें माझा साफल्य जन्म झाला ।
रायें हर्षोनि दिधले सुताला । येरु बोले रांधोनि तुम्हींच घाला. ॥ ९

चांगुणेनें घरांत बाळ नेला । पोटासी तो कवळोनि धरीयेला ।
घेत अलायबलाय श्रीमुखाला । धरी हातें दे क्षम वेळोवेळां. ॥ १०

सांठवेना तो मोह निजपोटीं । क्षणक्षणां घातली गळां मीटी ।
म्हणे माझी तुज झणी लागो दृष्टी । गौरवानें मग तया वदे गोष्टी. ॥ ११

(अभंग.)

चिल्हया माझें बाळ गुणाचें निधान । तुज मी कैं देखेन तानया रे ! ॥ १ ॥
माझिये पोटासी येवोनियां कांहीं । देखियेलें नाहीं सुख तेंही. ॥ २ ॥
तुजवरी दृष्टी देवोनि जगजेठी । तुझेनि मी ये सृष्टी सुखरूप. ॥ ३ ॥
सोनियाचे ताटीं वाढोनि मिष्टान्न । जेवीं बा ! देखेन डोळेभरी. ॥ ४ ॥
जीवींच्या जीवना म्हणोनि कुरवाळी । तुजलागीं सांभाळी अनंतदेवो.॥५॥१२

(दिंड्या.)

विळीनें ते जंव कापितसे मान । नेत्र लावोनि करी शिवध्यान ।
वदे हर हर महादेव गरजोन । सत्व राखी देवोनि जीवदान. ॥ १३

शीर सिंक्यावरी ठेवी पूसोन । म्हणे यातें मी नित्य पाहीन ।
क्षणक्षणां देखोनि मुसळान । कांडी उखळा आंत घालोन. ॥ १४

मनीं आठवी पुत्रशोक तेव्हां । मुखीं बोले शिव शिव महादेवा ।
रम्य वोव्या म्हणवोनि देत घावा । आठवोनी घेतसे पुत्र नांवा. ॥ १५

(अभंग.)

चिल्हूचे हो ! घोडे काळे कुमाईत । लगामीं ताईत सोनीयाचे. ॥ १ ॥
चिल्हूचें मनगट सोन्याचें तगट । मी माय कौतुकें कांडीतसें. ॥ २ ॥
चिल्हयाचे डोळे आंबियाच्या फोडी । देवलोकीं गोडी चिल्होबाची. ॥ ३ ॥
चिल्हुचे हो ! दांत हिरियाच्या ज्योती । खणखणा वाजती मुसळघायें. ॥ ४ ॥
चिल्हुनें हा माझा सांडीला पसारा । गेला ईश्वराला भेटावया. ॥ ५ ॥ १६

(दिंड्या.)

सूर्यवंशी आली थोर कीर्ति । तुझ्या सेवे तोषेल सांबमूर्ती ।
निजपुत्राचें मांस अतिप्रीती । रांधोनिया घालीत सत्वजीती. ॥ १७

ताट वाढोनि पुढें ठेवितांच । वदे अतीत घेई तुझें तूंच ।

शीर रांधोनी घालिसी तरीच । तृप्त इच्छा होईल आज साच. ॥ १८
पतिव्रता **चां**गुणा सत्वशीळा । शीर कांडोनि सत्वर पाक केला ।
वदे, स्वामी ! ध्या करा भोजनाला । तदा अतीत बोलतसे बाला. ॥ १९
न जेवीं तुम्हांसी सोडोनि । मला हांसेल सत्य **शू**ळपाणी ।
दोघें बैसले तरी अनुमानी । सत्व पाहे **ज**गदीश शोधोनी. ॥ २०
निपुत्रिकाचें अन्न कासयासी । अति अपवित्र नको तें आम्हांसी ।
तूंचि मागोनि तूंचि निंदितोसी । **शि**वा ! उदरीं तूं ठाव दे आम्हांसी.॥ २१
दृढ पाहोनि सत्व निश्चयातें । प्रगट दावी निजरूप **उ**माकांत ।
कृपादृष्टि पाहोनि बाळकातें । ठेवि उठवोनि शिरीं अभय हस्त. ॥ २२
मायबापांसी बाळ भेटविलें । **म**हादेवें तींघांसि आलंगीलें ।
सत्व पाहोनि चित्त बहू धालें । ऐसें कौतुक **सां**व **शि**वें केलें. ॥ २३
**चं**द्रचूड पाहोनि सत्व ठेवी । बाळकाचे मस्तकीं हात ठेवी ।
प्रेमभावेंसी पूर्ण देवभेटी । उभे वंदियले तिघे निजदृष्टी. ॥ २४
म्हणे भूतेश, माग गा ! वरासी । एक मुहूर्त राज्य दे आम्हांसी ।
कृपामूर्ती उद्धरी या पुरीसी । असें छळूं नको **शि**वा ! कवणासी. ॥ २५
वर देवोनि तोषविला रावो । भुलोनिया भक्तिसी **म**हादेवो ।
कथा ऐसी अमृत प्रेमभावें । वर्णिलीसे चिद्घ**ना**नंतदेवें. ॥ २६

## अनंतकविकृत आणखी उपलब्ध झालेलीं पदें.

### पद १० वें.

मना ऐसा महाराज कोण आहे रे ।
नाममात्रेंची जन्म जरा जाये रे ॥ ध्रुवपद. ॥
मच्छ [1]कच्छप [2]सूकर जाहला रे ।
नारसिंहें अवतार धरियेला रे ।
[3]अंबरीष परम सुखी केला रे ।
अर्जुनाचा सारथी स्वयें झाला रे ॥ मना० ॥ १ ॥
धरी भक्ताचे उरीं शिरीं पाय रे ।
[4]पुरी नेली वैकुंठ पदा पाहें रे ।
[5]भिल्लिणीचीं उच्छिष्ट फळें खाय रे ।
[6]रिसां वानरां [7]ऐकांत करिताहे रे ॥ मना० ॥ २ ॥
दीनवत्सला काय वानूं रे ।
पार्थालागीं लपविला [8]दिवसा भानू रे ।
वृंदावनीं वाजवी वेणू रे ।
तेणें नादें मोहिल्या गोपि धेनू रे ॥ मना० ॥ ३ ॥
अनंतकोटी ब्रह्मांडें ज्याचे पोटीं रे ।
तो हा धांवे गोवळ्या धेनुपाठीं रे ।

---

१. कांसव. २. डुकर. (वराह). ३. अंबरीष–हा सूर्यवंशोत्पन्न नाभाग राजाचा पुत्र. हा मोठा दानशूर, पराक्रमी आणि भगवद्भक्त होता. एकदां द्वादशीच्या दिवशीं दुर्वास ऋषि याच्या घरीं अतिथि म्हणून आला. तेव्हां राजानें त्यास भोजनार्थ राहवून घेतलें. नंतर मुनि आपलें आन्हिक कर्म करण्यासाठीं नदीतीरीं गेला. या दिवशीं थोडी म्हणजे साधनद्वादशी होती. तेव्हां व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें, तिथि संपली तों देवास नैवेद्य समर्पण करून, भोजन न करतां देवाचें तीर्थ प्राशन करून पारणें सोडलें. हें जाणून मुनि संतप्त झाला. त्यानें आपल्या जटेंतील केंसापासून एक अक्राळ विक्राळ कृत्या (राक्षसीं) उत्पन्न करून राजावर सोडिली. तेव्हां विष्णूच्या सुदर्शन चक्रानें तिचा नाश केला आणि त्या मुनीचा पाठलाग केला. हें पाहून दुर्वास भीतिग्रस्त असा विष्णूस शरण गेला. विष्णूनें ‘परत अंबरीषाकडे जा, तो निराहार आहे, त्याचें समाधान कर म्हणजे चक्र तुला सोडील’ असें सांगितलें. त्यावरून निरुपाय होऊन तो अंबरीषाकडे परत आला. दुर्वासास हर्ष झाला. त्यानें सुदर्शनाची स्तुति करून दुर्वासाला त्यापासून मुक्त केलें आणि यथेच्छ भोजन दिलें–अशी कथा आहे. (भागवत–नवम स्कंद–अध्याय ४-६.) ४. जगन्नाथपुरी. ५. शबरीचीं. ६. आश्वलां. ७. निजहिताच्या गुह्य गोष्टी. ८. जयद्रथवधसमयीं.

खांदा कांबळा घेवोनि हातीं काठी रे ।
निजानंदें रंगला अनंत पाठीं रे ॥ मना० ॥ ४ ॥

### पद ११ वें.

आश्रय तव चरणाचा ।
श्रीगजवदना साचा ।
इतरहि उद्धरणाचा ।
मार्गी जनीं त्रिजगनिया आहे । ऐसें न वदे वाचा ॥ आश्रय० ॥ १ ॥
प्रथम तुझ्या नमनाला ।
जो नर उत्सुक झाला ।
त्याचा सर्व विझाला ।
जनन मरण दावानल कामी । मत्सर शांतची झाला ॥ आश्रय० ॥ २ ॥
मंगल नाम तुझें कीं ।
मज उच्चारूं दे कीं ।
तारकसें या लोकीं ।
दास अनंत कृपाघन इच्छित । रंगणिं येउनि दे कीं ॥ आश्रय० ॥३॥

### पद १२ वें.

हरिजन हरिसम रे । भावुनी पद भजनीं रम रे । सखया ॥ ध्रुवपद. ॥
भवसागर मृग तो पवि भासे ।
मग कैंचा भ्रम रे । सखया ॥ हरि० ॥ १ ॥
धरितां भावार्था । येणें साधिशी परमार्था ।
वारुनि सकळ अनर्था । आपल्या साधी निज स्वार्था । सखया ॥ हरि० ॥२॥
धरितां हे चाली । माया ममता मृत झाली ।
माया वर्णिति वेद पराक्रम । हर्षें पूर्ण दशा आली । सखया ॥हरि०॥३॥
जन्म अनंताचा अंकित । झालों संताचा [1]अंकित ।
निजरंगीं नाचतसें गर्जत । पावन त्रीवाचा । सखया ॥ हरि० ॥ ४ ॥

### पद १३ वें.

मनुजा ! राम भजावा रे । मूर्खा ! गर्व त्यजावा रे ॥ ध्रुवपद. ॥
दौलत झेंडा तपतो हंडा खाशी उनउन मांडा ।
मडक्यामध्यें पाणि तापतें रडती पोरें रांडा ॥ मनुजा० ॥ १ ॥

---

१. सेवक.

धोतरजोडा कानिं चौकडा बसाया खासा घोडा ।
यमरायाचें येइल बोलावणें पायीं पडेल खोडा ॥ मनुजा० ॥ २ ॥
नेसुन साडी उंच माडी कानीं बाळी बुगडी ।
यमरायाचें येइल बोलावणें स्मशानिं काया उघडी ॥ मनुजा० ॥ ३ ॥
अनंतकवि म्हणे समजा उमजा वाया करितां गमजा ।
यमरायाच्या येतिल फौजा करतिल पुरजा पुरजा ॥ मनुजा० ॥ ४ ॥

## पद १४ वें.

(द्रौपदीचा धांवा.)[1]

वृंदावनवासी कोठें गुंतला प्राणविसांवा ? ॥ ध्रुवपद. ॥
दुःशासन धरुनी वेणी वरुणी सन्निद्ध राहे, ।
पांचाळी उघडी करितां सुरसरिता भंवती पाहे, ।
गंगात्मज द्रोणासहिता पांडवां दुःख न साहे, ।
चाल ॥ मोकली दीर्घ धाय । आठवी कृष्णपाय ॥ वृंदावनवासी० ॥ १ ॥
शंखासुर साधुनि गेला वेदासी कोण तमासा, ।
ब्रह्म्यानें करुणा करितां उदधींत झाला मासा, ।
माझी कां करुणा नये रे तुजलागीं संकटनाशा, ।
चाल ॥ भक्तपरेशा लागली थोर आशा । पाव तूं विघ्ननाशा. ॥ वृंदावनवासी० ॥ २ ॥
गोविंदा ! गोपवेषा ! गोवर्धनधारी ! ये रे ! ।
वैरी ही क्लीबरूपी भासती निष्ठुर कीं रे ! ।
येकली माझी काया दीन रूप हेच उभीरे ! ।
चाल ॥ गोंविलें भक्ती बारे । तुजलागीं काय म्हणूं रे ! ॥ वृंदावनवासी० ॥ ३ ॥
श्रीकृष्णा [2]कंजनयना पावें तूं कुंजविहारी ।
अवतार बौद्ध्यस्वरूपा खेळसि नानापरी ।
टाकला लोभ दयाळा काय बा ! तूंच मुरारी ।
चाल ॥ तरि कोण संकट वारी । गा ! [3]आतळति मजला वैरी ॥ वृंदावनवासी० ॥ ४ ॥
श्रीरंगा लक्ष्मीरमणा करुणाकर दीनदयाळा ।
अनाथनाथ मुकुंदा ! पावसी वेळोवेळां ।

---

१. हा द्रौपदीचा धांवा पदसंग्रह पृ० ११२ ह्यांत छापला आहे, पण तो अगदीं त्रुटित आहे. त्यांत चारच कडवीं आहेत व यांत दहा आहेत म्हणून हा पुनः येथें दिला आहे. २. कमललोचना. ३. स्पर्शती, गांजिती.

परि आज निष्ठुरपण कां धरिलें त्वां घननीळा ।
चाल ॥ शीणशी वेळो वेळां । टाकि तूं [1]भीमकबाळा ॥ **वृंदावनवासी०** ॥५॥
**रुक्मिणीरमणा** देवा! गुंतलास कवणें ठायीं ।
गोपिकासंगविलासा टाकलिस माझी साई ।
आतां मी कवणा ध्याऊं आकांति [2]**कृष्णामाई** ।
चाल ॥ लाजही तुजला आहे । दाखवी आपुले पाये ॥ **वृंदावनवासी०** ॥६॥
बैसोनी [3]मसणीं वेडा झालासी [4]**वृंदेसाठीं**, ।
लुसलुसीत हिरवा पाला तुळसीवर आवड मोठी, ।
**रुक्मिणी** येऊं नेदी घातला हार कंठीं, ।
चाल ॥ लागलास धेनूपाठीं । कोणतें संकट पोटीं. ॥ **वृंदावनवासी०** ॥ ७ ॥
गरुडावरि बैसुनि वेगीं **का**वेरीरंगा येरे ।
धांव बा! धांव [5]**मुरारी**! जाचिती **कौ**रववैरी ।
याही **दु**:शासन काळाकरविं सोडविं दादा! रे ।
चाल ॥ भाई! फार मी वाट पाहें । मोकलतें तुजला धाये ॥**वृंदावनवासी०**॥८॥
**गो**विंदा! गोपवेषा! **गो**वर्धनगिरिधर! येरे! ।
**मु**कुंदा! मानसमोहना! **मा**धवा! श्रम हा ने रे ।
दिगांबर देव**द**त्ता! **अ**नंताला भेट देरे ।
चाल ॥ उचलोनि [6]कडिये घेरे! । चुकवि [7]जन्मफेरे ॥ **वृंदावनवासी०** ॥ ९ ॥
ऐकुनि ऐशी करुणा **पी**तांबरधारी देवा! ।
टाकुनि विषयसुखातें चालिला विश्वमोहा ।
संकटें ऐसीं तूं बा! वारीत जा हो! ।
चाल ॥ पसरुनि श्रीपति बा! हो! । भेटला पूर्ण कृपा हो ॥ **वृंदावनवासी०** ॥१०॥

---

१. रुक्मिणी. २. उपास्य देवतेचा निर्देश स्त्रीलिंगेंकरून करण्याचा संप्रदाय सर्वप्रसिद्ध आहे. तुकारामादिक कवीही विठोबास 'विठाई' 'विठाबाई' वगैरे शब्दांनीं संबोधनपूर्वक आळवितात असें त्यांच्या काव्यांवरून दिसून येतें. असा परिपाठ संस्कृत काव्यांतही क्वचित् दृष्टीस पडतो. ३. 'स्मशान' या शब्दाचा अपभ्रंश 'मसण' आहे. ४. वृंदा—ही जालंधर नामक असुराची भार्या. ही मोठी पतिव्रता होती म्हणून तिच्या पुण्यानें देव आणि राक्षस यांचे युद्धांत जालंधराचा पराभव होत नसे. म्हणून विष्णूनें जालंधराचे रूपानें येऊन वृंदेचें पातिव्रत्य हरण केलें. ह्या पातकामुळें जालंधर युद्धांत मृत्यु पावला. म्हणून तिनें सती जाते वेळेस विष्णूला 'स्त्रीवियोग होईल' असा शाप दिला. पुढें ती सती जाऊं लागली तेव्हां तिचा शाप विष्णूला सहन होईना. तेव्हां तिनें त्याला असा उ:शाप दिला कीं 'मी सती गेल्यावर माझे चितेवर एक तुळसीचें झाड उत्पन्न होईल, त्यासीं विवाह कर म्हणजे वियोगदु:ख शांत होईल.' याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याची शांति झाली—अशी कथा आहे. ५. मुर नामक दैत्याचा अरि. (कृष्ण.) ६. कडेवर. ७. चौऱ्याशीं लक्ष योनींत जन्म पावणें हे फेरे.

# अनंतकविकृत आणखी उपलब्ध झालेलीं काव्यें.

## सुलोचनागहिंवर.

### प्रसंग पहिला.

(श्लोक.)

श्रीमन्मंगलमूर्तिपादकमळीं अत्यंत प्रेमा मना,
अर्चूं सिंदुरगंध अक्षत फुलें दे इच्छिली [2]कामना, ।
लाडू मोदक मिष्ट, तांबुल मुखीं संतुष्ट दुर्वांकुरी
तो चिंता हरणार मी नमितसें [3]चिंतामणी ये परी. ॥ १

विनंती कवीची तुतें [4]ब्रह्मबाले ! जगन्मात आश्रा तुझा कीं दयाले ! ।
पवाडे मला गोड त्या राघवाचे, करावी तुवां प्रेरणा तेचि [5]वांचे. ॥ २

पाजिला गुरुवरें घुटका हो ! जाहली [6]भवभया सुटका, हो ! ।
भ्रांति [7]नीदं अवघीच उडाली, कल्पना समुळ हेचि बुडाली. ॥ ३

पाउनी कुमति या नरदेहा, रामकीर्ति वदनीं न वदे हा, ।
व्यर्थ माय शिणली अधमानें नेति त्या [8]निरय संनिध [9]माने. ॥ ४

हीन पातकि भजूनि अजाला वंद्य वाल्मिक ऋषी जगिं [10]जाला ।
वर्णिलें चरित जें शतकोटी अक्षरें [11]दुरित नाशिति कोटी. ॥ ५

रामासन्मुख जे [12]निशाचर रणीं लंकेंतुनी पातले,
ते नाहीं परतोनि रावणसभे भेटावया पावले; ।
वेळा चार जया करूनि समरीं [13]शक्रारि आला असे,
ऐसें जाणुनि [14]लंकनाथचि तया आज्ञा निरोपीतसे. ॥ ६

---

१. या आख्यानावरून आणि मागें गेलेल्या सुलोचनाख्यानावरून अनंताची रामायणकथापर कविता आणखी बरीच असावी असें वाटतें. 'सुलोचनागहिंवर' आणि 'सुलोचनाख्यान' हीं प्रकरणें कदाचित् एखाद्या मोठ्या सबंध काव्याचीं अंगें असतील असाही संभव आहे. २. मनोरथ. ३. चिंतित वस्तु देणारा मणि, इष्ट मनोरथ पुरविणारा देव. ४. हे सरस्वती! ५. वाणीला. ६. संसाररूप भयापासून. ७. नीज, निद्रा. ८. नरक. ९. जाणे, समजे. १०. झाला. ११. पाप. १२. राक्षस. (निशाचर='रात्रीं फिरणारा' हा यौगिक अर्थ असून 'राक्षस' हा रूढार्थ आहे.) १३. इंद्रजित् (मेघनाद.) १४. लंकनाथ=रावण=लंकानाथ.

‘पुत्रा! जाउनि एकदा [१]समरणीं ऐशा करी [२]लाघवा,
सर्वस्वें क्षय होय [३]वानरचमूमद्बांधवा **रा**घवा.’ ।
आज्ञा वंदुनि मस्तकीं सुत निघे बोले प्रतिज्ञा मुखें,
‘शत्रू निर्मुळ केलियाविण न यें, स्वामी! असावें सुखें.’ ॥ ७

**नि**[४]कुंबळे येउनि यज्ञशाळे शत्रुक्षया योजित तर्क चाले ।
[५]मायीक **सी**तावध हेतु जोडी हे देखुनी **रा**घव जीव सोडी. ॥ ८

वाढी **सु**मित्र कटकें कपिचीं निदानीं, जाती जसे दिनमणीकर अस्तमानीं।
ऐसें विचारुनि बसे [६]अभिचारकर्मी पूर्णागमी प्रविण राक्षस थोर धर्मी. ॥ ९

यज्ञीं [७]हवी [८]पिर्शित [९]शोणित तेचि [१०]सर्पी पूर्णाहुती पशुशिरें तितुकीं समर्पी; ।
कुंडांतुनी प्रकट मायिक रूप **सी**ता वेदीवरी बसवि उत्सव **इं**द्रजीता. ॥ १०

घण घण घण [११]भेरी घाव गाजे निशाणीं,
थर थर थर धाके कापला [१२]**व**ज्रपाणी; ।
घड घड रथसेना गर्जना देत आली,
गडबड बहु तेव्हां **रा**मसैन्यांत झाली. ॥ ११

दोहीं दळीं सजुनि भार उभे विरांचे,
जैसे प्रचंड वळले [१३]जिमुती [१४]निरांचे; ।
मध्यें नृपात्मज रथीं सह ते **वि**देही
तो भूमिके उतरुनी उतरीत तेही. ॥ १२

---

१. संग्रामांत. २. कौशल्या. (लाघव=शैघ्र्य, त्वरितपणा; सौष्ठव=चातुरी, केवळ एकच खड्ग सभोंवतीं फिरवून एकाच समयीं अनेक आयुधांचें निवारण करणें असें चातुर्य; शोभा=देदीप्यमान एकाच खड्गाची सर्व ठिकाणीं फांकणारी प्रभा; धीरत्व=स्थीरत्व; अभीतत्व; दृढत्व=दृढमुष्टिता. (नीलकंठ—भारतभावदीप—अध्याय १३४ श्लोक ३१.) ‘लाघव’शब्दाचा अर्थ कसा बदलला हें पुढच्या उताऱ्यावरून कळेल:—“चित्रें काढणें, नक्षीचें काम करणें वगैरे कुशलतेचें काम करण्यास हात हलका असावा लागतो; या गुणास हस्तलाघव असें म्हणतात, याचा अर्थ हस्तकौशल्य. यावरुन ‘लाघव’ शब्दाचा अर्थ ‘कौशल्य’ असा झाला. लाघव ज्यास आहे तो ‘लाघवी’ म्हणजे दुसऱ्याचें मन वळविण्यास चतुर असा अर्थ झाला, त्यावरून गोड बोलून काम करून घेणाऱ्या मनुष्यास ‘तो मोठा लाघवी’ असें म्हणतात.” (व्युत्पत्तिप्रदीप पृ० ५९.) ३. वानरसैन्ययुक्त आहेत बांधव (हितैषी बंधु) ज्याचे त्या (राघवा). ४. निकुंभिला=लंकेच्या पश्चिमभागवर्ती एक स्थान. ही इंद्रजिताची अभिचारकर्मभूमि होय. येथें त्यानें अनेक यज्ञ केले. ५. कृत्रिम. ६. जारणमारणादिक कर्म करणारा. ७. हवनद्रव्य. ८. मांस. ९. रक्त. १०. तूप. ११. नगारे. १२. इंद्र. १३. जीमूत=मेघ, ढग. १४. निरांचे=उदकांचे. (नीर=उदक.)

पाहे मारुति [1]जुत्पती [2]अवनिजा ते दाटली स्फुंदनें,
केशीं ओढुनि काढिली असिलता [3]लंकापतीनंदनें; ।
बोले 'वायुसुता! अरे वनचरा! हे तूमची जानकी
जेथें जाय तया घरीं लय करी, नेणा कसें ज्ञान कीं? ॥ १३

नृपा शांति केली न होऊनि [4]भाजा, विल्हे लाविला बाप पक्षिराजा, ।
विदेहासि चिंता इच्या सैंवराची प्रतिष्ठा बुडे तेथ लंकेश्वराची. ॥ १४

अयोध्येसि येतां नृपा जीवहाणी, जना दुःख, सासूंसि वैधव्य आणी, ।
महारण्य वस्ती तदा देवरासीं अभिःशाप नस्ताचि दे देवराशी. ॥ १५

अहो! शूर्पनख्यास्य वैरूप्य केलें, खरादूषणां मृत्युपंथेंचि नेलें, ।
[5]मारीची मरे, लागली दृष्टि ईची भिकारी करी [6]लंकनाथासि हेची. ॥ १६

जधींहूनि लंके हिचे पाय आले तधींहूनि दुःखी महालोक झाले. ।
क्षयो अक्षया, मारिला जंबुमाळी, अशोका वना शोकसंताप जाळी.॥ १७

लंकेसमान नगरी न दुजी त्रिलोकीं, जाळोनि भस्म, मुख शाम तुझें विलोकी, ।
खाणें पिणें न कपिला क्षुधि लाविलाची माथां कपीसि पडलीं टकलें शिळांची.॥

मेले [7]प्रहस्त [8]अतिकाय इच्याच पाईं, लंकेसि [9]नाडति सदा अगणीत गाई; ।
गेले [10]अहीमहि असे बळि हे प्रचंड, झाला रणांत [11]घंटकर्णहि खंड खंड.॥ १९

मी आणि मुख्य उरलों इतुकीचि बाकी अद्यापि हीत[12] तनुचें नुमजेचि बाकी, ।
होणार काय पुढलें न कळेचि आहे, याकारणें वधितसे इजलागिं पाहे. ॥ २०

[13]हीकारणें परम वैर तुम्हां अम्हांसीं, हे रावणा अमृतभोजनिं प्राप्त मासी.' ।
ऐसें वदोनि वधि मायिक रामजाया, गेलें उडोनि गगनीं शिर गुप्त काया.२१

ऐसें देखुनियां रघूत्तमदलीं आक्रोश सर्वा मुखीं,
'रे! सीता वधिली दशास्यकुमरें, श्रीराम कैंचा सुखी?' ।

---

१. युद्धपति, प्रतापशाली योद्धा, गाढा वीर. २. सीता. ३. मेघनादानें. ४. भार्या. ५. मारीच. मारीचनामक राक्षस सुवर्णमृगाचें रूप घेऊन सीतेपुढें आला. त्याला पाहून 'हा मला आणून द्या' असें सीतेनें रामास म्हटलें, तेव्हां तो त्याचे मागें लागला. इकडे रावणानें तापसवेषानें येऊन रामाच्या पर्णकुटींतून सीतेला उचलून नेलें. ६. रावणपुत्र. ७. रावणाचा मातुल व प्रधान. ८. रावणाचा पुत्र. याचें शरीर (काय) फार मोठें म्हणून त्यास असें नांव पडलें. ९. छळतात. १०. अनंतानें 'अहिमह्याख्यान' नामक स्वप्रणीत काव्यांत अहिमहि राक्षसांच्या वधाचें वर्णन केलें आहे. (मागें पृष्ठें २५-३५ पहा.) ११. कुंभकर्ण. १२. कल्याण. १३. या सीतेसाठीं.

सक्रोधें हनुमंत त्यावरि गिरी प्रेरूनि हेरी[1] तये[2]
तों धाकें विवरीं रथासह लपे, सेना समाधीस ये. ॥ २२
तेव्हां हेर निकुंबळे बिभिषण प्रेरी अशोका वना,
रामा सन्मुख ये मरुत्सुत जवें, शोकाग्नि जाळी मना; ।
सीतेचा वध ऐकुनी रघुपती मूर्च्छीत भूमंडळीं,
सौमित्रादिक जुत्पती विकळले[3], दुःखी कपीमंडळी[4] ॥ २३
येऊनी जवळी बिभीषण म्हणे, 'रे! धैर्य चित्तीं धरा,
कीजे[5] हा रघुराज सावध बरा, वारा निवारा करा, ।
शत्रूला कळतां अनर्थचि करी, मौन्यें उगें राहणें,
जाता एक निमिष्य[6] कौतुक कसें होईल तें पाहणें.' ॥ २४
वृक्षांच्या नवपल्लवें पवन ते रामावरी वारिती,
हस्तें पादतलें सुशीतल दिसे नेत्रांबु संस्कारिती, ।
नाडी प्राणदशेंद्रियें परतलें चैतन्य स्वस्थान कीं,
पाहे बंधुमुखाकडे वदतसे, 'हा! जानकी! जानकी!' ॥ २५
आले कोण सुहेर[7] ते खगपती श्रीराघवा वंदिती,
सद्वार्ता कथिती, 'अशोकविपिनीं स्वक्षेम माता सती, ।
केली राक्षसि माव[8] रावणसुतें मायीक भूनंदिनी,
निर्मूनी वधिली खळें मग बळें बैसूनियां स्यंदनीं[9].' ॥ २६
कपी सर्व आनंदले याचि बोला, रघूनायका हर्ष अत्यंत झाला, ।
वदे नैऋतेशां[10]! धनुर्बाणधारी, 'अशा दुःखसिंधूंत तूं कंठधारी.' ॥ २७
रामांघ्री नमुनी बिभीषण तया प्रार्थीत शेषाग्रजा,
'मायावि स्वबिजा दुरत्यय तुझी नेणे विरंची प्रजा; ।
स्वेच्छा नाचवि पूतळ्यारिति रिघे सूत्रीं तया मानवी,
स्वामी! तद्वद हा प्रकार करिता होऊनियां मानवी.' ॥ २८

---

१. पाही, टेहळी. २. तिला, त्या सीतेला. ३. विकळ झाले, कळाहीन, व्यथित झाले. ४. 'कपीमंडळी' हा समास चिंतनीय आहे. असे सामासिक शब्द अनंताच्या काव्यांत अनेक आढळतात, ते 'निरंकुशाः कवयः' या न्यायानें क्षम्य आणि आदरार्ह होत. ५. करा. [येथें **कीजे** हें रूप आज्ञार्थी म्हटलें पाहिजे; विध्यर्थी नव्हे.] ६. अल्पकाळ, निमिष. ७. उत्तम प्रकारें गुप्त बातमी काढणारे दूत. ८. माया, कपट. ९. रथांत. १०. राक्षसांच्या राजाला.

ऐशा प्रेमरसीं निमग्न असतां ते देवभक्त स्थिती,
आले हेर **नि**कुंबळेहुनि उभे वंदूनियां प्रार्थिती; ।
[1]**श**क्रारी विवरीं रथासहित जो गेला पळाला रणीं,
त्या मार्गेंचि **नि**कुंबळेप्रति निघे मायागुणी **रा**वणी. ॥ २९
**सी**ता मायिक मारिली विदित हे रामा, न बाधी व्यथा,
ऐसें जाणुनि राक्षसेंद्रतनयो प्रेत्नें पडे अन्यथा; ।
प्रार्थी शत्रुवधा प्रसाद अनळा शस्त्रास्त्र वाजीरथा,
आरंभी अभिचारयज्ञ सहसा हा प्रेत्न•नोहे वृथा. ॥ ३०
बोले **बि**भीषण मुखें **र**घुराजयासीं 'पावेल [2]राक्षस रथीं बैसल्या जयासीं, ।
हे आपणा परम दुःसह विघ्न बाधे, विध्वंसिजे मख, [3]तैया फळ जों न साधे. ३१
**सु**मित्रासवें द्या कपी **अ**क्षयारी, करूं विघ्न यागा, वधूं **वा**सवारी' ।
असें ऐकितां, त्या वदे **रा**मराजा, 'सवेगें उठा, वीर हो! संगरा जा'.॥ ३२
सर्वी [4]रामपदारविंद नमिलें, देणार जो कामना,
संग्रामीं निघतां पथीं सुशकुनीं आनंद केला मना; ।
सेना घेउनि राहिले **र**घुपती रात्रीं **सु**वेळे वरी,
साती वीर **नि**कुंबळे अतिजवें जाती सुवेळेवरी. ॥ ३३
**सौ**मित्र, **मा**रुति, **बि**भीषण बुद्धिवंत, तो **गं**धमादन [5]अतुर्बलि **जां**बुवंत, ।
युद्धोत्सवें [6]ऋषभ घे **श**रभासि नाचे हे वीर [7]सप्तक जसे भुज [8]पावकाचे. ॥ ३४
[9]इंद्रजीत [10]अभिचारिकधर्मा, शाहणा कुशल जो [11]क्रुरकर्मा, ।
कुंडमंडपविधी तरुशाखी मंत्र तांत्रिक [12]अथर्वणशाखी. ॥ ३५
[13]शक्रारिच्या [14]मनुजशोणित ते कपाळीं, रक्तांबरें कुसुम कुंकुम गंध भाळीं; ।
[15]प्रेतासनीं बसुनियां [16]रिपुमार [17]इष्टी संकल्प कल्पुनि पुढें [18]अनळा प्रतिष्टी. ॥ ३६

---

१. इंद्रजित. २. बसला असतां. ३. त्या इंद्रजिताला. ४. रामचरणकमल. ५. अत्यंत बलाढ्य. ६. नल, नील, वृषभ, अंगद, गवय, गवाक्ष, मैंद, पनस, केसरी, दधिमुख, द्विविद इत्यादि यूथपतींसह लक्ष्मण निघाला होता. ७. अग्नीला सात भुज (हस्त), सात ज्वाला, चार शृंगें, तीन पाद, दोन शीर्षें आहेत असें वर्णन आहे. ['चत्वारि शृंगा त्रयोऽस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासोऽस्य'– असें अग्निवर्णन आहे ] ८. अग्नीचे. ९. येथें छंदोभंग न व्हावा म्हणून 'जी' दीर्घ आहे. १०. जारण-मारणादिक कर्म (अभिचार) आहे धर्म ज्याचा असा. ११. 'क्रूर' शब्द मुद्दाम वृत्तसुखार्थ ऱ्हस्व केला आहे. १२. अथर्वण वेदाच्या शाखेंतील. १३. इंद्रजिताच्या. १४. मनुष्यांचें रक्त. १५. 'रक्तोदकें स्नान करोनी । रक्त वस्त्रें नेसला रावणी । सप्त प्रेतें पसरूनी । त्यावरी आसन घातलें ॥.' [रामविजय–अध्याय २९ ओवी ७६.] १६. ज्यांत शत्रूंचा मार (मरण) आहे असा. १७ याग, यज्ञ. १८. अग्नीला स्थापी.

मांसें असंख्य भरलीं पशुमाणसांचीं, पात्रें पुजार्चन परिस्तरणें वसाचीं,[१] ।
दिग्बंध शाकिनि[२] वरा वरणू समंधें[३] झोटिंग[४] भैरव भुतें उभि मूर्तिमंते. ॥ ३७
कुंडाप्रतीपरिघ[५] सप्तशिला उभारी, दुर्लंघ्य जे खगगती[६]हुनि उंच भारी; ।
तैसेंच राक्षस वरी मखरक्षणासी,[७] योद्धे विचक्षण रणांगणलक्षणासी. ॥ ३८

यज्ञाहुती दशशती[८] गणना प्रसिद्ध पूर्णाहुती प्रति शिरें[९] तितुकींच सिद्ध. ।
आवाहनें उभि हुताशनि[१०] मूर्ति केली, आरंभिला मख, मुखीं अवदान[११] झेली. ॥
बाऱ्हे बिभीत मुचकुंद कण्हेर काष्ठें ज्वाळा धडाडिति नभीं भयभीत दाष्टे; ।
दुर्गंधिमांसजलता मधु रक्तधारी धूम्रें दिशा गगन गुप्त सचंद्र तारा. ॥ ४०
होमितां नवशता[१२] अवदाना, पावली रजनि ते अवसाना;[१३] ।
शेषभाग पडतां मखतोंडीं, देखिला कनकस्यंदन[१४] कुंडीं. ॥ ४१
जों जों हुताशनमुखीं[१५] अवदान घाली, तों तों निघे रथ वरी उदयार्कचाली,[१६] ।
शस्त्रास्त्रसंग्रह दृढध्वज त्या पताका, घंटा सकिंकिणिरवें सुर[१७] घेति धाका. ॥ ४२
अर्धार्ध आलीं वरि चार चक्रें, जीं शक्रसैन्याप्रति काळचक्रें. ।
तों काढिती आनन[१८] कान वाजी,[१९] ज्याकारणें सारथि या नवा जी. ॥ ४३
गर्जती घनरवें[२०] हय[२१] जेव्हां, कांपते थरथरा मही[२२] तेव्हां; ।
स्पंद[२३] रावणसुता[२४] निज गोत्रा, आजि हे रिपुहिना[२५] करु गोत्रा.[२६] ॥ ४४
होतां प्राप्त निधान,[२७] जेंवि विवशी[२८] भक्षावयासीं उठे,
कीं[२९] येतां सधनें प्रवास करुनी स्वग्रामसीमें[३०] लुटे; ।
किंवा पीयुषभोजनांत्यकवळीं[३१] ये मक्षिका भक्षणीं
तैसी यागफळीं अनर्थ विवसी त्यां[३२] राक्षसा ते क्षणीं. ॥ ४५

---

१. वसा=चरबी, चर्मसार. २. पिशाची. ३. संबंध=समंध. ४. खवीस, जिंद, ब्रह्मराक्षस. ५. कुंडाच्या सभोंवतालची भिंत. ६. पक्षी. ७. यज्ञरक्षणार्थ. ८. एक हजार. ९. मस्तकें. १०. अग्नि. ११. आहुति. १२. नऊशें. १३. अंताला. १४. इंद्रजितानें ब्रह्मदेवास स्वतपश्चर्येनें संतुष्ट करुन त्याजपासून वरदान मिळविलें होतें. तें असें कीं निकुंभिला नामक यागभूमींत अभिचारिक होम यथासांग समाप्त करावा म्हणजे यज्ञाग्निकुंडांतून कामगामी अश्वांनीं युक्त असा रथ आणि ब्रह्मशिरोस्त्र नामक आयुध त्यास प्राप्त होईल व त्यांच्या योगें तो सर्वांस अवध्य होईल—या कथेचा येथें उल्लेख आहे. १५. अग्निमुखांत. १६. उदय पावणाऱ्या सूर्याच्या चालीनें. १७. देव. १८. तोंड. १९. घोडे. २०. मेघाच्या कडकडाटाप्रमाणें. २१. घोडे. २२. पृथ्वी. २३. कंप. २४. इंद्रजिताच्या शरीराला. २५. शत्रुरहिता. २६. पृथ्वी. २७. ठेव. २८. जखीण. २९. किंवा. ३०. आपल्या गांवाच्या सीमेवर. ३१. अमृतभोजनाच्या अंत्य कवळीं (शेवटच्या घासांत). ३२. त्या मेघनादाला.

आले [1]यागसिमे **सुमित्र**, **हनुमान्**, तों [2]धूम्र नेत्रीं भरे,
पोळी दुर्घट मान, मार्ग न दिसे, दुर्गंधि नाकीं शिरे; ।
ऐकोनी हय [3]हिंसतां **बिभिषणू** सांगे समस्तांप्रती,
'आला याग समाप्तिसीं फळरुपें, वाजी रथी हिंसती. ॥ ४६
कीजे विघ्न मखा, नसे जंव दिली पूर्णाहुती या जनें,
तोडा मंडप, कुंड मोडुनि हवी, फोडा [4]शुची [5]भाजनें, ।
ओढा [6]आसनिं **इंद्रजीत** उठवा, झोडा [7]शिळीं [8]स्यंदना.'
.................................................................. ॥ ४७

'नाहीं मार्ग' म्हणे **सुमित्र** 'रिपु तो लक्षावया [9]ईक्षणें,'
'फोडावें परिघा' **बिभीषण** म्हणे 'त्या तीक्ष्ग बाणें क्षणें; ।
मध्यें राक्षस झुंजती, रिपु घडी मागेंपुढें [10]आंतुडो
विघ्नार्थी **ऋषभासहीत** **हनुमान्** आकाशपंथें उडो.' ॥ ४८
[11]ऐकुंनी उडति वानर दोघे, लंघिती गगनिं वीर अमोघे; ।
आननीं **रघुपतीगुणसंथा** पावती [12]दिनमणीरथपंथा. ॥ ४९
फोडोनियां परिघ [13]वज्रशरें, **सुमित्रा** [14]संचारतां परम कोप चढे अमित्रा; ।
नानायुधीं करिति धांवुनि [15]चंड मारा, [16]पट्टीश [16]तोमर [16]गदा शर चक्रधारा.॥ ५०
सुचपल शर भाते झेलुनी आयुधा ते,
फिरुनि त्वरित मारी राक्षसां चंड घातें; ।
**बिभिषण** भुजदंडें मंडलाकार रंगीं
फिरवि निजगदेतें राक्षसां सैन्यभागीं. ॥ ५१
घे [17]**गंधमादन** शिला उचलुनि मौलीं, झोडूनि पाडति रिपूशिर चूर्ण मौली, ।
झोंबूनि राक्षसगणा [18]रिसराज पाडी, रोवोनि [19]तीक्ष्ण नखें उदरासि फोडी. ॥ ५२

---

१. यागभूमीच्या हद्दीवर. २. धूर. (धूम.) ३. खिंकाळतां, हेषारव करतां. ४. शुद्ध, पवित्र. ५. यज्ञपात्रें. ६. प्रेतासनावरून. ७.दगडावर. ८. अग्निकुंडांतून रथ बाहेर निघण्यापूर्वी यज्ञविध्वंस केला तरच मेघनाद वध्य होता. ९. नेत्रानें. १०. असो, मिळो, सांपडो. ११. स्वागता वृत्त. १२. सूर्याच्या रथाच्या मार्गाप्रत. १३. जोंपर्यंत यज्ञकर्म समाप्त झालें नाहीं तोंपर्यंत या रावणपुत्राचा इंद्राशनिप्रख्य शरांनीं वध कर—असा बिभीषणोपदेश होता. (युद्धकांड—सर्ग ८६ श्लोक ४-६.) १४. भिंत फोडून आंत प्रवेश करतां. १५. भयंकर. १६. हें आयुधाचें नांव. १७. एक वानर. १८. जांबवान्. १९. तीक्ष्ण.

**सौ**मित्र सज्जुनि धनू [१]शरजाळ सोडी, चेंडू जसे उडवि मस्तक लक्ष कोंडी; ।
संग्राम हा करुनि वीरें[२] पराक्रमानें ते भंगिती [३]परिघदुर्ग अनुक्रमानें. ॥ ९३
आलें अरिष्ट जवळीं मग राक्षसांनीं आरंभिला त्वरित जाउनि [४]शंख कानीं; ।
तो [५]रावणी अचळचित्त तयां न पाहे, [६]यज्ञीं समंत्रक करें [७]अवदान वाहे. ॥ ९४

[८]दोघे वानर ते उडोनि गगनीं [९]मौलीसिमा लंघिती,
तेथींच्या उखळोनि पाडिति [१०]शिळां यज्ञस्थळा भंगिती; ।
ज्वाळा धूम्रनभीं बळें उसळती झाले कपी घाबिरे,
सायासें **ह**नुमंत तो उतरुनी, त्या यज्ञशाळे फिरे. ॥ ९५
तोडी मंडप कुंड [११]पात्रसमुहो तो सर्वही फोडिला,
लत्ता हाणुनियां निघे रथमखीं तो आसनीं मोडिला ।
स्थानें सांडुनि दैवतेंचि पळती, वेतालभूतावळी,
[१२]नोहे चंचळ **रा**वणी, मखमुखीं मंत्राहुती दे वळी. ॥ ९६

व्योमींहुनी **ऋ**षभ पाहत [१३]शत्रुनिष्ठा, [१४]थुंके वरी, करिति [१५]मर्कट ते कुचेष्टा. ।
तैं **इं**द्रजीत न उठे, न [१६]मनी अशंका, पृष्ठीवरी करिति ते [१७]लघुदीर्घशंका. ॥ ९७
तो **रा**वणी सधिर यज्ञविधी न सोडी, प्रेतासना मग बळें **ह**नुमंत ओढी; ।
तेव्हां उठूनिच पडे अवनीं उताणा, कोपें उठे मग जसा [१८]मृगयूथराणा, ॥ ९८
[१९]वज्रमुष्टि दिधली **ह**नुमंता, पाडिला क्षितिसि [२०]अक्षयहंता; ।
मूर्च्छना बरिच ये, [२१]दृगें झांकी, ताडिला **ऋ**षभ तो [२२]चपडाकीं. ॥ ९९

---

१. बाणसमूह. २. वीराचें लक्षण असें:—'वीतरागभयद्वेषो रहितः सर्वसंश्रयैः । सर्वभूतानुकंपी च **वीर** इत्युच्यते बुधैः ॥'. ३. निकुंभिलेचा किल्ला आणि भिंत. ४. शंखध्वनि. ५. रावणपुत्र. (मेघनाद.) ६. यज्ञकुंडांत. ७. आहुति. ८. ऋषभ आणि मारुति. ९. पर्वतसीमा. (मौली=पर्वत, शृंगी, शिखरी.) १०. पर्वतशिखरें. ११. यज्ञपात्रसमुदाय. [अकारान्त नामें कवितेंत कधीं कधीं ऊकारांत अथवा ओकारांत होतात असें आढळतें.] १२. नोहे=नव्हे=न होय, न होई. ['नाहीं'बद्दल कवितेंत कधीं कधीं 'नोहे' असें रूप येतें—'बलवीर्यादि गुणांहीं भिन्नचि मी, उग्रसेन सुत **नोहे**'—मोरोपंत.] १३. इंद्रजिताची निष्ठा. १४. 'इंद्रजिताच्या पृष्ठीवरी । ऋषभ देहधर्मातें करी । यज्ञपात्रें फोडोनि झडकरी । होमद्रव्यें उलंडीत ॥.' [रामविजय—अ० २९ ओ० ८२.] १५. माकड. १६. आशंका न गणी, न मानी (अपायशंका अथवा अरिष्टशंका न मानी.) १७. लघुशंका=मूत्रोत्सर्ग, दीर्घशंका=विष्ठोत्सर्ग. १८. मृगयूथपति—सिंह. १९. कठिण मूठ. वज्रासारख्या मुष्टिप्रहारास. २०. अक्ष (रावणपुत्र) त्याचा हंता, वध करणारा. (मारुति.) २१. दृष्टि. २२. चपडाक=चपराक=चापट, थापड, चपाटी.

तों पांचही विरे[1] समूख[2] मारीत[3] आले, [4]संतापला मनिं मनोरथ व्यर्थ झाले; ।
'हा घातला **बि**भिषणें मज आजि घाला' आरूढला मग रथीं समरा निघाला.॥
संग्राम **रा**वणसुता नरवानरांसीं **रा**मायणीं श्रुतकथानक पुण्यराशी. ।
हे वेंचिती जन वृथा विषयानुसंगीं लोभी **अ**नंतकवि [5]**रा**मकथाप्रसंगीं. ॥ ६१

## प्रसंग दुसरा.

(श्लोक.)

[6]श्री**वा**ल्मिकीमुखसरोरुहसौरभासीं [7]झेंपावती भ्रमर जे नरदेहवासी, ।
ते चूकती [8]निरयकर्दमरौरवासीं चर्चा[9] कदापि न करी **य**मपूरवासी. ॥ १
घेऊनि **रा**वणसुतें चतुरंग सेना, सोडीत ये शरसमूह, रवी दिसेना. ।
विध्वंसिला मख, मनांतरिं दुःख डांजे, [10]अट्टाहास्य करि जेंवि [11]गंजारि गाजे.
तों **मा**रुती, ऋषभ, सावध शीघ्र झाले,
त्या **ल**क्ष्मणासमिप जाउनियां मिळाले; ।
दाही दिशा गवसुनी रिपु घेत आले,
पट्टीश तोमर करीं मुसळादि भाले. ॥ ३
[12]घटा घोर सेना हटा पेटलीसे, भटा मर्कटा संकटा नेटलीसे; ।
जटा पिंगटा मुक्त आरक्त डोळे, कठोरे सुरें टाकिती प्राण पोळे. ॥४
हयारूढ तों तातडी खड्गपाणी, रथारूढ तो [13]चंडकोदंडबाणीं, ।
वरी प्रेरिले भीमे[14] हस्ती बलांनीं प्रहारा बहू मांडिले शृंखलांनीं. ॥ ५
उपडुनि **ह**नुमंतें घेतला दीर्घशोखी,[15]
निरखुनि गजसेना विक्रमें ठाव[16] टाकी; ।
मिळवुनि धरणीसीं मांस [17]शोणीत अस्थी,
निवटुनि,[18] मग धाडी प्राण **वै**कुंठवस्ती. ॥ ६

---

१. वीर. २. संमुख, समोर. ३. मारीत. ४. मेघनाद संतापला. ५. या कथेचें वर्णन 'रामायणां'त असून 'रामविजयां'तही आहे व या प्रकरणास **श्री**धरानें 'सुलोचनागहिंवर' हेंच नांव दिलें आहे. ['निकुंभिलेसीं जाऊन । वानरीं होम विध्वंसून । शक्रजितासीं मारी लक्ष्मण । एकुणतिसाव्यांत हेचि कथा. ॥ १७८ ॥ तिसाव्यांत सुलोचनागहिंवर ।' रामविजय—अध्याय ४०.] ६. भगवान् वाल्मीकिकवीच्या मुखकमळाच्या सुगंधास. ७. झेंपावणें=उडी मारणें, झेंप मारणें, उडी टाकणें असा अर्थ कवितेंत आहे. ['गरुड झेंपावला सर्पावरी' असे प्रयोग काव्यग्रंथांत आढळतात.] ८. अनेक नरकांप्रत. ९. सले. १०. मोठ्यानें हंसणें. ११. सिंह गर्जे. १२. दांडगी. १३. भयंकर धनुष्य आणि बाण ज्याचे असा. १४. भयंकर. १५. मोठ्या शाखांचा वृक्ष. १६. तळ, ठिकाण. १७. शोणित=रक्त. १८. मारून.

[1]गंधमादन शिळा उचलीतो, लग्न लावुनि रथीं निजवीतो; ।
दे **बि**भीषण गदा असिधारा, पाववी त्वरित मुक्तिसि[2] वीरां. ॥ ७
प्रळय[3]अनळरूपा राक्षसा दुर्निवारा **वृ**षभ, **शर**भ, दोघे मर्दिती पायभारा; ।
निवटुनि निमिषार्धें सैन्यसिंधूचि सारा, निजरिपु जवळूनी दूर केला पसारा. ॥ ८
रमा[4] भाग्यहीना जसी शीघ्र सोडी, विरें जेथिचे तेथची लक्ष कोडी. ।
तदन्याय[5] **लं**केशपुत्रासि झालें, समूळीं दिसे सैन्यसिंधू निमाले. ॥ ९
पदीं **रा**मबंधू, रथीं **वा**सवारी, मनीं **जां**बुवंतासि संताप भारी, ।
फिरे देत, कावे[6] रथाचे अपाया, करी **रा**वणी व्यर्थ त्याचे उपाया. ॥ १०
सारथी, चपळ स्यंदन घोडे, जिंकिती पवन धांवति होडे[7]. ।
**ल**क्ष्मणा उचलुनी **ह**नुमंतें, खांदिया बसविलें गुणवंतें. ॥ ११
पदींचा रिपू वाहनीं उंच आहे, मनीं **मे**घनादा कधीं ते न साहे. ।
पिटी[8] सारथी वायुचक्री तुरंगा, जिंकी[9] सूर्यवाजी[10] शशीच्या कुरंगा. ॥ १२
सुमेरूहुनी वाढती तेथ पावे, धरी भूमि दाही दिशा शीघ्र धांवे, ।
कपी धांवले व्योमगर्भीं अगाधे, बहू हिंपुटी[11] **इं**द्र शत्रू न साधे. ॥ १३
प्रचंडा शिळा घे रिसाधीश[12] मुष्टी, त्वरें हाणितां काव्हली ब्रह्मसृष्टी[13]. ।
रथाची गती त्या झपेटींत आली, अकस्मात फावे जसा काकताली[14]. ॥ १४
पताकी रथा सारथी अश्व मारी, उडोनी पडे वेगळा **वा**सवारी. ।
चुरी हात चावीत ओष्टासि रोषें, कपी गर्जती **राम** श्री**राम** घोषें. ॥ १५
ठोकूनियां **बि**भिषणें भुजदंड मांडी, काढी गदा कठिण जे कुलिशासि[15] खंडी[16];।
बोले, 'अरे! कपटसिंधु! तुला अगस्ती[17] हा पातला समिप पूर्वज ज्या[18] **ग**भस्ती[19]. १६

---

१. या पद्याचें वृत्त 'स्वागता' आहे. २. जे वीर धारातीर्थीं मरण पावतात त्यांस मुक्ति वरते, अशी प्राचीन कवींची समजूत आहे. ३. प्रळयसमयींच्या अग्नीसारखें रूप ज्याचें त्याला. ४. लक्ष्मी, संपत्ति. ५. त्या न्यायानें. (तदन्याय–हा शब्द चिंतनीय आहे.) ६. कावणें=काव्हणें=क्षुब्ध होणें, खिजणें, चिडणें, तळतळणें, मनांत कढणें. ७. पैज. ८. मारी. ९. जिंकी. १०. सूर्याच्या घोड्यांला आणि चंद्राच्या मृगांला. (कुरंग=हरिण.) ११. कृपण, क्षुद्र. १२. जांबवान्. १३. सकल ब्रह्मांड. १४. काक जसा तालवृक्षाच्या शाखेवर अकस्मात् बसतो आणि त्याच्या डोक्यावर फळ पडून शाखा मोडून जाते तसा. १५. वज्रास. १६. तोडी. १७. अगस्त्यमुनि–हा मित्रावरुणाचा पुत्र. याचा कनिष्ठ भ्राता वसिष्ठ मुनि. इंद्राच्या शापानें वायु आणि अग्नि हे मृत्युलोकीं मित्रावरुणांपासून अगस्त्यवसिष्ठरूपानें जन्मास आले. मित्रावरुणांनीं आपलें तेज कुंभांत सोडिलें म्हणून यास 'कुंभयोनि' असें नांव पडलें. याच्या स्त्रीचें नांव लोपामुद्रा. कालकेय नामक असुर जनांस अत्यंत पीडा देत असत, तेव्हां यानें समुद्रोदकाचें शोषण करून त्या असुरांचा नाश केला. हा मोठा तपस्वी, विरक्त आणि तत्ववेत्ता होता. १८. लक्ष्मण. १९. सूर्य.

मारूनि तूज विजयें रणिं आज यासीं, भेटीस नेउं शिर हें रघुराजयासीं.' ।
मंदोदरीतनय तप्त [1]हुताशरूपी, दुष्टा म्हणे, 'न मरसीच बुडोनि कूपीं. ॥ १७
कुलांगार तो [2]काननीं [3]वंश जाळी, स्वगोत्रीं [4]कटाक्षानळें वंश जाळी. ।
तदन्याय तूं जन्मुनी ब्रह्मवंशीं, स्ववंशासि घालीसि रे! [5]रुद्रवंशीं. ॥ १८
कैसा करील [6]इभभंग [7]मतंगसेवा? वंदी [8]विहंगमकुलेश [9]भुजंगदेवा? ।
दृष्टांत तुल्य घडतां घडिसी कुकर्मी. कीं मानुषा स्वदनिं राक्षस दास्यकर्मीं? १९
[10]भ्रांता वडील [11]जनकासम अन्नदाता, त्याच्या अखंड मनिं चिंतिसि घातपाता; ।
सर्वाधमाधम तुसीं [12]उपमा न [13]साधू तूं [14]सुग्रिवाजवळि साजसि सिद्ध साधू.'॥ २०
बोले बिभीषण, 'अरे! जड मंदबुद्धि! रामा मनुष्य न [15]मनीं, सहसा त्रिशुद्धि; ।
प्रत्यक्ष हे [16]सगुणब्रह्म लिलावतारी, तारी स्वभक्त, [17]महिचा [18]खळभार वारी. ॥२१
मी सांगता स्वहित रावण दुःख मानी, तें भोगितां सकळ तें फल हे निदानीं, ।
साहे गदा म्हणुनि टाकिलि [19]सिंहनादें, तैं तोडिली निजगदें करिं मेघनादें.'॥२२
[20]झुंझार साधक वळी कपटी सुबुद्धी, मारील हों बिभिषणा ठकवोनि युद्धीं ÷
सौमित्र यास्तव तया करि पृष्ठभागीं, झाला पुढें समरणा सम ते विभागी. ॥ २३

सौमित्रें रिपु पाठिसी लपविला [21]शक्रारि चित्तीं पडे,
सक्रोधें धरुनी [22]शरासन मदें बाणासि जोडी पुढें; ।
[23]मौर्वीतें शर जोडुनी भुजबळें आकर्ण ओढीतसे,
दीक्षायुक्त विजें समंत्रक जपे संधान सोडीतसे. ॥ २४

एकाचे शतलक्षकोटि पडती ते कालदंडाकृती
[24]वर्मीं खोंचिति वानरां [25]समरणीं ती मानिती विकृती; ।
सौमित्रें धरुनी [26]स्वकार्मुक करीं [27]उर्वी ठणत्कारिली,
त्या नादें नभ कोंदलें, सुरगणीं चिंता तिरस्कारिली. ॥ २५

ओढूनि चाप रघुनंदन बाण सोडी, त्या [28]सायकां प्रसवले शतलक्ष कोडी; ।
त्या शत्रुचा विशिखमंडप सर्व तोडी, गात्रांतरीं शिरुनि [29]चौरवि रक्त गोडी. ॥ २६

---

१. अग्नीसारखा तापलेला. २. वनांत. ३. वेणु, कुल. ४. दृगनलानें, नेत्रवन्हीनें. ५. संहारकवंशांत. ६. इभाचा (गजाचा) भंग करणारा सिंह. ७. मतंगाची (गजाची) सेवा (चाकरी). ८. गरुड. ९. सर्पश्रेष्ठाला. १०. रावण. ११. पित्याप्रमाणें. १२. सादृश्यसाधन. १३. उत्तम, योग्य. १४. येथें वृत्तसुखार्थ 'ग्री' ऱ्हस्व आहे. १५. मानूं नको. १६. मूर्तिमान् देहधारी. १७. पृथ्वीचा. १८. दुष्ट जनांचा समूह. १९. मोठा घोष करून. २०. योद्धा. २१. इंद्रजित्. २२. चाप, धनुष्य. २३. धनुष्याचे दोरीतें. २४. मर्मभागीं. २५. समरांगणीं, समरीं, युद्धांत. २६. आपलें धनुष्य. २७. पृथ्वी. २८. बाणां. २९. पाजी.

रिपू छिन्न नोहेचि देखोनि शस्त्रा, त्यजी रावणी त्यावरी अग्निअस्त्रा. ।
भडाडीत दाही दिशा ज्वाल दाही, कपी पोळती बोलती [1]रामद्राही. ॥ २७

दशरथसुत वेगें [2]मेघधारास्त्र सोडी
[3]स्खलति बहुत धारा [4]दामिनी लक्ष कोडी; ।
कड कड कड शब्दें घोष त्याचा कडाडी,
गड गड गड गर्जे मेघ आकाल धाडी. ॥ २८

[5]शिळाकारा गारा घनसमुह जैसा पडतसे,
तरूशाखा साला फळ कुसुम पाला झडतसे; ।
तळीं शीळा वापी कुप नदि कदापी न कळती,
पशूपक्षी आदी [6]जिव जळसमाधीस मिळती. ॥ २९

लंके आणि निकुंबळे भय मनीं अत्यंत लंकेश्वरा,
ते काळीं पवनास्त्र रावणसुतें संयोजिलें सत्वरा; ।
[7]झंझा मारुत सूटला उडविलें मेघाचिया मंडपा,
सर्वांगीं थरकांप वानरविरां, [8]उत्थापना [9]पादपां. ॥ ३०

धूलीनें नभ कोंदलें; [10]रज दिशा पाहों न देती कदां,
सौमित्रा कपि प्रार्थिती जिव 'जिवें' या संकटीं एकदा; ।
शैलास्त्राप्रति प्रेरिलें समरणीं रामानुजें ते वडी;
आकाशीं शिखरें अशा गिरिवरी पंक्ती किजे देव्हडी. ॥ ३१

तो कोंडला पवन, सावध वीर झाले, [11]मंदोदरीतनय फार पुढेंचि चाले; ।
वज्रास्त्र टाकुनि करी शत चूर्ण [12]शैलां, [13]मोहें धरी स्वउदरीं सुतसिंधुचैला.॥ ३२
संहारिले [14]अचल वर्षति वज्रधारा, संत्रस्त वानर तया कठिण प्रहारा; ।
ब्रह्मास्त्र मंत्रुनि रणीं मग रामबंधू सोडी सवेंचि रणपंडित [15]वीर्यसिंधू. ॥ ३३
बळें तुल्य शस्त्रास्त्रि विद्यापणाचा, महाघोर संग्राम दोघांजणांचा; ।
विलोकावया कौतुका चित्त तोषें, विमानीं नभीं दाटली वाद्य घोषें.॥ ३४
नभीं सर्वही [16]स्वर्गवासी विमानीं, दिशा कोंदल्या दिव्यदिक्पालयानीं; ।
भुकेल्या उभ्या भोंवत्या भूत फौजा, महींमंडळीं पाहती युद्ध मौजा.॥ ३५

---

१. रामनामाचा जयघोष. २. पर्जन्यास्त्र. ३. ढाळतात, पडतात. ४. रज्जु. ५. दगडाच्या आकाराच्या गारा. ६. जीव, प्राणी. ७. वात्या; झंझा=मोठा वारा, तुफान, वादळ; मारुत=वारा. ८. उपटून पडणें, उलटणें. ९. वृक्षांना. १०. धुळीचे कण. ११. मंदोदरीचा पुत्र (इंद्रजित्). १२. पर्वताला. १३. मायेनें. १४. पर्वत. १५. शौर्यसागर. १६. देव.

वृत्रासुरा [1]सुरपती, त्रिपुरा [2]पुरारी, त्या [3]भार्गवार्जुन, मधूमुरुसीं [4]मुरारी, ।
चंडी प्रचंड करि खंडन चंडमुंडा, कीं [5]सिंदुरासुर करी रण वक्रतुंडा. ॥ ३६
जालंधरादि समजे बहु [6]आन राजे, युद्धासि यापरि कदा उपमा न साजे. ।
विद्यासमान बळ विक्रम कोप ज्यांचा, सीमा नव्हे जय पराजय नेम त्याचा. ३७
ब्रह्मास्त्र कोटि [7]चपलासम ते कडाडी, ब्रह्मांडगोल [8]धरणी [9]सगिरी खडाडी; ।
वाराह दाट कचके [10]फणि मान भारे कूर्मा भरे उसवणी धरि काळ शारे. ॥ ३८
ते दिव्य नेत्र जरिही न शकेचि लक्षूं, [11]झांकोळवी सकळ दीपुनि चर्मचक्षू; ।
विच्छिन्न होति [12]कुलिशें, [13]द्युति त्या न साहे, संभ्रांत [14]वासवरिपू क्षण एक राहे. ३९

निवारूं तो नेणे, त्यजित मग ब्रह्मास्त्र समरीं,
उभौ तेजांभेटी घटलि करि जे चित्र अमरीं; ।
न वन्ही वन्हीते दहित पवना या उडविती,
तसी अस्त्रें अस्त्रा, उदक उदकीं केंवि बुडती? ॥ ४०
तेजीं तेज मिळोनि लोपति जसी गाजे विझे [15]चंचला,
दोघेही [16]वश जाहले [17]रणमदें अत्यंत [18]कोपानला; ।
मंत्रें मंत्रुनि रावणी त्यजि रणीं रौद्रास्त्र तें योजुनी,
ते काळीं रण रौद्र[19] तें पसरलें दाही दिशा व्यापुनी. ॥ ४१
पृथ्वीसी पद, मूर्धनीं नभिं दिसे श्मश्रू जया पिंगटा,
वन्ही नेत्र पुढां तदन्त विकटा दाढा मुखीं [20]दांसटा; ।
जिव्हा भ्यासुर [21]आननीं पसरली त्रैलोक्य भक्षावया,
रूपें नग्न, बिभत्स, कर्कश [22]गिरा [23]पिंगाक्ष देती भया. ॥ ४२

---

१. इंद्र. [यानें वृत्र नामक असुराचा संहार केला म्हणून याला वृत्रारि, वृत्रनिषूदन असें नांव आहे.] २. महादेव. ३. भार्गवरामाला सहस्रार्जुन (कार्तवीर्य.) ४. मुरनामक दैत्याचा अरि. (कृष्ण.) ५. सिंदूर—हा असुर ब्रह्मदेवाच्या जांभईपासून उत्पन्न झाला. याचें सविस्तर वर्णन गणेश-पुराणांत आहे. [गणपतिराव हरिहर पटवर्धन ऊर्फ बापूसाहेब कुरुंदवाडकर यांनीं केलेला ग्रंथ—गणेश-पुराण आर्या—उत्तरार्ध पृष्ठ १७२-१९४ पहा.] ६. अन्य. ७. वीजेप्रमाणें. ८. पृथ्वी. ९. पर्वतां-(गिरीं)सह. १०. सर्प (शेष). ११. झांकोळणें=आच्छादित होणें किंवा करणें. १२. कुलिश=वज्र. १३. प्रकाश. १४. इंद्रजित्. १५. वीज. १६. स्वाधीन. १७. संग्रामाभिमानानें. १८. क्रोधाग्नीला. १९. भयंकर. २०. भयंकर, अक्राळविक्राळ. २१. मुखांत. २२. वाणी. २३. ज्यांचे डोळे (अक्ष) पिंगट वर्णाचे आहेत असे वानर.

सौमित्राप्रति प्रार्थिती, 'प्रभु! महा वैरी मिळाला हटी,
वीरा[1] एक कंचाट[2] तो शतगुणें घाली पुन्हा संकटीं; ।
जाले आय[3] न मानसीक समरें पूर्वीं बहू पाहिलीं,
ऐसी ख्याति परंतु दुर्धर रणीं कोणी नसे दाविली. ॥ ४३
आतांचें दिसतें महा कठिण हें संहारकारी[4] जिवां;
कैं देखों रघुराजपादकमळें कीजे विनंती शिवा; ।
सोडी दाशरथी सवेंग मग तो भस्मासुरास्त्रा रणीं,
एकाएक उभे असंख्यचि असे विस्तारिले लक्ष्मणीं. ॥ ४४
महाकाल विक्राल भस्मांग वेशी, जटा पिंगटा रुळती[5] भूमिदेशीं, ।
जसा चंद्रसूर्याप्रती येत राहू, तसा भस्म रुद्रा उभारूनि बाहू. ॥ ४५
बघोनी भस्मातें पळति अवघे रुद्र समरीं,
ठिवो येती दैत्या शचिवर अरीच्या कर शिरीं; ।
मनीं जाणे वर्मा धरुनि धनुषा सोडित शरा,
तशी वारी बाहू चिरुनि तुकडे पाडित करा. ॥ ४६
गेल्या समस्त विलया[6] रणि भस्म एकी,
सौमित्र लाघवचि[7] थोर करी असें कीं, ।
ओढूनि चाप शर मारित शत्रुवर्मीं
तो ऊसणे त्वरित फेडित क्षात्रधर्मीं[8]. ॥ ४७
शरीरें दोघांच्या कठिण शरमारें चुबकती,
व्यथा ते सर्वांगीं बहु रुधिरधारा[9] ठबकती; ।
वसंतीं ते जैसे पळस विपिनींमाजि[10] फुलले,
विरश्रीच्या माजें रणिं रणमदें देह भुलले. ॥ ४८
तनू[11] हे काळाच्या वदनिं पडली नित्य चघळी,
न साधू कां वेगें दिसत जनते मुक्ति सगळी. ।
कराव्या कां यात्रा[12] जननिजठरींच्या घडीघडी?
अशा बुद्धीं योद्धे वरितिच सदा मुक्ति उघडी. ॥ ४९

---

१. निवारण करता. २. संकट. ३. 'आय न मानसीक' हा अपपाठ दिसतो. शुद्ध पाठ कोणी शोध करून पाठविल्यास उपकार होतील. 'आय'चे ठिकाणीं 'हाय' असें तर नसेलना? ४. संहार करणारें (समर). ५. लोळतात. ६. नाशाला. ७. कौशल्य, हस्तचापल्य. ८. क्षत्रिय धर्माला अनुसरून. ९. रक्ताच्या धारा. १०. अरण्यांत. ११. देह. १२. पुनः पुनः जन्मास येणें.

सुमित्रें भातींचे नवशर शिंतीं[1] शीघ्र जडले,
ग्रहांचीं ते रूपें बहु दिवस बंदींत पडले; ।
उदो[2] केला भाग्यें रघुविरकरें प्राप्त सुटका,
सुरारीचे भातीं बसुनि गिळिती रक्तघुटका. ॥ ९०
शरीं केलें भेदा कठिणचि कुशातुल्य[3] निढळीं[4],
पिसारे बाहेरी, दिसति गिरकी नेत्रपडळीं. ।
पडे झोके भूमी, लवकरि पुन्हा सावध धरी,
स्मरे गौरीकांता, शिव! हर! मुखें चिंतन करी. ॥ ९१
भात्यांतुनी उपशिले शर तीन भारी, ते अग्निदत्त[5] भुवनत्रय दाहकारी[6], ।
ज्वाळामुखी निघति सायक[7] सज्जचापा, विष्णू, विरिंचि[8], शिव मानिति ज्या प्रतापा
सूटतां शर कडाडित आले, कांपले अचल[9], भूसुर[10] भ्याले; ।
लक्ष्मणा निढाळिं[11] रूपति घातें, इंद्रियें विसरलीं[12] चलनातें. ॥ ९३
रणीं मूर्च्छना लक्ष्मणा शत्रुबाणीं[13], हहाकार[14] केला बहू वानरांनीं; ।
सुरांमाजि[15] कोल्हाळ झाला विशेष, अहो! राक्षसें पाडिला मुख्य शेष[16]! ॥ ९४
शक्रारिमस्तकिं[17] बिभीषण खड्ग टाकी, खंडी शिरें जसि शिळे करि भेद टाकी; ।
युद्धीं उचीत चुलत्या[18] शरपांच धाडी, भेदूनिया हृदयपंकज[19] भूसि[20] पाडी. ॥ ९५
जिव्हारीं[21] शर भेदिता बिभिषणा शाखी[22] तसा उन्मळे,
कंठीं घुर्घुरता वमीत रुधिरा[23] नेत्रार्ध चंद्रीं मिळे; ।
टाळी पीटुनि हास्य ऊर्ध्वचि करी नाचे उडे रावणी[24];
झाला सावध ऊर्मिलावर[25] म्हणे, 'दुर्नाम[26] आहे रणीं. ॥ ९६
ज्या कर्मा मि बहूत भीत असतां तें पातलें प्राक्तना[27],
झाल्या अंत बिभीषणा मुख कसें दाऊं[28] रघूनंदना?' ।

---

१. धनुष्याच्या दोरीवर. २. उदय. ३. दर्भाप्रमाणें. ४. कपाळावर. ५. अग्नीनें दिलेले. ६. तीन लोकांचा दाह करण्यास समर्थ असे. ७. बाण. ८. ब्रह्मदेव. ९. पर्वत. १०. विप्र, ब्राह्मण. ११. मस्तकीं. १२. चलनवलन व्यापार बंद पडले, बेशुद्ध लक्ष्मण पडला. १३. इंद्रजिताचे बाणांनीं. १४. हहाकार=हाहाकार, आकांत, अनर्थ, 'हा' 'हा' (हाय हाय) असा आराव. १५. देवांत. १६. लक्ष्मण हा शेषाचा अवतार म्हणून शेष असें त्यास येथें म्हटलें आहे. १७. शक्र+अरि, इंद्राचा शत्रु (इंद्रजित्). १८. बिभीषणाला. १९. कमलासारखें हृदय (अंत:करण). २०. भूमीवर. २१. मर्मस्थानीं. २२. वृक्ष. २३. रक्त. २४. रावणाचा पुत्र (इंद्रजित्). २५. लक्ष्मण. २६. अपजय, दुर्लौकिक. २७. दैवाला. २८. दाखवूं.

**सौ**मित्रा विनवी [1]रिसाधिप, '[2]रिपूग्राहिक जीवा खरा,
विद्या काय निदानिंची असल ती ते खर्च वेगीं करा.' ॥ ५७
शस्त्रास्त्रें शर वेचिलें खडबडी भाता रिता पाहिला,
त्यामध्यें **र**विचक्रबाण तितुका तो एकला राहिला; ।
काढूनी मग वंदिला [3]स्वनिडलीं **सू**र्या दिसे जावळी,
बाणाग्रीं लिहिला समंत्रक बिजें श्री**रा**मनामावळी. ॥ ५८
[4]कोदंडा चढवोनि सायक [5]गुणीं **सौ**मित्र प्रार्थीतसे,
बाणीं ते **र**घुवीरसत्यमहिमा सत्य त्रिवाचा असे. ।
त्याचा [6]अंकित मी उपासकमनें [7]अनन्यभावें जरी,
या बाणें तरि आजि मस्तक पडो **श**क्रारिचें भूवरी. ॥ ५९
आकाशीं **र**विबिंब नित्य उगवे, प्रत्यक्ष **वि**ष्णू खरा,
त्याचे वंशपरंपरा नरपती पाळीत आले [8]धरा; ।
धर्मात्मे अतिपुण्यवंत जगतीं ते सत्यवादी जरी,
या बाणें तरि आजि मस्तक पडो **श**क्रारिचें भूवरी. ॥ ६०
[9]वंशींच्या [10]वनिता पतिव्रतपणें तें पुण्य साह्या असो,
ज्येष्ठाच्या वचनासि भंग सहसा झाला कनिष्ठें नसो; ।
माता सत्य, तसा [11]पितामहपिता, कन्या [12]सुशीला जरी,
या बाणें तरि आजि मस्तक पडो **श**क्रारिचें भूवरी. ॥ ६१
जे कां [13]निर्गुण निःप्रपंच, [14]निगमीं ॐब्रह्म [15]संज्ञा जया,
तो श्री**राम** [16]लीलावतारि सगुणी [17]भूभार वारावया; ।
**सी**ता हे [18]प्रकृति **अ**शोकविपिनीं ते [19]निष्कलंका जरी,
या बाणें तरि आजि मस्तक पडो **श**क्रारिचें भूवरी. ॥ ६२

---

१. जांबवान्. २. शत्रु प्राण घेणारा खरा आहे यास्तव. ३. आपल्या मस्तकीं. ४. चापा. ५. धनुष्याच्या दोरीवर. ६. सेवक. ७. एकनिष्ठपणानें, एकाग्रचित्तानें. ८. पृथ्वी. ९. रविकुलांतील. १०. स्त्रिया. ११. आजा (अजराजा). १२. उत्तम स्वभावाची. १३. गुणरहित; (पक्षीं) परमात्मरूप. १४. वेदांमध्यें. १५. नांव. १६. लीलेस्तव देह धारण करणारा. १७. पृथ्वीवरील दुष्टजनांचा भार. १८. सीता (प्रकृति) आणि राम (पुरुष). [प्रकृति पुरुष हे शब्द सांख्यमतात अनुसरून आहेत.] १९. निर्दोष, पापशून्य.

देवांचे[1] अवतार वानरचमू, मी शेष वाहें धरा,[2]
ब्रह्मा हा, रिसराज, वायु हनुमान् तो ब्रह्मचारी खरा; ।
जे भावी[3] शतकोटि वाल्मिकिमुनी ते सत्य वाणी जरी,
या बाणें तरि आजि मस्तक पडो शक्रारिचें भूवरी. ॥ ६३

हा शत्रू न मरेचि आजि, तरि हे पृथ्वी न वाहे मला,
बाणा! तूं फिरसी रितें,[4] शपथ तैं श्रीरामजीची तुला;' ।
ऐसें बोलुनि सोडितां शर, निघे मार्तंड[5] व्योमीं[6] दुजा,
'सौमित्रा जय दे' सुरेश[7] विनवी अर्पूनि पुष्पें पुजा.[8] ॥ ६४

चापा लावुनि बाण रावणसुतें संधान जों जोडिलें,
तो आला रविचक्रबाण गगनीं, कंठस्थळा फोडिलें; ।
तों खंडे भुजदंड दक्षिण, शिरा, आकाशपंथीं उडे,
गेला बाहु[9] निकुंबळेवरि पहा! राजांगणीं तो पडे. ॥ ६५

स्वर्गीं मस्तक तें चढे, तंव पळे देवेंद्र तो तेक्षणीं,
राहू चंद्रदिवांकरा,[10] शिर तसें हें होय आम्हां क्षणीं.[11] ।
कैंचा लाभ पुढें? रघुत्तम परब्रह्म स्वयें भूतळीं,
घेऊं दर्शन तें म्हणोनि उतरे जेथें कपीमंडळी. ॥ ६६

आलें मस्तक पाहती रिसकपी आकाशिचें पोकळीं,
पृथ्वीसीं पडला किरीट[12] कबरी[13] विस्तारिली मोकळी; ।
रक्तें खांड मिशा ग्रिवा लवथवी[14] दाढा मुखीं भ्यासुरा,[15]
तेकाळीं वरिच्या वरी ऋषभ[16] घे झेलूनि हातीं शिरा. ॥ ६७

---

१. वानरचमू (वानरांचें सैन्य) ही देवांश होय. [इंद्राचा पुत्र वाली, सूर्याचा सुग्रीव, बृहस्पतीचा तार, कुबेराचा गंधमादन, विश्वकर्म्याचा नळ, अग्नीचा नील, वरुणाचा सुषेण, पर्जन्याचा शरभ, वायूचा हनुमान्, अश्विनीकुमारांचे मैंद व द्विविद, आणि जांबवान् ब्रह्मदेवाच्या जांभईपासून झालेला—असें वर्णन आहे. रामायण—बालकांड—सर्ग १७ श्लोक ७-१७.] २. पृथ्वी मी वाहतों. ३. मानी. ४. रिकामा, निष्फळ, मस्तक घेतल्याशिवाय. ५. सूर्य. ६. आकाशांत. ७. इंद्र. ८. वृत्तसुखार्थ 'पुजा'शब्द ऱ्हस्व केला आहे. ९. इंद्रजिताचा बाहु. १०. सूर्याला. ११. तत्क्षणीं, लागलेंच. १२. मुकुट. १३. केशकलाप. १४. लवलवीत. १५. भयंकर. १६. ऋषभ=रामाच्या सेनेंतील एक वानर. [इंद्रजिताचें मस्तक रामास दाखविण्यासाठीं वानरांनीं सुवेलाचलावर नेलें—अशी कथा आहे. रामायण—युद्धकांड—सर्ग ८६-९२ पहा.]

शत्रूमस्तक हस्तकीं जरि चढे, तैं जन्मसाफल्यता,
जे गर्भश्रम जाहले जननिसीं त्याची हि उत्तीर्णता; ।
ते हे धन्य घडी[1] सुमित्रचि तया जो दीप भानूकुळीं,
केलासे जयकार शब्द अमरीं[2] वर्षोनि पुष्पांजळी. ॥ ६८
प्रेताच्या दरडी अशुद्धसरितासेवाल[3] वाहे जटा,
मासें कर्दम[4] माजला अतिशयें रक्तोदकींच्या तटा; ।
वाजी वारण[5] सावजें[6] तळपती[7] दंतास्थि वाळू खडे.
ऐसी देखुनि ते बिभत्स सरिता[8] भ्याडासि भ्रांती पडे. ॥ ६९
मुष्टी चाप कबंध, लिप्त रुधिरें,[9] धैर्यें उभा रावणी,
पीती शोणित,[10] मांस भक्षिति मुखें, भूताघरीं पारणीं,[11] ।
केलें सावध लक्ष्मणें बिभिषणा, आनंद गोलांगुला,[12]
गर्जोनी 'जय राम!' वीर विजयी आले सुवेळाचळा.[13] ॥ ७०
आले धांवुनि रामसन्मुख पुढें सुग्रीव सेनापती,
सौमित्रादिक मारुती रघुविरा लोटांगणें[14] वंदिती. ।
श्रीरामें कवटाळुनी सकळिकां आलिंगिलें ह्न्वटीं,
'माझा लक्ष्मण आणिला जिववुनी, तारू तुम्हां संकटीं'. ॥ ७१
दावी मस्तक हस्तकें ऋषभ तो रामापुढें लक्षिती,
बोले, 'धन्य असा पराक्रमि पुढें होणार नाहीं क्षितीं.'[15] ।
तेव्हां राम वदे कपींस सकळां, 'सांभाळुनीयां शिरा,
ठेवावें बहु यत्न तो करुनियां, कार्यार्थ आहे बरा.' ॥ ७२
वृक्षाच्या नवपल्लवीं[16] रचुनियां शय्या सुमित्रा वरी,
आरोग्यार्थ सुषेण वैद्य सुमती पाचारिला सत्वरीं; ।
तेणें देउनि ओषधी सकळिकां केलें शरीरीं सुखी,
आनंदें कपि गर्जती 'जय जय श्रीराम!' सर्वांमुखीं. ॥ ७३

---

१. घटिका. २. देवांनीं. ३. रक्तनद्यांचा शेवाळ. ४. चिखल. ५. हत्ती. ६. श्वापदें. ७. चमकतात. ८. नदी. ९. रक्तानें माखलेला, चोपडलेला. १०. रक्त. ११. भोजनें. [व्रत समाप्त झाल्यावरचें भोजन.] १२. वानरांना. १३. सुवेल नामक अचलातें (पर्वतातें). १४. साधु, देव, इत्यादि प्रीत्यर्थ आडवें पडून चक्रासारखें लोटत जाण्याची जी कृति तिला 'लोटांगण' म्हणतात. १५. पृथ्वीवर. १६. नूतन कोंवळ्या पाल्यानें.

दुश्चिन्हें बहु देखुनी सुख नसे लंकेंत लंकेश्वरा,
दुःस्वप्नें अतिबावरी रडतसे मंदोदरी सुंदरा. ।
जाती [1]दीप निकुंबळेप्रति लया [2]सस्नेहवर्ती जया,
शेषाची [3]तनया जशी अनसुया चित्तांत मानी भया. ॥ ७४

## उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

त्रैलोकीं अतिपुण्यपावन महा रामायणीं हे कथा,
श्रोते सादर आयकोत, [4]हरिते दारिद्र्यदोषव्यथा. ।
गोष्टी नावडती अनंतकविला ज्या लौकिकीं [5]बोंगळा,
गातां रामकथा निरंतर तुटे [6]संसारमोहार्गळा. ॥ ७५

---

## प्रसंग तिसरा.

(श्लोक.)

प्रपंची महा आवडी काळ कंठी, अकस्मात येतो बसे काळ कंठीं; ।
पुन्हा जन्म मृत्यू नको यातना ही, भजे रामचंद्रा, चुके यांत नाहीं. ॥ १
इंद्रजीत वधिला [7]जगजेठी, पावले शिर रघूत्तमभेटी; ।
राहिले धड उभे रणभूमीं, मंडलें फिरत ये भुज व्योमीं. ॥ २
निकुंबळा सुंदर राजधानी, शोभा जिची शेष विशेष मानी; ।
पराक्रमी रावणपुत्र राजा, सुलोचना वल्लभ ज्यासि भाजा. ॥ ३
[8]स्नुषारत्न त्या रावणें यत्न केले, त्रिलोकीं विलोकावया हेर गेले; ।
न येती मना ज्या वधू धन्यधन्या, प्रयत्नें [9]वरी नोवरी शेषकन्या. ॥ ४
अहो! जीपुढें [10]उर्वशी नृत्यकारी, जिचे शुश्रुषे देवगंधर्वनारी; ।
पलंगीं स्वशय्येवरी चित्रशाळे, सुखें सेविती शेष कीं शेषबाळे. ॥ ५

---

१. दिवा आपोआप विझणें हें अपशकुनसूचक समजतात. २. तेल व वात ज्यांत आहेत असे (दीप). ३. सुलोचना. ४. हरण करते. ५. बाष्कळ, बालिश, निष्फळ, तुच्छ. ६. संसाररूप मोहाची (भ्रमाची) अर्गला (प्रतिबंधदंड). ७. जगजेठी=जगज्ज्येष्ठ=अत्यंत बलवान्. ८. उत्तम सून मिळण्यासाठीं. ९. पसंत करी, स्वीकारी. १०. उर्वशी—नरनारायण मुनींच्या ऊरुसमीपस्थ भागापासून (मांड्यांपासून) उत्पन्न झाली म्हणून या स्वर्वेश्येस 'उर्वशी' असें नांव इंद्रानें ठेविलें. हिची कथा पुराणांत वर्णिली आहे ती:—बदरिकाश्रमीं राहून तप करणाऱ्या नरनारायणांचें इंद्रास भय

मर्दिती पदतळें तळहातें, विंजणे[1] विजेति[2] शीतळ वातें, ।
एक हेमकुपिका मधुमोदें, एक गीतनटहास्यविनोदें. ॥ ६
एक नीट करि कुंकुम लेणी, एक काजळ, विडा, फणि, वेणी. ।
वस्त्रपात्र सह ये पिकधारी, एक झारित सुशीतळ वारी[3]. ॥ ७
पादुका धरुनि तिष्ठति एकी, अंगभार करणार अनेकी. ।
एक ते चतुर श्रोत्रमनाची, जांभईस चुटकी सकळांची. ॥ ८
एक उंच शुभदर्पण[4]धारी, दे विड्या, कनकचामर वारी, ।
एक गंध कुसुमें उपचारी, राजकाज गुज एक विचारी. ॥ ९
सुखामाजि या दुःख तीतें घडे हो! सुधाभोजनीं वीष जैसें पडे हो! ।
नभीं हिंडतां कांतबाहु[5] प्रचंड, पडे अंगणीं, तो जसा काळदंड[6]. ॥ १०
आदळे सदनिं[7], भूमि दणाणी, हीरकंकण[8] करांत खणाणी, ।
नाद तो उमटला श्रुतिकाला, ऊठली दचकुनी फणिवाळा; ॥ ११
'पहा अंगणीं वाजलें काय भारी,' असें ऐकितां धांवती वेत्रधारी; ।
विलोकोनि पद्मानननेची सपद्मी, उभ्या प्रार्थिती जोडिल्या हस्तपद्मी. ॥ १२
न जाणेचि कोण्या क्षितीनायकाची[9] भुजा[10] खंडिलीसे क्षतें[11] सायकाची ।
रिता ठाव ना शोणितांनीं जियेचा, पडे अंगणीं आपुल्या नाद तीचा. ॥ १३
[12]ने जाणे कीं स्वर्गीं असुरसुरसंग्राम घडला,
तुटोनी हा त्यांचा भुज महिस येवोन पडला; ।

---

पडलें. तेव्हां त्यांस विघ्न करण्यासाठीं इंद्रानें वसंत, काम आणि देवांगना यांस नित्याप्रमाणें पाठविलें. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें अप्सरांनीं त्या ऋषींला भुलवून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते काष्ठलोष्ठाप्रमाणें अगदीं निर्विकार होते. याप्रमाणें त्या सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. तेथील स्त्रियांचें लावण्य पाहून काम आणि अप्सरा यांस लाज वाटली. तेव्हां त्यांनीं परत स्वर्गास जाण्याचा बेत केला. हें जाणून नरनारायणांनीं 'इंद्रासाठीं आश्रमांतील स्त्रियांपैकीं एकीस घेऊन जा,' असें सुचविलें. तेव्हां त्यांनीं ऊरुसमीपस्थ स्त्री पाहिजे अशी इच्छा दर्शविली, ती नरनारायणांनीं आपल्या तपःप्रभावानें पूर्ण करुन उर्वशीला त्यांजबरोबर पाठविलें. (भागवत–स्कंध ११ अध्याय ४ पहा.)

१. पंखे. [व्यजन, व्यज=विंझणा, पंखा.] २. वारा घालतात. ३. पाणी. ४. दर्पण=आरसा. ५. कांताचा (वज्रभाचा=इंद्रजिताचा) बाहु. ६. यमदंड. ७. घरांत. ८. हिऱ्याचीं कांकणें. ९. राजाची, पृथ्वीपतीची. १०. 'दोः प्रकोष्ठो भुजो बाहुर्भुजा च स्मर्यते बुधैः' इति वैजयंती. [शिशुपालवध–सर्ग ७ श्लोक ७१ टीका पृष्ठ २२५ पहा.] ११. क्षत=जखम. १२. या श्लोकाचें वृत्त 'शिखरिणी' आहे. याचें लक्षण:—'यमनैः सभलैर्गेन युक्ता सप्तदशाक्षरा । षडेकादश-

नभीं नेतां किंवा [1]अमिष खग यांनीं झडपणें
मुखींहूनी त्याच्या गळुनि पडला कीं [2]जडपणें. ॥ १४

असें हो! ऐकोनी धडधड [3]तिचें काळीज उडे,
मुखींचा [4]वोलावा सुकुनि [5]रसने कोरड पडे; ।
म्हणे, 'बाई! नाहीं धड गति, दिसे [6]भाग्यपडळीं,
न जाणे ब्रह्यानें असल लिहिलें काय [7]निडळीं? ॥ १५

सदा हीं दुश्चिन्हें उठति, नगरी उद्वस दिसे,
निजेल्या दुःस्वप्नें पडति न कळे होणर कसें? ।
जिला 'ब्रह्मी माया' म्हणति 'प्रकृती' सांख्य मननीं
असी जीची शक्ती जनकतनया [8]विश्वजननी. ॥ १६

[9]तिच्या लोभीं पाहा [10]श्वशुर पडिले होति अतिथी,
म्हणावे अज्ञानी, तरि [11]निगमभाष्यार्थ कथिती; ।
सुलावण्यें [12]गेहीं युवति हरिती गर्व रतिचा,
बळात्कारें सीता हरुनि धरिला [13]छंदचि तिचा. ॥ १७

---

विच्छेदवती शिखरिणी मता ॥' [क्षेमेंद्रविरचित सुवृत्ततिलक–प्रथम विन्यास ३४.] या वृत्ताविषयीं सुवृत्ततिलकांत पुढील विवेचन केलें आहे:—'शिखरिण्याः समारोहात्सहजैवौजसः स्थितिः । सैव लुप्तविसर्गांतैः प्रयात्यत्यंतमुन्नतिम् ॥ शिखरिण्याः पदैश्छिन्नैः स्वरूपं परिहीयते । मुक्तालताया निःसूत्रमुक्तैर्मुक्ताफलैरिव ॥' [सुवृत्ततिलक–द्वितीय विन्यास ३१-३२.]१३. दैत्यांशीं आणि देवांशीं संग्राम (युद्ध). १४. इंद्रजिताचा.

१. मांसाचा तुकडा. २. फार जड असल्यामुळें. ३. सुलोचनेचें. ४. ओलावा, आर्द्रपणा. ५. जिभेला. ६. दैवपटलीं. ७. कपाळीं. ८. विश्वाची माता. ९. श्लोक १६ आणि १७ यांचें युग्म आहे. तिच्या=त्या जनकतनयेच्या, सीतेच्या. १०. रावण. ११. निगमभाष्यार्थ=वेदाच्या भाष्याचा (टीकेचा) अर्थ; 'निगमभावार्थ' असा पाठ असावा, कारण रावणानें वेदोंची खंडें करून पदें पाडलीं व क्रम, घन, जटा या विकृति त्यानेंच केल्या असें समजतात, तेव्हां तसा पाठ असला तरी चालेल. १२. घरीं. १३. छंद=यथेच्छ आचरण, नाद. या शब्दाविषयीं व यापासून उत्पन्न होणाऱ्या शब्दांविषयीं पुढील उतारा पहा. ["छंदस् म्हणजे वेद किंवा पद्य असा मूळचा अर्थ आहे. सांप्रतकाळीं भाषाशास्त्रवेत्त्यांनीं ज्या भाषांस आर्यभाषा असें नांव दिलें आहे त्या सर्वांत संस्कृत भाषा फार प्राचीन होय. तिला पुष्कळ काळ गेल्यावर पाणिनीनें तिचें व्याकरण केलें. त्या वेळेस जे शब्द लोकव्यवहाराच्या भाषेंत नसून केवळ वेदांत मात्र होते त्यांस त्यानें छांदस म्हटलें. त्यावरून व्याकरणनियमाबाहेरचे जे वेदांत किंवा महाभारतासारख्या आद्य ग्रंथांत येणारे शब्द त्यांस छांदस असें नांव पडलें. या शब्दांतील नियम बाह्य एवढा अर्थांश घेऊन ज्या मनुष्याचें

[१]रमेशा लंकेशा म्हणुनि धड सख्यासि न घडे,
शिरांची लाखोली प्रतिदिनिं महीदेविसि चढे; ।
बहू योद्धे मेले रघुपतिकरें त्या [२]रणमखीं,
न जाणें मी [३]कैसें लिखित घडणारें प्रियसखी ! ॥ १८
तयाचा रणीं घ्यावया सूड अंगें, पती आमुचे धांवले [४]लगवेगें, ।
कळेना कसा काय वृत्तांत तेथें, सुखें रक्षिजे त्यास कैलासनाथें.' ॥ १९
विलोकूं उठे रूपसौंदर्यराशी न [५]ले पादुका, वर्जिलें चामरासीं, ।
रुली भूमि शूद्री नसे रावणाची, सख्या सावरीती स्नुषा रावणाची.॥ २०
भरे [६]नीर नेत्रीं, मुराला [७]मुखेंदु, [८]कपोलस्थळीं दाटले [९]घर्मबिंदु. ।
विडा थुंकुनी टाकिला [१०]आननींचा, करें भंगिला मान हो ! मानिनीचा.२१
सवें सेवकां सांडुनी चित्रशाळीं, असी अंगणा पातली शेषबाळी; ।
पुढें कांचभूमीवरी बाहुदंडा, निरिक्षी जसी [११]मत्तमातंगशुंडा. ॥ २२
उडाले भुजेभोंवते रक्तबिंदू, मनीं दाटलासे पुरें खेदसिंधू. ।
बसोनी भुमीं आद्यमध्यांत पाहे म्हणे, 'आमुच्या [१२]वल्लभाचीच [१३]बाहे.' ॥ २३
वीरकंकण करीं वळखीलें, मुद्रिकेसि बरवें निरखीलें; ।
घेतला भुज करें उचलोनी, लाविला स्वहृदया कवळूनी ! ॥ २४

---

आचरण लोकव्यवहारनियमाबाहेर असतें त्यास छांदिष्ट असें म्हणण्याचा परिपाठ पडला. यावरून छंदिष्ट किंवा छांदिष्ट याचा अर्थ यथेच्छ आचरण करणारा, वेडसर असा व्यवहारांत झाला आहे. आर्ष शब्दाचा इतिहास असाच आहे. आर्षशब्द ऋषिशब्दापासून झाला आहे, त्याचा अर्थ ऋषीचा, ऋषीनें उच्चारलेला असा आहे. राजकृत नियमांनीं राजा बद्ध होत नाहीं, असा राजनीतीचा एक सिद्धांत आहे त्याप्रमाणें, व्यासवाल्मिकांसारखे समर्थ व स्वतंत्र कवि व्याकरणनियमांनीं बद्ध होत नाहींत या अर्थाचा (निरंकुशा: कवय:) कवींला प्रतिबंध नाहीं असा एक भाषातत्त्ववेत्त्यांचा सिद्धांत आहे. त्याप्रमाणें व्याकरणनियमबाह्य एकाद्या शब्दाचा प्रयोग आढळला म्हणजे त्याला आर्ष प्रयोग असें म्हणतात. त्यावरून लोकस्थितिनियम बाह्य आचरण करणाऱ्यास आर्ष म्हणण्याचा संप्रदाय पडून आर्ष म्हणजे यथेच्छ वागणारा, वेडा अर्थ झाला. व्युत्पत्तिप्रदीप—आवृत्ति ३ पृष्ठ ३४ पहा.]

१. रामाचें व रावणाचें परस्पर सख्य म्हणून होत नाहीं. राम विष्णूचा अवतार म्हणून रामाला येथें रमेश म्हणजे लक्ष्मीपति असें म्हटलें आहे. २. युद्धरूप यज्ञांत. ३. विधीनें कपाळीं लिहिलेलें=ब्रह्मलिखित=दैव. ४. त्वरेनें. ५. घेई, घाली. ६. बाष्प. ७. मुखचंद्र. ८. गालांवर. ९. घाम. १०. आनन=तोंड. ११. माजलेल्या मातंगाच्या (हत्तीच्या) शुंडा (सोंडेला.) १२. प्रियतमाची, नवऱ्याची (इंद्रजिताची). १३. बाहे=बाहु.

‘सृष्टि सर्व मज आजि बुडाली !, राज्य वैभव दशाचि उडाली; ।
काय होय पुरगोपुर माते ?’ पीटलें [1]म्हणुनि आनन हातें. ॥ २५
सेवकी मिळति अंगणिं, लोके शंखनाद करिती अतिशोकें; ।
चंडवात [2]कदली हत जैसी, लोटली [3]धरणिं मूर्च्छित तैसी. ॥ २६
उठोनी बसे, तों दिशा शून्य भासे, त्यजी स्फुंद स्फुंदो उसासे घुसासे ।
असे मोकळी सूटली वीरगुंठी, विलापा करी घालुनी बाहु कंठीं. ॥ २७
‘सदा रक्षिजे [4]स्कंदमातापित्यानें, कसें हातिचें [5]सोडिलें आजि त्यानें, ।
अहा ! चोरिलें रत्न कीं काळचोरें ! असे जाहलें दैवची पाठिमोरें ! ॥ २८
जिता हे जिंकूनी [6]जलधिवसना [7]राज्यपदवी
प्रतापें संग्रामीं, तसिच वरिली मोक्षपदवी; ।
न कंठे वैकुंठीं मजविण पतीला पळभरी,
म्हणोनी हे धाडी निजभुजखुणेंची मुळ करी. ॥ २९
पतीसंगें येसी विजय करुनी तूं [8]घरवसा,
म्हणोनीयां होता बहुतचि तुझा कीं भरंवसा, ।
न यावें त्वां ऐसें सबळ वळिया कां तुज मुके ?
परंतु प्रारब्धीं लिखित विधिचे कां तरि चुके ? ॥ ३०
अहा ! हो ! हें कैसें ! जनकतनया रावण हरी,
तयाच्या पैं दोषें सकळ पडिले शोकलहरी. ।
अरिष्टासीं [9]प्रेत्नें घरिंचि ठिविलें मुख्य वडिलें,
सितेच्या संतापें [10]कुलिश [11]चुडियांमाजि पडिलें. ॥ ३१
जळो ही संपत्ती ! पतिविण [12]रतीमंदिर जळो !,
जळो रत्न:शाळा ! हयगजविशाळा परि जळो ! ।
जळो रिद्धी सिद्धी ! धन कनक वृद्धी पशु जळो !
जळो जन्मा येणें ! [13]वधुवसनलेणें [14]तनु जळो. ॥ ३२

---

१. असें भाषण सुलोचनेचें आहे. २. केळी. [‘**कदली** वैजयंत्यां च रंभायां हरिणांतरे’ इति विश्वः.] ३. धरणीवर, पृथ्वीवर. ४. स्कंदाची माता (पार्वती) व पिता (शंकर) यांनीं. ५. विरुद्ध, विमुख, प्रतिकूळ. ६. समुद्रवलयांकित. ७. पृथ्वी. ८. गृहवासाला, घराला. ९. प्रयत्नें. १०. वज्र. ११. बांगड्यांवर. १२. शृंगारगृह, विलासमंदिर. १३. स्त्रियांचीं वसनें (वस्त्रें) आणि लेणें (अलंकार). १४. देह.

अहा! रे! अदृष्टा! ब्रिद परम नष्टा! मिरविसी,
पियूषाच्या[1] पात्रीं विषद[2] विषयां तें फिरविसी?' ।
सुखी गोडी जोडी तरि मरण खोडी उडविसी
विसंगाचीं अंगें प्रळयभवभंगें नुरविसी.' ॥ ३३

सख्या प्रार्थिती, 'पार दुःखासि नाहीं, परी शोक केल्या नसे साध्य कांहीं, ।
अहो! मृत्युलोकासि जे लोक आले, तयां हा असा नेमिला मार्ग चाले. ॥ ३४

बळी कर्म होणार होऊनि गेलें, विचारी पुढें पाहिजे काय केलें?' ।
असें बोलतां सेवकीं लोकपाळा; भुजेची करी प्रार्थना शेषबाळा. ॥ ३५

कनकरस[3] भरूनी आणिली रत्नदौती,
असितसमचि[4] जिव्हा लेखनी दिव्य दीप्ती, ।
उकलुनि धरणीसी ठेविलें भूर्जपत्रा
विनवि पतिभुजेसीं चारुनेत्रा पवित्रा. ॥ ३६

'सदा येके ताटीं बसुनि सखये! भोजन करूं,
विडे पुष्पें पानें विषयरसमानें मन धरूं, ।
असा होता स्नेही, कवण चुकिनें मंद पडला?
भुजे! कां कैवल्यें अचळपदिंचा गर्व चढला? ॥ ३७

मी मानसें पतिव्रता[5] पतिनेमधारी, या कारणें जरि सदा शिव साक्षकारी, ।
बाहू अचेतन सचेतन शीघ्र व्हावी, लेहूनियां प्रगट ती गुजगोष्टि दावी.' ॥ ३८

हे बोलतां निर्जिवा[6] चळली ति[7] बाही[8], घे लेखणी, नयनिं कौतुक लोक पाही, ।
लेहोनि पत्र पडिला धरणीस पाणी[9], वाची मुखें संति[10] सगद्गद दीनवाणी. ॥ ३९

सांडोनियां गलबला, जन मौन्य[11] घेती, चित्रोपमा[12] श्रवणिं सादर चित्त देती; ।
ये लोचनीं उदकबिंदु सुलोचनेच्या, वांची सती[13] पतिगती पतिशोचनेच्या. ॥ ४०

'प्रिये! आयकें रूपलावण्यशीले! गती लाजली, नागनागेंद्रबाळे!; ।
पुसोनी तुतें जाय लंकेस जेव्हां, कृतांतेंचि केली तडातोडि तेव्हां. ॥ ४१

---

१. अमृताच्या. २. विषप्रद. ३. सुवर्णरस, सोनेरी शाई. ४. काळी. ५. पतिव्रता—पति हेंच व्रत जिचें ती पतिव्रता. पतिव्रतेचें लक्षणः—'आर्तार्ते मुदिते हृष्टा प्रोषिते मलिना कृशा । मृते म्रियेत या पत्यौ सा स्त्री ज्ञेया पतिव्रता ॥' ६. निर्जीव, अचेतन. ७. येथें वृत्तसुखार्थ 'ती' मुद्दाम ऱ्हस्व केली आहे. ८. बाहु, भुज. ९. हात. १०. सति=सती. (सुलोचना.) ११. स्तब्ध होती. १२. चित्राप्रमाणें. १३. सती=साध्वी. ['सन् साधौ धीरशस्तयोः । मान्ये सत्ये विद्यमाने त्रिषु साध्व्युमयोः स्त्रियाम्'—इति मेदिनी.]

वधाया रणीं रामसौमित्रवैरी, जयो रावणाचा करू नाद भेरी, ।
.................................................................................... ॥ ४२
गळां गोंविले अंतकें तंत फासे, म्हणोनी मला तोचि उद्योग भासे; ।
तुझे भेटिचा हेत चित्तांत वाटे, बळें काळ ओढूनि ने मृत्युवाटे. ॥ ४३
मनीं इच्छुनी शत्रुसंभारभेदा, रथा यज्ञि लागी यजी [1]जातवेदा; ।
फलप्राप्ति होतां सखे! तेचि संधी, अकस्मात ते साधिली वेळ [2]द्वंद्वीं.॥ ४४
जया [3]पितृबंधू असे साह्य जाला, कथी वर्मकर्मा अधर्मी निघाला, ।
फिरे काळ तेव्हां उणा डाव पाडी, मखा मर्कटाची पडे थोर धाडी.॥ ४५
पुढें मातलें झुंज [4]अद्भूत झालें, परी शेवटीं येश शत्रूस आलें; ।
सखे! तूटली मुख्य [5]आयुष्यदोरी, म्हणोनी सरे शस्त्रविद्यासिदोरी. ॥ ४६
सखी! तूं जिवातुल्य कीं कंठनाळीं परी दूर होतीस [6]देहांतकाळीं; ।
तनु त्यागुनी प्राण वैकुंठवाटे निघाला, परीं खंति तूझीच वाटे. ॥ ४७
[7]आधीं पाउल ठेवितां प्रियतमे! वैकुंठिचे पायरीं,
मागें अंतरली म्हणोनि भुज ही जी कां सखी सोयरी; ।
बाहे बाहिच धाडिली, जंव तुला येता न शोकीं पडूं,
हातें हातिं धरूनि दुर्घट सखे! वैकुंठघांटीं चढूं. ॥ ४८
मी दानशूर रणिंचा [8]मनवारिदीक्षा, सत्पात्र दाशरथि याचित येत भिक्षा, ।
जालों न विन्मुख, दिलें [9]शिरपद्म दानीं [10]सायुज्यराज्यपदवी चढलों विमानीं.॥ ४९
धैर्यें उभें धड रणीं, [11]धरणीं न लोटे, नेलें [12]कंपीं, शिर सितापतिलागिं भेटे; ।
हे धाडिली मुळ तुला भुज, प्राणमित्रे! संगें इच्या झडकरी, तरि ये पवित्रे!॥ ५०

---

१. अग्नीला. [जाते जाते विद्यते इति जातवेदाः तस्मिन् असून्सप्तपर्णादिव वीप्सासमासेनेव प्रतीताः । जातं वेदाः अस्मादिति वा । इति हेमाद्रिः॥रघुवंश–सर्ग १२ श्लोक १०४ पहा.] २. शत्रूंनीं. ३. काका. (बिभीषण.) ४. येथें वृत्तसुखार्थें 'द्रु' हा वर्ण दीर्घ केला आहे. हा प्रकार अनंताच्या काव्यांत सर्वगामी आहे. ५. आयुर्मर्यादा. [आयुष्य हें दोरीसारखें मानून कवि तशा अर्थाचे प्रयोग वारंवार करतात. जसें:—आयुष्याची दोरी बळकट आहे इत्यादि.] ६. मरणसमयीं. ७. या श्लोकाचें वृत्त शार्दूलविक्रीडित. याचें लक्षण:—'अंत्यं सप्तदशं चैव षोडशं च चतुर्दशम् । द्वादशो साष्टमं चैव षष्टमष्टममेव च ॥ ८६ ॥ त्रीण्यादौ च गुरूणि स्युर्यस्मिंस्त्वेकोनविंशके । पादे लघूनि शेषाणि तच्छार्दूलविक्रीडितम् ॥ ८७ ॥' [भरतमुनिप्रणीत नाट्यशास्त्र–अध्याय १५. काव्यमाला–पृष्ठ १६१ पहा.] ८. मानवारिदीक्षा. ९. मस्तककमळ, शिरःकमळ. १०. सायुज्यमुक्तिरूप राज्याची पदवी. ११. पृथ्वीवर. १२. ऋषभानें. (प्रसंग २ श्लोक ६७ पहा.]

तूं देह गेह ममता तिळही नसों दे, जें त्वां दिलें वचन त्याचि स्मृती असों दे, ।
त्वां दीन[1]रूप मजवांचुनि कां जिवावें ? या मुक्तिवैभवपदा सखि ! आजि यावें.'॥९१
वाचोनि पत्र प्रतिचें पुरत्या वे[2]ळी हो ! भूमीवरी थैं[3]डथडा शिर आफळी हो; ।
ते दाटली, गहिंवरे, करि रोदनासी, 'हा ! नाथ ! नाथ ! अजि अंतरलें तुम्हासीं.॥
आ[4]जन्म सादर सदा वचनासि होतें, अंतींच अंतर कसें पडिलें अहो ! तें ? ।
भर्ताररत्न दिधलें वरयुक्तिपालें ते कां जिरेल मजला फुटक्या कपाळें ? ॥ ९३
नामें प्रताप तुमच्या कळिकाळ कांपे, सारे भरे सुरवरा अमरेंद्र तापे; ।
ऐ[5]रावता पळ सुटे, न धरेल [6]धी हो ! हे मांडलीक मशकासम आ[7]वघी हो. ॥ ९४
तो मारिजे समरणीं नरवानरांनीं, प्रा[8]रब्ध कर्म बळवान् म्हणती पु[9]राणीं. ।
सौभाग्यमंडित अखंडित भाग्यसिंधू, त्या भेटला रणिं घं[10]टोद्भवरामबंधू. ॥ ९५

---

१. दीनवाणी. २. पत्रांतील सगळ्या ओळी. ३. आपटण्याची क्रिया घडतांना जो शब्द होतो तो—थडथड. अशा शब्दाला अनुकरणवाचक शब्द म्हणतात. अशा शब्दांचीं अनेक रूपें असतात—जसें थडथड, थडाथड इत्यादि. "या अशा अनुकरणरूप शब्दांचा या महाराष्ट्र भाषेंत जितका भरणा असेल तितका, मला वाटतें, आणखी कोणत्याही भाषेंत नसेल, आणि तो या भाषेचा केवळ असाधारण जिव्हाळा होऊन राहिला आहे; गति, मांजुल्य, कार्कश्य, सौंदर्य, परिमिति इत्यादि क्रियेचे शतावधि प्रकार दाखवायाचे असतां, त्या त्या अनुकरणरूप शब्दांचा प्रयोग होतो. जसें:— **झटझट** चालतो; **चमचम** लवते; **टकमक** पाहते; **झणझण** वाजतें; **बदबद** पडतें; **टपटप** झरतें; **भडभड** ओकतो; **तडतड** बोलतो; 'छडी वाजे **छमछम**, विद्या येई **घमघम**." (दादोकृत व्याकरण.) ४. जन्मापासून. ५. इंद्राचा हत्ती. [इरा आप: तद्वान् इरावान् समुद्र: तस्मादुत्पन्न: । इरा उदकानि संत्यस्मिन् इरावान् इरावत्यब्धौ भव: ऐरावत: ॥ असा ऐरावत शब्दाचा मूलार्थ आहे. समुद्रामध्यें उत्पन्न झालेला जो तो ऐरावत.] ६. मतीला धैर्य नाहीं. ७. सगळे. ८. नियति, दैव. ९. पुराणें अठरा आहेत; त्यांचीं नांवें:—'ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् ॥ आग्नेयमष्टकं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा ॥ वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा ॥' व अठरा उपपुराणें आहेत तीं अशीं:—'अष्टान्युपपुराणानि मुनिभि: कथितानि तु । आद्यं सनत्कुमारोक्तं नारसिंहमत: परम् ॥ तृतीयं नारदं प्रोक्तं कुमारेण तु भाषितम् । चतुर्थं शिवधर्माख्यं साक्षान्नंदीशभाषितम् ॥ दुर्वाससोक्तमाश्चर्यं नारदोक्तमत: परम् । कापिलं मानवं चैव तथैवोशनसेरितम् ॥ ब्रह्मांडं वारुणं चाथ कालिकाह्वयमेव च । माहेश्वरं तथा शांबं सौरं सर्वार्थसंचयम् ॥ पराशरोक्तं प्रवरं तथा भागवतद्वयम् । इदमष्टादशं प्रोक्तं पुराणं कौर्मसंज्ञितम् । चतुर्धा संस्थितं पुण्यं संहितानां प्रभेदत: ॥.' १०. अगस्त्यमुनिरूप लक्ष्मण. (सागराचें शोषण ज्यानें केलें तो अगस्त्यमुनि.)

ज्या मस्तकें शचिवरा[1] पदिं नम्र केलें, ते मर्कटीं[2] स्वकरिं झेलित आजि नेले; ।
स्नेहें सदा निववि स्पर्शुनि हस्त कया[3], त्याची दिसे बहु सये! मज आजि माया.'॥
ऐसे विलाप करितां कमलायताक्षी[4], तों दाटले गहिंवरें जन लोक साक्षी; ।
गो, हस्ति[5], वाजि[6], पशु जे असती अशेष[7] ते सांडुनी तृण, जळें, रुदती[8] विशेष. ५७
जे पंजरीं खगकुळें[9] तरुगेहधारी अन्नोदका त्यजुनि सांडिति अश्रुधारी; ।
शोकें अशा तरु गळे, उकले धरित्री, तप्तोदकें वनलता सुकती पवित्री. ॥ ५८
त्या सेवकी परम ज्या चतुरा विवेकी त्या प्रार्थिती मन तिचें कटुता निवे कीं; ।
'ती तूं सुशील पतिनिष्ठ अनन्यभावें आली सखे! मुळ[10] तुला भुज हे स्वभावें. ॥
लंके चला, कथुं वृतांत दशाशिरासी, आणूनि देइल तुम्हा पतिच्या शिरासी; ।
तेणें स्वधर्म तुमचा उरकोन घ्यावा, आतां वृथा शिण जिवा सहसा न द्यावा.' ॥६०

ऐसें ऐकुनि ऊठली, उचलिला बाहू, न दे आणिकां,
पाहे मंदिर[11], तों नसेच गणना मुक्ताफळां माणिकां ।

---

१. 'शचीवरा' असें सामासिक पद पाहिजे. शचीवरा=शचीपति, इंद्राणीपति, इंद्र. २. वानरांनीं. ३. देहाला. ४. सुलोचना. [कमलाप्रमाणें सुंदर आणि आयत (विस्तीर्ण) अक्षि (डोळे) जिचे ती.] ५. हत्ती–'या शब्दावरून अपभ्रंश कसे चमत्कारिक होतात व भाषेंतील शब्दसंग्रह कसा वाढत जातो हें चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. मूळ नक्षत्रवाचक शब्द 'हस्त' आहे. 'अश्विनी,' 'मृग हीं नांवें जशीं आकृतिसादृश्यावरून पडलीं आहेत त्याप्रमाणेंच 'हस्त' हें नांवही हाताच्या आकृतीवरून वरील नक्षत्रास मिळालें आहे. पण अशी मूळ स्थिति नसतां मराठींत प्रयोग पहा कसे दृष्टीस पडतात!—'हत्ती गर्जायाला लागला,' 'कोसळेल हत्ती तर पाडील भिंती.' हा चमत्कार होण्यास दोन तीन कारणें झालीं आहेत. एक तर अगोदर 'हस्त' आणि 'हस्ती' (हत्ती) हें वर्णसादृश्य. दुसरी गोष्ट ही कीं, मधें वीज जी बंदींत पडली असते ती वरील नक्षत्र लागतांच पुनः गर्जायाला जाते. तेव्हां गर्जनाची कल्पना साहजिक रीतीनें 'हत्ती'वर बसतेच. तिसरें असें कीं, हत्तीच्या दणक्याप्रमाणेंच वरील नक्षत्राची गर्दी असते. हत्ती मोकळा सुटून जर बोकळला तर गंडस्थळाच्या धडकांनीं जसें कांहीं राहूं देणार नाहीं व सारा विध्वंस करून टाकील, त्याप्रमाणेंच हस्ताच्या अमलांतही धडाधड घरें पडताहेत, वाऱ्याच्या सपाट्यानें मोठमोठे वृक्ष उपळताहेत, विजांचा कडकडाट चाललाच आहे, मुसळासारखे धोधाटे चालून चोहोंकडे जळबंब होऊन गेलें आहे, हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडतो. याखेरीजही ही एक कल्पना लोकांच्या मनांत बिंबलेली आहेच, कीं मेघांचा स्वामी जो इंद्र त्याचे हत्ती समुद्राचें पाणी सोंडेनें शोषून घेऊन चोहोंकडे त्याची वृष्टि करतात!' (निबंधमाला–अंक ५३ पृष्ट २३.) ६. घोडे. ७. सकळ. ८. श्लोक ५७-५८ यांत अतिशयोक्ति नामक अलंकार झाला आहे. ९. पक्षिकुळें. १०. आमंत्रण देणारें मनुष्य, बोलावून नेणारें मनुष्य. ११. मंदिर–['**मंदिरं** नगरेऽगारे मंदिरो मकरालये' इति विश्वः.]

भांडारे धनपूरते अगणिता जांबूनदाच्या[1] मुसा
वैडूर्यादिक[2] पाच, नील, भरले रत्नीं मणीं मांदुसा.[3] ॥ ६१
नाना रत्न सुरंग सुंदर वरी दिव्यांबरें कोटिशा,
वाजी वारण[4] स्यंदनादि[5] शिबिका[6] संपूर्ण दाही दिशा; ।
ऐसी ते अमरावतीहुनि अती उत्कृष्ट जे संपती,
तेथें लोभ मना नसेचि, वमना ऐसेंचि मानी सती. ॥ ६२
त्यागितो वधु[7] जसा वितरागी,[8] चंपकीं न धरि संग परागीं, ।
नावडेचि नृप रावण सीते, संपती पतिविनाचि तसी ते. ॥ ६३
शास्त्रदारुण[9] म्हणे प्रळयाग्नी, युक्तिनें वडिल हा विरहाग्नी, ।
या भयें सति मुखा फिरवी ते, पावकीं तनु सुखे निववी ते. ॥ ६४
ये आंगणा, त्यजुनि वैभव, भूपराणी,[10] तों मांडिलें करुणरोदन पाखरांणीं; ।
'आई! दिसों तुजविना अवघीं अनाथें, कापून मान तरि जाय तुझेचि हातें.' ६५
पारावतादि,[11] पिकें,[12] सारस,[13] हंसें,[14] मोरें, लावे,[15] ससाण, शुक, सारिक,[16] जे समोरे, ।
त्या सोडितां गगनिं दुःखित फार होती, गुंडाळिती कितिक ते चरणा सभोंतीं. ६६
रत्नाच्या पुतळ्या खणोंखणिं उभ्या त्यांतूनि ज्या बोलती,
'आम्हातें निरवूनि आजि जननी! जातेसि कोणाप्रती?' ।

---

१. जांबूनद=सोनें. २. रत्नविशेष. एकंदर नव रत्नें आहेत:—'मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ। पद्मरागं मरकतं नीलं चेति यथाक्रमम् ॥' ३. पेटी. ४. हत्ती. ५. रथ. ६. पालख्या. ७. वधु=वधू, स्त्री. ['वधू स्नुषा नवोढा स्त्री वरो जामातृपिंगयो:' इति विश्व:.] ८. 'वितरागी' हा शब्द 'वीतरागी' (विरक्त) असा असावा. ९. शास्त्राप्रमाणें पाहिलें असतां प्रलयाग्नि हा दारुण (भयंकर) होय, पण युक्तिदृष्ट्या पाहिलें असतां विरहाग्नि हा वडिल (दारुणतर) होय, यास्तव सती (सुलोचना) विरहाग्नीकडून मुख फिरवून पावकीं (अग्नींत, चितेंत) तनु (स्वदेह) सुखानें निववितें. १०. सुलोचना. ११. पारवे. १२. कोकिलपक्षी. १३. सारस—हे पक्षी बहुधा जलाशयाचा आश्रय धरून राहातात. यामुळें यांच्या शब्दावरून जलार्थी पथिकांस जलाशय समीप अथवा दूर आहे हें समजतें. हे पक्षी उत्तरहिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात. [मालविकाग्निमित्र—अंक ३ श्लोक ६.] १४. हंस—हे पक्षी हिमालय पर्वताच्या कैलासशिखरावरील मानससरोवराकडे वर्षाकाळाच्या आरंभीं मोठ्या प्रेमानें गर्भधारणसमय आला असें जाणून राहण्यासाठीं जातात. ['हंसा वर्षाकाले मानसं सरो यांतीति प्रसिद्धि:' स्तुतिकुसुमांजलि—स्तोत्र १० श्लोक २५ टीका पहा.] हें सरोवर हंसांचें प्रिय वसतिस्थान होय. यांना नीरक्षीरविवेक करण्याचें नैसर्गिक सामर्थ्य आहे. असें या पक्ष्यांविषयीं प्राचीन कवींच्या ग्रंथांत वर्णन आढळतें. १५. लावे—लावकपक्षी. हे पक्षी आपल्या मादीविषयीं फार लंपट असतात अशी प्राचीन कवींची समजूत आहे. १६. मैना.

ते बोले, 'जगदीश्वरा! निरविलें, संरक्षिजे त्या हरें,
स्वस्थानीं वसिजे सुशोभित, सदा स्नेहो असों द्या बरें.' ॥ १७

घालोनी शिविकेंत[1] हस्त पतिचा चाले पुढें घेउनी,
संगातें चेमु लोक सर्व निघती, वर्जूनि वाद्यध्वनी; ।
ते लंकेप्रति चालिली पतिविना ध्याना न ये अन्यथा,
वर्णी नित्य सुखें अनंतकवि ह्या रामायणींच्या कथा. ॥ १८

---

## प्रसंग चवथा.

(श्लोक.)

मना! गाइजे कीर्ति या राघवाची, सुखाचा तरी जन्म हा आवघाची; ।
निजेध्यास[3] रामीं पशू वानराला, नसावा तसा कां अशा या नराला? ॥ १
मंदूरमंडसिन[4] आवडती जिवाची शृंगारिली भगिनि जेंवि उँचैःश्रवाची;[5] ।
आरोहणा वरि करी फणिराजपुत्री[6] चिंती पती, टपकती जलबिंदु नेत्रीं. ॥ २
भर्तारशोकगिरि दुर्गम वाट मोठी, ते मानसें चढ उतार करूनि लोटी, ।
लंका गढी सबळ रक्षण राक्षसाचें, सेना निरिक्षुनि घडे भय त्यांसि साचें. ॥ ३
विश्रांति ज्या निशिदिनीं न मिळे क्षणाची, झाली तयां गडबडी गडरक्षणाची, ।
योद्धे सदा करिति गर्जन यंत्र झाडा, 'आला असे' म्हणति 'हा दिवसाचि धाडा.' ४
प्रतापें महा रामचंद्रें सुजाणें सुवेळाचळीं घातलें उग्र ठाणें. ।
उरीं ते कटारी सदा रावणाच्या, म्हणूनी प्रयत्नीं चमूरक्षणाच्या. ॥ ५
गर्जूनि हस्त करिती विर येरझारा, धीरा धिरे म्हणति, पावति हेर हेरा. ।
तैं ओळखूनि करिती उघडीं कपाटें, लंकेमधें प्रविशती पिटिती[9] ललाटें. ॥ ६
सभे बैसलासे दशग्रीवराजा, सभामंडपा पातली पुत्रभाजा,[10] ।
निरिक्षूनि दृष्टी पतीतात, तीनें नमस्कार साष्टांग केला सतीनें. ॥ ७
उठे तांतडी, [11]वोखटें चिन्ह पाहे, स्नुषा ऊचलीली अधोदृष्टि राहे, ।
म्हणे, 'माय! कां सांग होतेस कष्टी? जितों[12] मी, तुम्हातें उणें काय सृष्टी? ॥ ८

---

१. पालखींत. २. सैन्य आणि सर्व इतर जन. ३. निदिध्यास. ४. हें नांव वाहनाचें असावें असें दिसतें. सुलोचना घोडीवर बसून निघून गेली असें पुढें ६२ व्या श्लोकांत आहे, तेव्हां 'मंदूरमंडसिन' हें घोडीचेंच नांव असावें असें दिसतें. ५. समुद्रमथनसमयीं निघालेल्या चौदा रत्नांपैकीं एक. उच्चैःश्रवा हा अत्युत्तम अश्व होता. याचे कान (श्रव) उच्च होते म्हणून याला उच्चैःश्रवा असें नांव पडलें. हा इंद्राचा अश्व होय. ६. सुलोचना, शेषकन्या. ७. बिकट. ८. जा ये. ९. हें 'कारकदीपका'चें उदाहरण आहे. १०. मुलाची भार्या, सून. ११. वाईट. १२. जीवंत असतां.

स्नुषा आमुची गांजिली होय जेणें, बळें आजि आमंत्रिला काळ तेणें, ।
मुखें सांग माये! श्रमाच्या निमित्या, न लागे घडी ते मला पारिपत्या.'॥ ९
पूसतां तिसि लंकनायक खेदयुक्त सुलोचना,
दाटला बहु कंठ सद्गद, पाझरे जल लोचना, ।
पत्र देउनि दाविलें भुज, वाचितो नृप घाबिरा,
दास करिति निवेदना, बहु पुत्रशोक दशाशिरा. ॥ १०
श्मश्रु तोडुनि भाल आनन[१] पीटिले प्रतिहातकीं,
धूळि धूसर[२] घे पसेवरि ऊधळी मुखिं मस्तकीं, ।
लोटला धरणीवरी, करपाद टाकुनि मोकळे,
शोक अद्भुत मांडिला, जनलोक धांवति ज्या कळे. ॥ ११
ऐशीं सहस्र वनिता[३] नृप रावणासी लावण्यसागरलता गुणरूपरासी, ।
मंदोदरीप्रमुख मंडण मंदिराचे अत्यंतजीवन विरा दशकंधराचे. ॥ १२
तिनें मंदिरीं ऐकतां नाद कानीं, निघे सत्वरीं ते विना पादुकांनीं, ।
सख्या ज्या तिच्या धांवती एकएकी, नणंदा, णि[४], जावा सुना, नाति लेकी,॥ १३
सभामंडपा पातल्या त्या समस्ता, अवस्था अशी देखुनी शोकग्रस्ता; ।
पिटूनी मुखीं ताडिती ऊर पोटा, 'अहा!' बोलती, 'जाहला घात मोठा.' ॥ १४
मंदोदरी परिसतां 'सुतकाळ जाला,' तें चाललें वचन कापित काळजाला, ।
टाकी उभ्याचि तनु[५], जाणुनि पुत्रहानी भूमीवरी थडथडा निजभाळ हाणी. ॥ १५
'जें[६] हें कपाळ जगतीतळिं धन्य जालें, तें केंवि आजि फुटकें म्हणती निघालें, ।
होतां विलास बहु संततिसंपतीचा, जाला कसा अवचिता तरि संप[७] तींचा[८]?' ॥ १६
गेली स्नुषेजवळि घालुनि हात कंठीं, आक्रंदना करित सूटलि वीरगुंठी, ।
'बाई! म्हणे निरखितां तुज शेषबाळे! काळीज होय तुकडे तुकडे निराळें. ॥ १७
तूं भालचंद्र जगपाळकमालधाडी, आली कसी तुजवरी तरि काळधाडी? ।
सौभाग्यमंडित चुड्यांप्रति हानि जाली, त्या ईश्वरा तुझि कशी करुणा न आली? १८
म्यां वाहिलें उदरिं या नवमास ओझें, तें तान्हुलें परम कोमळ बाळ माझें, ।
दाढेतळीं रगडुनी गिळिलेंचि काळें, त्याचें कसें न करि देव कधींच काळें?' ॥ १९
मंदोदरीसहित रावण शेषपुत्री, राजांगना सकळ आप्त कुटुंब गोत्री ।

---

१. तोंड. २. मलिन, मळकट. ३. स्त्रिया. ['वनिता जनितात्यर्थरागयोषिति' इति विश्वप्रकाशः.] ४. आणि. ५. शरीर. ६. हें मंदोदरीचें विलापोक्त आहे. ७. अंत, नाश. ८. त्या संतति(अपत्य)रूप धनाचा.

आक्रंदती कवळुनी मग एकमेकां, त्या शोक बाधित असे भवतां अनेकां. ॥ २०
प्रधानीं लंकेशा उठवुनि [1]महीसीं बसविलें,
स्त्रिया त्यांच्या मंदोदरिसि धरुनीयां विनविलें; ।
'तुम्ही दोघें ऐसा अतिशय जिवा शोक करणें,
[2]सुनेत्राबाईचें बसुनि कवणें दुःख हरणें ? ॥ २१
कपाळीं जे रेखा लिहुनि चुकला [3]प्राक्तन विधी,
तसें भोगी प्राणी अढळ, न ढळे तें तरि कधीं. ।
पुसा, बोला ईसी, नगर चमु राखा चंहुंकडे,
तुम्ही होतां [4]ऐसे, द्विगुणित रिपूला बळ चढे.' ॥ २२
पुसे [5]भूप मंदोदरी ते स्नुषेला, 'तुवां सांग, बाई! कसा नेम केला?'।
म्हणे ती, 'मला आणुनी शीर देणें, पतीदर्शना निश्चयीं आजि जाणें.'॥ २३
असें ऐकुनी भूप सक्रोध ठेला, उडे पिंगळ श्मश्रु फुत्कार केला, ।
पळा, नीमिषा जागवीलें उदाना म्हणे, 'आजि रामा ! करूं कीं निदाना.॥ २४
नेमा तुझ्या अटक ती तिळही असेना, जातों रणा सजुनि राक्षसवीरसेना, ।
आहे तुझा पतिशिरावरि नेम जाणूं, त्या वेगळीं चिरुनि आणिक [6]आठ आणूं,॥२५
श्रीराम लक्ष्मण बिभीषण जांबुवंत सुग्रीव अंगद नळा [7]अखयानिहंत. ।
हे अष्ट मारुनि शिराष्टदळावरीच ठेवीन पुत्रशिर रावण मी तरीच. ॥ २६
या अंगणांत रिपुची शिरमाळ लोळे, जेणें निवोत तुमचे तरि दृष्टिडोळे; ।
तें मी करीन, चुकलों तरि [8]वन्हि सेवीं, संहारिल्याविण [9]पुरीं पद हा न ठेवीं.॥ २७
सर्वस्व जीवन मला सुत धूर माझी, ते मारिली, [10]अंहित वाचति केंवि आजी ? ।
ज्याचें बळें सबळ मी भुजगेंद्रबाळे ! त्रैलोक्य जिंकुनि घरीं सुर बंदिशाळे. ॥२८
पुजा ते घरीं नेम धर्मे शिवाची, विधी नित्य येवोनि [11]पंचांग वाची; ।
सदा इंद्र माळी सुपुष्पास आणी, यमा काम, वाहे पखालींत पाणी; ॥ २९
झाडूनि केर घरिंचा पवनें भरावा, तेथें समार्जन सडा वरुणें करावा; ।

---

१. जमिनीवर. २. सुलोचनेचें. ३. दैव, नशीब. ४. शोकविव्हळ होतां. ५. राजा. (रावण.) ६. आठ शिरें. ७. अक्षाचा हंता. (मारुति.) ८. अग्निकाष्ठें भक्षण करून प्राणत्याग करीन. ९. लंकानगरींत. १०. शत्रु. ११. ज्यांला पांच अंगांचा समुदाय आहे तें पंचांग. तिथि, वार, नक्षत्र, योग आणि करण हीं पंचांगाचीं पांच अंगें होत. याविषयीं विशेष स्पष्टीकरण आणि विवेचन पाहणें असल्यास रा० शंकर बाळकृष्ण दीक्षितकृत 'ज्योतिर्विलास' पृ० १२१-१३० यांत पहावें.

काष्टें शिरीं बहुत भूतसमूह आणी, पाककिया करि यथारुचि सप्तपाणी. ॥३०
भैराळ दाखवि मुखाप्रति दर्पणातें, 'स्वस्ती' म्हणे सुरगुरू मज रावणातें; ।
[3]लक्ष्मीसहोदर धरी शिरछत्र छाया, पुष्पीं वसंत शयनीं निववीत काया. ॥ ३१
पीडा करीति नव हे ग्रह सर्व लोकां, ते पाहऱ्यासिं खिळिले असती, विलोका; ।
द्वारींच रक्षक पहा रविनें असावें, भांडारकार्य तितुकें धनदा पुसावें. ॥ ३२
चामुंडिका सदनिच्या नवकोटिदासी, न्हाणी उटी सटवि हालवि बाळकासीं, ।
वेताळ दीप दिवट्या उजळी सभेच्या, श्रेणी वेळी गणपती बहु रासभांच्या.॥३३
लंकापुरीं गजर भैरव जागराचा, जीकारणें परिघ दुस्तर सागराचा, ।
ज्या पुत्र, पौत्र, बळ, वैभव, साभिमानी नाहीं दुजा मज असा नृप वर्तमानीं.॥३४
राज्यीं अशा वनचरी विवंशी उदेली, भेदी मिळोनि घरचा घरमोड केली. ।
आधींच गोष्ट चुकलों, रुसुनी निघाला, तैं मारितों, तरि असा पडता न घाला.॥
ऐका प्रधान! जन! सैनिक! शस्त्रपाणी! युद्धा निघा, सकळ घाव दिजे निशाणीं.।
शस्त्रास्त्र संग्रह करा अणि चाप बाणा, माझ्या रथा त्वरित जुंपुनि अश्व आणा.' ॥
आज्ञा असी नगरिं वार्तिक देति फेरी, नादें खणाणिति सुदुंदुभि शंखे भेरी. ।
[12]मंदोदरी निरखुनी नृप सिद्धसेना, हें चिन्ह तैं मनिं तिच्या बरवें दिसेना. ॥३७
तेव्हां [13]स्नुषेसि उठवी उचलोनि बाहे, 'चाले अगे! तुजसि एक विचार आहे, ।
वर्जूनि आप्त सखियादिक नोपचारी जाती विविक्त सदना बसती विचारी, ॥ ३८
कोपें विचार न सुचे तरि रावणासीं, बाई! दिसे विमुख काळचि आपणासीं, ।
निद्रिस्थ हंसतुळिकेवरि कांतसंगी दुःस्वप्न म्यां निरखिलें पहिले प्रसंगीं. ॥ ३९
निकुंबळेसीं परचक्र आलें, रामानुजासीं अतियुद्ध झालें; ।
मारूनियां इंद्रजितासि बाणीं नेलें सुवेळे शिर वानरांनीं. ॥ ४०

---

१. अग्नि. (अग्नीला सात हात आहेत असें वर्णन आहे. 'चत्वारि शृंगा त्रयोऽस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासोऽस्य' असें अग्निमूर्तीचें वर्णन सुप्रसिद्ध आहे.) २. दर्पण=आरसा. ३. लक्ष्मीचा बंधु. (चंद्र.) ४. वळवितो, राखतो. ५. गाढवांच्या, गर्दभांच्या. ६. सभ्यां. ७. विघ्नदेवता, जखीण. ८. बिभीषण घरांतून निघाला. ९. बातमीदार. १०.दुंदुभि–(नौबद) प्राचीन रणवाद्य. ११.शंख–'शंकराचा पांचजन्य व विष्णूचा देवदत्त त्यांचीं हीं धाकटीं भावंडें होत. बौध्य धर्मांचेही लोक शंख वाजवितात. जंगमाचें तर हें उदरनिर्वाहाचें साधन आहे'. [देशी हुन्नर-पृष्ठ३९.] १२. मय असुर+हेमा अप्सरा यांची संतति दोन पुत्र मायावी व दुंदुभि आणि एक मुलगी मंदोदरी. १३. सुलोचनेस. १४. 'हंस'चित्रें जीवर काढिलेलीं आहेत अशी तुलिका (कापसाची गादी). १५. शत्रुसैन्य.

आले कपी खिजत शेंदुर काळतोंडे, पिंजारुनी मुख मिशा लव पुच्छ गोंडे; ।
लंकागडीं चहुंकडे चडले विशाळा, विध्वंसिले नृपतिहोमहि मध्यशाळा. ॥४१
लंकापती उठविला कवळोनि दाढी, वेणी धरूनि वरितीं मज ओढताडी. ।
श्रीरामबाण सुटला गगनीं[१] कडाडी, लंकेपुढें दशशिरें धरणीस पाडी. ॥ ४२
सुखें सूटले देव तेतीस कोटी, ग्रहांची तुटोनी पडे पायबेडी, ।
सिता राघवा भेटली निष्कलंका[२], दिली सर्व बीभीषणा राज्य लंका. ॥ ४३
गुढी रामराजा उभारोनि लोकीं, सुखें दुंदुभी गाजती सर्वलोकीं. ।
नव्हे स्वप्न हें, साच ऐसेंच व्हावें, म्हणोनी तुवां रामभेटीस जावें. ॥ ४४
तुवां प्रार्थुनी जानकीवल्लभातें, पतीच्या शिरा मागुनी आणि हातें[३], ।
यणें धर्म तूझाचि सिद्धीस जातो, विलंबें पुढें नाश कार्यासि होतो. ॥ ४५
रणा गेल्या रावें[४], विजय पदरीं आजि न पडे,
तया होतां कांहीं समुळ अवघें जैहाज[५] बुडे; ।
न ये हाता तेव्हां शिर, मग पुढें शोकचि पुरे,
उपासांनीं तूझा झुरमुर करोनी जिव नुरे. ॥ ४६
जिवे जों तों राजा करिल तव तो कोट करणी,
............................................ ।
समस्तांच्या मागें बिभिषण सदा भोगि उरवी[६],
स्वगोत्राला तोची तिळ उदक पिंडास पुरवी. ॥ ४७
फणींद्राची कन्या अतिस्वरुप[७] लावण्यसरिता[८],
कसी जाऊं आजी रिपुगणसभे शोक करितां, ।
सितेसाठीं रामः धरिल कुमती तो मजवरी
अशंका हे ऐसी, तिळभरि जिवामाजि न धरी. ॥ ४८
परब्रह्म तो राम लीलावतारी[९], जडा जंगमा नाममात्रेंचि तारी; ।
सदां एकपत्नीव्रतें सत्य वाचे समाधीमधें ध्यान ठेवी शिवाचें. ॥ ४९
महादेव तो मारुती ब्रह्मचारी श्रुतीचे[१०] मुखें साक्ष हे तूं विचारी, ।
धराभार वारावया देवरूपें, तिहीं घेतलीं वानरांची स्वरूपें[११]. ॥ ५०

---

१. आकाशांत. २. पापरहिता. ३. हातानें. ४. रावणानें. ५. जहाज=नौका. ६. उर्वी=पृथ्वी. ७. रूपसंपन्न. ८. लावण्याची नदी. ९. लीलेनें नररूप अवतार घेणारा. १०. वेदाचे. ११. वानर हे निरनिराळ्या देवांचे अंशावतार होत असें रामायणांत वर्णन आहे. (मोरोपंत—वनपर्व—अध्याय १० गीति ३६-३७ पहा.)

वैरी बिभीषण असे परि आप्त पाही, साहित्य तेथ करितां न चुकेचि कांहीं. ।
सत्वें तुझा त्रिवटिती बहु पुण्य बुद्धी देईल रामचि चितावरि मोक्षसिद्धि. ॥९१
जावें तुवां पुसुनि सत्वरि लंकनाथा श्रीरामचंद्रचरणावरि ठेविं माथा.' ।
ऐसें विचारुनि निशाचरि लोकमान्या वंदूनियां विनवणी करि शेषकन्या.॥९२

'खटाटोपा ठेवा, समयिं झगडा, आजचि नका,
मला द्यावी आज्ञा, रघुपतिसभे, भर्तृजनका ! ।
शिरासंगें माझी करुनि वडिलीं सद्गति करें
स्वपुत्राचे मागें रिपुसि उसणें द्याचि निकरें[1].' ॥ ९३

म्हणे राजा, 'ऐकें सजिव असतां दिक्षुवदना[2]
तुवां कां वो! जावें रडत पडतां शत्रुसदना ? ।
वरीं आहे माझ्या जनकतनया, त्यासि न सुटे
विलोकूनी तूतें कुमति रिपुला केंवि न उठे ? ॥ ९४

विखारामुखें[3] घालिजे हात जेव्हां न डंखी[4] कसा तो तया सांग तेव्हां ? ।
तसी तूं स्वयें शत्रुठायासि जासी, सितेचें कसें नाठवे दुःख त्यासीं ?' ॥९५
म्हणे ते नृपा, 'संशयो दूर घालीं, न कल्पीं मनीं रामरूपीं विटाळीं, ।
परस्त्रीवरी पापदृष्टी न रक्षी, नसे गोष्टि हे राम संसारपक्षी, ॥ ९६
असे एकपत्नीव्रती, सत्यवादी, न लिंपेचि तो राम लोकापवादीं, ।
सखा मित्र सौमित्र नित्योपवासी वनीं राघवा ब्रह्मचर्यें उपासी. ॥ ९७

उपजत हनुमंता ब्रह्मकौपीन मौंजी,
स्मरहर तप मूर्ती ऊर्ध्वरेतार्कभुंजी, ।
बिभिषणसम नाहीं बुद्धीवंता विवेकी
.................................... ॥ ९८

अतिशय न करावा आजि ते शांति ध्यावी,
सुखरुप मज आज्ञा रामभेटीस द्यावी. ।
पतिशिर अतिवेगें आणितें सत्वभावें,
निजकरिं वडिलांनीं आमुतें बोळवावें.' ॥ ९९

परिसुनि, बहु चित्तीं खोचले स्तब्ध रावे,
म्हणत, 'तव मतीचें चिंतिलें सिद्धि जावें, ।

---

१. नेटानें, त्वेषानें. २. रावणा, दशवदना. ३. सापाच्या तोंडांत. ४. चावे.

वदतिल छळणोक्ती, शत्रुसीं त्वां न भ्यावें,
पतिशिर तुज हातीं ये नये, शीघ्र यावें.' ॥ ६०
नमुनि दशमुखातें चालतां काय सांगे,
'प्रगटुनि निजसत्वा आणितें शीर आंगें. ।
तिळभरि छळ होतां, शीघ्र हे शापवाचा,
करिन रघुविराचे त्याग पायीं जिवांचा.' ॥ ६१
घेऊनि हस्त पतिचा शिबिकेंत घाली,
ती अश्विनीवरि[३] बसोनि सवें निघाली; ।
वेताळ[४] बोलति पुढें स्तुतिकारमेळे,
आली असी फणिपतीतनया सुवेळे. ॥ ६२
[५]तेथें वानरभार[६] ते उतरले व्यापूनि शाखी[७] गिरी,
विस्में[८] मानिति देखुनी फणिसुता, 'हे कोण पैं सुंदरी? ।

---

१. आलें न आलें तों. २. स्वधैर्याला; आपल्या उत्कृष्ट गुणवैभवास दाखवून. ३. घोडी. ४. वैतालिक, स्तुतिपाठक. ५. या श्लोकाचें वृत्त 'शार्दूलविक्रीडित' आहे. याचें लक्षण असें आहे.— 'मसजैः सततैर्गेन युक्तमेकोनविंशवत् । शार्दूलक्रीडितं प्राहुश्छिन्नं द्वादशसप्तभिः ॥ ३६ ॥' [सुवृत्ततिलक—प्रथम विन्यास.] 'साकाराद्यक्षरैः पादपर्यन्तैः सविसर्गकैः । शार्दूलक्रीडितं धत्ते तेजो जीवितमूर्जितम् ॥ ३५ ॥ विसर्जनीयस्योल्लेन पदैर्निम्नोन्नतैरिव । शार्दूलक्रीडितं याति पाठे सायासतामिव ॥ ३६ ॥ विच्छिन्नपादं पूर्वार्धे द्वितीयार्धे समासवत् । शार्दूलक्रीडितं भाति विपरीतमतोऽधमम् ॥ ३७ ॥ आद्यंतयोर्गुणोत्कर्षकांत्या सर्वातिशायिनोः । शार्दूलक्रीडितं धत्ते मध्ये तद्गौरवोन्नतिम् ॥ ३८ ॥ आद्यांताकारविरहात्पर्यंते चाविसर्गतः । शार्दूलक्रीडितं स्वस्य रूपं नैवोपलभ्यते ॥३९॥' [सुवृत्ततिलक—द्वितीय विन्यास.] 'शौर्यस्तवे नृपादीनां शार्दूलक्रीडितं मतम् ॥२२॥ [सुवृत्ततिलक—तृतीय विन्यास.] याचा भावार्थ असा:—ज्या वृत्ताच्या प्रत्येक चरणांत १९ अक्षरें असतात आणि बाराव्या आणि त्यानंतर सातव्या अक्षरावर यति असतो आणि ज्यांत म-गण, स-गण, ज-गण, स-गण, त-गण, त-गण आणि एक गुरु अक्षर अशी रचना असते त्यास **शार्दूलविक्रीडित** वृत्त म्हणावें. अकारादिपासून विसर्गापर्यंत प्रत्येक चरणांत अक्षरें गोविलीं असलीं तर तें **शार्दूलविक्रीडित** मोठें भारदस्त आणि सतेज असें समजावें. जागोजागीं विसर्गयुक्त पदें आल्यानें **शार्दूलविक्रीडित** म्हणतांना खालउंच चालण्याप्रमाणें हिसके बसतात. पूर्वार्धांत वेगळालीं पदें असलीं व द्वितीयार्धांत समासयुक्त असलीं तर तें **शार्दूलविक्रीडित** विपरीत आणि निकृष्ट समजावें. आरंभ आणि अंत हे सुंदरतम साधतां आले तर गुणोत्कर्षाच्या सौंदर्यानें मध्यभागीं **शार्दूलविक्रीडितास** गौरव आणि श्रेष्ठत्व प्राप्त होतें. आरंभीं आणि शेवटीं 'आ'-कार नसला व अंतीं विसर्ग न आला तर **शार्दूलविक्रीडितास** आपलें स्वरूप प्राप्त झालें नाहीं असें समजावें. राजे वगैरे भुजबलशाली वीरांच्या शौर्याची प्रशंसा करायाची असली तर **शार्दूलविक्रीडित** योजावें, असें ज्ञात्यांचें मत आहे. ६. वानरसमुदाय. ७. वृक्ष. ८. विस्मयानें.

लंकेची अधिदेवता उतरली ? कीं स्वर्गिची यक्षिणी ?
कीं क्रोधें रुसुनी दशास्यघरींची[1] आली कुलस्वामिणी ?' ॥ ६३
कोणी बोलति, 'होय रावणवधू मंदोदरी सुंदरी,
पुत्रातें वधिलें म्हणोनि पतिच्या साह्यासि आली खरी;' ।
कोणी बोलति, 'जानकी दशमुखें लंकेंतुनी काढिली,
शक्रारी[2] वधिला, पुढें भय जिवा, याकारणें धाडिली.' ॥ ६४

### उपसंहार.

(श्लोक.)

ऐसे तर्कवितर्क मानुनि कपी सांगों रघूनायका,
जाती, हास्य करील मस्तक[3] सभे त्या कौतुका[4] आयका. ।
कल्हारीं[5] मधुपा[6] रती,[7] तदुपरी रामायणींच्या कथे,
गोडी नित्य असे अनंतकविला आनंद पोटीं जिथें. ॥ ६५

---

## प्रसंग पांचवा.

(श्लोक.)

श्रीरामा कपि ते उताविळपणें जाऊनियां सांगती,
'सामर्थ्यें प्रभुचे भयाभित मनीं अत्यंत लंकापती. ।
शक्रारी वधिला म्हणूनि महिजा[8] हे धाडिली येतसे,'
ऐसें ऐकुनियां रघूपति मनीं आश्चर्य मानीतसे. ॥ १
बोले राम तयांसि, 'शोध पुरता आणा, मनीं शाहणा,
सीता तों न पडेचि दृष्टिसि तुम्हां, जीवें जिता रावणा.' ।
आली सन्मुख ते अनंततनया, देखे कपींची सभा,
तेज:पुंज तयामधें रघुपती श्रीसूर्यकोटीप्रभा. ॥ २
गुणातीत, नाहीं जया रूपरेषा, अहं विश्व इच्छा असी त्या परेशा, ।
करी तेथुनी सर्व विस्तार माया, अकाया[10] सकाया[9] स्वसंगें रमाया. ॥ ३

---

१. रावणाच्या घरची. २. इंद्रजित्. ३. इंद्रजिताचें शिर. ४. कुतूहला. ['कौतुकं नर्मणी-च्छायामुत्सवे कुतुके मुदि । पारंपर्यागतख्यातमङ्गलोद्वाहसूत्रयोः' इति हैमः; 'कौतुकं त्वभिलाष स्यादुत्सवे नर्महर्षयोः । कुतूहलेऽपि तत्प्रोक्तम्' इति मेदिनीकारः ॥ 'कौतुकं मङ्गले हर्षे हस्तसूत्रे कुतूहले' इति शाश्वतः.] ५. कमळांत. ६. भ्रमराला. ७. गोडी, अभिरुचि. ८. सीता. ९. साकार, सगुण. १०. निराकार, निर्गुण.

निराकार वस्तु श्रुती[1] गाति कीर्ती, स्वयें तेचि हे **राम** साकार मूर्ती, ।
महा सुकृतें[2] पावलें ध्यान नेत्रां, असें जाणुनी लक्ष लावी सुनेत्रा[3]. ॥ ४
घनश्याम तो **राम** लावण्यगाभा, तनू सांवळी कोटिकंदर्पआभा[4], ।
जटावेश माथां घटा तो जटांचा, भेटां[5] दर्प मोठा कटाक्षछटांचा, ॥ ५
सरश्मी[6] रवी कुंडलें तेंवि कर्णीं, धनुष्याकृती भ्रूलता श्यामवर्णी, ।
ललाटीं टिळा केशरीकस्तुरीचा भुजीं चाप, पृष्टीस भाता शरांचा. ॥ ६
सुनासातळीं श्यामश्मश्रूसुरेखा, मुखीं दंतदीप्ती हिरे ही न लेखा. ।
प्रसन्नास्य[7] ते मंदहास्यें[8] विराजे, मना आणि ध्याना न पोचे गिरा[9] जे. ॥ ७
भुजादंड[10] ते चंड[11] आजानुबाहु मारीची[12] म्हणे, 'चूकलासे सुबाहु[13], ।
जरी **राम**हस्तें तनू जीव सोडी, नये गर्भवासासि तो कल्प कोडी'. ॥ ८
गळां पुष्पमाळाप्रती शोभवीतो, **सि**तेच्या गळ्या जो गळा लोभवीतो, ।
विशाळा उरीं हार ये क्रूर दंडी, जया जठरीं[14] लोक सृष्टी उदंडी. ॥ ९
दिसे नाभिशोभा, कळी कीं फुलांची, असे जन्मभूमी विरिंचीमुलांची[15], ।
कटीं वल्कलें वेश तो तापसाचा[16] निवे, देखतां **राम**, संताप साचा. ॥ १०
जसें मर्गज स्तंभ ते जानुजंघा पुरे ना पदा स्वर्गभूमी उलंघा, ।
छवी गुल्मरातोत्पलें[17] पादपद्में, ध्वजा अंकि वज्रांकुशादीकपद्में. ॥ ११
पदींच्या नखें दीप्ति तेजें झळाळी, जगोद्धार जेथूनि **गं**गा निघाली. ।
**अहल्या** शिळा पावली दिव्य देहा, महानंद प्रक्षाळितां दे विदेहा[18]. ॥ १२
गृहादी सुखें मित्र **सौ**मित्र त्यागी, धनुर्बाण हातीं उभा पृष्ठभागीं ।
**मरुत्सूत**, **तारेय**[19], दिव्यार्कचंद्रा असी चामरें वीजिती[20] **राम**चंद्रा. ॥ १३
पुढें **जांबुवान्** **सुग्रिवादीक** राजे, उभे जोडुनी जुत्पती[21] आठरा जे ।
असें ध्यान हे **शं**कराची समाधी, मनें दृष्टिनें पद्मजा[22] लक्ष साधी. ॥ १४

---

१. वेद. वेदाला निगम, छंद, आम्नाय, ब्रह्म अशीं अन्य पुष्कळ नांवें आहेत. २. सुकृत=पुण्य. ३. सुलोचना. ४. आभा=शोभा, कांति. ५. वीरांला. ६. रश्मि=किरण. ७. प्रसन्न+आस्य=प्रफुल्लित, विकसित, निर्मल+मुख. ८. स्मितानें. ९. वाणीला. १०. भुजा=भुज, बाहु. ['दोः प्रकोष्ठे भुजो बाहुर्भुजा च स्मर्यते बुधैः' इति वैजयन्ती. शिशुपालवध—सर्ग ७ श्लोक ७१ सर्वंकषा-व्यटीका. पृष्ठ २२५ पहा.] ११. भयंकर. १२. मारीची राक्षस. १३. मारीच्याचा ज्येष्ठ भ्राता ताटकेचा पुत्र. १४. ज्याच्या जठरांत—उदरांत. १५. ब्रह्मदेवपुत्राची. १६. तपस्वीजनाचा. १७. रातोत्पल=लाल कमळ. १८. जनकाला. १९. अंगद. २०. ढाळिती. २१. सेनानायक, युद्धनायक. २२. लक्ष्मी.

देखोनियां उभि सभे मृगशावकाक्षी, पाहे बिभीषण मुखाखिललोक साक्षी; ।
आलें भरोनि दृग, लोटति अश्रुधारा, प्रार्थी सगद्गद गिरा करुनी उदारा. ॥ १५
जे सुंदरी पतिव्रता सति पुण्यगंगा हे इंद्रजीतललना पति अंतरंगा, ।
कन्या भुजंग सुगुणा दशशत्फणाची, ज्येष्ठ स्नुषा परम मानिति रावणाची. १६
दोहीं करें कवळुनी पद राघवाचें ठेवी वरी फणिसुता शिर मौन्य वाचे, ।
साष्टांग दंडवत व्याप्त अनेक एका नेत्रोदकें करि सती चरणाभिषेका. ॥ १७
अंगुष्ठ ते वदति, दुर्लभ जे विभीषा, आली मनांत करुणा करुणानिधीला. ।
'माते!' म्हणे 'उठ जिवें न करी श्रमातें, अन्याय कर्म घडलें करणें क्षमा तें. ॥ १८

अनुचित अनुजाचें कर्म चित्तास बाधी.
शिव! शिव! रविवंशीं जन्मलों सापराधी!' ।
उचलि उभय हस्तें मस्तका चापपाणी
पुसि दृग तरुपत्रें भर्तुसंतापपाणी. ॥ १९

उभी राहिली जोडुनी युग्म पाणी, करी शेषकन्या स्तुती गोप्य वाणी. ।
'जगद्यापका! विश्वबीजा! अरूपा! नमस्कार या सच्चिदानंदरूपा. ॥ २०
जो अंतरीं प्रविशुनी जडभूतमात्रीं चैतन्यता प्रगटवी सकळांहि गात्रीं ।
बुद्धींद्रियें मन गिरा स्फुरवीत स्फूर्ती, प्रत्यक्ष ते सगुण हे रघुवीरमूर्ती, ॥ २१
सूत्रीं अचिंत्यप्रतिमाप्रति खेळवीतो, तैसाचि अच्युत जगत्रयखेळ वीतो. ।
आत्मा, अनंत, अज, अव्यय, निर्विकारी, साकार तो सगुण हा शरचापधारी.
द्युव्योमसीम तरणी धरणी द्रुमादी पाताळ सिंधु सरिता जडजंगमादी, ।
हे स्थूळरूप विभुचे श्रुति गाति कीर्ती, प्रत्यक्ष हे नयनगोचर राममूर्ती. ॥ २३

---

१. मृगबाललोचना. २. नेत्र. ३. पतिव्रता. ४. साष्टांग नमन—साष्टांग वंदन=अष्टांग प्रणाम. 'जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः ॥'. दोन पाय, दोन हात, दोन गुडघे, भाळ, वाचा, नेत्र, ऊर आणि बुद्धि, या अंगांनीं केलेला नमस्कार. ५. मेघनादवधरूप अयोग्य कृत्य. ६. नेत्र, दृष्टि. ७. प्राणी. ८. सूर्य. ९. 'श्रुति' शब्दाविषयीं पुढील विवेचन मनन करण्यासारखें आहे:—'जिच्या योगानें धर्म ऐकूं येतो (समजतो) ती श्रुती, असा 'श्रुति'शब्दाचा मूलार्थ आहे. वेदमंत्र म्हणण्याचे वेळेस पाठकाचे चित्ताची एकाग्रता राहून अर्थानुसंधान राहावें म्हणून पुस्तकावरुन पठन करण्याचा निषेध शास्त्रकारांनीं केला आहे. ऐकून म्हणणें यावरुन वेदास 'श्रुति' हें नांव पडलें, व 'श्रुति' शब्दावरुन प्राचीनकाळीं लेखनकला भरतखंडांत नव्हती, अशीं अनुमानें यूरोपांतील विद्वान् करतात तीं बरोबर नाहींत. याप्रमाणेंच वेदार्थाचें स्मरण करुन त्यांत प्रतिपादित केलेल्या धर्माचें ऋषींनीं विस्तारानें ज्यांत कथन केलें आहे, असे जे ग्रंथ त्यांचें नांव 'स्मृति' असा 'स्मृति' शब्दाचा अर्थ प्राचीन संस्कृत ग्रंथकारांनीं केला

तंतूपटा क्षितितटांबुतरंगमाळा, आत्मा तसा [1]अखिल या [2]जडजंगमाला, ।
सच्चित्स्वरूप नटलें मुनिवेषधारी तो हा **र**घूत्तम अनंत लिलावतारी. ॥ २४
नमो नमस्ते ! **मधुकैटभारे** ! नमो नमस्ते ! तमकौस्तुभारे ! ।
नमो नमस्ते ! धृतचापबाणे ! नमो नमस्तेऽस्तु [3]रथांगपाणे ! ॥ २५
अनंतवीर्याय नमो नमस्ते ! ज्ञानस्वरूपाय नमो नमस्ते ! ।
अनादि आद्याय नमो नमस्ते ! वेदांतवेद्याय नमो नमस्ते ! ॥ २६
जय जय **र**घुवीरा ! अद्वयानंदपूर्णा !
जय जय करुणाब्धे ! ध्येय [4]शूली [5]अपर्णा ! ।
जय जय अविनाशा ! [6]योगिचित्ताब्जहंसा !
जय जय जय **रा**मा ! [7]सूर्यवंशावतंसा ! ॥ २७
निशिदिनिं तव कीर्ती वर्णितां [8]चक्षुकानीं
शिशुपणिं रमतां जे आयकीलें स्वकानीं, ।
चुकत मुकत मीं हें बोलिलें बाळ भाषा,
क्षमुनि पुरवि आशा दिव्य ज्योतिःप्रकाशा ! ॥ २८
वर्णी सहस्त्रवदनें महिमा **अ**नंत जिव्हा शिणूनि चिरल्या तरि तूं [9]अनंत, ।
लाजूनियां मग लपे शयनीं धृवाणी तेथें किती मज कुमारिचि एक वाणी? ॥ २९
सर्वात्मका रिपु सखा जननी न पीता तैसाचि तूं **र**घुपती प्रकृतीच **सी**ता; ।
तत्वें [10]गिली गुगलि हा भवभास सारा नीरोप दे मजसि निर्गुण ! निर्विकारा ! ॥ ३०
**सी**तापती ! **र**घुपती ! पतिशीर देणें, माझ्या पतिव्रतपणा [11]चरितार्थ तेणें; ।
जैसा असे विघड दंपति [12]चक्रवाका तो [13]मेळिकार करणें त्रिमळा ! [14]कृपार्का ! ॥ ३१
[15]जधीहूनी बापें पतिंसि पदरीं बांधुनि दिलें,
तया संगें **रा**मा विभव सुख कामानुभविलें; ।

---

आहे. याकरितां 'स्मृति' म्हणजे केवळ 'स्मरणानें पढण्याचे ग्रंथ' असा अर्थ करून स्मृतिकालींही भरतखंडांत लेखनकलेचा अभाव होता असें म्हणणें निराधार आहे. कारण स्मृतींमध्यें न्यायसभेंत मानण्याचीं प्रमाणें सांगितलीं आहेत त्यांत लेखप्रमाण धरलें आहे.' (व्युत्पत्तिप्रदीप—पृष्ठ ६६.)

१. सर्व. २. चराचराला. ३. चक्रपाणे. ४. शंकर. ५. पार्वती. ६. योगीजनांच्या चित्तकमळांतल्या हंसा ! ७. सूर्य+वंश+अवतंसा=रविकुलवंशाच्या शिरोभूषणा. ८. सापांनीं. (चक्षु=नेत्र आहेत कान ज्याचे तो साप. सापाला डोळ्यांनींच ऐकतां येतें. याच कारणास्तव त्याला 'चक्षुःश्रवा' अशी संज्ञा अमरांत आहे. ['कुंडली गूढपाच्चक्षुःश्रवाः काकोदरः फणी' इत्यमरः.]) ९. अपार, अमर्याद. १०. हा अपपाठ आहे. ११. सफलार्थ. १२. पृष्ठ ८० टीप १४ पहा. १३. संयोग. १४. हे दयाभास्करा ! १५. जेव्हांपासून.

तुम्ही आल्या लंके, प्रबळ भय, चिंता; सुख पळे,
निदानीं हा झाला कळस, विधिचा लेख न टळे. ॥ ३२
रमानाथा! लावी विघड पतिसीं योग करणें,
जिवा शीवा ऐक्यें निरसि ममता देह करणें, ।
नये जन्मा ऐसी उचित उभयां मुक्ति बरवी
कृपासिंधू! द्यावी अचलसुख सायुज्य[1] पदवी." ॥ ३३
म्हणे राम, 'पुत्री! असि प्रेमवाणी तुझ्या ग्लानिनें चित्त खेदासि आणी, ।
रणांतूनी कोणी जिता नाहिं गेला, शिरा आणिलें, हा कसा तर्क केला?' ॥ ३४
म्हणे सुंदरी, 'रामचंद्रा! दयाळा! पतीची भुजा ये घरा, लोकपाळा! ।
तिनें लेहुनी दाविल्या सर्व गोष्टी, म्हणूनि प्रभू! पाहिले पाय दृष्टी. ॥ ३५
दावी काढुनि पत्रहस्त पतिचें, आश्चर्य वाटे मना,
तैं रामा! म्हणती अचेतन करें केलें कसें लेखना?' ।
बोले राम तया, 'अपार महिमा पातिव्रताचा असे,
सत्वें जी प्रति पावला भुज घरीं तैं लेख मिथ्या नसे.' ॥ ३६
बोले सुग्रिव वर्णिल्या श्रुतिमुखें त्या थोरथोरांस ती,
'केला लेख असा अचेतन करें, संदेह पावे मती, ।
त्याची ती प्रचिती जरी पतिशिरा हे हासवी या स्थळीं,
मानूं लेख खरा' म्हणे 'रघुपते! फेडा मनाचा मळी.' ॥ ३७
सेनापती कथितसे ऋषभा खुणेनें, तैं आणिलें लुळत लोंबत शीर तेणें; ।
झोंट्या[3] सलंब रुधिरें[4] भिजल्या समग्रा, दाढी मिशा सघन पिंगटवर्ण उग्रा. ॥३८
धगागी जसी आगिटी वामचक्षु, निवाला दुजा राम भेटी मुमुक्षू, ।
महाभ्यासुरा दंतदाढा[5] कराळा[6], बिभित्सा मुखा त्या धरी जीभ लाला. ॥३९
केशीं धरी ऋषभ त्या फिरवीत आणी, तो आपटी तिजपुढें, धरणी दणाणी; ।
मोहें सती उचलि पल्लव ते पुसाया, 'मी वाचलें' म्हणतसे 'मुख हें पहाया.' ॥ ४०
नेत्रींहुनी टपटपा जलबिंदु आले, चोळी भिजूनि हृदयीं कुच तिंब झाले; ।
बोले सगद्गद लघू, जन वक्र पाहे, जेव्हां करीत जगदीश अवकृपा हे. ॥ ४१

---

१. चार मुक्तींतील शेवटची मुक्ति. ह्या मुक्ति अशा:–सलोकता, समीपता, स्वरूपता व सायुज्यता. उपास्य देवतेच्या लोकीं राहणें ती सलोकता; उपास्य देवतेच्या संनिध राहणें ती समीपता; उपास्य देवतेचें व आपलें स्वरूप व गुण सारखे होणें ती सरूपता आणि उपास्य देवतेमध्यें (ब्रह्मीं) मिळून लीन होणें ती सायुज्यता. २. मळमळ, संशयवृत्ति. ३. केंसाचे पिंजारे. झोंटी=डोईचे लांब केश. ४. रक्तानें. ५. दाट. ६. भयंकर, उग्र.

'अद्यापि बंधन घरीं सुरलोकपाळां, नामें प्रताप उठवी थरकांप काळा; ।
त्या मस्तका करिति मर्कट हेलना हे, कर्में कसे घडुनि आणिलि वेळ बा! हे!' ॥४२
पुसोनी शिरातें सती घेत देवी मही मांडुनी उत्तरीं नीट ठेवी, ।
म्हणे, 'भेटिची फार होती अ[1]सोसी, तुम्हांवेगळी ते घटी कोण सोसी? ॥ ४३
[2]प्राणेश्वरा! न पुसतां मज वीरवेशा, गेलां कसे कैं[3]टकि जी! करुनी विदेशा? ।
जीतां मशीं परम आदर भाव माया त्याचा अभाव, मिळतां दुसरी रमाया. ॥ ४४
हीन स्वभाव पुरुषा तरुणी परावी, देखूनियां भलति लालुच ते करावी; ।
आहे घरीं इहुनि सुंदर नाठवीती, संगें तिच्या घडिभरी मन वाढवीती. ॥ ४५
मी नाठवे, सति गळीं पडतां विरश्री[4], लाजों नका, सं[5]मुख नीट करा मुखश्री; ।
आलिंगितां घरनिधी पतिला उबारा झाला म्हणोनि करि शीतल मंद वारा. ॥४६
जीता विनोद रसहास्य किजे पतीनें, मी रूसल्या समजवां बहुतां रितीनें; ।
तो मोह आजि कवण्या उदकीं बुडाला? कीं या शिरासकट तोहि शरें उडाला. ॥४७
अत्यंत मी अवगुणी अपराधरासी, दासत्व पैं चरणिंची करणार दासी; ।
सोडोनि मौन्य रुसणें पतिहास्यभावें, माझें सतीपण किजे सकळांसि ठा[6]वें. ॥४८
पाहे रघूत्तम सभा बहु वानरांची याँ[7]नें नभीं पसरलीं सकळां सुरांची; ।
दोहींकडे पि[8]शुन पाहति सत्व माझें, येऊं न द्या जिवलगा! अपमान वोझें. ॥४९
सौमित्रि दे समरिं अक्षय मोक्षसिद्धी, गेल्या लया सकळ संस्मृति द्वंद्वबुद्धी[9]; ।
आनंदमग्न पडिली मुखिं मौन्य मुद्रा, माझी कशी गतिपुढें करुणासमुद्रा! ५०
आजन्म इच्छित दिले मज लाडकोडें कां आजि मौन्य पडलें? नकळेचि कोडें; ।
मी किंकरी पदरजीं, न करा उपेक्षा, स्वामीविना कवण ते पुरवी अ[10]पेक्षा? ॥५१
हांसे न शीर करुणा करितां विलोकी बोले विनोद चडतां पति स्वर्गलोकीं ।
येऊनि बंधु अ[11]खया अतिकाय माने ते भेटले सकळही धडनाककाने. ॥ ५२

---

१. हव्यास, प्रबळ इच्छा. २. या श्लोकाचें वृत्त 'वसंततिलक'. याचें लक्षण:—'अभिज्ञातं तभजजैरंतासक्तगुरुद्वयम् । चतुर्दशाक्षरं वृत्तं **वसंततिलकं** विदुः ॥ २९ ॥ [सुवृत्ततिलकम्—प्रथमविन्यासः], **वसंततिलक**स्याग्रे साकारे प्रथमाक्षरे । ओजसा जायते क्रांतिः सविकास-विलासिनी ॥ २० ॥ आकारेऽपि कृते पूर्वं बंधेऽल्पपदपेशले । **वसंततिलकं** धत्ते निर्ग्रंथि रमणीयताम् ॥ २१ ॥ [सुवृत्ततिलकम्—द्वितीयो विन्यासः] **वसंततिलकं** भाति संकरे वीररौद्रयोः । कुर्यात्सर्गस्य पर्यंते मालिनीं द्रुततालवत् ॥ १९ ॥' [सुवृत्ततिलकम्—तृतीयो विन्यासः]. ३. सैन्यांत. ४. वीरश्री हीच सती गळ्यांत पडतां. येथें वृत्तसुखार्थ 'वीरश्री' शब्दांतील प्रथमाक्षर लघु केलें आहे. ५. संमुख. ६. सुप्रसिद्ध. ७. वाहनें. ८. नीच, दुष्ट. ९. भेदबुद्धि. १०. इच्छा. ११. अक्ष. (रावणपुत्र.)

पितृस्वसा स्वरुप शूर्पनखी विचित्रा, गेली वरा नवरि होवुनियां सुमित्रा, ।
नाकींवरे विशिख लेवविले सुपाणी ती भेटली तरि तिसीं वळखा निशाणी.॥५३
भेटीस ये नृपसहोदर साभिमानी त्या लेविले भगिनिभूषण नाक कानीं, ।
रामें विनोद करुनी रणि गौरवीला पितृव्य तो तरि बरा तुम्हि ओळखीला. ॥५४
भेटावयासि त्रिशिरा खर दूषणादी त्या ताटकेसहित ते सकळी चमादी ।
हे गोत सुंदर तुम्हां भवतेचि बाणें त्यातें तुम्ही दिसतसाल विरूपवाणे. ॥५५
कांहिंच शब्द न निघे, दिसतां उपासी, आशातुरा जसि मखीं पुरुडाशघासीं।
हांसोनि बोल सखया! मसिं गोड वाणी बोला पती! त्वरित देइन अन्नपाणी.॥
तुम्हासीं मसीं लागलें लग्न जेव्हां, बळी बंधु माझा पिळी कान तेव्हां, ।
विनोदें बळीच्या मनीं राग केला, म्हणोनी किं हो! आज हा कोप केला. ॥५७
मी जाणतें परम रागिट कांत आहे, त्याची चुके खुण तरी मुख हे न साहे. ।
पृथ्वीवरी ऋषभ तो करि देह धर्मीं मी चूकलें उदक घेउनि शौचकर्मीं'.॥५८
न हांसे विनोदें सती खेद मानी, म्हणे, 'पाहती देव स्वामी! विमानीं, ।
तुम्हां वल्लभा! प्रार्थितें दीनवाणी, कसी या सभे मांडिली मानहानी? ॥ ५९

वैरी दुर्जन हें मला न कथिलें पूर्वींच जातां रणा,
राईतुल्य धरी धरा मम पिता ज्याच्या सहस्रा फणा, ।
युद्धीं साह्य तुम्हांसि आणुनि तया, देतें स्वकन्या हिता,
शत्रूचा करुनी पराभव जिवें जामात संरक्षिता.' ॥ ६०

परिसुनि वचनातें विस्मयो मेघनादा,
गदगद शिर हांसे ऐकती देव नादा; ।
उघडुनि उजवा तो नेत्र रामा विलोकी,
परम चकित झाले कीर्ति फांके त्रिलोकीं. ॥ ६१

मरणघडि चकोरा चंद्रपीयूष जैसें,
घव घव फणिबाळे ये मुखीं तेज तैसें; ।

---

१. बाण. २. चुलता. ३. चमू. ४. यज्ञांत. ५. पृथ्वी. ६. शेष. ७. इंद्रजित्. [यानें जन्मतांच मेघासारखी गर्जना केल्यामुळें यास मेघनाद असें नांव ठेविलें होतें. अध्यात्म रा० उत्तर० स० २ श्लो० ४४.] ८. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं अनेक संकेत मानिले आहेत त्यांस **कविसमय** अथवा **कविसंप्रदाय** असें म्हणतात. चकोरपक्षी चंद्राचे अमृतकिरण सेवितो हाही कविसमयच आहे. पुढें दिलेले कविसमय सुप्रसिद्ध आहेत:—आकाश आणि पाप यांचें मालिन्य, कीर्ति व हास्य यांचें शुभ्रत्व, क्रोध व प्रीति त्यांचा रक्तिमा (तांबडेपणा), नदींत आणि सागरांत यथाक्रम पंकज आणि इंदीवर यांची उत्पत्ति, मरालादिक पक्ष्यांचा जलाशयांत संचार, चकोरांचें चंद्रकिरणपान, जलदा-

उचलुनि शिर भेटे प्रेम आनंद पोटीं,
म्हणत, 'जिवलगानें रक्षिली लाज मोठी.' ॥ ६२
बोले सुग्रिव, 'हांसले रघुपती! हें शीर कोण्याच्यें?'
सांगे राम तयासि 'लक्ष्मण हा शेषावतारी स्वयें, ।
त्या तूझ्या जनकेंच घात इतुका केला जिवाचा खरा,
तो कैसा मज रक्षिता म्हणसि तूं हें हास्य आलें शिरा. ॥ ६३
पूर्वी लक्ष्मण लक्षितांचि उघडा वामाक्ष यांचा असें,
आतां हा उघडूनि दक्षिण अम्हा नेत्रेंचि पाहातसे.' ।
ऐसें ऐकुनि सर्वही पतिव्रते लोटांगणा घालिती,
स्वर्गींचे सुर 'धन्य धन्य' म्हणुनी पुष्पांजळी वर्षती. ॥ ६४
बोले लक्ष्मण कन्यकेसि, 'कलुषीं मीं लिंपलों आजि या,
सिंधूच्या सम पात्र तें डळमळो पापोदकें माझिया.' ।
नेत्रीं नीरें झरे म्हणे, 'निजकरें म्यां नाडिली आत्मजा.'
रामातें विनवी, 'प्रभू! मज असा नाहीं दुरात्मा दुजा.' ॥ ६५
बोले राम, 'सहोदरा! कठिण कीं हे क्षत्रधर्मी क्रिया,
आप्तांला वधणें अवश्य घडतें युद्धामधें आलिया; ।

---

गमकाळीं हंसांचें मानससरोवराप्रत आगमन, स्त्रीलत्ताप्रहारें अशोकवृक्षाचें फुलणें, तरुण स्त्रियांच्या मद्यगंडूषांनीं बकुलवृक्षाचें फुलणें, विरहसंतापानें तरुणांच्या हृदयावरील हारांचें व हृदयांचें फुटणें, कामाचें चाप आणि बाण कौसुम (पुष्पमय) आणि त्याच्या धनुष्याची दोरी भ्रमरमाला असणें, कामाच्या बाणांनीं आणि स्त्रीकटाक्षांनीं तरुणजनहृदयांचा भेद, दिवसा (सूर्याच्या योगानें) अंभोजांचा आणि रात्रीं (चंद्राच्या योगानें) कुमुदांचा विकास, शुक्लपक्षांत चंद्राचा प्रकाश, मेघगर्जनेनें मोरांचें नृत्य, अशोकाला फळें न येणें, वसंतांत जाईला फुलें न येणें, गंधसारवृक्षांच्या (चंदनवृक्षांच्या) फलपुष्पांचा अभाव; स्त्रियांच्या पादाघातानें अशोकाचा, कटाक्षप्रेरणानें तिलकवृक्षाचा (तिळव्याचा), आलिंगनानें कुरबकाचा (कोरांटीचा), करस्पर्शानें प्रियंगूचा (वाघांटीचा), मद्यगंडूषसेकानें बकुलाचा, नर्मभाषणानें मंदाराचा, मृदुहसितानें चंपकाचा, मुखमारुतानें (तोंडाचा फुंकर घालण्यानें) आम्रवृक्षाचा, सुस्वर गायनानें नमेरुवृक्षाचा (सुरंगीच्या झाडाचा), नृत्यानें कर्णिकाराचा (पांगाऱ्याच्या झाडाचा) पुष्पविकास होणें, हत्तीचें गंडस्थळ, सापाचें मस्तक, शंख, मत्स्य, वराह आणि वेणु यांत मोतीं असणें, चक्रवाकमिथुनांचा सूर्यास्ताबरोबर वियोग आणि सूर्योदयाबरोबर समागम, इत्यादि अनेक कविसमय प्राचीन ग्रंथांत आढळतात. यांचा प्राकृत कविवर्यांनींही आपापल्या काव्यांत प्रसंगानुरूप संनिवेश केला आहे.

१. कोणत्या कारणास्तव, कोणत्या संबंधानें. २. अध्यात्मरामायणांत युद्धकांड सर्ग ८ श्लोक ६८ यांत 'लक्ष्मण एव शेषः' असें आहे. ३. डावा डोळा. ४. पापानें. ५. पाणी. ६. मुलगी.

वत्सा ! हे तनया ! दया बहुत ये, कालासि शिक्षा करूं
शक्रारी करुं जीत, अमृतकरें वैधव्य ईचें हरूं.' ॥ ६६
या शब्दें कपिंची सभा गजबजी, धैर्यांश तो सांडिला,
भ्याले देव नभीं, 'अनर्थ' म्हणती 'रामा ! कसा मांडिला !' ।
आशाभूत सुलोचना रघुविरा प्रार्थीत बद्धांञ्जुळी,
'हा तो जन्म नवा दिला तरि बहू सत्कीर्ति भूमंडळीं.' ॥ ६७
ते काळीं हनुमंत होउनि पुढें रामा वदे निर्भिडे,
'स्वामी ! झांकुनि ठेवणें घडिभरी औदार्य एकीकडे, ।
पोसोनी फणि व्याघ्र थोर करिता प्रत्यूपकारी जसे
हा जीता जगीं ब्रह्मराक्षस तसा सर्वांस मृत्यू असे. ॥ ६८
करूनी दया येकट्या जीवनाचे, महा घात होती अनेका जिवांचें; ।
असा धर्म कोण्या ऋषीचे पुराणीं ? न बोलेचि जे वाल्मिकाची सुवाणी. ॥६९
याचा सिद्धिस पावता मख[1], तरी त्रैलोक्य हा जिंकिता,
अग्नीचा फुणगा धरूनि सदनीं प्रेमें कसा फुंकिता ? ।
सौमित्रासि म्हणे, 'अघात[2] रिपुचे देहींच ना सूकले
सांगाना रणसंकटें स्वविडिलां कां मूक आरंभिलें ? ॥ ७०
देवां शासनरूप रावणबळी याचे बळें सर्वथा,
दोघेही शरपंजरा विसरलां ते नागपाशीं व्यथा.[3]' ।
प्रार्थी लक्ष्मण अग्रजासि, 'बहुतां संतोष, तैसें किजे.'
सांगे राम सुलोचनेसि, 'नियमा सिद्धिस त्वां नेइजे.' ॥ ७१
जाणोनी परती निराश उठली जातां वदे ईतुकें,
'लंकेचे जन सर्व येतिल मला बोलावया कौतुकें ।
वर्जावें तरि आजि संगर कपी होणार जे कां हटे'
बोले राम, 'अवश्य' तेचि कटकीं आज्ञा फिरे जे घटे. ॥ ७२
घेऊनि मस्तक सती रणभूमि लक्षी, कोदंडदंड करि ···· उभे निरिक्षी, ।
साष्टांग दंडवत त्या चरणां करूनी आलिंगिलें दृढ तया हृदयीं धरूनी. ॥ ७३
'येतां मला उशिर तो बहु लागला कीं ? तों वाट पाहत उभे पति भागले कीं ?।
आतां चला', म्हणुनि ऊचलिलें धडातें, लावूनि शीर निजवी शिबिकेंत हातें. ७४

---

१. यज्ञ. २. आघात, घाव. ३. नागपाशांनीं रामलक्ष्मणांस बांधिलें होतें त्या प्रसंगींची व्यथा.

लंकेसि सव्य करुनी जलधीतिरासीं आला दशास्य मयजा[1] निरखी शिरासीं. ।
आबालवृद्ध मिळले, जन वोसेरेना,[2] देती झडा परि तया मुखही दिसेना. ७५
उत्पन्न शूभ[3] सरिता[4] त्रिकुटाचळीं[5] हो पूर्वाभिमूख[3] मिनली जलधीजळीं हो ! ।
त्यासंगमीं करि यथाविधि स्नान दानें दे वायनें पुजि सुवाशिनि[3] संभ्रमानें. ७६
शृंगारयुक्त बसली संपती[6] विमानीं, उद्दाम दुंदुभिरवें नभ ते धणाणी; ।
भेरी विणा पणव शंख अणी विषाणें[7] कोट्यावधी झळकती तगटी निशाणें. ७७
दोहींकडूनि उभयांवरि छत्रछाया आल्या पुढें चतुर किन्नरि[8] गीत गाया, ।
देती विड्या सहचरी, स्तुति भाट[9] गाती, दासी धरी कनकचामरदंड हातीं. ७८
वांटी असंख्य धन, याचक मात्र थोडे, मंदोदरी जवळ रावण पुत्र जोडे ।
ऐसी सहस्र करिती वधु अंक्षवाणी[10] केलीं शिवें म्हणति पन्नसुनी सिराणी. ॥७९
आनंद निर्भर मनीं फणिराजबाळी[11] हा सोहळा परम दुर्लभ कीं कपाळीं, ।
कांता सवें मिरविती सकळा विवाहीं पैं आजिचें मिरवणें अतिधन्य पाही. ॥८०

---

१. मंदोदरी. २. वोसरणें=एकीकडे होणें. ३. हे शब्द वृत्तसुखार्थ बरेच बदलले आहेत. ४. नदी. ५. याच पर्वतावर लंका होती. ६. पतिसहित. ७. शिंगें. ८. गंधर्वांच्या स्त्रिया. ९. "पूर्वी भाट, चारण यांची प्रतिष्ठा फार असे. ते राजाचे उपाध्ये असत, आणि राजाच्या वंशाचें वर्णन कवितारूपानें करीत, व तें वर्णन वीररस उत्पन्न करण्याकरितां स्वारींत राजापुढें म्हणत. त्यांस 'वहिवंचे भाट' म्हणतात. राजांची वंशावळ त्यांजवळ लिहिलेली असते, व दरएक राजकुलास नेमलेला भाट असतो. तो वर्षास राजदरबारीं येतो, व त्यास कांहीं द्यावें लागतें. याप्रमाणें भीक मागून ते निर्वाह करितात, जामीन घेणें तरी त्यांस घेत; मुलीबरोबर पाठविणें तरी भाट पाठवीत; त्यांचेसारखा विश्वासू कोणी नाहीं, व तो प्राण दिल्याशिवाय राहावयाचा नाहीं, अशी लोकांची समजूत असे. ते त्रागा करीत म्हणजे त्यांजवर कोणीं जुलुम केला तर ते आपले घरच्या म्हाताऱ्या माणसांचें डोकें मारीत; आणि जो जुलूम करील त्याचे घरीं त्या प्रेतास आणून त्याचें तोरण बांधीत व 'तुझ्यावर ही हत्या पडली' असें म्हणत ! मरणाची तर त्यांस बिलकुल पर्वा नसे. अहमदाबादेंत एका भाटिणीवर सरकारांत खोटी फिर्याद झाली सबब ती आपले पोटांत कटार मारून घेऊन मेली ! तिचें देऊळ हल्लीं शाहापुरांत आहे. कोणीं त्यांस नेमणूक वगैरे दिली नाहीं तर ते त्याचें चित्र करून, तें एका उंच काठीवर टांगून त्याजबद्दलचें कवन व निंदा सर्व मुलुखभर दाखवीत फिरत. व याजकरितां राजेसुद्धां त्यांस भीत असत, आणि त्यांचा संतोष राखीत ! हल्लीं भाटांमध्यें ज्या अनेक जाती आहेत त्या:-ब्राह्म भाट, बारवट भाट, वहीवंचे भाट, कंकाली भाट, तुर्की भाट, श्रमण भाट वगैरे. भाट लोक रजपुत लोकांपासून उपजीवन करितात. त्यांच्या कवितेस कुंडली, सवाई, चौपाई, छप्पा, कबीत, छंद, प्रबंध, दोहा, केहेवत, गीत, असें म्हणतात. हे असें म्हणतात कीं, कृत युगांत वेलंग, वळास व भीमसी, हे मोठे भाट झाले; त्रेतायुगीं बळीराजाजवळ पिंगळ नामक भाट होता; रामाजवळ रंपाळ होता; द्वापारयुगांत पांडवांजवळ सूत व संजय हे होते; पृथ्वीराजाजवळ चंद भाट म्हणून होता, त्यानें 'रासा' म्हणून मोठा भारतासारखा ग्रंथ केला आहे; विक्रमाजवळ वेताळ भाट होता आणि तसाच अकबराजवळ गंग भाट म्हणून होता." [लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती—भाग २, पृष्ठ ३९] १०. आयुष्यबाण. ११. सुलोचना.

प्रेमें प्रिया कवळिती पतिला पलंगीं निद्रावशंगत निशासुरतांगसंगीं ।
अंतीं चिताशयनिं ये प्रिय ते पतीची, राहे रुदे स्वविष पाट कडी प्रतीची. ८१
मिरवत गजरें रे निर्मिलें कुंड जेथें, धडधड अतिमानें चेतला वन्हि तेथें, ।
[1]मॅगमगित सुकाष्टें बिल्व मैलागिराचीं धगधगित विराजे मूर्ति वैश्वा[2]नराची. ८२
वन्ही पुजी घृतघटार्पित शेषबाळी, वातें शि[3]खा उसळती विविधांतराळीं; ।
मध्यें सती पतिशवा निजवी-स्वहस्तें 'येतें' म्हणोनि नमिलें वडिलां समस्ते.॥
'बाई ! सदां' म्हणति 'लोभ तुझा असों दे, पुण्यें तुझ्या नगरि हे बरवी वसों दे,।
पौ[4]लॅस्त्य वंश चिरकाळचि राज्य हो' बोले सती, 'सफल हे तुमची गिरा[5] हो.'

---

१. घमघमित. २. अग्नीची. ३. ज्वाला. ४. महाभारताच्या वनपर्वांतील रामायणाप्रमाणें रावणाचा वंशवृक्ष पुढें दिला आहे त्याजवरून पुलस्त्य कोण हें सहज कळेल:—

स्वयंभू (विधि.)
|
पुलस्त्य×गो.
|
पुष्पोत्कटा×विश्रवस्×मालिनी×राका. वैश्रवण (कुबेर.)
(अ० २७५ श्लो० ४.) (अ० २७४ श्लो० १२.)
विभीषण. नलकूबर.
कुंभकर्ण. दशग्रीव. खर. शूर्पणखा.

मोरोपंतांनीं वनपर्वांत (अध्याय १० गीति ६-१२ काव्यसंग्रह-वनपर्व पृ० १३९-१४०) असेंच वर्णन महाभारतास अनुसरून केलें आहे. हें वर्णन रामायणांतील वर्णनाशीं जुळत नाहीं. अध्यात्म-रामायण—उत्तरकांड (सर्ग १२) यांत हा रावणवंशवृक्ष दिला आहे तो असा:—

प्रजापति (स्वयंभू.)
|
पुलस्त्य × तृणबिंदुकन्या गो.
| (स० ११३४.)
सुमालिकन्या कैकसी × विश्रवस् × भरद्वाजकन्या देववर्णिनी.
(स० ११३२.)
वैश्रवण (कुबेर)×ऋद्धि.
|
नलकूबर×रंभा.

१ दशग्रीव×मंदोदरी. (स० २१४०.) | २ कुंभकर्ण×वैरोचनदौहित्री वज्रज्वाला. (स० २१४१.) | ३ शूर्पणखा×विद्युज्जिव्ह. | ४ बिभीषण×शैलूष-गंधर्वकन्या सरमा.
मेघनाद.

५. तुमची वाणी फलितार्थ होवो.

कुंडा तीन प्रदक्षिणा करुनि ये ती धर्मशीलेवरी,
सूर्यातें कर जोडितां निरखिली आश्चर्यता अंबरीं[1] ।
देवांचीं गगनोदरीं पसरलीं यानें विमानें बहू,
दिक्पालादिक[2] कौतुकार्थ मिनले गंधर्व हाहा[3] हूहू. ॥ ८५
सद्विद्याधर यक्ष किन्नर मुनी स्वर्गांगना देवता,
देखे नारद[4] तुंबरू शचिपती आरूढ ऐरावता, ।
दुर्गा ब्रह्म सरस्वती, अनसुया, वृंदा, पुलोमा, सती
हातीं घेउनि आरत्या फणिपतीकन्येसि वोवाळिती. ॥ ८६
कुंडीं कांत विराजमान बरवा तो वाट पाहे उभा,
भेटाया निज वल्लभा उसळली तेजें तडित्सन्निभा[5], ।

---

१. आकाशांत. २. दिक्पाल हे आठ आहेत. [इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशो क्रमात् ॥ १ इंद्र (पूर्वेचा), २ वन्हि (आग्नेयीचा), ३ यम (दक्षिणेचा), ४ निर्ऋति (नैर्ऋतीचा), ५ वरुण (पश्चिमेचा), ६ वायु (वायवीचा), ७ कुबेर (उत्तरेचा),८ ईश (ऐशान्यीचा).] ३. हाहा हूहू असे दोन गंधर्व होते. देवल ऋषीच्या शापानें त्यांतील एक गज होऊन त्रिकूटपर्वतावर भटकूं लागला व दुसरा तेथेंच सरोवरांत नक्र झाला. गज पाणी पिण्यास सरोवरांत उतरला तेव्हां नक्रानें त्याला पकडलें. नंतर गजानें श्रीकृष्णाचा धांवा केला, तेव्हां त्यानें नक्रास मारून गजास मुक्त केलें. पुढें ते दोघेही शापमुक्त होऊन गंधर्वपद पावले अशी कथा आहे. ४. नारद. हा ब्रह्मदेवाच्या शरीरापासून—मांडीपासून—झालेला. नार=पाणी, द=देणारा. जो पितरांना पाणी (नार) देतो तो नारद. 'नारं पानीयमित्युक्तं तत्पितृभ्यः सदा भवान् । ददाति तेन ते नाम नारदेति भविष्यति ॥' **हरिवंश** नामक ग्रंथांत या देवर्षीचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—याची अंगकांति प्रज्वलिताग्नीप्रमाणें देदीप्यमान आहे, नेत्रांची चकाकी बालार्कसदृश आहे, मस्तकावर जटाभार उन्नमित करून बांधला आहे. याचें शरीर सुवर्णालंकारानें भूषित केलेलें आहे. सखीप्रमाणें यानें आपल्या कक्षपुटांत एक मोठी वीणा वाळगली आहे. चंद्ररश्मीप्रमाणें शुक्लांबर धारण केलें आहे, कृष्णमृगचर्मनिर्मित उत्तरीयवस्त्रानें आपली काया आच्छादन केली आहे, दंडकमंडलु घेतलें आहे व हा कोणी दुसरा साक्षात् इंद्र आहे असा भास होत आहे, हा जगांतील गुप्त कलहांचा जाणणारा आहे, स्कंदासारिखा ब्रह्मचारी आहे, या महर्षीस कलहप्रिय देखील म्हणत असतात, हा विद्वान् आहे व तसाच गायनकलेंत निष्णात आहे, हा ब्रह्मसूनु आहे व जणूं काय अन्यकलीच आहे, देव व गंधर्व लोकांचा आदिवक्ता व मुनिश्रेष्ठ आहे, हा चारी वेद पठण करणारा आहे व मुख्य मुख्य याज्ञिकांकडून गाइला जाणणारा आहे. या ब्रह्मर्षीस नारद म्हणत असतात, हा चिरंजीव आहे व याचा ब्रह्मलोकांत संचार आहे. ५. वीजेसारखी.

जैसा दीपकले पतंग झडपी तैसी उडी टाकिली,
ज्वाळांचे भडके नभीं उसळती, सूर्यप्रभा झांकिली. ॥ ८७
देवांनें जयजेयकार करुनी पुष्पांजुळी वर्षती,
वर्णी विश्व, 'सुलोचना पतिव्रता हे धन्य ऐसी सती।
लंकेशा अतिशोक, शून्य दिसती दाही दिशा लोचना,
केला शीघ्रगती प्रवेश नगरीं झांकोनियां आनना. ॥ ८८

राजांगना निघति आननिं बुंथि[3] घेती, प्राणान्तदुःखलहरी मयजेसि येती; ।
ज्येष्टस्नुषा वडिल पुत्र महाप्रतापी, त्या बोळवोनि उरला जिव हाचि पापी.८९
आली समस्त नगरा, मनिं दुःख दाटे, लंका तया बहु भयानक ओस वाटे; ।
गर्जे कॅपीसमुह बैसुनि वृक्षसेंडा, 'लंके उद्यां चढवुं रामनिशाण झेंडा.' ॥९०॥

## उपसंहार.

(श्लोक.)

वार्त्तीक बोलति कथा, असि वाल्मिकानें रामायणीं न कथिली, श्रुतही न कानें; ।
लोकत्रयीं चरित हें शतकोटि आहे, तें शोधुनी सकळ पंडित कोण पाहे?॥ १
प्रस्तूत साक्षहि ऋषी रसना पुराणीं आहे कथा रसिक संस्कृत व्यासवाणी, ।
आधार तो धरुनि प्राकृत ग्रंथ केला, रामेंचि राममहिमारस सिद्धि नेला. ॥ २
वाजे मृदंग म्हणती, परि तो न वाजे, त्या वाजवी गुणि करें म्हणुनीच वाजे; ।
तैशा नव्हेति कविच्याचि जडाजडी या, वक्ता अनंत हृदयस्थ जडा जडी या.॥
सोळासें तहताळिसीं, प्लुव अशा प्रख्यात संवत्सरीं
मासीं चैत्र, ऋतू वसंत नवमी शुक्लः शशीवासरीं ।
सत्संगे धनि घे अनंत कवि हे श्रीरामनामामृतें
हांसे लावित तर्जनी निरखुनी संसारमोहाश्रितें. ॥ ४

---

१. पतंग. ['पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति सुधा. अथवा 'पतंगः शलभे भानौ' इति विश्वः.] २. मुखाला. ३. बुरखा, आच्छादन. ४. यांतील ओढाताण फारच विलक्षण दिसते. 'कपि-समूह' असें पाहिजे होतें. ५. हें काव्य शके १६४३ प्लवनाम संवत्सरीं चैत्रमासीं शुक्लपक्षीं सोमवारीं नवमीस समाप्त झालें.

# बभ्रुवाहनाख्यान.[1]

## प्रसंग पहिला.[2]

(श्लोक.)

'ऐकें[3] रे!' मुनि म्हणे 'नृपतीवरा! बभ्रुवाहन उभा रणसंगरा[4]।
देखुनी, नव शरें अनुशाल्वकें भेदिला, दुरुनि लक्षुनि कौतुकें. ॥ १
बभ्रुवाहन विलोकुनि हांसिला, एक तो सहज सायक[5] सोडिला।
बाण ते नव त्रि खंडुनि पाडिले, त्यावरी मग ईषू शत सोडिले. ॥ २
ते इषू त्वरित दैत्यजनायकें तोडिले, तिळपरी निज सायकें,।
त्यावरी मग परस्पर भेदिती शोणितें विपुल कांतिशि माखिती. ॥ ३
वीर ते समरिं सक्षत[6] ठाकले काय किंशुक[7] सुपुष्पक शोभले,।
ते क्षणीं मग धनंजयनंदनें[8] पाहिला असुरनायक[9] लोचनें. ॥ ४
पाडिले रथ तुरंगम[10] चौशरें[11] पंचमें खुडुनि सारथि नीकरें[12],।
षष्ठही त्यजुनियां ध्वज छेदिला, सप्तमें दृढ धनूगुण[13] तोडिला. ॥ ५
अष्टमेंकरुनि कार्मुकि[14] तोडिला, शाल्वबंधुशि नवें उरिं भेदिला.।
दैत्यनायक तदा बहु कोपला, अश्वस्यंदनिं जेवें[15] मग बैसला. ॥ ६
बाणसंचय त्यजी, रणिं दोकरीं बभ्रुवाहन क्षणें विरथी करी.।
त्यावरी शर सहस्रहि टाकिले, पार्थनंदन कलेवरि भेदिले. ॥ ७

तंव रणिं रथ त्याचा तोडिला बभ्रुवाहें,
करुनि विरथ बोले, 'सोडितों बाण साहें.'।
निरखुनि रणिं तेणें ते गदा घेतलीसे,
नृपवरशिरिं घालूं शीघ्र तो पातलासे. ॥ ८
दृढतर दशबाणीं भेदिला पार्थपुत्रें
पडत असुरस्वामी भूमीं मूर्छीत गात्रें[16],।

---

१. हें प्रकरण जैमिनीकृत अश्वमेध–अध्याय २१-४०; महाभारत–अश्वमेधपर्व–अध्याय ७९-८१; श्रीधरकविकृत जैमिनीअश्वमेध–अध्याय २३-२४ व मोरोपंतकृत अश्वमेधपर्व–अध्याय ५ यांत आहे. २. दुसरा प्रसंग उपलब्ध नाहीं. ३. या श्लोकावरुन ह्या आख्यानामागील व पुढील कथानकावरही अनंतानें कविता केली असावी, असें दिसतें. शोधकांनीं मागील व पुढील कविता मिळविण्याचा प्रयत्न करावा, अशी सविनय प्रार्थना आहे. ४. युद्धा. ५. बाण. ६. जखमी. ७. पळस. ८. बभ्रुवाहनानें. ९. दैत्यांचा राजा. १०. घोडे. ११. चार बाणांनीं. १२. नेटानें. १३. धनुष्याची दोरी. १४. धनुर्धर. १५. त्वरेनें. १६. अवयव.

तदुपरि उठलासे काम युद्धासि वेगें
नृपवर दशबाणें ताडिला थोर रागें. ॥ ९
स्मर शर[1]अयुतानें झांकिलासे नरेशें,
मग दृढतर त्याशीं बोलिला क्रूर वेशें ।
'धरिसि तुं अभिमाना व्यर्थ लोकीं अनंगा!
करिन मी तुज आतां सायकेविण अंगा.' ॥ १०
परिसुनि स्मर तेव्हां बाण लक्षैक[2] टाकी
कपिध्वजसुतसेना[3] पीडुनी सर्व झांकी, ।
हयगजरथवेंदा देखुनीयां पिशाचें[4]
रणमहिवरि[5] येती; नाचती हृष्ट वाचे. ॥ ११
बहु बळ रणिं त्याचें मर्दिलेंसे स्मरानें,
निरखुनि मग भूपें भेदिला चौं शरानें; ।
अतिदृढतर बाणें काम मूर्छीत केला,
मग कपिध्वजसेनेमाजि 'हा[6]! हा!'च झाला. ॥ १२
देखतांचि उग्र तो मराळकेतु ऊठिला,
तीव्र सायकें रणांत बभ्रुवाह भेदिला. ।
मारिली चमू तदा असंख्य दारुणा शरीं,
तप्त जाहला बहूत बभ्रुवाह अंतरीं. ॥ १३
क्रोधरूप होउनी सुतीव्र बाण सोडिले
केतु[7]सारथीतुरंग तीळ तीळ तोडिले. ।
......................................
...................................... ॥ १४
थोर वीर पाडिला उठे सुवेग[8] ते क्षणीं
भेदितो असंख्य सायकें दुरूनि लक्षुनी[9] ।
तदा धनंजयात्मजें शतैक[10] बाण सोडिले,
सुवेग कांति लक्षुनी सुपिच्छ आंत भेदिलें. ॥ १५

१. दहा हजार बाणांनीं. २. लाखों. ३. अर्जुनाच्या मुलाची (बभ्रुवाहनाची) सेना (सैन्य). ४. भूतें. ५. रणांगणीं. ६. हाय हाय असा दुःखोद्गार. ७. ध्वज+सूत+हय. ८. यौवनाश्वराजाचा पुत्र. ९. पाहुनी. १०. शेंकडों.

पुन्हां सुवेग सुभ्रमें असंख्य हस्ति[1] संहरी[2]
 असंख्य मारितो सुरंग[3] ते तुरंग संगरीं[4], ।
पदाति[5] सायकें किती रणांगणांत मर्दिले,
 कृषी करूं पिशाच भैरवादि सर्व पातले. ॥ १६
गजाननाशि हस्ति आश्वला उनी हाळाकृती (?)
 नरांसि रश्मि[6] वेष्टुनी समान भूमि खोजिती ।
धरूनि बीज पेरितो करी कपोल मौक्तिकें
 [7]अशुद्धवृष्टि सिंचिती सुनाचतांती कौतुकें[8]. ॥ १७
कृषी[9] बहुत पीकली विरूढलीं शिरें फळें
 सुकांडितातिं येक्षणीं करींद्रपादमूसळें[10], ।
सुगीत गाति आननें सुवेगबभ्रुवाहना
 परंतु त्यावरी सुवेग बुद्धि योजि तत्क्षणा. ॥ १८
सुवेगें ते काळीं त्यजुनि शिर काळानळपरी
 विलोकोनी दृष्टी नृपसुत मधें खंडन करी, ।
विभेदीले बाणें सकळ परि ते अग्र....डे
 तदा वीरें त्याचे करुनि स्वकरें दोन तुकडे. ॥ १९
समित्साचे आले सकळ वपु शोधूं अतिबळें
 करूनी दो ठायीं निरखुनी रणीं वीरच पळे, ।
शराचे त्या झाले नृपति खुडितां चार तुकडे,
 न गेले भूमीशीं हृदयिं जडतां मूर्च्छित पडे. ॥ २०
तदा राजा मूर्च्छा त्यजुनी समरीं शीघ्र उठिला,
 सुवेगाशीं बाणें हृदयिं वधितां तोहि पडिला, ।
सुसंहारी सेना कपिध्वजरथा व्याप्त[11] जितुकी
 निचेष्टीता केली जनक श्रुति ज्यावीण जितुकी. ॥ २१-
श्रुतीपुत्रालागीं कपिध्वज म्हणे, 'जा गजपुरा[12],
 अवस्था हे ऐशी श्रुत करिं सुधर्मा यदुविरा. ।

---

१. हत्ती. २. मारी. ३. चांगल्या रंगाचे. ४. रणांत. ५. पायदळ सैन्य. ६. लगाम, अ-नीन. ७. रक्त, रुधिर. ८. पृ० १५६ टीप ४ पहा. ९. शेती. १०. हत्तिश्रेष्ठाच्या पादरूपी मुसळानें. ११. व्यापलेली, भरलेली. १२. पृष्ठ १०७ टीप ६ पहा.

विचारीतां आतां तनय स्वकुळीं तूंच असती,
नव्हे जीणें[1] याच्या समुख गमतें पूर्ण मजशीं.' ॥ २२
असें बोले वैक्रें[2] तंव गिध[3] किरीटाग्रि बसला,
कळों आलें चित्तीं समिप उरला मृत्यु अपला, ।
कपोतातें[4] कोठें करुनि सुरथीं पिंजरीं[5] बसे,
विलोकीली छाया तंव निजशरीरा शिर नसे. ॥ २३
पुन्हा पाहे दृष्टीं तंव नयनिं घ्राणाग्र[6] न पडे,
कणीका[7] नेत्राची निरखि अरिसायुग्महि उडे. ।
'श्रुतीपुत्रा! आतां उशिर न लवीं जा अतिजवें
हरीभीमाधर्मा मम मरण तूं सांग बरवें. ॥ २४
वैसलें सुता! अपेश मस्तकीं राहिला असे धर्मयज्ञ कीं, ।
कितेक विप्र ते निराश राहिले तृप्त अध्वरी[8] नाहिं जाहले. ॥ २५
नाहिं दीधलीं असंख्य गोधनें तृप्त जोंवरी न वांटिलीं धनें, ।
मन्निमित्त हा यज्ञ राहिला धिक्क! मी असें काश्यपीकुळा.' ॥ २६
ऐकुनी दिनेशपुत्र बोलिला, 'जाइना कदा त्यागुनी तुला ।
काय भय मला मृत्युचें असे? प्राण प्रीय ना रणांत फारसे. ॥ २७
अभंग भंगती, अनाश नाशती; सूक्ष्म स्थूळ आदि मृत्यु पावती. ।
मृत्युलोकिं कीं कोण राहिलें? कीर्ति ठेवुनी सर्व गेच्छले[9]. ॥ २८
शक्ति वेंचिजे मित्रकारणा सर्व देइजे याचि ब्राह्मणा, ।
देह अर्पिजे स्वामिकारणीं पाहिं रे! प्रभो! शौर्य ये क्षणीं'. ॥ २९
वैसुनी रथीं तयावरी म्हणे, 'भक्तिवीन मी नासिकीं चणे'. ।
यापरी मुखें वदुनि चालिला बभ्रुवाहनासमिप पातला. ॥ ३०
'तिष्ठ रे! म्हणतसे रणसंगरा, मर्दिली बहु चमू[10] नृपतीवरा!' ।
ऐकतां कपिध्वजात्मज कोपला तीं शरें करुनि कर्णज भेदिला. ॥ ३१
बाण ते हृदय भेदुनि ते क्षणीं रीघती[11] त्वरित फोडुनि मेदिनी[12] ।
प्राशिती शिरुनि भोगवतीजळा क्रोध त्यावरि भरे तरणीकुळा[13]. ॥ ३२

---

१. जगणें. २. तोंडानें. ३. गिधाड. ४. कवडा. ५. पिंजऱ्यांत. ६. नाकाची बोंडी, टोंक. [नाकाची बोंडी दिसली नाहीं म्हणजे मरण येतें—अशी समजूत आहे.] ७. बाहुली, कनीनिका. ८. अध्वर्यु, यज्ञांतील ऋत्विज. ९. मेले. गेले. १०. सैन्य. ११. प्रवेश करितात. १२. पृथ्वी. १३. सूर्यवंशा.

सोडुनी निजशरें शत सायकां वक्षिं[1] भेदित मणीपुरनायका[2] ।
.......................................................................... ॥ ३३

बभ्रुवाहन विभेदित कर्णजा सारथी वधुनियां खुडिलें ध्वजा, ।
स्यंदनासह हयोत्तम छेदिले तीळ तीळ तुकडे महि पाडिले. ॥ ३४
त्यावरी वृषभकेतन तेक्षणीं बैसला त्वरित आणिक स्यंदनीं, ।
सायकें करुनियां विरथी तया शंखस्फुरण करी जनमेजया. ॥ ३५
बभ्रुवाहन बसे दुसऱ्या रथीं पावकास्त्रहि[3] त्यजी प्रजळू रथीं, ।
वारणास्त्र सुनिवारण कर्णजें[4] सोडिलें धनुहुनी करपंकजें[5]. ॥ ३६
त्यावरी नृप त्यजी पवनास्त्रा, टाकि कर्णज तदा अचलास्त्रा[6] ।
भूप जे शचिवरास्त्रहि[7] टाकी, वैष्णवें श्रुतिज[8] त्याप्रति झांकी. ॥ ३७

(सवाया.)

त्यावरि पार्थज बोलतसे वृषकेतुसि, 'युद्ध तुवां बहु केलें,
देखुनि शौर्य तुझें, नृवरोत्तम! या रणसागरिं चित्त निवालें ।
यावरि तूं मम पाहें पराक्रम सोडुनि सायक बाहुविशाले[9]!'
त्या इषुनें वृषकेतुकलेवर[10] वाहुनियां गगनांतरिं नेलें. ॥ ३८
तेथुनियां फिरवी वृषकेतुसि दाहि दिशा सरितादि सुवेगें
तीन मुहूर्त तया फिरवूनि रणीं मग आणुनि टाकित रागें, ।
त्यावरि क्रोधि उठे वृषकेतुसि म्हणे 'समरीं नृवरोत्तम जागे
स्यंदनसंयुत बभ्रुवहन उडवी नभिं सोडुनि बाण अमोघे[11]. ॥ ३९
त्या इषुनें रथ तो सनसद्विप[12] ते रविमंडळ भेदित गेला
देखुनि पुत्रसुतारि[13] सहस्रकरें[14] रथ तो मग दग्धचि केला ।

---

१. छातींत. २. बभ्रुवाहनाचें मणिपुर गोकर्णाच्या आसपास कोठें तरी असावें. हें मुक्तेश्वरकृत आदिपर्वांतर्गत ४७ व्या अध्यायांतील कांहीं ओंव्या पुढें दिल्या आहेत, त्यांवरून समजेल. "पश्चिमसागरींचे परिसरीं । मणिपुरनाम नगरीं । चित्रवाहन राज्य करी । ......... ॥ ३७ ॥ त्याची कन्या गुणलक्षणी । चित्रांगदा लावण्यखाणी । तिणें लक्षिला सिंधुजीवनीं । स्नान करितां अर्जुन. ॥ ३८ ॥ पुढती पातला मणिपुरा । तंव चित्रांगदा गरोदरा । बत्तीसलक्षणी राजकुमरा । बभ्रुवाहना प्रसवली ॥ ६४ ॥ वंदोनी गोकर्ण पवित्र । वोलांडोनी हरिहर क्षेत्र ॥ ६८ ॥" यावरून असें सिद्ध होतें कीं बंगाल्याकडील मणिपुर (जें इंग्रजांनीं २।३ वर्षांपूर्वीं खालसा केलें तें) बभ्रुवाहनाची राजधानी नव्हे. ३. अग्न्यस्त्र. ४. कर्णपुत्र वृषसेनानें. ५. हस्तकमळें. ६. पर्वतास्त्र. ७. इंद्रास्त्र. ८. कर्णाचा पुत्र. ९. आजानुबाहु! १०. प्रेत, मुर्दा. ११. सफल, फलकारक. १२. 'सनसद्विप' असा आवाज करीत बाण रविमंडळीं गेला. १३. पुत्राच्या सुताचा वैरी. १४. सूर्यानें.

तेथुनियां रिचवे नृपती वृषकेतुवरी अंचळापरि आला
पाहुनि कर्णसुतें शर सोडुनि वीर पुन्हा रविमंडळिं नेला. ॥ ४०
अंगवळें शर तेचि विखंडुनि येउनियां धरिले कर त्याचे
सोडवुनी कर ते श्रुतिजें मग मार करी बहु पंचशराचे ।
त्या शरिं जाउनि ऊर्ध्व नभीं रिचवोनि धरी दृढ पाद तयाचे
टाकितसे गगनीं वृषकेतुसि गर्जति वीर मृगाधिप वाचे. ॥ ४१
येउनियां वृषकेतु रणांगणि सोडितसे मग सायककोडी
देखुनि अर्जुननंदन ते क्षणिं अर्धशशीशर कार्मुक जोडी ।
मंत्र सबीज जपोनि मुखीं वडवानळतुल्य सुसायक सोडी
तो इषु जाउनियां झगटे वृषकेतु सकुंडल मस्तक तोडी. ॥ ४२

(श्लोक.)

श्रुतिसुतशिर तेव्हां ऊर्ध्व व्योमीं उडालें
नभिंहुनि अतिक्रोधें भूतळालागिं आलें, ।
मणिपुरपतिलागीं वक्ष सिंधूसि ताडी
नगपरि रिपुलागीं रंगभूमीसि पाडी. ॥ ४३
तदुपरि पडिलेंसे जाउनी पार्थपायीं
'हरिहर' मुखिं जल्पे ध्यास आणीक नाहीं ।
उचलुनि मग पार्थें शीर्ष घेऊनि पाणी
तव मृदु वदताहे श्रीहरीनाम वाणी. ॥ ४४
निरखुनि जळ अश्रू लोटले पार्थनेत्रीं
रुदन करि विलापें घालुनी वक्र वक्रीं, ।
'तुज तरि कथिलें रे! जा पुरालागिं वेगें
न धरिसि मम गोष्टी थोर शूरत्व अंगें. ॥ ४५
निजपुरि कथुं वक्रें काय धर्मासि आतां?
तुजविण मज कुंती केंवि तोषेल जातां? ।
परिसुनि तव वार्ता द्रौपदीही न राहे
श्रवणिंच पडतां हें दुःख भीमा न साहे. ॥ ४६
यमल अनुज दोघे ऐकुनी प्राण देती
यदुपति तरि तूझ्या पंचही प्राणज्योती ।

---

१. पर्वतापरी. २. अर्धचंद्राकार. ३. धनुष्य. ४. पृष्ठ ३९ टीप १ पहा. ५. वृक्षासारखा.
६. दोन धाकटे भाऊ.

हरिविण निजलोकीं केंवि गेलासि पुत्रा!
न वदसि मज कांहीं, मौन कां रम्य वक्रा? ॥ ४७

यौवनाश्वतुरंगमा निज विक्रमें सुत आणिले
आजि कां त्यजिलें नरोत्तम! धैर्य सर्वहि आपुलें? ।
भीम एकट जातसे रणसंगरा श्रुतिनंदना!
नाहिं त्यासि साहाय्य दुसरा तूजविण रिपुकंदना. ॥ ४८
मौन तें धरिलें नि[1]जाननिं पूर्ण तें कळलें मला,
मारिला तव तात म्यां तुज क्रोध न्हां तरणीकुळा; ।
वैर तें धरुनी वनांतरिं दुःख हें मज दाविलें,
[2]शीर्ष हें तव पाहतां मम [3]वक्ष सक्षत फूटलें. ॥ ४९
त्वां रणीं शिरपंकजें रजमौक्तिकें पुजिला रवी
तो विलोकुनियां तुला निज [4]भा नभांतरिं हारवी, ।
[5]तूंजविण शशि सूर्यवंशि कदापि महि ना शोभती
घ्राण तें तनुलागिं नसतां काय ते रुचिराद्धती. ॥ ५०
सूर्यविण [6]अवनी जशी गृह दीपावीण [7]न लसे कदा
लिंगविण शिवपिंडी यत्र [8]भर्तृविण [9]प्रमदा सदा, ।
'[10]नीरविण [11]सरिता, महाराणि शौर्यविण प्रभु काय तो?
तेंवि तुजविण वंश मज हा पूर्ण [12]उद्वस वाटतो.' ॥ ५१
यापरी वदुनि मूर्च्छित जाहला, घेउनी शिर उरीं महि लोटला ।
बभ्रुवाहन विलोकुनि ते क्षणीं, पातला समिप निर्दय येउनी. ॥ ५२
टोंचुनी जनक तो [13]धनुकोटिनें, पूर्व तें स्मरुनि बोलत बुद्धिनें, ।
'वैश्यसंभव तुला तुळुं पातलों मोजुनी बहु शिरें यश लाधलों. ॥ ५३
[14]त्यांतरी जड असे वृषकेतुचें, [15]कोंड तें न पुरलें मम हेतुचें ।
जैं तुझें तुळिन रे! शिर या रणीं, तैंचि राहिन सुक्षत्रिय होउनी. ॥ ५४
तिष्ठ रे! उठुनि [16]गांडिव घे करीं, चिंतिं [17]पाशुपत सत्वर अंतरीं' ।
शब्द ऐकुनि धनंजय कोपला, त्या शिरासह रथावरि बैसला. ॥ ५५

---

१. आपल्या तोंडानें. २. धड, शीर. ३. ऊर. ४. प्रभा, कांति. ५. येथें वृत्तासंबंधानें गडबड दिसते. ६. पृथ्वी. ७. न विलसे (शोभे). ८. नवऱ्याशिवाय. ९. स्त्री. १०. उदकाशिवाय. ११. नदी. १२. ओसाड. १३. धनुष्याच्या अग्रानें. १४. सामर्थ्यें. १५. कौतुक. १६. पृष्ठ ९६ टीप ५ पहा. १७. पशुपतीचें (शिवाचें) अस्त्र.

बोलिला निज सुताप्रति आननें, 'आज मी प्रळयींचा शिव लक्षणें[1], ।
कोठ तूं मजपुढें नर गच्छसी[2]? तूज मारिन कसें जिविं नेणसी?' ॥ ५६
यापरी वदुनि सायक सोडिले, बभ्रुवाहन उरस्थळिं भेदिले, ।
त्यावरी करित भैरव[3] गर्जना क्रोध तो न धरवे बहु अर्जुना. ॥ ५७
बाण ते त्यजुनि ने गज अंबरीं[4], अश्वस्यंदन पदीं पिडितो शरीं, ।
पार्थ····च्यय समीरहि तो जसा, ऊडवी सुतचमू नभिं हा तसा. ॥ ५८
चमूजलाब्धि[5] अंतरीं धनंजयाग्नि संहरी ।
विलोकितांचि अर्जुना सुमृत्यु सैनिकाजना. ॥ ५९
असंख्य बाण सोडिले रणांत वीर भेदिले, ।
पुरांत चालिले इषू कितेक सूटती पशू. ॥ ६०
गृहां कितेक पाडिलें मणी सुरुक्म[6] ढाळिले ।
सुधांवतांचि[7] अंगना[8] सदग्ध त्या गृहांगना[9]. ॥ ६१
सुतीव्र बाण पावकें प्रदीप्त नारि अंशुकें[10] ।
वधू किती विलापिती वरांसि हांक मारिती. ॥ ६२
तदा धनंजयात्मजें त्रिसायकें करांबुजें[11] ।
वदोनि पंडुनंदना करीत सिंहगर्जना. ॥ ६३
वरूणकेतु तोडिला महीस सूत पाडिला, ।
रथध्वजासि भेदिलें तुरंग[12] चारि छेदिले. ॥ ६४
शरें सुशीघ्र तोडिले कपीवपूसि[13] छेदिलें, ।
सुवीरसूनु[14] पातला पुन्हां पित्यासि बोलिला. ॥ ६५
'द्रोणइंद्रनिर्जरादि[15] अर्चुन[16] पूर्वीं मंत्र अस्त्र त्याजपासून ।
त्वां धनंजया! कितेक घेतले ते रणांत आज कोठ गच्छले? ॥ ६६
कृष्णसूत[17] कां नये तुझाऽधमा[18] मींच सांगतों मुखें उपक्रमा, ।

---

१. पाहणें, मानणें. २. जासी. ३. भयंकर. ४. आकाशांत. ५. सैन्यरूप सागरांत. ६. सोनें. ७. त्या कवीची 'सु'वर बरीच प्रीति आहे. ८. स्त्रिया, ९. घरापुढील अंगणांत. १०. वस्त्रें. ११. हस्तकमलानें. १२. घोडे. १३. मारुतीच्या शरीराला. १४. अर्जुनपुत्र. १५. देवादि. १६. पूजून. १७. सूत=सारथी. [भक्तांची मोतद्दारी कृष्ण करतो असें वर्णन काव्यांतून अनेक ठिकाणीं आढळतें. जसें:—(१) अर्जुनतुरंगमांतें जो स्वकरानें करी खरारा जी. (२) असा प्रभुहि सेवकां भजसि खासदारापरी. (मोरोपंत.)(३)हयदोरे धरि स्वकरें 'हेरे' वदत पार्थरहंवरीं (देवनाथ)]. १८. तुझा+अधमा, असा संधि करणें अप्रशस्त होय.

मत्पवित्र मातृ[1] त्वांचि दूषिली याजसाठिं कृष्णमूर्ति राहिली. ॥ ६७
पूर्वी चिंतितांचि शीघ्र येतसे आजि क्रोधरूप तूज कां असे? ।
चिंतिं श्रीहरी मनांत यावरी नाहिं टाकितों[2] शरासि जोंवरी ॥ ६८
कृ[3]ष्णविस्मृतासि हानि निश्चयें गर्व त्यागुनी स्मर मनोदयें ।
देख स्वर्गिं आजि कर्णनंदना धाडितों तुला वधोनि अर्जुना.' ॥ ६९
शब्द ऐकतांचि पार्थ कोपला तीव्र सायकें सुपुत्र भेदिला ।
बाण ते न लागतांचि गच्छले त्यावरी सुतें असंख्य सोडिले. ॥ ७०
त्या शरीं दिशादि व्योम व्यापिलें अर्जुनःर्सिं चौशरें विभेदिलें ।
त्यावरी समूळ भ्रां[4]ति घातली मृत्युवेळ ते समीप ठाकली. ॥ ७१
बोलली तथा सुशाप जान्हवी क्रोध तो बळें प्रताप आठवी, ।
बाण जो करें त्यजी क[5]पिध्वजी बभ्रुवाह तोडुनी मही त्यजी. ॥ ७२
अर्धचंद्रबाण बभ्रुवाहनें लावुनी धनुष्य वोढिलें गु[6]णें ।
देखतांचि शक्रदेव कोपले चंद्र भास्करादि व्य[7]ग्र जाहले. ॥ ७३
भूमि पाहतां भग्न जाहली, चेवती बहू उ[8]डुगणावली ।
धूळयुक्त वायु थोर सूटला, रक्तवृष्टिनें मेघ वर्षला. ॥ ७४
काळ वन्हिरूप बाण सोडिला अर्जुनें दुरूनि तो विलोकिला, ।
ना शके निवारुं तीव्र सायका ते क्षणीं स्मरे ख[9]गेंद्रनायका. ॥ ७५
········स·ह·री····तंन जो रणीं वमित पावक सुसायक येउनी ।
ज्वळित कुंडल सुमस्तक ताडिला रणिं वृषध्वजीश तरि पाडिला. ॥ ७६
तनु तनूजवळि जाउनियां पडे रणनभीं रविधनंजय तो बुडे, ।
'पडियला नरपती कवणे दिशीं' मुनि म्हणे, 'नृपवरा! जरि पूससी. ॥ ७७
एकादशी कार्तिक मास होता भौमोत्तरास्ताप्रति भानु जातां ।
त्या शुक्लपक्षीं शिर अर्जुनाचें रे! छेदिलेंसे तंनयें[11] पित्याचें. ॥ ७८
त्या बभ्रुवाहें जय हांक केली सेना तदा हर्षित सर्व झाली ।
वाद्यें तुरें वाजति सर्व घोषें [12]बंदी मुखें वर्णिति कीर्ति तोषें. ॥ ७९
आला सुसैन्यें नृप नीजग्रामा ओंवाळिती ठाकुनि सर्व रामा[13] ।
घेऊनि पुष्पें किति वर्षताती वा[14]रांगनांचे पथिं नाच होती. ॥ ८०

---

१. माता, आई. (चित्रांगदा.) २. बाण सोडला नाहीं तोंच. 'नाहीं टाकितों' हा प्रयोग चिंतनीय आहे. ३. जो कृष्ण विसरला त्यास. ४. मोह, मूर्च्छा. ५. कपि आहे ध्वजाच्या ठायीं ज्याच्या तो. (अर्जुन.) (पृष्ठ ८४ टीप १ पहा.) ६. धनुष्याच्या दोरीनें. ७. दुःखित. ८. तारागणपंक्ति. ९. कृष्णा. १०. बभ्रुवाहनें. ११. अर्जुनाचें. १२. भाट, स्तुतिपाठक. १३. स्त्रिया. १४. वेश्या, जारिणी.

चित्रांगदेलागिं वदे उलूपी, 'तूं धन्य गे! सुंदरि पुण्यरूपी, ।
असा तुझा दुर्धर पुत्र झाला आला रणीं मारुनि अर्जुनाला.' ॥ ८१
ऐकूनियां अर्जुनघातवाणी सालंकृता दीपकपात्र पाणी ।
पुत्रा [1]निरांजूं जंव जात होती, तैसीच टाकी [2]तनु दिव्यकांती. ॥ ८२
आनंदांतरिं तो विषाद शिरला, वक्षासि ताडी करें,
पोतीचे गळसूत्र तोडुनि त्यजी माळा पिटी नीकरें; ।
टाकीते [3]कच तोडुनी, गडबडा लोळे, क्षिती सुंदरी,
आक्रंदोनि रडे, पुन्हा महि पडे, तेव्हां उलूपी धरी. ॥ ८३
एकें जाउनियां नृपासि कथिती, 'कां शोक माता करी?
आम्हीही समजाविली परि नृपा! ते दुःख ना आंवरी.' ।
ऐकूनी मग बभ्रुवाहन तदा आला असे [4]तांतडी
वंदोनी जननी म्हणे, 'निजतनू कां पीडिली [5]कोरडी? ॥ ८४
संतापें निजकंठिचें मृदु करें हें [6]सूत्र कां तोडिलें?
सौभाग्यांचित घ्राणिच्या सुरुचिरा कां मौक्तिका काढिलें? ।
ताटंकेविण कर्ण केंवि दिसती माते! मला सांगिजे,
आलों मी जय घेउनी म्हणउनी तूं आज [7]नीरांजिजे. ॥ ८५
नामें अर्जुन कोणिएक सचमू आला असे संगरा,
सांगातें वृषकेतुकामनृपती चालोनि येती [8]पुरा, ।
तेव्हां जाउनियां रणीं निजबळें कामादिकां जिंकिलें,
त्यांमध्यें वृषकेतु अर्जुन शरें दोघां जिवें मारिलें. ॥ ८६
घालीं सर्वहि भूषणें तनुवरी संतोष हा मानुनी,
दीसे रूप तुझें अमंगळ बहू या [9]मंडणांवांचुनी.' ।
ऐकोनी जननी म्हणे, 'निजमुखें रे! पापरूपी सुता!
नाहीं रे! तुजसारिखा अधमहि, त्वां [10]हांटिला तो पिता. ॥ ८७
धर्मअनुज अर्जुन पुत्रका! प्रीय तो बहु असे यदुनायका, ।

---

१. ओंवाळूं. २. देह. ३. केंस. ४. शीघ्र. ५. व्यर्थ. ६. मंगळसूत्र. ७. ओंवाळी. नीराजनविधी म्हणून एक मंगलकारक कर्म आहे. ताटांत दूर्वा, पुष्पें, कमळें, अक्षता इत्यादि शुभद्रव्य ठेवून दीप पाजळून देवाला, नवऱ्याला किंवा विजयी राजाला आरतीसारखें ओंवाळितात. याचे योगें अरिष्ट निरसन होऊन उन्नति होते—अशी समजूत आहे. [मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय १२ ओंवी २९, काव्यसंग्रहग्रंथमाला—पृष्ठ ८९ पहा. तसेंच वराहमिहिरकृत बृहत्संहिता—अध्याय ४४ पहा.] ८. मणिपुरा. ९. अलंकारांवांचून. १०. मारिला.

कुंतिचा तनय तो नरकेसरी[1] स्वामि[2] तो मम कसा वधिला शरीं? ॥ ८८
कंठसूत्रहि तुवां मम भंगिलें, हें बरें उपजुनी सुख दाविलें. ।
धिक्क रे! तव पराक्रम नंदना! पितृघातक न दाखविं आनना[3]. ॥ ८९
काष्टसंभव[4] हुताशन[5] तो जसा, तात[6] भक्षित, न शंकित मानसा, ।
तेंवि तूं बहुत निर्दय होउनी, मारिला निजपिता समरांगणीं. ॥ ९०
बांध तूं म्हणशि सूत्रहि तें गळां, घाल तूं तपवुनी[7] दृढ शृंखळा[8], ।
लेववी श्रवण तावुनि तंदुले, चित्त हें पतिसवें मम गच्छलें. ॥ ९१
कोठ रे! पडियला पति दाखवीं, कुंड खाणुनि हुताशन[5] चेतवीं ।
देह हें करिन दग्धहि त्यांसवें, मानिजे मज सुरांसह वासवें[9].' ॥ ९२
वदोनी असें कामिनी ते निघाली, पथीं चालतां दुःखपूरीत झाली, ।
उलूपी वदे वाक्य चित्रांगदेला, 'मला पूर्विंचा अंतरीं हेतु आला. ॥ ९३
पुरा अर्जुनें बोलिलें वाक्य वक्त्रें, सखे! मृत्यु माझा तदा ऐक श्रोत्रें ।
तुझे काननीं[10] दाडिमा पंच मौझा, जधीं दग्ध होतांचि गे! मृत्यु माझा.' ॥ ९४
असें बोलुनीयां वनामाजि नेली, अळीं दाडिमाचीं वनीं भस्म झालीं, ।
विलोकूनियां वक्ष पीटीत हातें, म्हणे, 'निश्चयें मृत्यु गे! अर्जुनातें.' ॥ ९५
सुपुत्रें सुसैन्यें सुदुःखेंचि धांवे, वधू मुक्तकेशा[11] रणालागिं धांवे ।
असे छिन्नशीर्षें रणीं पार्थ जेथें, विलापोनियां पातली नारि तेथें. ॥ ९६
असंख्यात तें मारिलें सैन्य पुत्रें, वदोनी विलापीतसे अंबु[12] नेत्रें ।
मिठी घालिती जाउनी पार्थपायीं, म्हणे 'वल्लभा! वाक्य तूं बोल कांहीं. ॥ ९७
मृदू पाद कैं ना करें चोळिले रे! कधीं अंबुनें नाहिं प्रक्षाळिले[13] रे! ।
असे पूर्ण सेवा तरी तस्करी[14] मी, म्हणोनी सलज्जीत मी! अंतरामीं[15].' ॥ ९८
उठोनी वधू घे पतीशीर्ष मांडीं, म्हणे 'स्वामि! तूं सर्वही क्रोध सांडीं ।
वदें स्वल्प कांहीं मसीं वक्त्रपद्में, करीं शोक उष्णीं दिल्हीं वस्त्रसद्में.' ॥ ९९

---

१. मनुष्यरूपी सिंह, प्रतापी. २. प्राणनाथ, नवरा. ३. मुखाला. ४. लांकडापासून उत्पन्न झालेला. [लांकडावर लांकूड घांसलें असतां अग्नि उत्पन्न होतो, हें प्रसिद्धच आहे.] ५. अग्नि. ६. अग्नि आपल्या ताताला काष्टाला, अरणींत, मनांत शंका न धरतां जाळून टाकतो—या गोष्टीकडे कविकटाक्ष आहे. ७. तापवून. ८. वेडी, बिडी. ९. इंद्रानें. १०. वनांत. ११. जिचे केंस सुटले आहेत अशी. १२. उदक, अश्रु. १३. धुतले. १४. लग्नाची बायको नव्हे ती 'तस्करी.' १५. मनांत.

## उपसंहार.

(श्लोक.)

विलापील आतां बहू अर्जुनाला, तुम्ही ऐकतां धैर्य द्यावें मनाला।
अनंताश्रयें प्राण येईल त्याचा अनंता तरी छंद तो माधवाचा. ॥ १००

१. ह्या श्लोकावरून हें प्रकरण अपुरें आहे हें सिद्धच होतें. याचा आणखी एक प्रसंग आहे, परंतु तो आम्हांस मिळाला नाहीं. कोणास मिळाल्यास त्यांनीं आम्हांकडे पाठवावा म्हणजे तो आम्ही छापून प्रसिद्ध करूं आणि कवीच्या व देणाऱ्याच्या ऋणांतून मुक्त होऊं. २. शेषाच्या आश्रयानें. "तंव वासुकी म्हणे श्री अनंता । देखिलें बभ्रुवाहनाच्या पुरुषार्था । मग कृष्ण झाला आलिंगिता । चित्रांगदेच्या नंदनातें ॥ १ ॥ म्हणे आणिला आहे अमृतमणि । अर्जुन उठवावयालागुनी । परी शिरकमळें नेलीं चोरुनी । तें आम्हां न कळे श्रीरंगा ॥ २ ॥ शिरें असती कृपानिधी । तरी पावती कार्यसिद्धी । सैन्यसागर क्षणामधीं । सजीव होता श्रीकृष्णा ॥ ३ ॥ मग म्हणे गा फणिवरा! । शिरें येतील चिंता न करा । कृष्ण संकल्प घाली अवधारा । विचित्र एक ॥ ४ ॥ म्हणे मी नित्य ब्रह्मचारी । हें सत्य असेल चराचरीं । तरी शिरें नेलीं ज्या दुराचारीं । त्याचा शिरच्छेद हो ॥ ५ ॥ नेलीं शिरें एक क्षणीं । येऊनि पडोत रुंडास्थानीं । ऐसें बोलिला शार्ङ्गपाणी । धरूनी सत्य संकल्प ॥ ६ ॥ तंव अपूर्व वर्तली करणी । त्या दोघांची झाली शिरखंडणी । शिरें गगनमार्गें येउनी । पडलीं रुंडापाशीं ॥ ७ ॥ वासुकी घेउनी अमृतमणी । चालिला उठवावया अर्जुनालागुनी । तंव बोलिला शार्ङ्गपाणी । आधीं वृषकेता उठवावें ॥ ८ ॥ मग उठविला वृषकेत । तो सावध झाला त्वरित । त्यानंतरें उठविला पार्थ । तयामागें प्रद्युम्न ॥ ९ ॥ सकळ राय मुगुटवर्धन । आणि सर्व चतुरंग सैन्य । सावध झाले न लागतां क्षण । जेंवी उठती निद्रिस्त ॥ १० ॥ जैसा प्रळयो झालिया पाठी । ब्रह्मा निर्माण करी सृष्टी । पुन्हा होय घटमठी । निर्माण सर्व. ॥११॥ कां उगवलिया तरणी । तारांगणें लोपती गगनीं । पुन्हा अस्त झालिया दिनमणी। उडुगणीं भरे आकाश॥१२॥ कीं पूर्वी श्रीरामावतारीं। सैन्य पडलें होतें रणसागरीं। तैं मेघ वर्षले अमृतधारीं । तेणें सर्व सैन्य उठलें ॥ १३ ॥ अपूर्व वर्तलें एक तेथें । पडिलीं होतीं राक्षसप्रेतें । त्यांसी जीवदशा न येची अमृतें । हे इच्छा श्रीरामाची. ॥ १४ ॥ तद्वत अमृतमणी निमित्त करुनी । समस्त उठिले तत्क्षणीं । हे केवळ श्रीकृष्णाची करणी । बडिवार नव्हे अमृताचा ॥ १५ ॥ अमृतमणीचा पुरुषार्थ । शिरें नसतां भासला व्यर्थ । तेंचि पहा श्रीकृष्णाचें सामर्थ्यें । अकस्मात शिरें आलीं. ॥१६॥ अमृतदृष्टी श्रीकृष्णाची । कायसी प्रभुता अमृतमणीची । कृपादृष्टी झाली भगवंताची । तेणें उठले सकळही ॥ १७ ॥ जयाचिया इच्छा वसे । अनंत ब्रह्मांडांची रचना दिसे । ज्याच्या भ्रूविक्षेपें नासे। क्षणांत ब्रह्मांडरचना ॥ १८ ॥ पुन्हा कृष्णाचिया इच्छावेशें । यथापूर्व जशाचें तसें । उत्पत्तिस्थितिलय चालत असे । ज्याच्या सहज इच्छामात्रें ॥ १९ ॥ अमृतमणीस सामर्थ्यें । देता हाची श्रीकृष्णनाथ । कृष्णाचें ऐश्वर्य समर्थ । विभुतीरूपें विस्तरलें. ॥ २० ॥ धेनु बोळली वांसुरा । कीं कल्पतरू प्रसन्न सुरवरा । किंवा तृप्त करावया धरा । वोळला वर्षाकाळीं. ॥ २१ ॥ तैसा शिववल्लभ अमृतदृष्टी । अवलोकितां सैन्य दृष्टी । तत्काळ झाली उठाउठी । लागती श्रीकृष्णाचे चरणीं. ॥ २२ ॥" [ नारायणकृत अश्वमेध—अध्याय २०—ओंव्या १५९-१८०] ३. अनंतकवीला. ४. लक्ष्मीपतीचा. (कृष्णाचा.)

## सिंहध्वजाख्यान.

(श्लोक.)

वंदोनी करि प्रश्न जैमिनिप्रती राजा अती आदरें,[1]
'जे काळीं मेखअश्व[2] तो धरियला कुसुमावतीनिर्जरें,[3] ।
पार्थादी वृषकेतु सर्व समरीं मूर्च्छा असे माधवा
बाणें विंधुनि पाडिलें महिवरी सिंहध्वजें तेधवां. ॥ १
नाहीं कोणिच राहिला तरि कसें अश्वासि त्या रक्षिलें ?
कोणें होउनि साह्य पांडुकुमरा सिंहध्वजा मारिलें ? ।
सांगा सर्व वृतांत[4] गुह्य मजला विनवीत अत्यादरें,[1]
संतोषोनि वदे सविस्तर मुनी[5] रायाप्रती आदरें ॥ २
कर्णापासुनि पुत्र तो प्रसवला वृषकेतु·········
····षोडश जाहला परि····पुरुषार्थि·········· ।
भार्या भद्रवती महा सति असे····संभवे[6] संतती
तीचा तोच पती दळासह[7] गती गेला सुयुद्धाप्रती. ॥ ३

(ओंव्या.)

गर्भासी भरतां नवमास । दशमासीं झाली प्रसूत ।
दशाह[8] लोटल्या पुत्रास । धर्में महोत्साह मांडिला. ॥ ४
ऐसिया उत्साहें धर्मराज । बाळा नाम ठेविलें ध्रुवतेज ।
नेत्र देखोनी तेज:पुंज । भावी अर्थ जाणोनी. ॥ ५
स्नुषेसहवर्तमान[9] कुंती । अत्यंत संतोषली चित्तीं, ।
'माझ्या कर्णाची संतती । रक्षो श्रीपती'[10] म्हणतसे. ॥ ६
मग द्रौपदीनें काय केलें । बाळ पाळण्यामाजी घातलें ।
सुवर्णसूत्र करांनीं धरिलें । हलर[11] देती पैं झाली. ॥ ७
सप्रेम करूनियां चित्त । या बाळातें[12] असे हालवीत ।
हृदयीं हात ठेवोनी अनंत । त्याचें गीत गातसे.[13] ॥ ८

---

१. सन्मानपूर्वक. २. यज्ञ+हय. ३. कुसुमावती नगरीच्या राजानें. ४. येथें वृत्तसुखार्थ 'वृतांत' असें 'वृत्तांत' या शब्दाचें रूपांतर केलें आहे. ५. जैमिनी. ६. प्रसवे. ७. ससैन्य. ८. दश+अहन्= दहा+दिवस. ९. कर्णाच्या स्त्रीसह. १०. रमाकांत. ११. झोंके. १२. कर्णपुत्रातें. १३. हें प्रकरण बहुतेक त्रुटित आहे. हीं पद्यें एका प्रसंगाच्या अखेरचीं आहेत. आम्हांस वाटतें कीं अनंतानें सर्व अश्वमेधावर कविता केली असावी; मागें 'सुरथसुधन्वाख्यान' (२ प्रसंग) व 'बभ्रुवाहनाख्यान'

## पदसंग्रह.

### पद १५ वें.

भजन तव गजवदना! मजला । देत असे तोषाला. ॥ ध्रुवपद. ॥
नामस्मरणावांचुनि नाहीं । तारण नरतनुला. ॥ भजन० ॥ १ ॥
नाम तुझें हें सुरनरपावन । गंधर्व गाति ताला ॥ भजन० ॥ २ ॥
सकलारंभीं नाम तुझें हें । मंगलमय विमला ॥ भजन० ॥ ३ ॥
दास अनंता तारक तूं गण- । नायक हेंच भला ॥ भजन० ॥ ४ ॥

### पद १६ वें.

म्हणुनी आळविजे गोकुळपाळा । बाळा गोपाळा. ॥ ध्रुवपद. ॥
स्मरिजे वेदनीं ज्याची ललना मा । नामा अनामा ।
ना माया लेश ज्या, सुखधामा । दामान्वित दामा ।
दामा कटिवेष्टित तनयो दामा । यन्मित्र सुदामा ।
दामोदरनामा जपती विपती पद वरती न रामा ॥ म्हणुनी० ॥ १ ॥
जाती हटयोग तपांसि कराया । रायत्व वेराया ।
रायस्पद भोगित धनसुतजाया । जाया उपजाया ।
जायाचें देहें, हें क्षण न फसाया । सायास कशाया ।
सायासाविण उमगा या, गा या, हरि सुगम जपा या ॥ म्हणुनी० ॥ २ ॥
ध्याती हृदयांतरिं मूर्ति उदारा । दारा सकुमारा ।
मारा कर चिंतिति गोपकुमारा । माराब्धि उतारा ।
ताराया जडजीव धरि अवतारा । संसार पसारा ।
सारा तुम्हि अनंतप्रभुविण सारा सारा भव सारा ॥ म्हणुनी० ॥ ३ ॥

---

(त्रुटित) हीं प्रकरणें छापलींच आहेत. कोणापाशीं ह्या कवीची आणखी कविता असल्यास आम्हांकडे पाठवावी अशी सविनय प्रार्थना आहे. शोधक वाचक मनावर घेऊन जर प्रयत्न करतील तर ह्या कवीच्या काव्यांचा उद्धार होण्यास कितीसा वेळ लागेल?

१. देवांस आणि मानवांस पवित्र करणारें. २. तोंडानें. ३. भार्या. ४. लक्ष्मी. ५. राजपद भोगाया. ६. 'देह' शब्द कोठें कोठें नपुंसकलिंगी आढळतो; जसें—(१)'जरि देह म्हणावें आपुलें । तरि हें बहुतां कारणें निर्मिलें ॥' [रामदास], (२) पूर्वीं शिबी चक्रवर्ती । देह तेणें दिधलें ससाणियासी । त्याची देखोनी विश्वासभक्ती । श्रीहरि त्यास पावला. ॥ ४१ ॥ [नारायणकृत--अश्वमेध-अध्याय २२]. ७. श्रम. ८. मूढ जन; (पक्षीं) जडांना [अहल्या शिळा झाली असतांना तिचा उद्धार झाला—हें लक्षांत असलें पाहिजे.] आणि जीवांना (सजीव प्राण्यांना.)

## पद १७ वें.

ते मज निरवधि आवडती । भक्त [1]महासुकृती ॥ ध्रुवपद. ॥
ज्यांच्या [2]पादरजें मह्रत ब्रह्मांडें विरजे ।
व्हावी यास्तव त्या मागें मी चालें पादगती ॥ ते० ॥ १ ॥
दोंवरि दोनी भुजा घेउनी आलों या काजा ।
कीं कवळाचें आंग तयाचें हृदयीं चौहातीं ॥ ते० ॥ २ ॥
[3]श्रीगुरूच्या बोलें [4]विधीं मजला ओळखिलें ।
नित्य अनंत [5]अनामय त्या मज हृदयीं सांठविती ॥ ते० ॥ ३ ॥

## पद १८ वें.

[6]निशिदिनिं मुखिं गा रे! गा रे! । गोविंद हरे. ॥ ध्रुवपद. ॥
अगणितगुणवृंदा! ।
मंदरधर सुंदर मुख [7]कुंदरदन [8]मंदहसित ॥ गा गोविंद० ॥ १ ॥
जय जगदानंदा! ।
[9]अंबुजकर [10]कंबुधरणा शंभु न स्तविति वंद्यु तनु ॥ गा गोविंद० ॥ २ ॥
[11]त्रिभुवनचर [12]सुरवर ।
[13]विदलितमुर अनंत सत्कृति छंदा ॥ गा गोविंद० ॥ ३ ॥

## पद १९ वें.

मी झाडविणार गुरूचा दरबार त्याचा झाडी ।
कल्पनेचे बुडे कपट झाडुनिया काढी ॥ ध्रुवपद. ॥
भाव झाडूं भक्ती पाढी अविद्या मूळ फेडी ।
[14]कंदीमखान्यामध्यें [15]नफर चाकरी न सोडी ॥ मी० ॥ १ ॥
तीन तेरा पांच पंचक जात माझी रंगी ।
टुकड्याच्या पाळीला मी नाहीं कधीं तंगी ॥ मी० ॥ २ ॥

---

१. पुण्यवान्. २. पायांच्या धुळीनें. ३. गुरु=अंधकारनिरोधक. 'शब्दगुरुत्वंधकारश्च रुशब्दस्तु निरोधकः । अंधकारनिरोधत्वाद्गुरुशब्दो निगद्यते ॥' [सौरपुराण–अध्याय ६८ श्लोक १०.] ४. जगानें. ५. रोगरहित, निरामय. ६. रात्रदिवस. ७. कुंदाच्या कळीप्रमाणें ज्याचे दांत तो. ८. मंद हंसणें=स्मित करणें. ९. कमलहस्ता. १०. कंबु=शंख. ११. तिन्ही लोकांत फिरणारा. १२. देवश्रेष्ठ. १३. मुरनामक दैत्याला मारिलें ज्यानें तो. १४. जुना वाडा. १५. एक इसम.

उपमर्दराज देसायाची कीर्ति देशोदेशीं ।
कधीं भेट बिगार नाहीं माझा धाक काळोजीशीं ॥ मी० ॥ ३ ॥
मोठे मोठे सिद्ध साधू पढती पान पोथी ।
कवी अनंत म्हणे माझा अर्थ प्राणनाथीं ॥ मी० ॥ ४ ॥

## पद २० वें.

'पावन नाम कशाला धरिलें केव्हांची मी आळवितसें. ॥ ध्रुवपद. ॥
मोठा रागिट दुर्वास[1] हा भोजन रात्रिस मागतसे ।
न मिळे तरि तो शापिल सत्वर थरथर देवा! कांपतसें ॥ पावन० ॥ १ ॥
दीनदयाळा! स्वामि! कृपाळा! बहिण तुझी मीं म्हणवितसें ।
गोपीजनमनमोहन! माधव! धांव तुला मी भाकितसें ॥ पावन० ॥ २ ॥
अनंत पाहवा दीनोद्धारक ऐसें जग तुज बोलतसे ।
संकट हर तूं जनार्दना! मीं लवपळ वाट विलोकितसें. ॥ पावन० ॥३॥

## पद २१ वें.

राधेच्या गृहीं होतो सोहळा । कृष्णरूपीं जडली[2] ती बाळा ॥ ध्रुवपद. ॥
राधा म्हणे, 'रडूं नको घनश्यामा[3]! । यशोदे[4] गृहीं करूं दे कामा ।
चल माझ्या गृहासी खेळाया' । 'नेई' म्हणे राधेसी माया ॥
कडे घेउनी कृष्णातें । नेई मग आपुल्या सदनातें[5] ।
पाळण्या वसुनी गोपाळा ॥ राधेच्या० ॥ १ ॥
सांवळी पाहुनी मूर्ति ते । आवरी आपुल्या लज्जेतें ।
हास्यवदन करुनि तेव्हां । म्हणे, 'तूं थोर होसील केव्हां? ॥
माझ्या मनीं आवडे खेळावें । तुम्ही आम्ही मंचकीं[6] लोळावें.' ।
हरी म्हणे, 'थोर होतों या वेळा' ॥ राधेच्या० ॥ २ ॥
शिव किरिट मृगनयनी[7] बोले । थोर कसा होसील? या वेळे ।
मंत्रसामर्थ्य ज्यापाशीं । ........................ ॥
थोर होतां बोलती गुज गोष्टी । ...................... ।
पुष्पाची सेज केली त्या वेळा ॥ राधेच्या० ॥ ३ ॥
'कोमळ सखया!' म्हणे 'स्वरूप यावें । लागेन चरणीं दृढभावें' ।
अशा गोष्टी बोलती सखया । आला होता ते वेळीं अनया[8] ॥

---

१. दुर्वास ऋषि मध्यान्ह रात्रीस भोजनास आले त्याप्रसंगीं कृष्णाचा द्रौपदीनें केलेला धांवा. २. आसक्त झाली. ३. कृष्णा! ४. यशोदेला. ५. गृहातें. ६. पलंगीं. ७. हरिणाक्षी. ८. राधेचा पति.

………………………… । ………………………… ।
अमृतघोटीं पडे विषगोळा ॥ राधेच्या० ॥ ४ ॥
'कोणासी विचार हा पुससी । कवाडें लावुनियां बससी' ।
………………………… । ………………………… ॥
आला होता भ्रतार पुरे हेत । लज्जा माझी राखी अनंत ।
हो यालागीं झाला सांवळा ॥ राधेच्या० ॥ ५ ॥

---

## पाळणे.

### ( १ )

जो जो जो बाळा, नको रडूं गोपाळा । दारीं बागुलबावा आला. ॥ध्रुवपद.॥
बागुलबावाचें रूप दिसे मनोहर, । आंगावरी व्याघ्रांबर[१] ॥
त्रिशूळ डमरू शंख शोभे फणिवर[२] । गळ्यामध्यें मनुष्यमुंडांचे हार, ॥
मिशा पिंगट शिरीं जटांचा भार, । वरी वाहे झुळझुळ नीर[३] ॥
भस्म सर्वांगीं, कंठ दिसतो नीळा । आरुढोनि नंदीवर आला ॥ जो जो० ॥१॥
बागुलबावाचा ऐकूनि शब्द कानीं । तेव्हां रडे चक्रपाणी[४] ॥
मातेसी म्हणे, 'चल बाहेर घेऊनी । दाखीव बागुला नयनीं[५] ॥
………………………… । ………………………… ॥
नको छंद घेऊं, उगा राहीं गोपाळा! । मी भिक्षा वाढितें त्याला.'॥ जो जो० ॥२॥
म्हणे नंदाला, 'ध्या ह्याला क्षणभरी । ………………………… ॥
मी भिक्षा वाढितें वेगीं मोत्यें पौळ्यांनीं। सुवर्ण ताट भरूनी, गेली द्वाराबाहेर घेउनी ॥
ध्या ध्या बावांनो, नका करूं उशीर । माझें बाळ भितरें फार ॥
नव्या नवसांनीं, एवढा पुत्र आम्हांला । तो मोठे दैवें लाधला.' ॥ जो जो० ॥३॥
'बाळ आहे कसें, असे सर्वां माहित । दिसे जगावरी नाईक[६] ॥
मी बाळाचा, शब्द ऐकुनी कानीं । त्वरें आलों मी धांवूनी ॥
बाई ! आणा वेगें, वेगें सारंगपाणी[७] । पहावें बाळा इच्छा माझे मनीं, ॥

---

१. वाघाचें कातडें. २. साप. ३. उदक. ४. कृष्ण. 'चक्रपाणि' हें तद्गुणसंविज्ञान बहुव्रीहि-समासाचें उदाहरण आहे. ज्या वर्णिलेल्या गुणाचें संविज्ञान (चिन्ह, खूण) ज्याच्या विशेष्यांत नित्य सांपडते तो 'तद्गुणसंविज्ञान' बहुव्रीहि समास होय. येथें हातांत चक्र असणें हा जो गुण सांगितला तो कृष्ण या विशेष्यांत नित्य आढळतो. बहुव्रीहि समासाच्या दुसऱ्या प्रकारास 'अतद्गुणसंविज्ञान' असें म्हणतात. ५. डोळ्यांनीं. ६. श्रेष्ठ. ७. शार्ङ्गपाणि (कृष्ण).

'हा हा नारायणा, हरिसेवेमधीं गुंतला । मी अनंत नमितों त्याला' ॥ जो जो० ॥४॥

( २ )

जो जो-जो जो रे! मधुसूदना! । बाळा! जगजीवना! ।
हालवि यशोदा पाळणा । निज निज नारायणा! ॥ ध्रुवपद. ॥
[1]प्रथम अवतारीं क्षीराब्धी । स्तवन करितां वेदीं ।
करुणा परिसुनियां गुणनिधी । शंखासुरा वधी ॥ जो जो० ॥ १ ॥
द्वितिये संकष्टीं इंद्रासी । कूर्मरूप होसी ।
सिंधु मंथुनियां श्रमलासी । सौख्यें सकळां देशी ॥ जो जो० ॥ २ ॥
तिसरा अवतार हिरण्याक्ष । धरणी घाली कक्ष[2] ।
पळतां धरियेला अनुलक्ष । फोडी त्याचें कुक्ष[3] ॥ जो जो० ॥ ३ ॥
चतुर्थ नृसिंह विशाळ । अग्नीचे कल्होळ ।
निवटुनि असुराचें सहकूळ । काढी [4]अंत्रमाळ ॥ जो जो० ॥ ४ ॥
निर्जिव [5]स्तंभाचे उदरीं । प्रगट होशी हरी! ।
क्रोधें असुरातें संहारी । [6]प्रऱ्हादाशी तारी ॥ जो जो० ॥ ५ ॥
पंचमें वामन सुंदर । खुजट·········वर ।
तेजःपुंज दिनकर । हरला [7]दानव···· ॥ जो जो० ॥ ६ ॥
षड्रिपु भार्गव अभिधानी । पिता जमदग्नी ।
पृथ्वी निःक्षत्री तिनवाणी । दिधली विप्रा दानीं ॥ जो जो० ॥ ७ ॥
त्र्यंबक धनुषाची बळ प्रौढी । कर्णाकरी वोहडी ।

---

१. मत्स्य, कूर्म, वराह इत्यादि दशअवतारांस अनुलक्षून हें वर्णन आहे. या दहा अवतारांतील कृत्यें आणि त्यांचीं नांवें पुढील श्लोकांत निरूपण केलीं आहेत:—'वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते दैत्यं दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते म्लेच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥.' [भावार्थः—श्लोक 'वेदोद्धारकरा जगत्रयधरा भूगोल दंष्ट्रांकुरा, दैत्यप्राणहरा बलिं छलकरा क्षत्रीकुलारीवरा । लंकेशां तकरा हलायुधधरा कारुण्यपूर्णांतरा, म्लेंछो दे प्रहरा दशाकृतिधरा कृष्णा नमो श्रीधरा. ॥' तुकानागनाथ—गीतगोविंद, सर्ग १ श्लोक ५.] 'मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहोऽथ वामनः । रामेरामश्च कृष्णश्च बुद्धः कल्की च ते दश ॥.' २. अंतर्गृह, अंतःपुर. ३. पोट, उदर. ४. आंतडीं. ५. खांब. Stump. ६. पृष्ठ ९० टीप २ पहा. ७. बळी. पृष्ठ १०२ टीप ३ पहा.

सहस्र[1] अर्जुना....जोडी । दशशत भुजा जोडी ॥ जो जो० ॥ ८ ॥
सप्तम अयोध्यापुरवासी । राजा राम होसी ।
पितृ[2]वचनाचे नेमासी । राहोनी वनवासी ॥ जो जो० ॥ ९ ॥
चरणीं अ[3]हिल्या उद्धरिली । सीता परिणीयेली ।
रावण संहारी कवटाळी । लंका दहन केली ॥ जो जो० ॥ १० ॥
आठवा अवतार गोकुळीं । जन्मले व[4]नमाळी ।
चा[5]णुर कंसाची मंडळी । निवटुनि केली होळी ॥ जो जो० ॥ ११ ॥
बौद्ध कलंकी होणारा । पुढती युगांतरा[6]।
भुवन विश्वाचे आधारा । अनंतवदनीं होरा[7]. ॥ जो जो० ॥ १२ ॥

## भूपाळ्या.

### ( १ )

उठीं उठीं वो! जगदंबे! वदन प्रक्षाळीं ।
आला प्रातःकाळ आपुलें ब्रीद सांभाळीं. ॥ ध्रुवपद. ॥
सिंहाद्रीपर्वतीं अंबे! तुझा रहिवास ।
जमदग्नी भ्रतार अंबा पतिव्रता एक ॥ उठीं० ॥ १ ॥
मोवाळें इसाळें बहुत रमणीक स्थळ ।
नित्य स्नान करोनी धर्म करिती सकळ ॥ उठीं० ॥ २ ॥

---

१. यदुकुलोत्पन्न कृतवीर्याचा पुत्र कार्तवीर्य यास सहस्र हस्त असल्यामुळें हें नांव प्राप्त झालें. एकदां हा मृगयेनिमित्त अरण्यांत गेला असतां हा जमदग्नीच्या आश्रमांत गेला. तेथें त्यानें राजाचा कामधेनूच्या आश्रयानें उत्तम प्रकारें आदर सत्कार केला, परंतु राजा संतुष्ट न होतां जमदग्नीची कामधेनु हरण करूं लागला. तेव्हां त्याचा पुत्र परशुराम ह्याजबरोबर युद्ध होऊन त्यांत ह्याचे सहस्र हस्त तुटून हा मरण पावला. (भारत–वनपर्व–अध्याय ११७.) २. पृ० ८८ टीप ४ पहा. ३. इंद्रानें गौतमरूप धरून अहल्येपाशीं जारकर्म केल्यावर गौतमानें त्याला 'तुझ्या अंगास सहस्र भगें पडतील' असा शाप दिला, व तिला 'तूं शिळा होशील' असा शाप दिला. नंतर तिच्या प्रार्थनेनें प्रसन्न होऊन 'रामाच्या पादस्पर्शानें तुझा उद्धार होईल' असा उःशाप दिला–अशी कथा आहे. ४. जो वनमाला धारण करतो तो. 'आपादपद्मं या माला वनमालेति सा मता' इति कालिंगः, अथवा 'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला मध्ये । स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥.' तात्पर्यार्थ–कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला 'वनमाला' असें नांव आहे. श्रीकृष्णाची माला पूर्वोक्त प्रकारची असे म्हणून त्याला 'वनमाली' असें नांव आहे. ५. कंससभेंतील मल्लविशेष. यास श्रीकृष्णानें मारिलें. (भागवत–दशमस्कंध–अध्याय ४४ पहा.) ६. ज्योतिष, पुढें होणारी गोष्ट. ७. नवरा.

परशुराम पुत्र माते अवतार जाहला ।
वीर[1]वंत धनुष्यवंत प्रताप आगळा ॥ उठीं० ॥ ३ ॥
कार्तिक शुद्ध पूर्णिमा नित्य याचा महिमा ।
**अनंत राघव** गातो **अंबे**! हे तुझी सीमा ॥ उठीं० ॥ ४ ॥

( २ )

प्रातःसमय [2]उंठ **जनकनंदिनी** त्रिभुवननाथ [3]जगावे ।
'उठो नाथ! मम नाथ! प्राणपति! भूपत भुवन बुलावे.' ॥ ध्रुवपद. ॥
हस्तकमल ले चरणपें लोटे, लै ले [4]दृगन लगावे, ।
[5]उरझे माल [6]गरे [7]मुतियनकी करडंगरी [8]सुरजावे. ॥ प्रातः० ॥ १ ॥
[9]घुंगरवाले [10]अलक बदनपर [11]पेंगियन पेंच समारे ।
कनककलस गंगाजल भरके दातन दान करावे. ॥ प्रातः० ॥ २ ॥
[12]स्मितवदनमुख निरख **रामको** आनंद उर न समावे ।
संतजननके सुनत बिनती **अनंतवचन** सुनावे. ॥ प्रातः० ॥ ३ ॥

---

१. श्रेष्ठ, थोर. २. उठून. ३. उठविते, जागृत करिते. ४. डोळे, दृष्टि. ५. गुंतलेली. ६. गळ्यांतील. ७. मोत्यांची. ८. नीट करिते. ९. कुरळे. १०. केंस. ११. पागोट्याचे. १२. दांत न दिसतां व स्वर स्पष्ट न होतां गालांतल्या गालांत जें मधुर हंसणें तें. [स्मितलक्षण—'ईषद्विकसितैर्गंडैः कटाक्षैः सौष्ठवान्वितैः । अलक्षितं द्विजद्वारे सूत्तमानां स्मितं भवेत् ॥' इति नाट्यलोचनः, 'ईषत्प्रफुल्लितैर्गंडैः कटाक्षैः सौष्ठवान्वितैः । अदृष्टदंतकुसुमैरुत्तमानां स्मितं मतम् ॥' इति भरतः—मालतीमाधव—जगद्धरकृतटीकानुरोधतः पाठांतराणि—अंक १ ला—पृ० २२—निर्णयसागर छापखान्यांतील आवृत्ति.]

# अनंतकविकृत कवितेंतील पाठभेद.

## अहिमह्याख्यान. (पृष्ठें २५–३५.)

| श्लोक | चरण. | |
|---|---|---|
| १ | २ | त्रिसप्त दूर्वा गणनायकाला |
| ९ | ३ | वंदोनी रावणातें महि अहि निघती ऐकिलें बंधुदूतें |
| ९ | ४ | येवोनी सांगतो हें झडकरि गुज तें कर्णि बीभीषणातें |
| १० | १ | ऐकोनियां तो निज गौप्य वार्ता |
| ११ | ४ | देखोनियां सकळ सैन्य आश्चर्य झालें |
| १४ | ३ | होतां संपूर्ण तेथें, वरुनि उतरती वस्त्र सुज्ञान जाती |
| १६ | १ | घेवोनि गेले महिकावतीसी |
| १९ | २ | 'दावीं' कपी बोलति रामचंद्रा |
| २१ | २ | विवर संचर पुरःसर होउनी |
| २२ | ४ | तमविनाशन दिवाकर देखिला |
| २५ | २ | मग रीस तो धांवे ते क्षणीं |
| ३० | ३ | पवनजें वदनखांकर टाकिला |
| ३७ | १ | बोलतसे कपि मेळवितां मुख भेदिन मी जरि टाळु हि याची |
| ४१ | ४ | कपाट दीधलें ग्रामनायका |
| ४८ | २ | आमुचे मनिंचें सुत्र जाणुनि बोलिले हे मनोरमा |
| ४९ | १ | स्नान घालुनि त्या लागुनि हेमवसनें लेववीती |
| ४९ | ३ | विविध शोभा करुनि दोघे दाशरथी शृंगारिले |
| ४९ | ४ | अग्रवाद्यें लावुनी मग संभ्रमें अति आणिले |
| ५१ | ३ | याचिया जिवासी कसें मन वेधलें |
| ५४ | ४ | विघ्न तेंची निवारुनि आम्हांसि संकटिं ये रक्षिला |
| ८१ | ३ | बोलतसे अहिरावणनारी तें वज्र पडे परि भंग न त्याला |
| ८२ | १ | मंदिरींहुनी रुद्र चालिला |
| ८३ | २ | ऐकतां कपि त्यासि बोलिला |
| ८३ | ४ | फोली मंचका गर्भ सर्वही |
| ९२ | १ | पति दुरावुनि नेसिल राघवा |
| ९४ | २ | श्रीराघवें गमन तेथुनि शीघ्र केलें |
| १०० | १ | रामाचीं चरितें सुखाब्धिभरितें काव्यांतरीं ये रिते |

## कुशलवाख्यान.

### प्रसंग पहिला. (पृष्ठें ३५–४५.)

| श्लोक | चरण. | |
|---|---|---|
| १० | ३ | अश्व कंठ वेष्टुनी सुरम्य वस्त्रपल्लवें |

| | | |
|---|---|---|
| ३४ | २ | जैशा त्या मेघधारा श्रवति बहुतसे जीव घेती परांचे |
| ४२ | १ | युद्ध तें करिति हस्तक वोढुनि |
| ४६ | ३ | तंव ऋषीसुत मठांतरिं आले |
| ५० | २ | गमे मी करूं काय ये क्षणीं लागला जिविं ढांसरा |
| ५१ | ४ | तो ऋषि समजावी वचनें ऐक वो क्षितिनंदिनी |
| ५३ | २ | कुमार पैल पातला कुशा धरूनि देखिला |
| ५४ | ४ | बहूत आम्हि शिक्षितों रडूं नको बुझावितों |
| ५७ | १।२ | वैकुंठ स्वर्ग ढसळूं कैलास हातें । दिक्पाल बांधुनि त्यजूं उदधीं डुहातें ॥ |
| ६६ | ४ | व्यर्थ नाम शत्रुघ्न हें तुझा |

## प्रसंग दुसरा. (पृष्ठें ४५–५४.)

| | | |
|---|---|---|
| २ | ४ | शोक ते करिति कर्कश वक्रें |
| ४० | २ | घेउनी उडे ऊर्ध्व अंबरीं |
| ४२ | १ | तया मूर्च्छा आली पडत अवनीं रक्त वमतो |
| ४२ | ४ | जिवीं क्लेशी झाला सचकित कपी होय जिवितें |
| ५८ | ४ | मूखें करोनि म्हणती मग त्राहें त्राहें |
| ६२ | १।२।३ | फार काक पक्षी जाति आडवे । वाम चाष मुंगुसादि आडवे ॥ देखतां दशाननारि तोषला । |
| ८२ | १ | ओंवाळिती बाण सीतेसि सूता |
| ८२ | ४ | त्यांतूनि माजी रिघतात साचे |
| ९० | १ | ऋषि सांगतसे मधुरावचनीं |
| ९५ | १।२ | स्त्रीपुत्रबंधुसह स्यंदनिं राम बैसे । संतोषरूप सचमू पुरीं पातलासे ॥ |
| ९६ | ३ | कौसल्यादि सुमित्रा कुशलव धरुनि आवडी घेती मांडी |
| ९७ | ३।४ | वंदोनी राघवेशा बिभिषण त्वरया चालिले नीजग्रामा । वेगीं भारी रिसादी कपिगण निघती वंदुनी सौख्यधामा ॥ |

## गोपीगीत. (पृष्ठें ५५–५६.)

| | | |
|---|---|---|
| ३ | ३ | श्रीकृष्णलीलामृत नित्य गाती |
| ११ | ३ | पुशीत हस्तें श्रम फार होती. |
| १३ | १ | उलूखलीं घालुनि पंक साळी |
| १३ | २ | कांडीतसे सुंदरि गोपबाळी |
| १३ | ३ | "तें कंकणाचे झणत्कार होती" व "आलापुनी पंचम राग गाती" असे पाठभेद आहेत. |

## द्रौपदीस्वयंवर. (पृष्ठें ५७–६८.)

| | | |
|---|---|---|
| ५ | ३।४ | जेंवि वासुरालागिं गाउली । तेंवि तूं अम्हां कृष्ण माउली. ॥ |

६ १ "पाशि पाडसे गुंतली वणी" व "अपेक्षिती पिलीं खोपें बैसुनि" असे पाठभेद आहेत.

" २।३ देखतांचि धांव घे कुरंगिणी ।। दंती वागवी माजरी पिलीं

९ ३ ऐकतांचि कृष्णवाक्य धर्मराज बोलिले

१० १ अनंत विघ्नें पथिं त्यासि झालीं

" ४ त्याचे पुरीं नाश न पातकाचे

१४ ४ राया कांहीं न सूचे, म्हणउनि हि मग त्वरें द्वारके पातलासे

१५ २ तारका भवार्णवविहारका

१६ ४ यज्ञ म्यां नियोजिला चतुर्भुजा

१८ १ हे बहूत होते माझे अंतरीं

१९ ३ पत्र विलोकुनि या महिचे नृप धांवत येतिल ते लवलाहें

" ४ यावरि पांडव वांचले आसति येतिल ते तुम्हि चिंतित राहें

२० ३ तूंचि अभेद अखेद निःशब्द ते तूत्तव शोधित जे नर योगी

२१ १ ऐकुनि नम्र सुवाक्य, चतुर्भुज होउनि सिद्ध नृपा सवें चाले

२५ १ हे वार्ता नगरीहुनी लवकरी द्वीपांतरीं फांकली

२८ २ त्या तळीं कढात तेल अग्नि तापले भले

३१ २ 'अवश्य जाउं' बोलताति साहि लागले पदीं

३२ २ जेथ सुरासर आदिमहेश्वर रम्य सुधारस सेवुनि धाती. या सवाईतील चरण दोन व तीन यांमध्यें आणखी एक चरण आहे तो असा:—'यक्षगणेश्वर आदि खगेश्वर प्रेमभरें मुनि वास करीती' या चरणाचा अन्यपाठ असा आहे:—'तोचि सुरेश्वर आणि खगेश्वर केवळ ईश्वर होउनि ठाती.' तिसऱ्या चरणाच्या अखेरीस 'जळांतरिं गेले' असें आहे त्या ठिकाणीं 'जळांतरिं जाती' असें पाहिजे. हे फेरफार केले म्हणजे बत्तीस व तेहतीस ह्या सवाया ठीक जमतात.

३४ १ होय जो अस्त समस्त गभस्ति, दिनांतरीं दुस्तर तो तम दाटे

" ३ आणुनि कर्कट उल्क करूनि तें तेज पडे मग चालति वाटे

३५ २ क्षुधीत जैसा रत राय केला

" ४ "भोगी जसा तो हिममास माहो" व "भोगी जसा हेम बहू तमा हो" असे पाठभद आहेत.

३६ १।२ आज्ञा करी निक्षुनि सर्व दूतां । वर्जा तुम्हीं पांथिक सर्व येतां ।।

३७ १।२ "भीमें पुढें होउनियां दुतातें । सत्रासुनि पाडित तीव्रहातें ।।" व "भीमें पुढें होउनियां निघाते । ताडूनियां पाडित दूर हाते ।।" असे पाठभेद आहेत.

३८ १।२ भृत्यां पुसे वृत्त समस्त स्वामी । ते सांगती वीर्य अनंत स्वामी ।।

३९ १।२ हांसोनियां बोलत सेवकांसी । हें सांगतां लाज नये तुम्हांसी ।।

४२ २ कानाडी धनु ओढुनी सरुनि तो पार्थास विंधी शरीं

४५ ३ वंदूनी पांडवांतें धरुनि निजकरें प्रीतिनें ने स्वगेहा

" ४ पूजा ते आदरोनी करुनि षडरसू घालुनी दावि स्नेहा

४७ ४ "त्यासि तूं जपूनि लक्ष्य भेद कीं" व "त्या जपेंचि तथ्य मत्स्य भेदिसी" असे पाठभेद आहेत.

४९ १ या परी परस्परें तयासि सख्य जाहलें

" २ तोष पावुनी मनीं सुवाक्य तेचि बोलिले

" ३ "अविघ्न मी तुम्हासि पांचाळपूर लोचनीं" व "दावितों तुम्हासि पांचाळपूर लोचनीं" असे पाठभेद आहेत.

" ४ "दावितों चला तुम्हासि नेतों स्कंधि वाहुनी" व "आदरें करूनि साहि स्कंधि तत्क्षणीं"

५० २ साजणासि नेउनि सुत्राम दृष्टि दाविलें

" ३ "त्यासि तो पुसुनी वीर गुप्त होय तेक्षणीं" व "त्यांसि तो पुसोनी गंधर्व गुप्त होउनी" असे पाठभेद आहेत.

" ४ साही ग्राम बाह्य बैसताति स्नान सारुनी

सवाया ५३।५४ यांचा असा पाठ आहेः—

कुंति म्हणे हरि येउनि ये स्थळिं दाउनि रूप सुलाभ तो केला
दुस्तर साधन साधिति ज्यास्तव तोचि हरी मम सन्निध आला।
तोष मला कधिं नाहिं असा बहु कृष्ण सुदर्शनिं हा जिव धाला
तोषुनि त्यासि करांगुळि भूषण देउनि श्रीहरि शीघ्र निघाला ॥ ५३ ॥
धर्म म्हणे जगदीश्वर येउनि देउनि दर्शन तो श्रम नेला
हेंचि मनांतरिं खंति करी हरी चित्त प्रतिक्षणिं भीम भुकेला।
बंधुवरा अति तप्त क्षुधे करुनी उदरीं जठरानळ ज्वाला
धर्म म्हणे मुदि घेउनि हें वद पोट भरी मज भोजन घाला ॥ ५४ ॥

यांचा दुसरा पाठ असा आहेः—

बोलति पांचहि बंधु हरिप्रति आजि अम्हा शुभदीन उदेला
दुस्तर साधन साधिती यास्तव तो हरि भेटिसि सन्मुख आला।
जेवि सुधारस सेवनिं तोष तसा हरिदर्शनिं तोष जिवाला
तोषुनि त्यांस करांगुलि भूषण देउनि श्रीहरि शीघ्र निघाला ॥ ५३ ॥
धर्म म्हणे हरि येउनि ये स्थळिं दाउनि रूप अनाथ कृपाळा
तोषुनि अंतरिं जाय त्वरें हरि त्या शिबिराप्रति स्वक्रम लीला।
भीम म्हणे शृणु धर्मवरा जठरानळ पीडि मतें जि कृपाळा
धर्म म्हणे मुदि घेउनि हे वदे पोटभरी मज भोजन घाला ॥ ५४ ॥

५५ १ भीम मुद्रिकेसी घेउनि त्वरीत चालिला

५५ २ जाउनी जनांसि ईस घ्या म्हणोनि बोलिला

" ३ "पाहुं मुद्रिका वदेति लोक मोल ते किती" व "मोल बोल कापड्या! तुं सांग हेचि लौकरी" असे पाठभेद आहेत.

५५ ४ "घालिजे सुभोजनासि तृप्ती होय जोंवरी" व "हें अमूल्य रत्नवर्य नाहिं आ-नयें रिती" असे पाठभेद आहेत.

५७ १ ऐकुनी प्रधान कापड्यास बाहे लौकरी

,, २ मुद्रिका विलोकतांचि लोभ तो मनीं धरी

,, ३ तृप्ति झालिया हे मुद्रिका तुम्हासि दीधली

,, ४ अतृप्त राहिलों तरी फिरूनि घेइजे भली

५८ १ अतृप्त मी तरी न देइं मुद्रिका तुम्हांप्रती

,, २ बोलिला प्रधान कापड्या तुं जेविशी किती

,, ३ सैंवरीं नृपांनिमित्त अन्न फार निर्मिलें

,, ४ दूत देउनी भिमासि पाकशाळे धाडिलें

५९ १।२ भीम आसनीं स्वस्थ तो बळी । कोंपरें करी भूमितें खळी ॥

६० ३।४ दोंहि बाहुनीं ग्रास घे मुखीं । ठायिं ना उरे एक शीत कीं ॥

६१ २ "राहिल्यात कीं येत भोवंडी" व "येउंद्या म्हणे अन्न दूरडी" असे पाठभेद आहेत.

६२ १ जाउनी प्रधानासि सांगती

,, ४ ऐकतांच धांव घेत भीम तो

६३ २ तृप्ति जालि नाहिं एकहि कुशी

६५ १ "ऐकतांचि धृष्टद्युम्न पातला तये क्षणीं" व "बोल बोलतांचि धृष्टद्युम्न येत ते क्षणीं" असें पाठभेद आहेत.

,, २ मुद्रिका विलोकितांचि लोभ सूटला मनीं

,, ३ प्रौढि त्यासि दाउनी बहूत गर्व दाखवी

६७ ४ वदोनी संकेता हरि गुज निरोपी सहुदरा

६८ १।२ नंतरें भिमें त्वरेंच आइतें निवेदिलें । क्षुधेन पीडिलों बहूत अन्न नाहिं पूरलें ॥

,, ३।४ ऊपहार दे त्वरें स्वहस्तिं तूंचि लौकरी । हस्तकें तुझ्याचि तृप्ति होय क्षुब्ध जाठरीं ॥

७० १ रिकामीं कोठारें करुनि मुल आलें झडकरी

७२ २ धेनूनें रत्न जेंवी जरि मुखि गिळिलें काय कीजे विचारें

७२ ४ तेणें जातां वदत निजमुखें मृत्तिका आणि भीमा

७५ १।२ दाटली सभा राय तैं उभा । राहुनी वदे दाखवा प्रभा ॥

,, ३ "शौर्यवंत धैर्यवंत जे गुणीं" व "चाप घेउनी बाण लावुनी" असे पाठभेद आहेत.

७५ ४ "नोवरी वरा यंत्र भेदुनी" व "त्यांहिं शीघ्र बाण लाविजे गुणीं" असे पाठ-भेद आहेत.

७८ ३ "सैवरें बहुत पूर्वीं देखिलीं" व "अनंत सैंवरें पूर्वीं ऐकिलीं" असे पाठभेद आहेत.

,, ४ जीव ग्राहिकें नाहिं निर्मिलीं

७९ ३।४ त्यासि देउं हे कां मनोरमा । ज्ञानिं पाहतां अर्पी गौतमा ॥

८५ ४ नभीं त्रासे बाणीं परि बहुत कांपे थरथरा

८७ ३ हांसती नृपवर्य सर्वहि वोढुनी करिं आणिला

| | | |
|---|---|---|
| ८७ | ४ | बैसऊनि सुयोधना नृप बोलती पण जिंकिला ? |
| ८८ | १ | भूप बोलला सैंवरीं बहु आसतां कुरुमंडळी |
| ९१ | २ | अर्जुनें तळिं पाहुनी वरि मंत्र विंधुनि पाडिलें |
| ९२ | २ | "देखतां नृप 'धन्य धन्य' म्हणोन गर्जत वैखरी" व "ते क्षणीं नृप बोलती धन्य धन्य म्हणोन वैखरी" असे पाठभेद आहेत. |
| ९२ | ४ | माळ घे निजहस्तकीं त्वरें अर्जुनाप्रति घातली |
| ९३ | १ | "भीम येउनियां त्वरें द्रौपदी स्कंधिं घेउनि चालिला" व 'स्कंधिं ते क्षणिं भीम द्रौपदि बाहुनी त्वरें चालिला" असे पाठभेद आहेत. |
| ,, | ३ | दुष्ट दुर्मति तेथ भूपति द्वार जाउनि रुंधिती |
| ,, | ४ | आलों ज्यास्तव तेचि लाधलि आपणा कृपे श्रीपती |
| ९४ | १ | मार्गि त्या भिम चालतां बहुत नृप मारिले |
| ,, | २ | पांचहीजण चक्रिआलयिं घेउनी वधु पातले |
| ,, | ३ | बंधु बोलत जननिये ! भिक्षा आणिली तुजकारणें |
| ,, | ४ | तेधवां जननी वदे 'तुम्हि पांचहि जणें सेवणें' |
| ९५ | १ | मातृवचन वेदवाक्यचि पांचही जण सेविती |
| ,, | २ | तीशि वंदितां भो ! महाराज पातकें बहु भस्मती |
| ,, | ३ | भूपती सह श्रीपती करि पंडुनंदन सोहळा |
| ,, | ४ | सद्गुरू कृपे काव्य हा रस मंदमतिनें वर्णिला |

**गजगौरीव्रताख्यान.** (पृष्ठें ६९-७४.)

| | | |
|---|---|---|
| ३ | २ | विलोकूनी खंती शकुनिप्रति दुर्योधन मना |
| ५ | ४ | तळींच्या कृत्यासी चतुर रथ तेंवी फिरतसे |
| ७ | २ | फिरे जों दुर्योधी कुमति मतिनें वाक्य वदला |
| ८ | १ | ऐके निष्ठुर वाक्य त्या कुमतिचें कुंती मनीं खोंचली |
| ,, | ३ | जैशी त्या पियुषीं असे निजमुखें व्याळें गरा टाकिली |
| ११ | १ | तो तूं हा गजवोवसा निजसुखें आतांचि माते ! करीं |
| १६ | ३ | त्या चारदंता उतरोनि शिष्ट |
| ,, | ४ | आणूनि मी दाविन तूज स्पष्ट |
| १७ | २ | लेहोनी पत्रा खिळिलें प्रतापीं |
| ,, | ३ | मंत्रोनियां सायक तीव्र सोडी |
| १८ | ३ | गडगडी तवां निर्जरीसभा |
| २२ | २ | सुरगजवर कुंती स्वव्रता इच्छिताहे |
| २४ | ४ | दूत म्हणे बहु हे अमराधिप हस्तिस न्या कांथें हे हरिदासा |
| २८ | ३ | या बाणपंथें अमरावतीसी |
| ,, | ४ | येऊनि बोला सुरनायकासि |

३० ४ तूं चालवीं हा गज हस्तिनापुरासी

३१ १ महावतें तो ढकलोनि हस्ती

३२ १ धरोनि पाय हस्तकें गजासि नेतसे तुकें

३२ २ करोनि शीघ्र मोटकें स्वपाठि बांधि कौतुकें

३४ १ विडंबना पाहुनी सुरेंद्र कोपला मनीं

„ ४ सुशोभितासि नेलिया तुम्हासि साध्य जाइजे

३६ १ शरपथें उतरेत विराजती

„ ४ निरखितां जनिं सौख्यचि दाटलें

३७ ३ शचिवरें हि पराक्रम पाहिला

„ ४ म्हणुनियां गज सत्वर धाडिला

४० २ अघटित करणी हे या सुतें दावियेली

„ ४ उपजत करिगेहें दावितो सिंहनामा

## गरुडगर्वपरिहाराख्यान. (पृष्ठें ७४-८१.)

१३ ३ त्यागिना जरी सांग त्या खरा.

१४ २ "देखिली त्वरें द्वारकापुरी" व "टाकिली त्वरें कनकापुरी" असे पाठभेद आहेत.

१५ २ ते क्षणीं सभेसि जावुनी म्हणे रमापति

१५ ३ तुझे कृपेकरून श्रम हारिला तो आघवा.

१५ ४ मानसी न वर्णवे बहूत रूप राघवा.

२० ३ वानरा धरुनि आणिन येथें

२२ ४ मुनि त्वरें चमु संनिध पातला.

२३ ४ वांचवी सकळ भाविक सेना

२७ ३ जाउनि त्या कपिसी बहु मान करोनि म्हणे तुज बाहे सुज्ञा

२७ ४ "ऐकुनियां खगराज म्हणे मज काय निरोपसि न करवे अवज्ञा" व "बोलतसे अरुणानुज हे मज लाज चतुर्भुज ऐक प्रतिज्ञा" असे पाठभेद आहेत.

२८ १ "सप्तसमुद्रहि घोटुनि पाडिन बांधुनि आणिन पंखबळानें" व "सप्तसमुद्रहि घोटुनि महितळिंचा अहि काढिन चंचुपुटानें" असे पाठभेद आहेत.

२८ २ महितळिंचा अहि जाण तुं श्रीहरि वोढुन काढिन चंचुबळानें

२८ ४ काय करूं हरि शब्द नुलंघवे यास्तव जात असें बहु मानें

३० २ "फडफडां सभेमाजि तो पडे" व "द्वारकेमध्यें जावुनी पडे" असे पाठभेद आहेत.

३१ २ तों हरि सुधाहस्त फीरवी.

३२ १ जावुनि खगेंद्र काय बोलिलें

३७ १ ही खूण सांगुनि बरी गरुडासि देवें

३८ १।२ हरि म्हणे, गरुडा हृदयांतरीं। अभय होउनि जाइं वनांतरीं॥

४१ १।२ "खगेंद्र खांदिवरी भय अंतरीं। यदुविरें मजला घातलें भरी॥" व "गरुड

खांदिपरी भय अंतरीं । यदुविरें मज घातलेंसे भरी ॥" व "गरुड अंतरींच विचार करी । घातलें यदुनायकें मज तें भरी ॥" असे पाठभेद आहेत.

| | | |
|---|---|---|
| ४५ | ३।[illegible] | कृपाळू घनश्याम हा हेमवर्णी । जया वर्णिता भंगली शेषवाणी ॥ |
| ४७ | ६ | रामवियोगाचा शीण तोंचि सर्व नासिला |
| ५० | ३।४ | मारुति सखा प्राण भेटला । आनंदसिंधु हा पूर्ण दाटला ॥ |
| ५७ | ४ | नीघे कपि त्वरित घेउन राम आज्ञा |

## सुरथसुधन्वाख्यान.

### प्रसंग पहिला. (पृष्ठें ८२–९४.)

| | | |
|---|---|---|
| १ | १ | ऐकिजे सगळि भारत हे कथा |
| ,, | ४ | निश्चयें निजपदाप्रति पावती |
| ६ | २ | धनंजयाशीं रणि शीघ्र यावें |
| ७ | २ | रायें नेवुनियां सवें अतिबळी त्या नंतरी नायका |
| १० | २ | न्यायवर्त, धर्मपाळ, धर्मबाहु त्या रणीं |
| १३ | २ | म्हणोनि नृपती तयासि शासनोक्त बोलिला |
| १५ | २ | बहू यत्नें आणीं धरुनि कमळानायक हरी |
| १७ | १ | सुधन्वा तो शोभे कुवलयदलाक्षी ही कुवळा |
| २९ | ३ | जेचि तुरंगमवेष्टित सारंग चमुसि कसा जिणसी तुं निजांगें |
| ३१ | ३ | अश्रु तिचे श्रवती नयनीं मग दोहिं करीं धरि कंठ वराचा |
| ३४ | १ | बहुत ते क्षणिं नराधिप कष्टला |
| ,, | ४ | वदुनि भूपति विषादहि तो चढे |
| ३६ | १ | निरखिती नयनिं ते सुत संदनीं |
| ३७ | २ | सरथ घेउनि नृपाप्रति पातले |
| ४१ | ४ | सदय हृदय नोहे पाहतां दोष नाहीं |

### प्रसंग दुसरा. (पृष्ठें ९४–१०८.)

| | | |
|---|---|---|
| ८ | ४ | क्षणीं एका मूर्च्छा त्यजुनि नृपती सूनु उठिला |
| १५ | १ | ऐशीं दुवर्चनें धनंजय रणीं ऐकोनी क्रोधें भरे |
| ६८ | १।२ | कुशब्द वाणि ऐकतां हयींच नृपतीसुता |
| ७७ | १ | ऐकुनी नरवरें शर सोडिला |

# अनंतकविकृत काव्यावर आणखी टीपा.

## सीतास्वयंवर. (पृ० १–२४).

श्लोक.

२ श्रोतयां–श्रोत्यांना, ऐकणारांना.
पाणी–हात.

४ वियोगासि संयोग केला–माझा पति व मी यांची तुटातूट झाली होती ती तूं नाहींशी केलीस.

७ सप्तर्षि–सात ऋषि. त्यांचीं नांवें वेगवेगळीं आढळतात तीं अशीं:(१) १ कश्यप २ अत्रि ३ भरद्वाज ४ विश्वामित्र ५ गौतम ६ जमदग्नि ७ वशिष्ठ. (२) १ मरीचि २ अत्रि ३ अंगिरस् ४ पुलस्ति ५ पुलह ६ क्रतु ७ वशिष्ठ.

१० बाह्य–बाहेर. (हें मूळचें विशेषण आहे परंतु येथें शब्दयोगीअव्ययाप्रमाणें उपयोग केला आहे.)

११ तेजराशी–तेजस्वी.

१३ विदेहांतरीं–विदेह (जनक) त्याच्या मनांत. (विदेह+अंतर.)
आशंका–विचारण्याची इच्छा.

१४ कौसल्योदरशुक्तिका–कौसल्येचें पोट हाच शिंपला.
वरषती–(वर्षती) वर्षाव करतात.

१७ उद्धारिली–(उद्धरली) मुक्त केली.

२० कूसरी–(कुसरी) चातुर्यानें.

२३ दहाट–हुशार.

२४ विलासती–(विलसती) शोभतात.

३० नृपू–(नृप) राजे.
ऊपमेसि–(उपमेसि) बरोबरीला.
तुका–तुळा, लावून पहा.

३१ ऊटिलें–उटणें लावून स्वच्छ केलें.

३४ विस्मिताबला–अबला (स्त्रिया) विस्मित झाल्या (आश्चर्य पावल्या).

३५ जळीं घालिति–पाण्यांत दडून बसतात.
लंघि दिशांसी–लांब निघून जातो.

३७ पंखिंचि चंचुसि खोवी–पंखांत चंचु खोंवतो–खुपसून बसतो. (नाक अधिक चांगलें असल्यामुळें लाजून चंचु पंखांत खुपसतो–असा अर्थ.)
आस्य–तोंड.
लास्य–नृत्य.
बिंब–हा शब्द कवीनें 'बिंबाधर' या शब्दाबद्दल योजिला असावा.
स्थायी–राहणारे.

३८ मुष्टिप्रमाण–मुठीएवढी.
द्विपांतरिं–(द्वीपांतरीं) अन्यद्वीपांत.

३८ सखियाद्वय–सखियांचें द्वय, दोन सोबतिणी.
ललना–स्त्रिया.
लवलाहें–लौकर.

३९ अनवठें–(अनवट) पायाच्या आंगठ्यांत घालण्याचा डागिना.
पोल्हारें–(पोल्हार) एक पायांच्या बोटांतील अलंकार.
विरुद्या–(विरोद्या) पायांच्या बोटांत घालण्याचा डागिना.
पोंचट–खोंचा पाडलेलीं.

४२ पंचलडि–पांच सरांचा.

४३ ले–घातल्या.
नागोत्रे–एक डागिना.

४४ त्रैलोक्यमोलागळें–त्रैलोक्यांत किंमतीनें अधिक.

४५ कूहिरों–(कुहिरी) एक डोक्यांतील अलंकार.

झीब्यावरी–(झिब्यावरी) वेणीच्या गोंड्यावर.

५० तार्किती–तर्क करितात.

पातला–आला.

५१ आणिजे–आणावें.

५५ कोंदला–दाटला, दुमदुमला.

६१ माळिका–माळा.

झाडणी–केरसुणी.

६६ रावती–काम करतात.

६९ लंकनाथ–(लंकानाथ) रावण.

८० त्रीजगा–(त्रिजगा) तीन जगांना. (स्वर्ग, मृत्यु, पाताळ.)

उलाळें–(उल्लाळें) उलटण्यानें, उलटून.

८१ वरविण–वराशिवाय, नवऱ्याशिवाय.

निदानीं–शेवटीं.

८२ पैल–पलीकडे.

८३ सीता–दोरीला. चापीं सीता चढवीं–धनुष्य सज्ज कर. धनुष्याला बाण लाव. धनुष्य उचल.

८९ अवेक्षुनी–पाहून.

अपेक्षुनी–इच्छून, इच्छा करून.

९१ अलव्य–न लवणारें. लवणें हा मराठी धातु 'लीन' यापासून निघाला आहे तेव्हां त्यापासून असें अव्यय साधणें ही आपली दांडगाईच समजावयाची, पण आमच्या कवीस शब्दांचीं वेडींवांकडीं रूपें तयार करण्याचें मुळींच भय वाटत नाहीं! 'निरंकुशाः कवयः' या न्यायानें असे दोष आदरणीय समजले पाहिजेत.

९२ कृतकृत्य–(कृतकृत्य) ज्यानें आपलें कर्तव्य बजाविलें आहे तो.

९३ विखंडुनी–मोडून.

९४ क्षेत्रि–(क्षत्र) क्षत्रिय, योद्धा.

९८ शिरिरामचंद्र–श्रीरामचंद्र.

१०१ विद्युतभा–विजेची कांति.

१०२ चतुर्मदगजीं–चार माजलेल्या हत्तींवर.

सत्राणें–जोरानें.

१०४ वक्त्रें–तोंडानें.

सुतवूनियां–सुतानें बांधून.

१०५ रघूत्तमकटीं–रामचंद्राच्या कडेवर.

ग्रंथि–गांठ.

१०८ दृढवीर्यशृंग–मोठ्या पराक्रमाची खूण.

१०९ विकृती–वाईट काम करणारा.

११० व्यंग–उणें किंवा (व्यंग्य) उपरोधिक भाषण.

१११ अनुदिन–निरंतर.

निघाता–मारण्याला.

साभिमानें–अभिमान धरून.

११३ तुकें–कवितेचे तुकडे.

भातुकें–न्याहारी, अल्पाशन, भातुकली (कवीचें म्हणणें कीं ही कविता अल्पाहारासारखी आहे.)

**सुलोचनाख्यान.** (पृ० १४–२५.)

१ दीर्घघोरांदरीं–मोठ्या घोर युद्धांत.

३ ख्याती–कीर्ति.

५ देहांतता–मरण. (देहाची अंतता.)

६ परमाप्त–मोठा नातलग.

९ न वचें–धजूं नको.

११ सरोजनयनी–कमलनेत्री. येथें 'अनुप्रास' आहे.

१२ विन्मुख–पाठमोरे.

१३ ऊसणें–(उसणें) समाचार, सूड.

रावणी–रावणपुत्र, इंद्रजित्. संस्कृत 'अ'कारान्त पुल्लिंगी नामांस 'ई' हा प्रत्यय लाविला असतां अपत्यार्थी नाम होतें; जसें:–मरुत्–मारुति, कलिंद–कालिंदी, यज्ञसेन–याज्ञसेनी.

१४ गोत्रज–गोत्रांत उत्पन्न झालेले. एका कुळांतले.

नीजमनीं–(निजमनीं) आपल्या मनांत.

१६ परिसा–ऐका.

अन्यथा–खोटें.

दिजे–द्यावी.

१८ अश्विनीरुढ–घोडीवर बसलेले.

कमित–(क्रमित) चालले.

२२ वृतांत–(वृत्तांत) हकीकत.

२३ लोचना–डोळ्यांना.

इंद्राजिताची–(इंद्रजिताची) रावणाच्या मुलाची.

२५ ऊठिली–(उठली) उभी राहिली.

२६ कारुणा–(करुणा) भाकितें–प्रार्थना करितें.

२७ लाहिजे–पावावीं.

२८ पन्नगाची–सर्पाची. (शेषाची.)

३० लेहुनी–लिहून.

अन्वयो–जुळणी.

विस्मयो–आश्चर्य.

३१ तर्कला–तर्क केला.

मिथ्य–(मिथ्या) खोटा.

३३ द्विलोचनें–(द्विलोचनीं) दोन्ही डोळ्यांनीं.

३४ ढुळे–लोळे, हाले.

वन्हिरूप–अग्निमय.

वामनेत्र–डावा डोळा.

वेष–पेहराव, पोशाख,

३६ श्रवण–कान.

३७ सेवनासि–चाकरी करण्याला.

अष्टकाळ–आठप्रहर.

तिष्ठती–उभे असतात.

त्रिलोक–तीन लोक. स्वर्ग, मृत्यु व पाताळ.

३८ समरंणि–(समरंगणिं) लढाईत किंवा रणिं सम (अशा) अरितें–लढाईत तुमच्या सारखा पराक्रमी अशा शत्रूला (यश कसें दिलें).

नुमजत–उमजत (समजत) नाहीं.

विदेशा–परदेशाला (मला मागें ठेवून तुम्ही स्वर्गावर कां गेलां.)

३९ हरीपुंगवा–सिंहश्रेष्ठाला.

हर्षामृतें–हर्ष(आनंद)रूप अमृतानें.

४० उदंडवेळ–पुष्कळदां.

क्रिडाविनोद–(क्रीडा व विनोद) खेळणें व विनोदाच्या (करमणुकीच्या) गोष्टी बोलणें.

४१ दाटतो–भरतो.

शल्य–बोंचणारें.

४२ कारुणा–(करुणा) दया.

मुखाहुतीस–(अग्नीच्या) मुखांत आहुति अर्पीत असतां).

नभू–(नभ) आकाश.

४३ क्षाळितां–धुतलें असतां.

४४ बाहतां–बोलाविलें असतां.

४६ मिथ्याक्षरें–(मिथ्या अक्षरें) खोटीं अक्षरें.
साह्यते–साह्यलाला, मदतीला.
४७ अक्ष–डोळो.
दक्ष–चतुर.
४९ वामाक्ष–डावा डोळा.
५० निका–खरोखर.
५१ रणधिरा–(रणधीरा) रणांत धीर धरणाऱ्या.
विरा–(वीरा) शूरा.
प्रांजळा–हे स्वच्छ मनाच्या (लक्ष्मणा.)
५७ त्रासिता–त्रास देता.
जीवितां–जिवंत करितां.
५९ लाहान–(लहान) धाकटीं.
६० निरोपितां–निरोप (आज्ञा) होतांच–देतांच.
६१ धैर्यद्रुमा–धैर्यरूप वृक्षाला.
६२ अग्नीकुटी–अग्नी–चिता.
शिखा–ज्वाला.
६३ जळार्णवतिरीं–जळानें युक्त अशा समुद्राच्या कांठीं.
६५ प्रदक्षिण–(प्रदक्षिणा) फेरी.
मिनले–मिळाले.
६६ आन–दुसरी.
अक्षवाणें–अक्षयवाणें.
६७ नभोदरीं–आकाशांत.
७० उसणें–फेड [रामाची स्त्री सीता रावणानें बंदींत टाकली आहे, त्याचें उसनें सुलोचनेस अडवून रामानें फेडिलें असतें तर–असा भावार्थ.]
वर्जिता–मनाई करिता.
७२ जगत्र–जगत्रय, (तीन–जगें स्वर्ग, मृत्यु, पाताळ.)
सृजिता–उत्पन्न करणारा.
७३ तुकें–लहान लहान वाक्यें.
लोलुप्यता–लुब्धपणा, गोडी.
७३ नि–आणि.

**अहिमह्याख्यान.** (पृ० २५–३५).

१ त्रिसप्त–तीन सप्तकें (एकवीस.)
४ सैन्यें–सैन्यासह.
६ जीत–जिवंत.
,, भ्रातु–भाऊ.
७ अक्षाघ्यवाणें–अयोग्य.
१० नीवेदिलें–(निवेदिलें) सांगितलें.
११ अचेत–(अचेतन) बेसावध.
१३ ऊर्ध्व–वर.
१५ पंथ–पथिक, पांथस्थ.
१६ स्थानकीं–स्थानीं. (क हा स्वार्थी प्रत्यय समजावा.)
२३ विवेष्टिलें–वेढिलें.
२४ पेटला–हट्टास पेटला.
२६ चेतला–रागावला.
३३ बुझाली–भ्याली, लाजली.
३६ वदनांतरिं–तोंडांत.
३८ वायुच्यात्मजें–वायुच्या आत्मजें (मुलानें).
४५ पहति–(पाहति)–बघतात.
४९ वीविधू– विविध) नाना प्रकारचे.
५० ऊपरीवरि–ओटीवर किंवा गच्चीवर अथवा माडीवर.
५४ तनुप्राणरक्षण–तनु व प्राण यांचें रक्षण करणारा.
६४ न लगतां–न लागतां.
६५ विंधित–मारीत.
६७ अजित–अजिंक्य.
७५ स्थंडिलें–कुंडें.

७५ मुखपुटें–पुट–कोणत्याही वस्तूचा द्रोणासारखा जो आकार करतात तो; अंजलिपुट, कर्णपुट, नासापुट, पर्णपुट, इत्यादि.

७६ रोधीं–आडवून धर.

७७ सूध–(सुधा)–अमृत.
नाणिं–(न+आणिं,) आणूं नको.
त्रिवाणी–तीन वेळ.

८१ अभंग–न भंगणारा.

९१ कुडें–वांकडी बुद्धि.
सांकडें–संकट.

९३ ललनांतरिं–स्त्रियांमध्यें.

१००–१०१ यांत 'अनुप्रास' आहे.

**कुशलवाख्यान.**

**प्रसंग पहिला.** (पृ० ३५–४५.)

३ नित्योदयी–नित्य उदयच आहे ज्याचा असा.

१७ महाक्रांत–(महा+आक्रांत) मोठा अनर्थ.
वर्तला–झाला.

२५ परवीरशिरें–शत्रूकडल्या योद्ध्यांचीं शिरकमळें.

३४ म्हणितलें–म्हटलें.

३७ बुझाले–बुजाले, दिसतनासे झाले.

५१ धाय मोकली–रडूं लागली.
नवजाय–(न जाय) जात नाहीं.
शोकली–शोकयुक्त झाली.

५६ सच्छिन्न–फाडलेलें.

५७ नाक–स्वर्ग.

५९ शत्रूगजांतरिं–शत्रूरूप हत्तींमध्यें.

**प्रसंग दुसरा** (पृ० ४५–५४.)

२ धाय वाहति–ओरडूं लागले.
विभेदित गात्रें–अंगें छिन्नभिन्न होऊन.



करवक्त्रें–हातानें व तोंडानें.
भद्रासन–सिंहासन. भद्रासनाचें लक्षण 'देवीपुराणां'त आहे तें असें:–'हैमं च राजतं ताम्रं क्षीरवृक्षमयं च वा । भद्रासनं प्रकर्तव्यं सार्धहस्तसमुच्छ्रितम् ॥ सपादहस्तमानं च राज्ञो मांडलिकांतरात्.' याचें लक्षण वराहसंहितेंत आहे:–'त्रिविधस्तस्योच्छ्रायो हस्तः पादाधिकोऽर्धयुक्तश्च । मांडलिकानंतरजित्समस्तराज्यार्थिनां शुभदः ॥' [रंगनाथकृत विक्रमोर्वशीयनाटकटीका–पृष्ठ १३९ पहा.]
क्षतयुक्त–जखमी झालेले.

८ क्षत्रसूत–(क्षत्रसुत) क्षत्रियांचे मुलगे.

१७ करूं हुत–जाळून टाकूं.

२९ दिङ्माहि–दिशा व पृथ्वी.

३२ जुत्पती–(युद्धपती) रणांतला मुख्य.

३७ कर्कट–खेंकडा.

६६ कार्मुकें–धनुष्यें.

८२ प्रणामिती–नमस्कार करिती.

८६ श्रुत करील–ऐकवील.

९० विहारति–(विहरति) फिरतात.

९१ तधिं–त्यावेळीं.

९५ संचरती–शिरले.

९६ क्षमा–पृथ्वी.

९७ रिसादी–(रीसादि) रीस (आश्वलें) आदिकरून.

**गोपीगीत.** (पृ० ५५–५६.)

८ गोदोहना–गाईचें दूध काढण्याला.
क्षीरधारा–दुधाच्या धारा.

१३ आलापुनी–आलाप घेऊन (सुरावर)

१४ पाकक्रिया–स्वयंपाक.
घोषाणेवें–घोष (शब्द) रूप अर्णव (समुद्र) याच्या योगानें–कंकणाच्या शब्दानें.
ढाळ–तेज, शोभा.

१७ मोहरी–पांवा.

**द्रौपदीस्वयंवर.** (पृ० ५७–६८)

७ भावइंदु–भक्ति हाच चंद्र.

१५ पृष्ठ ७५ श्लोक १० पहा.

२२ कुवाडें–(कुवेडें) कोडें–पण.

२५ गम्य–टाऊक (अवगम्य).

३२ करसंपुट–हात.
धृतकंबुपदांबुजउद्भव अंबुसि–(धृत–धारण केलेला कंबु–शंख, पदांबुज–पदकमळ, उद्भव–उत्पन्न होणें, अंबु–पाणी, शंख धारण करणाऱ्या कृष्णाच्या पदकमळापासून उत्पन्न झालेल्या गंगेंत. येथें 'पर्यायोक्त' अलंकार आहे.

३४ रळि–(रळी) खोड्या.

४३ रिचवला–आला.

४७ चाक्षुसी–(चाक्षुषी) विद्या, नजरबंदीचा खेळ.

**गजगौरीव्रताख्यान.** (पृ० ६९–७४.)

२ शिशु–बालक.
पुत्रमानें–पुत्रवत्, पुत्राप्रमाणें.

४ मृन्मय–मातीचा, मातीनें युक्त; 'मय' प्रत्ययाचा अर्थ 'युक्त' 'पूर्ण' 'विशिष्ट' असा आहे.

६ सुतवती–पुत्रवती.

७ धिग् जिणें–जगणें व्यर्थ आहे.

११ वन–अरण्य. 'क्लीवं स्यात्कानने नीरे निवासे निलये **वनम्**' इति रभसः.

१५ तेव्हांश्रिले–तेव्हां आश्रय केला.

२० कृष्णमुद्रिका–अर्जुनाचा शिक्का. ['कृष्णः सत्यवती पुत्रे वायसे केशवेऽर्जुने' इति.]

२२ सुरकुलमणि–देववंशोत्तंसा.
विज्ञप्ति–विनंति, प्रार्थना.
टौरवाणें–टारगें, द्वाड.

२५ परमीत–अगणित.

३० चालवीं–घेऊन चल.

३४ श्लाघ्य–योग्य, उचित.

३६ कौतुक–पृष्ठ १५६ टीप ४ पहा.

४३–४४ यांत 'अनुप्रास' अलंकार आहे.

**गरुडगर्वपरिहाराख्यान.** (पृ० ७४–८१.)

५ कनकांवरें–सुवर्णाच्या वस्त्रानें. ['**अंबरं** वाससि व्योम्नि कार्पासे च सुगंधके' इति विश्वः.]

७ प्रवर्तसि कंदना–लढण्यास तयार होतोस.

१० भवनदी–संसाररूपी नदी. हा समास चिंतनीय आहे.

१२ भ्रुकुटी–भोंवई.

१४ न माय–न राहे, न भावे.

१५ चामर–चमर नांवाचे मृग असतात, त्यांच्या शेंपटाच्या चंवऱ्या (चामरें) करतात. यांच्या शेपटांस केसांचा झुवका अथवा गोंडा असतो, तो चंवरी करण्यास फार उपयुक्त असतो.

२० रेवतिरमण–बलराम. ['रेवतीरमणो रामः कामपालो हलायुधः' इत्यमरः.]

२९ बाहतो–बोलावतो.

३२ मातला–माजला, मत्त झाला.

४१ भरीं घातलें–भर घातली, चढवलें, उत्तेजन दिलें.

४४ वधू–स्त्री. ['वधू स्नुषा नवोढा स्त्री वरो जामातृषिंगयोः' इति विश्वः.]

४६ किंकर–किं करोमि कुर्याम् वा इति स्वामिनं पृच्छति इति किंकरः । अथवा कुत्सितं करोति इति. 'काय करूं महाराज' असें विचारणारा सेवादक्ष चाकर याला किंकर म्हणावें. किंवा जो काम नीट करीत नाहीं, कारण चाकरच तो, म्हणूनही त्याला किंकर म्हणावें.

५४ कुंभ–घट. ['कुंभस्तु कुंभकर्णस्य सुते वेश्यासुते घटे । राशिभेदे द्विपाङ्गे च कुंभस्त्रिवृति गुग्गुलौ॥' इति विश्वः.]

५५ तीनतीसकोटिमोचना–तेहतीस कोटी देवानां मुक्त करणाऱ्या.

५९ अनंताचा–अनंत कवीचा.

## सुरथसुधन्वाख्यान.

### प्रसंग पहिला. (पृ० ८२–९४.)

६ मत्सैन्यकीं–माझ्या सैन्यानें किंवा सैनिकांनीं.

११ स्थिरावला–स्थिर झाला.

१२ विसंग–संगरहित–न आलेला.
संगरासि–लढाईला.
शासनोक्ति–आज्ञा.

१३ कटाहतैल–कढईतील तेल.
युग्म–जोडी (दोन).
सजुनि–तयार होऊन.

६८ मुकुलित होतात–मिटतात.

८७ सर्पोपम–सर्पासारखे.

### प्रसंग दुसरा. (पृ० ९४–१०८.)

२६ कुत्सित–कुत्सित.

३० शृणु–ऐक.
न जिणवे–जिंकवत नाहीं.

६७ हितोऽपि–फायदा करणारें देखील.

७३ महीपपुत्र–राजाचा मुलगा.

८५ शीर्ष–मस्तक.

८६ पूत–पवित्र.

८८ पथिं–मार्गांत.
उरग–सर्प. उरानें जाणारा तो 'उरग'.

९५ मदयुत–मदानें युक्त.

९६ वीरशीर्षा–वीराचें मस्तक.

## रामदासस्तुति. (पृ० १०८–१०९.)

१ निर्माणस्थळ–उत्पन्न होण्याचें ठिकाण जन्मस्थान.

२ सज्जन–सज्जनगड.

## निर्वाणषट्क. (पृ० १०९–११०.)

१ बुद्ध्यहंकृति–बुद्धि आणि अहंकृति (अभिमान).
रसना–जीभ, जिव्हा. ['रसना कांचिजिव्हयोः' इति विश्वप्रकाशः.]
अनला–(अनल) अग्नि.

२ पंचप्राण–"वायूचे प्राण, उदान, व्यान, समान व अपान असे पांच भेद आहेत. त्यांपैकीं प्राणवायु डोक्यांत वास करून ऊर व कंठ ह्या स्थानांत संचार करितो. तो बुद्धि, हृदय, इंद्रियें व चित्त यांना धारण करितो व थुंकणें, शिंकणें, ढेंकर देणें, श्वास घेणें व अन्न गिळणें इत्यादि

क्रिया चालवितो. उदान वायूचें स्थान ऊर असून तो नाभि, गळा व नासिका ह्या स्थानांतून संचार करितो; व वाचा, ऐच्छिक क्रिया, उत्साह, बल, वर्ण, स्मृति इत्यादि गोष्टी उत्पन्न करितो. व्यान वायु हृदयांत राहून सर्व शरीरांत संचार करितो. त्याचा वेग फार तीव्र असून चालणें, हस्तादिकांचें आकुंचन व प्रसारण, पापण्या उघडणें व मिटणें इत्यादि सर्व शारीर क्रिया प्रायः त्याजवर अवलंबून आहेत. समान वायु पाचकाग्नि जवळ राहून सर्व कोठ्यांत संचार करितो. अन्नाचें ग्रहण व पचन करितो व त्याचा सत्वांश मलापासून पृथक् करून मलाचें विसर्जन करितो. अपानवायु गुदस्थानीं राहत असून कुल्ले, बस्ति, शिश्न व मांड्या ह्या स्थानांत संचार करितो. व शुक्र, आर्तव, मल, व गर्भ यांना बाहेर काढितो." (गर्देकृत वाग्भट –अष्टांगहृदय, सूत्रस्थान, अध्याय १२ श्लोक ४-९–पृष्ठ १४८ –१४९.)

२ पंचात्मकोशे–(पंचात्मकोश) अन्नमयकोश, प्राणमयकोश, मनोमयकोश, विज्ञानमयकोश, आणि आनंदमयकोश.

सप्तधातू–शरीरांतील सप्तधातु–रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र.

२ पादपाणि–पाय व हात.

५ मृत्युभय–मृत्यूची भीति.

**पदसंग्रह.** (पृ० ११०–११३.)

२ अंकिला–अंकित केला, स्वाधीन करून घेतला.

३ करताळिका–(करतालिका) हाताच्या टाळ्या.

नीरोधनें–(निरोधनें) प्राणायाम करून.

५ मलयमरुत्–मलयसंबंधीं वारा.

सैकतेयतीर–वाळूनें युक्त तीर.

९ गरिमा–मोठेपणा.

**श्रियाळचरित्र.** (पृ० ११४–११६.)

२ नीकी–(निकी) खरी.

६ गोऊनि–(गोंवुनि) गुंतवून.

**आणखी पदें.** (पृ० ११७-१२०.)

१३ पुरजा पुरजा–तुकडे तुकडे.

१४ लुसलुसित–कोंवळा.

# अनंतकृत कवितेंतील अधिक पद्यें.

## गोपीगीत. (पृष्ठें ५५–५६.)

घालूनियां लेंकरुं पाळण्यातें, 'निज नीज बाळा!' म्हणती तयातें।
सप्रेम दोरा मग हालवीती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ १
उठोनियां सुंदरि गोपदारा, काढीत वेगें श्रम केर सारा।
पादांबुजीं पैंजण वाजताती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ २
संमार्जनें शुद्ध करूनि बाळा, धरेवरी रेखिति रंगमाळा।
पायांमधें छुम छुम वाजताती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ३
दळावया बैसलि गोपभामा, देखोनि श्रीकृष्ण····शि कामा।
सांडूनी लज्जा बहुसाल गाती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ४
व्रजांगना यारिति पाक सारा, अर्पूनि श्रीश्याम गणेशदेवा।
जेवूनियां ते नर नारि गाती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ५
घेऊनि पाट्यावरि डाळ वांटी, डोले मदें कंचुकि फार दाटे।
तैं कज्जलाचे श्रमबिंदु येती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ६
गाईसवें जाउनि गोपमेळा, रानांत होतो मग कृष्णमेळा।
पांव्यामध्यें सुंदर वाजवीती, गोविंद दामोदर माधवेति. ॥ ७

## द्रौपदीस्वयंवर. (पृष्ठें ५५–६८.)

६ व्या श्लोकापुढें श्लोकः–

पाशि पाडसें गुंतलीं वनीं, देखतांचि धांव घे कुरंगिनी।
दांति वागवी मांजरी पिलीं, तेंवि तूं आम्हां कृष्णमाउली. ॥ ७

१६ व्या श्लोकापुढें श्लोकः–

दूरि पाहतां दृष्टि गोमती, त्या नराचि हो सृष्टि गोमती।
तींत जो करी प्राणि मार्जना, त्यासि वंदितां सुमुक्ति दुर्जना. ॥ १७
तेंवि गोमतीस्नान सारिलें, रायें जाउनी हरिसि वंदिलें।
देखतां उठोनियां खगध्वजें, क्षेम देतसे नृपा चतुर्भुजें. ॥ १८

५० व्या श्लोकापुढें श्लोकः–

एक ते कढे तैल तापतें, केलें पाहिजे तप्त शीत तें।
तूज अर्पितों मंत्र चाक्षषी, यासि तूं जपोनि भेद लक्ष्य कीं. ॥ ५१

५२ व्या श्लोकापुढें श्लोकः–

आलिंगिले पांडव गोपिनाथें, कुंती म्हणे पांच तुझीं अनाथें ।
तुझाचि तो आश्रय आहे आम्हां, प्रेमें तिला श्रीहरि देत क्षेमा. ॥९३

## गरुडगर्वपरिहाराख्यान. (पृष्ठें ७४–८१.)

३९ व्या श्लोकापुढें ओंवीः–

ऐकोनी दाशरथी हा शब्द । कपी होउनी सद्गद ।
खगा घेउनियां खांदे । नाचे छंदीं आनंदें. ॥ ४०

५१ व्या श्लोकापुढें श्लोकः–

माय चूकतां लेंकरूं झुरे, मीन अंतरीं ऊदका स्मरे ।
पाहे चातक मेघिंच्या जला, तेंवि आठवीं राघवा! तुला. ॥ ९२

५३ व्या श्लोकापुढें श्लोकः–

धेनुतें वनांतरीं राहे सुचित्त कंदरीं
अंड ठेवुनि ते पक्षिणी उडे दिगंबरीं ।
अदग्ध कच्छपी धरूनि वत्स पाहे दृष्टिसी
तेंवि आठवीं कपिविरा रे! तूजशी. ॥ ९४

## रामदासस्तुति. (पृष्ठें १०८-१०९.)

पुढील दोन श्लोक एका पोथींत आढळतात. ते 'रामदासस्तुति' या प्रकरणांतीलच असें समजून येथें दिले आहेत.

सोळाशें वरि तीन दुर्मति पहा संवत्सरा अंतरीं,
माध्यान्हीं शुभ माघ शुद्ध नवमी त्या मंदवारांतरीं ।
रामीं आत्मनिवेदनीं करि वपू, सत्कीर्तिची हे ध्वजा
स्वानंदें स्वसमाधि सज्जनगडीं श्रीरामदासा भजा. ॥ १
काया सुंदर गौरवर्ण विलसे भाळीं अवाळूं असे,
पादूकांवरि शेष शोभत असे दोहींकडे आरसे ।
माथां मंदिल दिव्य शोभत बरा फेटा दुपेटा बरा,
ऐसा सद्गुरु तो अनंतकविचा जो निस्पृहांचा तुरा. ॥ २

# अनंतकविकृत कवितेचें शुद्धिपत्र.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| | **सीतास्वयंवर.** | | |
| ३ | अहल्या करीं | अहल्याकरीं | १ |
| ४ | प्राप्त होईल रामा! | प्राप्त होईल रामा!' | ,, |
| ७ | महासुक्त माध्येम | महासूक्त माध्यम | ,, |
| ११ | प्रधाना सवें | प्रधानासवें | २ |
| १२ | सावधा | सावध | ,, |
| २३ | आटकाट | आटोकाट | ३ |
| ४१ | मणवंधीं | मणिबंधीं | ५ |
| ४३ | आधींले | आधीं ले | ,, |
| ४४ | त्रैलोक्य मोलागलें | त्रैलोक्यमोलागळें | ६ |
| ४५ | राकडि | राखडि | ,, |
| ४६ | तिशी | तिशीं | ,, |
| ५७ | उठले | ऊठले | ७ |
| ५९ | असें | असे | ,, |
| ६० | म्या | म्यां | ,, |
| ६६ | मज परीस | मजपरीस | ८ |
| ७८ | फरफरां, | फरफरा.' | ९ |
| ,, | परपरा' | परपरा | ,, |
| ८० | उलाळे | उलाळें | १० |
| १०२ | चंद्रजोती | चंद्रज्योती | १३ |
| १०६ | न नमी | न नमीं | ,, |
| १०९ | केलें | केला | १४ |
| ११० | द्विजवरा! | द्विजवरा! | ,, |
| | **सुलोचनाख्यान.** | | |
| ३ | शशांकवदने! | शशांकवदने! | १५ |
| ७ | नमी | नमीं | ,, |
| १० | दुरितें दुष्कर्म विध्वंसना | दुरितें दुष्कर्मविध्वंसना | १६ |
| १४ | (टीप १८) रावणाचा पत्र. | रावणाचा पुत्र | ,, |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ३४ | (टीप ५) भयंकर' | भयंकर. | १९ |
| ४१ | (टीप ३) ळशा भयानें | अशा भयानें | २० |
| ४५ | मिथ्यात्व | मिथ्यत्व | २१ |
| ७३ | अनंतकविता | अनंत कविता | २५ |
| ७४ | राघवक्रुपे | राघवक्रुपें | ,, |

## अहिमह्याख्यान.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २ | वागेश्वरीं! वाजविं | वागेश्वरी वाजवि | ,, |
| ,, | रिजे | करि जे | ,, |
| ६ | भ्रातु | भात्रु | २७ |
| २९ | स्वमुखें | मुखें | २८ |
| ३२ | आणी | आणीं | ,, |
| ५५ | सद्गदकंठ | सद्गदकंठ | ३१ |
| ६६ | अशुद्रांचे | अशुद्रांचे | ३२ |
| ८३ | मंचकापासुनी मही | मंचका पासुनीमही | ३४ |

## कुशलवाख्यान.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ५ | वाजीं गजारुढ रथीं | वाजीगजारुढ रथी | ३६ |
| ३४ | अवनी | अवनीं | ३९ |
| ,, | साध्यविद्या | साध्य विद्या | ४० |
| ३९ | त्यजी | त्यजीं | ,, |
| ५५ | स्वकरे | स्वकरें | ४२ |
| ७९ | काकुलती | काकुळती | ४८ |
| ९६ | पूर्वींचें | 'पूर्वींचें | ५४ |

## गोपीगीत.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | प्रणम्य | प्रणाम | ५५ |
| ६ | जाई | जाई | ,, |
| ११ | जातें | जांतें | ५६ |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ११ | घर्मार्थबिन्दु | घर्मार्थ बिंदु | ५६ |
| १३ | तंदुलातें | तंदुलांतें | ,, |
| १७ | करी | करीं | ,, |
| ,, | मोहरीया | मोहरी या | ,, |

## द्रौपदीस्वयंवर.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २४ | मूपांतरीं | भूपांतरीं | ६० |
| २५ | पसरे जनीं | नगरींहुनी | ,, |
| ४० | धांवाति | धांवति | ६२ |
| ६६ | टाकिती | टाकितो | ६४ |

## गजगौरीव्रताख्यान.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १९ | देखिलें | देखिलें | ७१ |
| २५ | सिद्ध अंस | 'सिद्ध असें | ७२ |
| ३४ | जाणिजे | जाणिजे.' | ७३ |
| ४४ | सत्काव्यश्रवणें करूनि श्रवणे | सत्काव्य श्रवणेंकरूनि श्रवणें | ७४ |

## गरुडगर्वपरिहाराख्यान.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ५० | अकाल | 'अकाल | ८० |
| ५९ | अनंताचों | अनंताचा | ८१ |

## सुरथसुधन्वाख्यान.

(प्रसंग पहिला)

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १२ | जिवागला | जिवागळा | ८३ |
| १३ | युग्म हस्तकें | युग्महस्तकें | ,, |
| १९ | वक्षी लक्षीं | वक्षीं लक्षी | ८५ |
| २० | कटी | कटीं | ,, |
| २१ | व्यंग | व्यंग्य | ,, |
| २२ | राहिलासी | राहिलासि | ,, |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २६ | धीर तो | धीर तों | ८५ |
| २९ | उमजे | उमजें | ८६ |
| ४१ | कढाहीं | कटाहीं | ८७ |
| ४२ | घालितो | घालितों | ,, |
| ४४ | सुत | ‘सुत | ८८ |
| ५० | मृत्युभे | मृत्युभें | ८९ |
| ७४ | हावे वरी | हयावरी | ९२ |
| ८१ | प्रेरि | प्रेरिं | ,, |
| ८२ | यज्ञस्वी | यशस्वी | ९३ |
| ८५ | दावी | दावीं | ,, |
| ९२ | अतितोमरांचें | अतितोमरांचे | ९४ |
| ९३ | परिघे | परिघें | ,, |

(प्रसंग दुसरा.)

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ५ | विभेदिले | विभेदिलें | ९५ |
| ७ | असुराधीश | असुराधीश | ,, |
| ,, | मुख | सुख | ,, |
| २४ | या क्षणी | या क्षणीं | ९८ |
| ४१ | पहिलें शरें तेहि | पहिले शरें तेंहि | १०० |
| ४२ | ते दृढ | तें दृढ | ,, |
| ,, | म्या | म्यां | ,, |
| ,, | ऐकुनी | ऐकुनि | ,, |
| ४३ | अर्जुन सायक | अर्जुनसायक | ,, |
| ,, | पराक्रमिं हा निरखी | पराक्रमि हा निरखीं | ,, |
| ६४ | पाहूं | पाहू | १०३ |
| ६६ | स्थीर व्हावें; | स्थीर व्हावें.’ | १०४ |
| ७१ | देखिलें | देखिले | ,, |
| ७६ | निरखि | निरखिं | १०५ |
| ८४ | ते पडे | तें पडे | ,, |
| ८८ | नव्हे | नव्हें | १०६ |
| ९० | ५० | ९० | ,, |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ९२ | पाहे | पाहें | १०६ |
| ९३ | आणि रे! | आणिं रे! | ,, |

## निर्वाणषट्क.

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पाही धर्म | पाहें धर्म | ११० |
| ६ | मूर्तीषड्डुर्मी | मूर्तीषड्डूर्मी | ,, |

## पदसंग्रह.

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | भवभ्रांतिदिग्मंडळीं | भवभ्रांति दिग्मंडळीं | १११ |
| ७ | आम्हावरते | आम्हावरती | ११३ |
| ८ | ज्याया | जाया | ,, |
| ९ | मानसी | मानिसी | ,, |

## श्रियाळचरित्र.

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पावन | पावन हे | ११४ |
| ,, | आठविती | आठवते | ,, |
| ,, | वर्त | वर्ते | ,, |
| ४ | तसे | तसें | ,, |
| ६ | गोंगान | घोंघाण | ,, |
| ,, | नेघे | नेघें | ,, |
| ९ | दिधले | दीधलें | ११५ |
| १० | क्षम | क्षेम | ,, |
| १७ | सूर्यवंशी | सूर्यवंशीं | ,, |

## आणखी पदें.

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | व्रिजनिया | विजनिं या | ११८ |
| ,, | कामी | कामहि | ,, |
| १२ | साधी | साधीं | ,, |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १४ | सन्निद्ध | सन्निध | ११९ |
| ,, | दाखवी | दाखवीं | १२० |
| ,, | श्रीपति बा! हो! | श्रीपति बाहो | ,, |

## सुलोचनागर्हिवर.

(प्रसंग पहिला.)

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ८ | हे देखुनी | हें देखुनी | १२२ |
| ९ | कपिची | कपिचीं | ,, |
| १० | तेचि | तेंचि | ,, |
| ११ | पूर्णागमी | पूर्णागमीं | ,, |
| ,, | धाके कापला | धाकें कांपला | ,, |
| १५ | देवरासीं | दे वरासीं | १२३ |
| ,, | देवराशी | देवराशीं | ,, |
| १८ | शाम तुझें विलोकी | श्याम तुझें विलोकीं | ,, |
| २० | नुमजेचि बाकी | नुमजेचि बा! कीं | ,, |
| ,, | वधितसे इजलागिं पाहे | वधितसें तुजलागिं पाहें | ,, |
| २४ | जाता | जातां | १२४ |
| २८ | तद्वद | तद्वत | ,, |
| ३० | प्रलें पडे | प्रलों पडे | १२५ |
| ३७ | शाकिनि वरा वरणू | शाकिनिवरा वरणूं | १२६ |
| ,, | मूतिमंते | मूर्तिमंतें | ,, |
| ४० | दुर्गधिमांसजलता | दुर्गंधि मांस जळतां | ,, |
| ४१ | मखतोंडीं | मखतुंडीं | ,, |
| ४३ | सारथि या | सारथिया | ,, |
| ४४ | करु गोत्रा | करुं गोत्रा | ,, |
| ४५ | स्वग्रामसीमें | स्वग्रामसीमीं | ,, |
| ४६ | रथी | रथीं | १२७ |
| ५१ | आयुधा ते | आयुधातें | ,, |
| ५३ | लक्ष कोंडी | लक्षकोडी | १२८ |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| | (प्रसंग दुसरा.) | | |
| ५ | चंडकोदंडबाणीं | चंडकोदंडबाणी | १२९ |
| ,, | मांडिले | मांडिलें | ,, |
| २१ | प्रत्यक्ष हे | प्रत्यक्ष हा | १३१ |
| २२ | सांगता | सांगतां | ,, |
| ,, | तें भोगितां | ते भोगितां | ,, |
| ,, | हे निदार्जी | हें निदार्नी | ,, |
| ,, | साहे | साहें | ,, |
| २३ | सम ते विभागी | सम तो विभागीं | ,, |
| ३४ | दाटली वाद्य घोषें | दाटलीं वाद्यघोषें | १३२ |
| ३५ | भूत फौजा | भूतफौजा | ,, |
| ३८ | वाराह दाट–फणि मान | वाराहदाढ–फणिमान | १३३ |
| ४० | तेजांभेटी | तेजां भेटी | ,, |
| ,, | वन्ही वन्हीते | वन्ही वन्हीतें | ,, |
| ,, | तसी | तसीं | ,, |
| ५६ | जिव्हारीं शर भेदिते | जिव्हारीं शर भेदितां | १३५ |
| ५८ | वेचिले | वेंचिलें | १३६ |
| ६५ | तो आला | तों आला | १३७ |
| ६७ | आकाशिचें पोकळीं | आकाशिंचे पोकळी | ,, |
| | (प्रसंग तिसरा.) | | |
| २ | पावले | पावलें | १३९ |
| ,, | राहिले धड उभे | राहिलें धड उभें | ,, |
| १२ | हस्तपद्मी | हस्तपद्मीं | १४० |
| १३ | सायकाची | सायकांचीं | ,, |
| १४ | न जाणे | न जाणें (किंवा) न जाणों | ,, |
| १५ | काळीज | काळिज | १४१ |
| ,, | न जाणे ब्रह्यानें | न जाणें ब्रह्यानें | ,, |
| १९ | रक्षिजे त्यास | रक्षिजे त्यांस | १४२ |
| २३ | वाहे | वाहे | ,, |
| २५ | माते?' | मातें?' | १४३ |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २५ | लोके | लोकें | १४३ |
| २७ | स्फुंदस्फुंदो | स्फुंदस्फुंदे | ,, |
| ३० | विधिचे | विधिचें | ,, |
| ३५ | विचारी | विचारीं | १४४ |
| ३७ | मन धरू | मन धरूं | ,, |
| ३९ | हे बोलतां | हें बोलतां | ,, |
| ४० | वांची सती | वाची सती | ,, |
| ४२ | करू | करूं | १४५ |
| ४४ | रथा यज्ञि लागी यजी | रथालागिं यज्ञीं यजीं | ,, |
| ४७ | परीं खंति | परी खंति | ,, |
| ५४ | नामें प्रताप | नामीं प्रताप | १४६ |
| ५६ | ते मर्कटीं—नेलें | तें मर्कटीं—नेलें | १४७ |
| ६१ | भांडारे धरपूरते | भांडारीं धनपूर ते (किंवा) धन पूरतें | १४८ |
| ६४ | सति मुखा | सति मुखा | ,, |
| ,, | सुखे निववी ते | सुखें निरवीते | ,, |
| ६५ | पांखरांणीं | पांखरांनीं | ,, |

(प्रसंग चवथा.)

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ११ | पीटिले | पीटिलें | १५० |
| १२ | मंदोदरीप्रमुख मंडण मंदिराचे | मंदोदरी प्रमुख मंडन मंदिराचें | ,, |
| ,, | दशकंधराचे | दशकंधराचें | ,, |
| १६ | होतां | होता | ,, |
| २० | त्या शोक—भवतां | तो शोक—भंवता | १५१ |
| २२ | न ढळें ते | न ढळे तें | ,, |
| २८ | वाचति | वांचति | ,, |
| ,, | ज्याचे | ज्याचे | ,, |
| ३८ | चाले अगे! | चालें अगे! | १५२ |
| ४१ | चडले | चढले | १५३ |
| ४२ | वरितीं मज | वरतीं मज | ,, |
| ४३ | कोटी | कोडी | ,, |

| द्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ४५ | आणि | आणिं | १५३ |
| ४८ | न धरी | न धरीं | ,, |
| ५१ | आप्त पाही | आप्त पाहीं | १५४ |
| ६० | खोचले स्तब्ध रावे | खोंचला स्तब्ध रावो | ,, |
| ,, | सिद्धि जावें | सिद्धि जावो | ,, |
| ६३ | विस्में (=विस्मयानें) | विस्मेँ (=आश्चर्य) | १५५ |

(प्रसंग पांचवा.)

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | कटाक्षछटांचा | कटाक्षच्छटांचा | १५७ |
| ७ | ते मंदहास्यें | तें मंदहास्यें | ,, |
| ,, | न पोचे | न पोंचे | ,, |
| १३ | असी चामरे | असीं चामरें | ,, |
| १७ | राघवाचें | राघवाचे | १५८ |
| १८ | न करी | न करीं | ,, |
| २३ | हे स्थूळरूप विभुचे | हें स्थूळरूप विभुचें | ,, |
| २८ | पुरवि अशा | पुरविं अशा | १५९ |
| ३२ | तया सगें | तयासंगें | ,, |
| ३३ | लावी | लावीं | १६० |
| ,, | निरसि | निरसिं | ,, |
| ३५ | दृष्टी. | दृष्टी.’ | ,, |
| ३९ | आगिटी | आगटी | ,, |
| ४० | वाचलें | वांचलें | ,, |
| ४६ | नाटवे | नाटवें | १६१ |
| ५१ | दिले | दिलें | ,, |
| ५२ | चडतां | चढतां | ,, |
| ५३ | नाकींबरे | नाकीं वरे | १६२ |
| ५५ | हे गोत | हें गोत | ,, |
| ५६ | कांहिंच | कांहींच | ,, |
| ५८ | हे न साहे | हें न पाहे | ,, |
| ,, | शौचकर्मी | शौचकर्मीं | ,, |
| ६४ | असें | असे | १६३ |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ६८ | करिता | करितां | १६४ |
| ७७ | धणाणी | ददाणी | १६५ |
| ८० | पाही | पाहीं | ,, |
| ८८ | ऐसी सती | ऐसी सती.' | १६८ |
| ९० | आली | आलीं | ,, |

## बभ्रुवाहनाख्यान.

| | | | |
|---|---|---|---|
| २ | त्रि खंडुनि | त्रिखंडुनि | १६९ |
| ६ | कार्मुकि (=धनुर्धर) | कार्मुक (=बाण) | ,, |
| ७ | कलेवरि | कलेवरिं | ,, |
| ९ | भूमीं | भूमिं | ,, |
| १० | सावळे विण | सायकें वीण | १७० |
| १२ | मग मूपें | मग भूपें | ,, |
| १७ | प्रथम चरण सर्वः– | गजाननाशिं हस्ति अश्व लावुनी हलाकृती | १७१ |
| ,, | करी कपोल मौक्तिकें | करीकपोलमौक्तिकें | ,, |
| १८ | बहुत | बहूत | ,, |
| १९ | शिर | शर | ,, |
| ,, | विभेदीले…ते अग्र…डे | विभेदीलें…तें अग्रच उडे | ,, |
| २४ | घाणाग्र | घ्राणाग्र | १७२ |
| ४६ | निजपुरि | निजपुरिं | १७४ |
| ५० | शशि सूर्यवंशि | शशिसूर्यवंशि | १७५ |
| ,, | रुचिराद्धती | रुचिराकृती | ,, |
| ५६ | प्रळयींचा | प्रळयिंचा | १७६ |
| ५८ | पदीं | पदी (=पायदळ) | ,, |
| ,, | पार्थ…च्चय | पार्थ संचय (?) | ,, |
| ६६ | त्याजपासून | त्याजपासुन | ,, |
| ६८ | पूर्वी | पूर्वि | १७७ |
| ७६ | वृषध्वजीष | वृषध्वज समीप | ,, |
| ९१ | लेववी | लेववीं | १७९ |
| ९५ | नेली | गेली | ,, |

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
| --- | --- | --- | --- |
| ९६ | सुदुःखेंचि धांवे | सुदुःखेंचि पावे | १७९ |
| ९७ | अंवु नेत्रें | अंवुनेत्रें | ,, |
| ,, | घालिती | घालि ती | ,, |
| ९८ | असे पूर्ण | नसे पूर्ण | ,, |

## पदसंग्रह.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
| --- | --- | --- | --- |
| १६ | सायास कशाया | सायास कशा या | १८२ |
| ,, | मारा कर | माराकुल | ,, |
| ,, | माराब्धि उतारा | माराब्धिउतारा | ,, |
| १७ | कवळाचें | कवळावें | १८३ |
| १८ | कंवुधरणा | कंवुधरण | ,, |
| १९ | पाढी | पाडीं | ,, |
| ,, | कधिं भेट | कधिं वेठ | १८४ |

## पाळणे.

| पद्य. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
| --- | --- | --- | --- |
| २ | तिन बाणी | तिनवाणीं | १८६ |
| ,, | वोहडी | वोढी | ,, |

# पदांची सूची.



| पदसंख्या. | पदारंभ. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | आश्रय तवचरणाचा गजवदना .... .... .... .... | ११८ |
| २ | उठीं उठीं वो! जगदंबे!.... .... .... .... .... | १८७ |
| ३ | उद्धवा या मथुरेसी कोणी तरि .... .... .... .... | ११३ |
| ४ | कोठुनि रे अधमा निशिमा .... .... .... .... | ११३ |
| ५ | जो जो जो बाळा नको रडूं .... .... .... .... | १८५ |
| ६ | जो जो जो जो रे मधुसूदना .... .... .... .... | १८६ |
| ७ | निशिदिनिं मुखिं गा रे गा रे! .... .... .... .... | १८३ |
| ८ | प्रावन नाम कशाला धरिलें .... .... .... .... | १८४ |
| ९ | प्रात:समय उठ जनकनंदिनी .... .... .... .... | १८८ |
| १० | भजन तव गजवदना मजला .... .... .... .... | १८२ |
| ११ | भोळा शंभू भक्ताच्या शोधितसे .... .... .... .... | ११४ |
| १२ | मनुजा राम भजावा रे! .... .... .... .... .... | ११८ |
| १३ | म्हणुनी आळविजे गोकुळपाळा .... .... .... .... | १८२ |
| १४ | मी झाडविणार गुरुचा .... .... .... .... .... | १८३ |
| १५ | रसने नीलनीरद सुंदर .... .... .... .... .... | ११३ |
| १६ | राधेच्या गृहीं होतो सोहाळा .... .... .... .... | १८४ |
| १७ | वृंदावनवासी कोठें गुंतला (अपूर्ण) .... .... .... | ११२ |
| १८ | ,, ,, (पूर्ण) .... .... .... | ११९ |



१. अनंतकवीच्या कवितासंग्रहांत छापलेल्या पदांपैकीं १,२,३,४,१०,१२ व १७ हीं पदें रंगनाथकृत आहेत. पद ५ वें हें विठ्ठलकृत आहे. हीं पदें चुकीनें अनंताच्या पदसंग्रहांत छापिलीं गेलीं.